# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# तौलनिक साहित्याभ्यास

**एम. ए. भाग २ : मराठी**

**सत्र ३ : अभ्यासपत्रिका क्र. १२.२**

**सत्र ४ : अभ्यासपत्रिका क्र. १६.२**

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**तौलनिक साहित्याभ्यास**
एम.ए.भाग २ : मराठी
अभ्यासपत्रिका क्रमांक १२.४ व १६.४
२०१९ पासून होणाऱ्या परीक्षांसाठी

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२०
एम. ए. भाग-२ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-93-89327-66-3

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४. (भारत)

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### सल्लागार समिती


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

■ **अभ्यासमंडळ : मराठी** ■

अध्यक्ष : **डॉ. दत्तात्रय मल्लू पाटील**
डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

- **प्रा. (डॉ.) रणधीर शिंदे**
  मराठी विभागप्रमुख,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
  सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा
- **डॉ. शहाजी जगन्नाथ पाटील**
  पद्मभूषण वसंतरावदादा पाटील कॉलेज, तासगाव,
  जि. सांगली
- **डॉ. सुभाष गणपती जाधव**
  दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
  इचलकरंजी, जि. कोल्हापूर
- **प्रा. डॉ. प्रभाकर पवार**
  मुधोजी कॉलेज, फलटण, जि. सातारा
- **प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण**
  श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर
- **डॉ. अरुण कृष्णा शिंदे**
  नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर
- **डॉ. उदय रामचंद्र जाधव**
  शहाजीराजे महाविद्यालय, खटाव, जि. सातारा
- **प्रा. (डॉ.) दासू वैद्य**
  मराठी विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा
  विद्यापीठ, औरंगाबाद
- **डॉ. नंदकुमार विष्णू मोरे**
  मराठी विभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्रा. (डॉ.) गोपाळ ओमाणा गावडे**
  महावीर महाविद्यालय, कोल्हापूर
- **श्री. के. एस. अटकरे**
  कैलास पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद

# संपादकीय

'तौलनिक साहित्याभ्यास' ही अभ्यासपत्रिका एम. ए. भाग-२ च्या सत्र-३ साठी आहे. या अभ्यासपत्रिकेमध्ये १. तौलनिक साहित्याभ्यास : संकल्पना व स्वरूप, २. तौलनिक साहित्याभ्यासाचे मूलभूत आधार, ३. तौलनिक साहित्याभ्यासाची वैशिष्ट्ये, ४. तौलनिक साहित्याभ्यासाच्या दिशा/शोधक्षेत्रे; तसेच 'तौलनिक साहित्याभ्यास' ही अभ्यासपत्रिका एम. ए. भाग-२ सत्र-४ साठी आहे. या अभ्यासपत्रिकेमध्ये १. तौलनिक साहित्यातील विविध संप्रदाय, २. वाङ्मयीन प्रभाव (उद्‌गम), ३. वाङ्मयीन प्रभाव, ४. तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्त्व इत्यादी घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. प्रस्तुत स्वयं अध्ययन साहित्यामध्ये अभ्यासक्रमासाठी नियुक्त कलाकृतींचे घटकनिहाय लेखन केलेले आहे. प्रत्येक घटकाचे लेखन अभ्यासपूर्णरीतीने व आकलनसुलभ भाषेत केलेले आहे. घटकाच्या प्रारंभी उद्दिष्टे नमूद केलेली असून उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रस्तुत घटकलेखनातील विषय-विवेचन व मूल्यमापन आपणास दिशादर्शक आहे. अभ्यासक्रमासाठी नियुक्त केलेल्या पुस्तकांचा आशय व्यापक असून त्यांचा सूत्रबद्ध आढावा घेण्याचा प्रयत्न घटकलेखनामध्ये केलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये काही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटकलेखकांनी जे परिश्रम घेतले. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

■ **संपादक** ■

**प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय,
सातारा

**प्रा. विष्णू वासमकर**
'दत्तब्रह्म' विकास कॉलनी, वारणालीच्या उत्तरेस,
विश्रामबाग, सांगली

| दूरशिक्षण केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ,<br>कोल्हापूर | **तौलनिक साहित्याभ्यास**<br>एम.ए.भाग २ : मराठी<br>अभ्यासपत्रिका क्रमांक १२.२ व १६.२ |
|---|---|

**अभ्यास घटकांचे लेखक**

| **लेखक** | **घटक क्रमांक आणि शीर्षक** |
|---|---|
| **सत्र तिसरे : अभ्यासपत्रिका क्रमांक १२.२ : तौलनिक साहित्याभ्यास** | |
| **प्रा. डॉ. सौ. मानसी लाटकर**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | **१. तौलनिक साहित्याभ्यास : संकल्पना व स्वरूप** |
| **प्रा. डॉ. नितीश सावंत**<br>जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर | **२. तौलनिक साहित्याभ्यासाचे मूलभूत आधार** |
| **प्रा. विठ्ठल नामदेव रोटे**<br>मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव | **३. तौलनिक साहित्याभ्यासाची वैशिष्ट्ये** |
| **डॉ. भरत भिमराव जाधव**<br>कला व वाणिज्य महाविद्यालय, यादोगोपाळपेठ, सातारा<br>**प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे**<br>सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा | **४. तौलनिक साहित्याभ्यासाच्या दिशा** |
| **सत्र चौथे : अभ्यासपत्रिका क्रमांक १६.२ : तौलनिक साहित्याभ्यास** | |
| **प्रा. डॉ. नितीश सावंत**<br>जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर | **१. तौलनिक साहित्यातील विविध संप्रदाय** |
| **प्रा. डॉ. भरत भिमराव जाधव**<br>कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा | **२. वाङ्मयीन प्रभाव (उद्गम)** |
| **प्रा. डॉ. अशोक तवर**<br>लाल बहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स, सातारा | **३. वाङ्मयीन प्रभाव** |
| **प्रा. डॉ. तातोबा बदामे**<br>पी.डी.व्ही.पी. महाविद्यालय, तासगाव | **४. तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्त्व** |

**■ संपादक ■**

**प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय,
सातारा

**प्रा. विष्णू वासमकर**
'दत्तब्रह्म' विकास कॉलनी, वारणालीच्या उत्तरेस,
विश्रामबाग, सांगली

# अनुक्रमणिका

## सत्र तिसरे : अभ्यासपत्रिका क्रमांक १२.२
## तौलनिक साहित्याभ्यास

| | | |
|---|---|---|
| **घटक १** | **तौलनिक साहित्याभ्यास : संकल्पना व स्वरूप** | **१** |
| **घटक २** | **तौलनिक साहित्याभ्यासाचे मूलभूत आधार** | **१८** |
| **घटक ३** | **तौलनिक साहित्याभ्यासाची वैशिष्ट्ये** | **३०** |
| **घटक ४** | **तौलनिक साहित्याभ्यासाच्या दिशा/शोधक्षेत्रे** | **५०** |

## सत्र चौथे : अभ्यासपत्रिका क्रमांक १६.२
## तौलनिक साहित्याभ्यास

| | | |
|---|---|---|
| **घटक १** | **तौलनिक साहित्यातील विविध संप्रदाय** | **९३** |
| **घटक २** | **वाङ्मयीन प्रभाव (उद्‌गम)** | **१०७** |
| **घटक ३** | **वाङ्मयीन प्रभाव** | **१२७** |
| **घटक ४** | **तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्त्व** | **१५६** |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहित होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहित. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

सत्र–३ : घटक–१

# तौलनिक साहित्याभ्यास : संकल्पना व स्वरूप

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ तौलनिक साहित्याभ्यासाच्या उदयाची युरोपातील पार्श्वभूमी

१.२.२ तेनची त्रिसूत्री

१.२.३ तौलनिक साहित्याभ्यासाच्या उदयाची भारतातील पार्श्वभूमी

१.२.४ तुलना : संकल्पना

१.२.५ मित्शेलचे तुलनेविषयीचे तीन सिद्धान्त

१.२.६ तुलना आणि साहित्यव्यवहार

१.२.७ तौलनिक साहित्याभ्यास : संकल्पना

१.२.८ तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप

१.२ समारोप

१.४ स्वयं–अध्ययन प्रश्न व उत्तरे

१.५ सरावासाठी स्वाध्याय

१.६ उपक्रम

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


## १.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्र–मैत्रिणींनो, या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हाला पुढील गोष्टी साध्य होतील.

१. तौलनिक साहित्याभ्यास या अभ्यासपद्धतीचा परिचय होईल.

२. या अभ्यासपद्धतीचा उदय व विकास लक्षात येईल.

३. या अभ्यासपद्धतीची संकल्पना व स्वरूप लक्षात येईल.

४. या अभ्यासपद्धतीचे प्रयोजन व महत्त्व लक्षात येईल.

५. तुमची साहित्यविषयक जाणीव विकसित होईल.

६. मानवी जीवनाच्या वैश्विक एकात्मतेची जाणीव विकसित होईल.

## १.१ प्रास्ताविक

तौलनिक साहित्याभ्यास ही आधुनिक काळातील एक महत्त्वाची अभ्यासपद्धती आहे. तिलाच तुलनात्मक अभ्यासपद्धती असेही म्हटले जाते. Comparative Literary Studies या इंग्रजी संज्ञेचे ते मराठी भाषांतर आहे. तौलनिक साहित्य हे या संज्ञेचे संक्षिप्त रूप आहे. या अभ्यासपद्धतीची संकल्पना, तिचा उदय कुठे, केव्हा आणि कसा झाला, तिचे स्वरूप आणि उद्दिष्टे या गोष्टी आपल्याला या घटकामध्ये समजावून घ्यायच्या आहेत. जगभर काही विशिष्ट सांस्कृतिक परिस्थितीमुळे तुलनात्मक दृष्टिकोनातून साहित्याचा अभ्यास करण्याची निकड प्रथम निर्माण झाली. ती पूर्ण करण्यासाठी विविध भाषांतील साहित्याचा असा तौलनिक अभ्यास करण्यात आला. त्यानंतर या पद्धतीची संकल्पना, स्वरूप व उद्दिष्टे याबाबत चर्चा झाली, असे दिसते. म्हणून सर्वप्रथम विविध सांस्कृतिक पार्श्वभूमींवर या पद्धतीचा उदय आणि विकास कसा झाला, हे समजावून घेणे योग्य ठरेल.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ तौलनिक साहित्याभ्यासाच्या उदयाची युरोपातील पार्श्वभूमी

तौलनिक साहित्याभ्यासाचा उगम युरोपमधील इतिहासातील सामाजिक घडामोडींमध्ये आहे. म्हणून या घडामोडी समजावून घेणे आवश्यक आहे. १४ व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंतच्या काळाला युरोपातील प्रबोधन युग असे म्हटले जाते. कारण या काळात तेथे मोठे सामाजिक परिवर्तन घडले. मध्ययुगीन युरोपमध्ये समाजावर धर्मगुरु आणि सरदार-उमराव यांचे वर्चस्व होते. ते जे सांगतील ते लोकांना मान्य करावे लागे. ही स्थिती हळूहळू बदलली. याचे कारण इमन्यूएल कांट, जॉन लॉक, माँटेस्क्यू, वॉल्टेअर, रुसो, अशा अनेक तत्वचिंतकांच्या समाजप्रबोधनातून तेथे मोठी समाजजागृती झाली. धर्मगुरू, सरदार-उमराव यांच्याइतकेच सामान्य माणसालाही महत्त्व आहे, ही जाणीव तेथील समाजाला झाली. व्यक्तिवाद, बुद्धिप्रामाण्यवाद, विज्ञाननिष्ठा इ. मूल्यांचा पुरस्कार करण्यात आला. या प्रबोधनाने जगाला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या कल्याणकारी मूल्यांची भेट दिली. त्याचा परिणाम म्हणून सुमारे १८ व्या शतकात युरोपात समाजातील जास्तीत जास्त घटकांच्या प्रतिभेचा विकास होण्यास अनुकूल असे वातावरण तयार झाले. साहित्य, चित्र, शिल्प इ. कलांमध्ये सामान्य माणूस हा केंद्रस्थानी आला. प्रयोगशीलता आणि विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनामुळे पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, शरीरशास्त्र

इ विषयांमध्ये नवनवीन शोध लागले. वाफेची शक्ती, विद्युतशक्ती इ.च्या शोधामुळे वाहतूक व दळणवळण क्षेत्रात गतिमानता आली. विविध यंत्रांच्या शोधामुळे उत्पादनाचा वेग वाढला. उत्पादनात प्रचंड वाढ झाली. व्यापारामध्ये मोठी स्पर्धा निर्माण झाली. नवीन बाजारपेठेचा शोध आणि कच्च्या मालाची गरज या कारणांनी युरोपियन राष्ट्रे आशिया व आफ्रिका या खंडांकडे वळली. आधुनिक शस्त्रांचाही शोध लागला. त्यातून युरोपियन राष्ट्रांची साम्राज्यविस्ताराची महत्त्वाकांक्षा वाढली.

या सर्व घडामोडींचा साहित्याभ्यासावरही परिणाम झाला. सर्वप्रथम ग्रीक आणि रोमन या अभिजात साहित्याचा आणि लोकभाषेतील लिखित व मौखिक साहित्याचा तौलनिक अभ्यास सुरू झाला. एका दृष्टीने ही साहित्याच्या क्षेत्रातील प्रस्थापित अभिजनांच्या आणि नव्याने आपली खास ओळख निर्माण करू इच्छिणाऱ्या बहुजनांच्या साहित्याची तुलना होती. उदाहरणार्थ १८ व्या शतकात जॉन ड्रायडनने "Essay on Dramatic Poesy" या आपल्या निबंधात फ्रेंच आणि इंग्लिश नाटकांची तौलनिक चर्चा केली. १९ व्या शतकात मादाम स्टेल या फ्रेंच विदुषीने फ्रेंच व जर्मन साहित्याचा तौलनिक विचार केला. अशा प्रकारे युरोपात तौलनिक साहित्याभ्यासाला सुरुवात झाली. याबाबत आद्यत्वाचा मान कोणाचा याविषयी अनेक मते आहेत. वसंत बापट यांच्या मते या पद्धतीचा प्रथम पुरस्कर्ता इटालियन कवी दांते हा होय. निशिकांत मिरजकरांच्या मते जॉन ड्रायडनने या अभ्यासशाखेचा पाया घातला. म्हणून त्याला 'तौलनिक साहित्याचा जनक' म्हटले जाते. फ्रेंच समीक्षकांची धारणा आहे की, मादाम स्टेल यांनी केलेला तौलनिक साहित्यविचार हीच या अभ्यासपद्धतीचा युरोपमधील प्रारंभ होय.

मात्र 'तौलनिक साहित्य' या संज्ञेचा वापर प्रथम मॅथ्यू अर्नोल्ड यांनी इ.स. १८४८ मध्ये आपल्या बहिणीला लिहिलेल्या अनौपचारिक पत्रात केला असून याबाबत अभ्यासकांमध्ये दुमत नाही. या पद्धतीची तत्त्वे, व्याप्ती आणि कार्यपद्धती याबाबतची शास्त्रीय मांडणी हुत्सेसन मेकॉले पोज्नेट यांनी इ. स. १८८६ मध्ये "Comparative Literature" या ग्रंथातील आपल्या "The Science of Comparative Literature" या लेखात केली. याच काळात फ्रेंच समीक्षक आणि इतिहासकार हिपोलिट ॲडॉल्फ तेन (Hippolyet Adolphe Taine) यांनी इ. स. १८६३ मध्ये एक सिद्धान्त मांडला. या सिद्धांताच्या माध्यमातून साहित्याच्या समाजशास्त्रीय अभ्यासाचा पाया घालण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केले. त्यांचा हा सिद्धान्त 'तेनची त्रिसूत्री' म्हणून महत्त्वाची मानली जाते. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये साहित्यकृतीच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीला अत्यंत महत्त्वाचे स्थान असल्यामुळे तेन यांचा हा सिद्धांत या अभ्यासाला पूरक ठरला. त्यामुळे हा सिद्धांत या ठिकाणी सविस्तरपणे पाहणे संयुक्तिक ठरेल.

## १.२.२ तेनची त्रिसूत्री

व्यक्तिचे खाजगी जीवन आणि सामाजिक जीवन यात परस्परसंबंध असतो. साहित्यिक हा सुद्धा

समाजाचा एक घटक असतो. तो ज्या साहित्याची निर्मिती करतो, त्या साहित्याचे माध्यम म्हणून वापरली जाणारी भाषा समाजनिर्मित असते. सामाजिक वास्तव हे त्या साहित्याचे आशयद्रव्य असते. साहित्यनिर्मिती हासुद्धा सामाजिक व्यवहाराचाच भाग असतो, हे समाजशास्त्रीय व तौलनिक साहित्याभ्यासाचे गृहितक आहे. अशा प्रकारच्या साहित्यविचाराचा प्रारंभ तेन यांनी केला. 'साहित्यकृती ही काळ, समाज आणि परिवेश यांची निर्मिती असते.' हा सिद्धांत त्यांनी 'हिस्ट्री ऑफ इंग्लिश लिटरेचर' या ग्रंथामध्ये इ. स. १८६३ मध्ये मांडला. या सिद्धांताचे सविस्तर विवेचन पुढीलप्रमाणे-

**१. काळ** (The Moment) : साहित्यिक हा समाजाचा एक घटक म्हणून जगात असताना तो ज्या काळात जगतो, त्या काळाचा परिणाम त्याच्या अनुभवांवर व त्याकडे बघण्याच्या त्याच्या दृष्टिकोनावर होत असतो. प्रत्येक काळाचा एक खास गुणधर्म असतो. त्याला युगधर्म असे म्हणतात. साहित्यिक आपल्या काळाचा युगधर्म कळत-नकळत स्वीकारून लिहीत असतो. उदा. भक्ती हा मध्ययुगीन भारतीय समाजाचा युगधर्म होता. त्यामुळे या काळातील बहुतांश साहित्य भक्ती या विषयावरचे होते. तसेच १९व्या शतकामध्ये इंग्रजांच्या आगमनामुळे भारतीय समाजामध्ये झालेल्या घडामोडींचे पडसाद त्या काळातील साहित्यावर पडलेले दिसतात. हे साहित्यिक जर २१ व्या शतकात जन्मले असते, तर त्यांच्या साहित्याचे स्वरूप निश्चितपणे वेगळे झाले असते. याचा अर्थ काळ हा साहित्यावर परिणाम करणारा एक महत्त्वाचा घटक आहे, म्हणून साहित्याचा अभ्यास करताना त्याच्या काळाचा विचार आवश्यक आहे, असे तेन यांचे मत आहे.

**२. वंश** (The Race) : साहित्यिक कोणत्या वंशात जन्मला यावर त्याचे अनुभवविश्व अवलंबून असते. या ठिकाणी वंश हा शब्द देश या अर्थाने वापरला आहे. उदा. भारतीय वंश, युरोपियन वंश, आफ्रिकन वंश इत्यादी. प्रत्येक देशाची आणि तेथील वंशाची काही खास वैशिष्ट्ये असतात. साहित्यिक ज्या देशात जन्मला आहे त्या देशाची जीवनमूल्ये (जीवनविषयक विचार) व संस्कार घेऊन तो जगत असतो. त्यावरच त्याचा साहित्यविषयक दृष्टिकोनही अवलंबून असतो. त्याचाच आविष्कार कळत-नकळत तो आपल्या साहित्यातून करत असतो. उदा. 'पण लक्षात कोण घेतो' ही हरी नारायण आपटे यांची कादंबरी भारतातच निर्माण होऊ शकते, कारण भारतामध्ये एकेकाळी प्रचलित असलेल्या विधवांच्या केशवपनाच्या समस्येवर ती आधारित आहे. ही कादंबरी दुसऱ्या कोणत्याही देशात निर्माण होऊ शकत नाही. म्हणून वंश हा साहित्यावर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक आहे, असे तेन यांना वाटते.

**३. परिवेश** (The Milieu) : प्रत्येक समाजाचे एक सांस्कृतिक पर्यावरण असते. या पर्यावरणातच साहित्यिक जगत असतो. या पर्यावरणाचे भान त्याला असते. साहित्याचा आशय, भाषा आणि सौंदर्यतत्त्वे या सगळ्यांच्या मुळाशी हे समाजभान असते. उदा. ग्रामीण साहित्य, दलित साहित्य निर्माण होत असताना, समाजातील विशिष्ट पर्यावरणाचा परिणाम होत असतो. अशा रीतीने सामाजिक पर्यावरण हा सुद्धा साहित्यावर परिणाम करणारा एक महत्त्वाचा घटक असतो, असे तेन म्हणतात.

तेन यांच्या या त्रिसूत्री सिद्धांतामध्ये साहित्य ही एका स्वतंत्र व्यक्तिची स्वतंत्र सौंदर्यात्मक कलाकृती आहे, असा विचार न करता, साहित्याचा एक सामाजिक घटक या व्यापक दृष्टिकोनातून विचार केला जातो. म्हणूनच एखाद्या साहित्याच्या अभ्यासातून त्याच्या देशाचा, काळाचा आणि सांस्कृतिक पर्यावरणाचा अभ्यास करता येणे शक्य होते. इ.स. १८६४ मध्ये तेन यांनी हा सिद्धांत इंग्रजी साहित्याला लावून दाखवण्याचाही प्रयत्न केला. त्यामुळे इंग्रजी समीक्षेवर या सिद्धांताचा मोठा परिणाम झाला, तसेच त्यामुळे तौलनिक साहित्याभ्यासालाही चालना मिळाली.

## १.२.३ तौलनिक साहित्याभ्यासाच्या उदयाची भारतातील पार्श्वभूमी

युरोपियन राष्ट्रांच्या साम्राज्यवादी धोरणामुळे युरोपातील इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल इ. जेती (जिंकलेली) राष्ट्रे आणि आशियातील भारत, चीन, अरबस्तान, इराण, इ. जित (जिंकल्या गेलेल्या किंवा पराभूत) राष्ट्रांमध्ये संपर्क निर्माण झाला. एका संपूर्ण नव्या संस्कृतीचा परिचय या आशियाई राष्ट्रांना झाला. या सांस्कृतिक अभिसरणामध्ये या दोन संस्कृतींमध्ये संघर्ष आणि संकर अशा दोन प्रतिक्रिया झाल्या. युरोपियन राष्ट्रे ही प्रगत, सांस्कृतिक दृष्ट्या उच्च आणि आशियायी राष्ट्रे अप्रगत असा एक दृष्टिकोण होता. पण भारतातील भाषा आणि साहित्य यांच्या समृद्ध परंपरेकडे काही युरोपियन विद्वान आकर्षितही झाले. मॅक्समुल्लर, विल्यम जोन्स, इ. विद्वानांनी भारतीय भाषा आणि साहित्याचा अभ्यास सुरू केला. विल्यम जोन्स यांनी इ.स. १७८४ मध्ये कलकत्ता येथे 'एशियाटिक सोसायटी'ची स्थापना केली. इंडॉलॉजी अथवा भारतविद्या ही अभ्यासशाखा निर्माण केली. तिच्या माध्यमातून भारतीय भाषा, साहित्य आणि संस्कृतीचा अभ्यास सुरू झाला. त्यातून तौलनिक साहित्याभ्यासाला चालना मिळाली. भारतातील वेद, रामायण - महाभारतासारखी संस्कृत महाकाव्ये, कालिदास इत्यादी नाटककारांची नाटके, पालीसारख्या प्राकृत भाषांतील बौद्ध धर्मग्रंथ इ. चा परिचय युरोपला झाला. उदाहरणार्थ इ.स. १७८५ मध्ये चार्ल्स विल्किन्स यांनी भगवद्‌गीतेचा इंग्लिशमध्ये अनुवाद केला. तो वाचून जर्मन कवी गटे प्रभावित झाला. त्याने आशियातील श्रेष्ठ साहित्याचा युरोपला परिचय करून दिला. राष्ट्राराष्ट्रांत केवळ व्यापारात देवाणघेवाण होता कामा नये, तर त्याबरोबरच साहित्यिक देवाणघेवाण व्हावी, असा संदेश त्याने दिला. त्यासाठी त्याने 'विश्वसाहित्य' ही संकल्पना मांडली. सर विल्यम जोन्स यांनी इ.स. १७८९ मध्ये कालिदासाच्या 'अभिज्ञान शाकुंतल' या नाटकाचा इंग्लिशमध्ये अनुवाद केला. इ.स. १८६७ मध्ये सर अलेक्झांडर ग्रँट यांनी 'फोर्ट नाइटली रिव्हयू'मध्ये तुकारामांचे चरित्र व कार्य यावर एक निबंध लिहिला. इ.स. १९०७ मध्ये जी. एच. वेस्टकोट यांनी 'कबीर अँड हिज कबीरपंथ' हा ग्रंथ लिहून कबीरांचे चरित्र व साहित्य यांकडे समाजाचे लक्ष वेधले. इ.स. १९३० मध्ये जस्टीन ई. ॲबट यांनी "The Life Of Tukaram' हा ग्रंथ लिहिला.

इंग्रजी भाषा आणि साहित्य यांच्या अभ्यासाने प्रभावित झालेल्या अभ्यासकांनी इंग्रजीतून परिचित

झालेल्या रोमँटिसिझमसारख्या वाङ्मयीन विचारधारा, निबंध, कथा-कादंबरी, यांसारखे वाङ्मयप्रकार, सॉनेटसारखे काव्यप्रकार अशा अनेक बाबींचा स्वीकार केला. असा स्वीकार करत असताना मूळ साहित्यापेक्षा काही नवीनच वैशिष्ट्यांचा आविष्कार झाला. काही अभ्यासकांनी भारतीय आणि युरोपीय साहित्याचा तौलनिक अभ्यास सुरू केला. उदा. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी 'शाकुंतल, मिरांडा आणि डेस्डिमोना' हा तौलनिक विवेचन करणारा लेख लिहून भारतातील तौलनिक साहित्याभ्यासाला प्रारंभ केला. त्यांनीच 'कुमारसंभव' आणि 'पॅरॅडाईज लॉस्ट' यांचीही तुलना केली. मराठीत हरी नारायण आपटे यांनी 'शाकुंतल' आणि 'द टेंपेस्ट' या नाटकांचा तुलनात्मक अभ्यास केला.

या अभ्यासपद्धतीला बळ देण्यासाठी काही व्यक्ती व संस्थांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. रवींद्रनाथ टागोर यांनी 'वसुधैव कुटुंबकम्' (संपूर्ण पृथ्वी हे एक कुटुंबच आहे) या भूमिकेचे प्रतिपादन केले. इ. स. १९०६ मध्ये कलकत्ता येथे 'राष्ट्रीय शिक्षणसंस्थे'त त्यांनी तौलनिक साहित्यावर एक व्याख्यान दिले. त्यात त्यांनी 'विश्वसाहित्य' ही संकल्पना विशद केली. भारतीय समाजाला तौलनिक साहित्याभ्यासाची निकड असल्याचे प्रतिपादन केले. अशा अभ्यासाला प्रोत्साहन देण्यासाठी 'विश्वभारती' ही संस्था स्थापन केली. इ.स. १९१० मध्ये याच संस्थेत 'भारतीय भाषांतील साहित्य' या विषयावर विनयकुमार सरकार यांचे व्याख्यान झाले. पेन (Poem, Essay and Novel) ही आंतरराष्ट्रीय पातळीवर भाषा आणि साहित्य यांचा अभ्यास करणारी संस्था स्थापन करण्यात आली. या संस्थेच्या वतीने इ.स. १९४५ मध्ये भारतात 'अखिल भारतीय लेखक संमेलन' भरले. त्याच्या अध्यक्षस्थानी सरोजिनी नायडू या होत्या. याप्रसंगी बोलताना त्यांनी विविध भारतीय भाषांमधील साहित्य एकच असल्याचे प्रतिपादन केले. या वातावरणाचा परिणाम म्हणून अनेक भारतीय भाषांमध्ये भारतातील आणि युरोपातील भिन्न-भिन्न साहित्याचा अनुवाद, अनुकरण करण्याची प्रवृत्ती वाढली.

यानंतर तौलनिक साहित्याभ्यासाला चालना देण्यासाठी विद्यापीठ स्तरावर पुढील प्रयत्न करण्यात आले. इ. स. १९४९ व इ. स. १९५० कोलकाता विद्यापीठात हेंकेल यांची या विषयावर व्याख्याने झाली. ही व्याख्याने इ. स. १९५२ मध्ये "The Study of Comparative Literature" या नावाने प्रसिद्ध झाली. इ. स. १९५६ मध्ये कलकत्ता येथे जादवपूर विद्यापीठाची स्थापना झाली. त्यामध्ये 'तौलनिक साहित्य' हा अभ्यासक्रम एम.ए.साठी सुरू करण्यात आला. इ.स. १९७४ मध्ये दिल्ली विद्यापीठाच्या आधुनिक भारतीय भाषाविभागात 'तौलनिक भारतीय साहित्य' हा एम.लिट.चा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. इ.स. १९७६ मध्ये दिल्ली विद्यापीठात नगेंद्र यांनी या विषयावर एक चर्चासत्र घेतले. त्यामध्ये राष्ट्रीय पातळीवरील तौलनिक साहित्यसंघटना स्थापन करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. त्याप्रमाणे इ.स. १९८० मध्ये निरंजन रे यांनी दिल्ली विद्यापीठात 'कंपॅरेटिव्ह इंडियन लिटरेचर असोसिएशन' (CILA) चे उद्घाटन केले. याशिवाय मुंबई, हैद्राबाद, सुरत, पतियाळा, जळगाव या विद्यापीठांमधून तौलनिक साहित्याभ्यासाचे काही अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

यानंतर विद्यापीठाच्या सहयोगाने, पण विद्यापीठाच्या कक्षेबाहेर काही संस्थांनी पुढीलप्रमाणे तौलनिक साहित्याभ्यासासाठी स्वतंत्रपणे कार्य सुरू केले. इ. स. १८८३ मध्ये 'इंडियन नॅशलन कंपॅरेटिव्ह लिटरेचर असोसिएशन' ही संस्था स्थापन करण्यात आली. ही संस्था आणि 'कंपॅरेटिव्ह इंडियन लिटरेचर' (CILA) या संस्था परस्परपूरक काम करू लागल्या. इ. स. १९७९ मध्ये चेन्नई येथे 'ॲकेडमी ऑफ कंपॅरेटिव्ह लिटरेचर' ही संस्था स्थापन झाली. त्यावेळी झालेली व्याख्याने 'कंपॅरेटिव्ह लिटरेचर' या नावाने इ. स. १९८० मध्ये प्रसिद्ध झाली. इ. स. १९८१ मध्ये म्हैसूर येथे 'सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन लँग्वेजेस' ही संस्था स्थापन झाली. या संस्थेने 'दि आयडिया ऑफ ॲन इंडियन लिटरेचर' हे सुजित मुखर्जी यांनी संपादित केलेले पुस्तक प्रसिद्ध केले. इ. स. १९८४ मध्ये तिरुअनंतपुरम येथे 'कंपॅरेटिव्ह लिटरेचर सोसायटी'ची स्थापना करण्यात आली. इ. स. १९८५ मध्ये मदुरै येथे 'द्रविडियन कंपॅरेटिव्ह लिटरेचर असोसिएशन'ची स्थापना करण्यात आली. इ. स. १९८६ मध्ये दिल्ली येथील साहित्य अकादमीने 'भारतीय साहित्याचा एकात्म इतिहास' हा प्रकल्प हाती घेतला. त्यातील दोन खंडांचे लेखन शिशिरकुमार दास यांनी केले. इ.स. १९८७ मध्ये शिमला येथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडीज्' या संस्थेने तौलनिक साहित्याभ्यासावर आठवड्याचे चर्चासत्र घेतले. त्यातील शोधनिबंध 'कंपॅरेटिव्ह लिटरेचर : थिअरी अँड प्रॅक्टीस' या ग्रंथात प्रसिद्ध करण्यात आले. अमिय देव आणि शिशिरकुमार दास यांनी त्याचे संपादन केले. इ.स. १९८८ मध्ये (CILA : Comparative Indian Literature) आणि (INCL : Indian National Comparative Literature Association) या दोन्ही संस्था एकत्र येऊन (CLAI : Comparative Literature Association of India) ही संस्था साकार झाली. तिच्या वतीने कोट्टायम (केरळ), दिल्ली विद्यापीठ, हैद्राबाद आणि तिरूअनंतपुरम येथे १९८० ते २००१ या काळात पाच परिषदा घेतल्या. याशिवाय साने गुरूजी यांची 'आंतरभारती', 'भारतीय विद्याभवन', 'दक्षिण भारतीय ग्रंथप्रतिष्ठान', 'साहित्य अकादमी', 'नॅशनल बुक ट्रस्ट', गणेश देवी यांची 'भाषा अकादमी' या संस्था तौलनिक साहित्यामध्ये कार्य करीत आहेत.

राष्ट्रीय पातळीवर तौलनिक साहित्याबाबत इतक्या घडामोडी घडत असताना महाराष्ट्रात मात्र या बाबत काहीशी निष्क्रियता दिसते. मुंबई विद्यापीठात 'गुरुदेव टागोर' हे तौलनिक साहित्यासाठी निर्माण केलेले अध्यासन आहे. पण तेथे याबाबतची फारशी कामगिरी झालेली दिसत नाही. याबाबत निशिकांत मिरजकर यांनी मांडलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत- त्यांच्यामते, जागतिक आणि राष्ट्रीय पातळीवर तौलनिक साहित्याबाबतच्या घडामोडींचे पडसाद मराठीमध्ये फारसे उमटलेले नाहीत. तौलनिक साहित्याभ्यास ही संकल्पना व समीक्षापद्धती याविषयी नेमके, स्पष्ट, निःपक्षपाती विवेचन करणारे एकही पुस्तक मराठीत नाही. जी काही आहेत, ती अर्धवट ज्ञानाने, चुकीच्या गृहितकांनी आणि अनाठायी अभिनिवेशाने ग्रस्त आहेत. मात्र तौलनिक साहित्य समीक्षेचा उपयोजनाचे मात्र काही उत्तम प्रयत्न मराठीत झालेले आहेत.

सध्या काही विद्यापीठांमध्ये पदव्युत्तर विभागासाठी तौलनिक साहित्याभ्यास हा एक ऐच्छिक अभ्यासक्रम नेमलेला दिसतो.

याबाबत विद्यापीठीय व संस्थात्मक पातळीवर जरी असमाधानकारक परिस्थिती असली, तरी काही अभ्यासकांनी वैयक्तिक पातळीवर काही ग्रंथ लिहून तौलनिक साहित्याबाबतची सैद्धान्तिक मांडणी व या समीक्षापद्धतीचे उपयोजन केले आहे. यामध्ये वसंत बापट, निशिकांत मिरजकर, आनंद पाटील यांनी या समीक्षापद्धतीचे विवेचन करणारे ग्रंथलेखन केले आहे. तसेच आनंद पाटील, वसंत आबाजी डहाके यांनी या पद्धतीचे प्रत्यक्ष उपयोजन करून समीक्षा केली आहे.

अशा पद्धतीने जागतिक, राष्ट्रीय व प्रादेशिक पातळीवर तौलनिक साहित्याभ्यासाच्या उदय आणि विकासाची ही प्रक्रिया जाणून घेतल्यानंतर आता आपण तौलनिक साहित्याभ्यास ही संकल्पना समजावून घेणार आहोत.

## १.२.४ तुलना : संकल्पना

'तुलना' या शब्दामध्ये मूळ धातू (क्रियापद) 'तुळ'णे हा आहे. त्याचा 'मराठी व्युत्पत्तिकोशा'त दिलेला अर्थ आहे- वजन करणे, मोजणे, बरोबर मानणे. या क्रियापदापासून 'तुलना' हे नाम तयार झाले. त्याचा याच कोशात दिलेला अर्थ आहे- साम्य, सारखेपणा, वजन करणे, तुलना या शब्दाचा इंग्रजी प्रतिशब्द आहे "Comparison". हा शब्द "to compare" या क्रियापदापासून बनलेला आहे. या क्रियापदाचा ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीमध्ये दिलेला अर्थ आहे, estimate, measure, or note the similarities, or dissimilarities between, liken something to, or have specified relationship with another thing or person. या ठिकाणी तुलना या शब्दाचा अर्थ स्थूल मानाने हिशेब करून मोजमाप करणे, साम्य-भेदाची नोंद घेणे, अन्य कोणत्या तरी वस्तू किंवा व्यक्तीशी असलेले साम्य किंवा वैशिष्ट्यपूर्ण संबंध दर्शविणे आणि मूल्यमापन करणे असा आपण लावू शकतो.

तुलना करणे हा मानवी मनाचा सहजस्वभाव आहे. तुलना केल्याशिवाय त्याला विचार करणे, काही एक निष्कर्ष काढणे आणि त्या आधारे कोणता तरी निर्णय घेणे, या मानसिक क्रिया करता येणार नाहीत. ज्ञान मिळविण्यासाठी तर तुलना आवश्यकच असते. त्यामुळे प्रत्येक माणूस सतत जाणता-अजाणता तुलना करतच असतो. अशा प्रकारे तुलना ही मानवी विचारविश्वाला व्यापून उरणारी आणि सहज-सुलभ क्रिया असली तरी तिची सूक्ष्म पातळीवर अधिक चिकित्सा अनेक अभ्यासकांनी केली आहे. त्यांपैकी डब्ल्यू. जे. टी. मित्शेल यांचे याबाबतचे विवेचन आता आपण पाहणार आहोत.

## १.२.५ मित्शेलचे तुलनेविषयीचे तीन सिद्धान्त

विल्यम जॉन थॉमस मित्शेल हे अमेरिकेतील शिकागो युनिव्हर्सिटीमधील इंग्लिश आणि कलेचा इतिहास या विषयाचे प्राध्यापक. त्यांनी चित्रकला, साहित्य, वास्तुकला, विज्ञान अशा विविध विषयांवर आंतरविद्याशाखीय विवेचन करणारे अनेक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांनी तुलनेबाबत सूक्ष्म विश्लेषण केलेले आहे. त्यांच्यामते आपण जेव्हा दोन गोष्टींची तुलना करतो, तेव्हा तीन शक्यता असतात. जेव्हा 'अ' व 'ब' मध्ये तुलना करावयाची असते, तेव्हा तीन विधाने संभवतात.

१. 'अ' हा 'ब'पेक्षा मोठा आहे.

२. 'अ' हा 'ब'पेक्षा लहान आहे.

३. 'अ' हा 'ब'च्या बरोबरीचा आहे.

यालाच 'त्रिभाजन नियम' असेही म्हटले जाते. 'अ' हा 'ब'मधील साम्याबरोबरच दोन प्रकारे त्यातील भेदही दर्शविता येतो. याचा अर्थ, तुलना म्हणजे केवळ साम्य शोधणे नसते. ज्या बाबी समान दिसतात, त्यातील भेद शोधणे आणि ज्या बाबी भिन्न दिसतात, त्यातील साम्य शोधणे, अशी ही दुहेरी प्रक्रिया आहे. या तुलनेचे तीन प्रकार मित्शेल यांनी पुढील सिद्धान्तांमध्ये सांगितले आहेत

१. **जाणीवरूपी (संवेद्य) :** तुलना जाणीव म्हणजे ज्ञान. हे ज्ञान मिळविण्यासाठी निसर्गाने माणसाला डोळे, कान, नाक, जीभ आणि त्वचा ही इंद्रिये दिली आहेत. या ज्ञानेंद्रियांच्या माध्यमातून जी अनुभूती मिळते तिला संवेदना म्हणजेच जाणीव असे म्हणतात आणि अशा संवेदनांच्या म्हणजेच जाणिवांच्या तुलनेला संवेद्य तुलना असे म्हणतात. अशा संवेदनांच्या माध्यमातून ज्ञान मिळवीत असताना माणूस कळत-नकळत तिच्यासारख्या अन्य एका किंवा अनेक संवेदनांशी तुलना करत असतो. अशा तुलनेला मित्शेल यांनी जाणीवरूपी किंवा संवेद्य तुलना असे म्हटले आहे. उदा. डोळे झाकून चाफ्याच्या फुलाचा सुगंध ओळखताना मनामध्ये त्या सुगंधाची अनुभवलेल्या इतर फुलांच्या सुगंधांशी तुलना केली जाते. त्यातील साम्य-भेद लक्षात घेऊन मन हा चाफ्याच्या फुलाचा सुगंध आहे, असा निर्णय देते. अर्थात ही प्रक्रिया अत्यंत सूक्ष्म आणि गतिमान असते. बऱ्याचदा ती नकळत होते. याच प्रकारे विविध प्रकारच्या दृश्य प्रतिमा, आवाज, चवी आणि स्पर्श यांचे ज्ञान माणसाला होत असते. अशा वेळी होणाऱ्या तुलनेला जाणीवरूपी, संवेद्य किंवा आकलनात्मक तुलना असे मित्शेल म्हणतात.

२. **विवेचक तुलना :** विवेचन करणे म्हणजे एखाद्या गोष्टीचा तारतम्याने, सर्वांगीण विचार करून उलगडा किंवा स्पष्टीकरण करणे. दोन वस्तूंमधील साम्यभेद शब्दांच्या साहाय्याने

स्पष्ट करणे, म्हणजे विवेचक तुलना, असे मित्शेल म्हणतात. अशी तुलना करण्यासाठी विविध अर्थालंकारांचा उपयोग केला जातो. उपमा हा त्यातील प्रमुख अलंकार होय. दोन गोष्टींमधील साम्य वर्णन करण्यासाठी उपमेय (ज्याची तुलना करावयाची ते) हे उपमानासारखे (ज्याच्याशी तुलना करावयाची त्याच्यासारखे) आहे, असे वर्णन केले जाते. उपमेय आणि उपमान यांच्यातील साम्याच्या वाढत्या तीव्रतेनुसार उपमेतूनच उत्प्रेक्षा, रूपक, दृष्टान्त, अपन्हुती, अनन्वय, व्यतिरेक असे अलंकार निर्माण केले जातात. उदा. मुख हे उपमेय आणि चंद्र हे उपमान यांचा वापर करून निर्माण होणारे विविध अलंकार पाहू या. मुख हे चंद्रासारखे आहे, असे म्हटले, की उपमा, मुख हा जणू चंद्रच आहे, असे म्हटले, की उत्प्रेक्षा, हे मुख नव्हेच, हा तर चंद्रच, असे म्हटले, की अपन्हुती, मुख हाच चंद्र, असे म्हटले, की रूपक, चंद्राहूनही मुख सुंदर आहे, असे म्हटले, की व्यतिरेक अलंकार होतो. मुखाची तुलना दुसऱ्याशी होऊ शकत नाही असे म्हटले की, अनन्वय अलंकार होतो. अशा विवेचक तुलनेचा वापर कधी कधी दैनंदिन भाषिक व्यवहारामध्येही होताना दिसत असला तरी अशी तुलना प्रामुख्याने प्रतिभावान कवीच्या कल्पनाशक्तीतून जन्म घेते. ती हेतुपूर्वक केली जाते. तिच्यामधून सौन्दर्यनिर्मिती होणेही अपेक्षित असते.

३. **शास्त्रीय प्रणालीबद्ध तुलना :** वरील दोन्ही प्रकारच्या तुलना या एका व्यक्तीच्या अनुभवांशी आणि कल्पनाशक्तीशी संबंधित आहेत. त्यामुळे त्या व्यक्तिसापेक्ष व म्हणूनच असंतुलित असण्याची शक्यता असते. उदा. 'फुलराणी' ही बालकवींची कविता म्हणजे त्यांनी घेतलेल्या निसर्गाच्या एका अनुभूतीची विवेचक तुलनाच होय. एक सुंदर गवतफूल आणि एखादी मुग्ध, निरागस नवतरुणी याच्यातील साम्य दर्शविणारे ते एक कल्पनारम्य रूपक आहे. ही बालकवींच्या संवेदनशील, सर्जनशील आणि सौंदर्यासक्त मनाला आलेली खास अनुभूती आहे. ती अन्य कोणा व्यक्तीला अशीच्या अशी येणार नाही. अशी व्यक्तिविशिष्टता कोणत्याही शास्त्रीय तुलनेत चालणार नाही. विज्ञानाच्या कोणत्याही क्षेत्रात जेव्हा एखादा सिद्धान्त मांडावयाचा असतो, तेव्हा तो सार्वत्रिक असतो. कोणालाही, कधीही तो मान्य होण्यासारखा असावा लागतो. त्यासाठी तो तर्कसुसंगतपणे मांडावा लागतो. अशावेळी केलेली तुलना ही शास्त्राच्या नियमानुसार पद्धतशीरपणे करावी लागते. त्यातून स्पष्ट, नेमका निष्कर्ष काढावा लागतो. या तुलनेला शास्त्रीय प्रणालीबद्ध तुलना असे मित्शेल यांनी म्हटले आहे. या तुलनेचे एक उदाहरण देता येईल. प्रसिद्ध मानववंश शास्त्रज्ञ डार्विन यांना माणूस आणि माकड यांच्यात काही साम्य जाणवले. त्यांनी तुलनेच्या आधारे या दोघांमधील साम्यभेद शास्त्रीय पद्धतीने तपासले. आणि त्या आधारे माणूस हा माकडापासून उत्क्रांत झालेला प्राणी आहे, हा सिद्धान्त मांडला. ही त्यांची कल्पना किंवा क्षणिक अनुभूती

नाही, तर त्यांनी प्रदीर्घ काळ केलेल्या शास्त्रीय प्रणालीबद्ध तुलनेचा तर्कसुसंगत निष्कर्ष आहे.

अशा प्रकारे मित्शेल यांनी तुलनेचे वर्गीकरण केले आहे. यानंतर आपण तुलनेचे साहित्यव्यवहारातील महत्त्व अभ्यासणार आहोत.

## १.२.६ तुलना आणि साहित्यव्यवहार

साहित्य आणि तुलना यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. साहित्यनिर्मिती, त्याचे आकलन, आस्वाद आणि मूल्यमापन या सर्व क्रियांमध्ये तुलना सक्रिय असते. लेखक साहित्यनिर्मिती करतो, तेव्हा त्याची प्रतिभा सातत्याने येणाऱ्या असंख्य अनुभूतींमधून काही खास अर्थपूर्ण अनुभूतींची निवड करतो. त्याच्या आधारे काही एक आशयसूत्र निश्चित करतो. ते मांडण्यासाठी योग्य असा वाङ्मयप्रकार निवडतो. विशिष्ट आकृतिबंध, त्यातील घटक, विविध कल्पना, शब्द यांच्या आधारे तो आपली साहित्यकृती साकार करतो. या सर्व क्रियांमध्ये तो तुलनेचा आधार घेत असतो. हे करत असताना तो स्वतःच निर्मिलेल्या साहित्यकृतीची समीक्षाही करत असतो. याच अर्थाने 'साहित्यनिर्मिती ही एकाच वेळी क्रिएटिव्ह आणि क्रिटिकल असते', असे टी. एस. इलियट यांनी म्हटले आहे. या साहित्यकृतीचे वाचन करताना वाचकाच्या मनात त्याने प्रत्यक्ष घेतलेल्या, पाहिलेल्या, वाचलेल्या, ऐकलेल्या अनुभूतींशी साहित्यकृतीमधील अनुभूतींची तुलना सुरू असते. साहित्यसमीक्षेत साहित्यकृतीच्या बाह्य संदर्भांची तुलना अटळ असते. तसेच मूल्यमापनासाठी वापरावयाचे निकष जुन्या-नव्या निकषांची तुलना करूनच निवडावे लागतात. साहित्यकृतीचा दर्जा ठरवताना तिच्याशी समतुल्य अशा अन्य एका किंवा अनेक साहित्यकृतींशी तिची तुलना करावी लागते. साहित्यिक आणि त्याची साहित्यकृती यांचे परंपरेतील स्थान निश्चित करणे तुलनेशिवाय शक्य होणार नाही. साहित्यसमीक्षेतील तुलनेचे स्थान हे असे अपरिहार्य आहे. म्हणूनच तुलना आणि विश्लेषण ही टीकाकाराची मुख्य साधने आहेत असे टी. एस. इलियट यांनी म्हटले आहे. इतकेच नव्हे, तर समीक्षा म्हणजेच तुलना करणे, असेही म्हटले जाते. तरीही प्रत्येक समीक्षेला तौलनिक समीक्षा म्हणता येणार नाही. कारण इतर समीक्षापद्धतीत तुलना ही आनुषंगिक व अप्रकट असते. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये तुलना हे प्राणभूत तत्त्व असते. मुख्य साधन असते. तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप जाणून घेण्यासाठी प्रथम ही संकल्पना समजावून घेऊ या.

## १.२.७ तौलनिक साहित्याभ्यास : संकल्पना

तौलनिक साहित्याभासाची सैद्धान्तिक मांडणी करताना अनेक अभ्यासकांनी त्याच्या विविध व्याख्या केल्या आहेत. वसंत बापट यांनी त्याची साधी-सोपी व्याख्या करताना म्हटले आहे, ''तौलनिक साहित्याभ्यास म्हणजे तुलनेच्या साह्याने एकापेक्षा अधिक साहित्यांचा अभ्यास.'' या व्याख्येला जोडून

त्यांनी या अभ्यासाची साधर्म्य, वैधर्म्य, उद्‌गम आणि प्रभाव ही चार अंगेही सांगितली आहेत. या ठिकाणी बापट यांनी महत्त्वाची गोष्ट नोंदविली आहे. ती म्हणजे, तौलनिक साहित्याभ्यासासाठी एकापेक्षा अधिक साहित्याची उपस्थिती आवश्यक असते. या साहित्यांमधील साम्य, भेद याबरोबरच त्यातील एक साहित्यकृती दुसऱ्या साहित्यकृतीच्या उद्‌भवासाठी म्हणजेच निर्मितीसाठी कारणीभूत आहे काय, त्यातील एका साहित्यकृतीवर दुसऱ्या साहिय्कृतीचा प्रभाव आहे काय, हे पाहणे या अभ्यासात अपेक्षित असते. निशिकांत मिरजकर यांच्यामते ही व्याख्या अव्याप्त आहे. म्हणजेच या पद्धतीचे स्वरूप संपूर्णपणे तिच्यामधून स्पष्ट होत नाही. ती फक्त या अभ्यासाची पद्धत वर्णन करते.

या दृष्टीने एस. एस. प्रावर यांनी केलेली व्याख्या या अभ्यासपद्धतीवर अधिक प्रकाश टाकते. ती व्याख्या अशी- ‘‘एकापेक्षा अधिक भाषांतील साहित्यकृतींची (साहित्यशास्त्र आणि समीक्षा यांवरील ग्रंथांसह) वैधर्म्य, साधर्म्य, मूलस्रोत किंवा प्रभाव यांचा शोध घेत केलेली समीक्षा म्हणजेच तौलनिक साहित्याभ्यास होय; तसेच दोन किंवा अधिक भिन्न-भाषिक समाजांमधील वाङ्‌मयीन संबंध आणि आदानप्रदान यांचाही अभ्यास त्यात अंतर्भूत आहे.’’ या व्याख्येमध्ये बापट यांच्या व्याख्येपेक्षा अधिक सांगितलेली गोष्ट ही की, असा अभ्यास दोन भिन्न भाषांतील साहित्यकृतींचा करणे अपेक्षित आहे. कारण भाषा हे संस्कृतीचे केवळ वाहनच नसून तिचा आशय धारण करणारी आहे. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये दोन साहित्यकृतींच्या अभ्यासाच्या माध्यमातून दोन समाजांमधील वाङ्‌मयीन संबंध आणि देवाणघेवाण यांचाही अभ्यास करणे गृहित आहे. ही व्याख्या तौलनिक साहित्याभ्यासाच्या व्याप्तीवर प्रकाश टाकते. ही अभ्यासपद्धती केवळ दोन भिन्नभाषिक साहित्यकृतींचा तौलनिक अभ्यास करीत नाही, तर त्या साहित्यकृतींच्या सामाजिक संदर्भांचाही तौलनिक अभ्यास करते, ही गोष्ट या व्याख्येमध्ये स्पष्ट होते.

याच दिशेने अधिक नेमकेपणाने विवेचन करणारी हेन्री एच. एच. रेमक यांनी केलेली व्याख्या विचारात घेण्यासारखी आहे. ती अशी ‘‘तौलनिक साहित्य म्हणजे विशिष्ट देशाच्या बंदिस्त सीमेपलीकडचा अभ्यास होय. त्यात एकीकडे साहित्यामधील परस्परसंबंधांचा तर दुसऱ्या बाजूला कला (म्हणजेच चित्र, शिल्प, वास्तुरचना, संगीत), तत्त्वज्ञान, इतिहास, सामाजिक शास्त्रे (म्हणजे राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र), विज्ञान, धर्म अशा ज्ञान व श्रद्धाक्षेत्रांचा अभ्यास असतो. थोडक्यात, ही एका साहित्याची दुसऱ्या एका किंवा अनेक साहित्यांशी आणि वाङ्‌मयाची इतर मानवी आविष्कारक्षेत्रांशी केलेली तुलना असते.’’ या व्याख्येमध्ये तौलनिक साहित्याभ्यासामध्ये समाविष्ट असलेला साहित्याच्या सामाजिक संदर्भाचा व्यापक परीघ अधिक स्पष्ट केला आहे. साहित्याचा सामाजिक शास्त्रे, कला आणि विज्ञान या ज्ञानशाखांच्या दृष्टिकोनातून अभ्यास करणे हे साहित्याच्याच नव्हे, तर जीवनाच्याही आकलनासाठी आवश्यक आहे आणि ती आवश्यकता पूर्ण करण्याची क्षमता तौलनिक साहित्याभ्यासामध्ये आहे, ही गोष्ट ही व्याख्या अधोरेखित करते.

या व्याख्यांवरून स्पष्ट होते, की तौलनिक साहित्याभ्यास हा विशिष्ट भाषांच्या व त्यायोगे विशिष्ट देशांच्या सीमा भेदून विविध ज्ञानक्षेत्रांना सामावून घेणारा, मानवी जीवनाच्या वैश्विक एकात्मतेचे दर्शन घडविणारा अभ्यास आहे. अशा प्रकारे तौलनिक साहित्याभ्यासाची संकल्पना समजावून घेतल्यानंतर आपण या अभ्यासपद्धतीचे स्वरूप जाणून घेऊया.

## १.२.८ तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप

तौलनिक साहित्याभ्यासामध्ये दोन किंवा अनेक भिन्नभाषिक साहित्यकृतींची वा साहित्यिकांची तुलना केली जाते, हे आपण पहिले. पण अशी तुलना करण्यासाठी त्या साहित्यांमध्ये कोणत्या तरी प्रकारचा संबंध असला पाहिजे. कोणताही संबंध नसलेल्या साहित्यांची तुलना होऊ शकत नाही. कुणी तसा प्रयत्न केला तरी तो वाङ्मयीन अथवा सांस्कृतिक दृष्ट्या फलदायी ठरणार नाही. तुलनीय साहित्यांमध्ये वा साहित्यिकांमध्ये कोणत्या प्रकारचे संबंध असले पाहिजेत, याबाबत निशिकांत मिरजकर यांनी उपयुक्त आणि सविस्तर विवेचन केले आहे. त्यांच्यामते तुलनीय साहित्यांपैकी एकाचा दुसऱ्यावर प्रभाव असेल, दोन्ही साहित्यिकांचे प्रेरणास्थान एक असेल, त्यांची तत्त्वप्रणाली एक असेल, त्यांच्या साहित्यकृतीच्या निर्मितीला कारणीभूत ठरणारी परिस्थिती समान असेल, ज्या ऐतिहासिक, पौराणिक, घटना, व्यक्ती यांच्या आधारे साहित्यनिर्मिती झाली आहे, अशी आधारसामग्री एक असेल, ज्यांचे आशयसूत्र एक असेल, अशा साहित्यांचा किंवा साहित्यिकांचा तुलनात्मक अभ्यास कोणत्या तरी अप्रकाशित वाङ्मयीन आणि सांस्कृतिक तथ्यावर प्रकाश टाकू शकेल. या अर्थाने ही एक आंतरविद्याशाखीय अभ्यासपद्धती आहे.

अशा प्रकारचा अभ्यास हे एक साधन आहे. साध्य नाही. केवळ तुलनीय साहित्यांमधील साम्य अथवा भेद दाखवून देणे, हे या अभ्यासाचे उद्दिष्ट नाही. या साम्यभेदाची कारणमीमांसा करून त्या आधारे काहीतरी फलदायी निष्कर्ष काढणे अपेक्षित आहे. या तुलनेचा उपयोग करून कोणताही साहित्यिक किंवा साहित्यकृती श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरविणे हे या अभ्यासाचे उद्दिष्ट असू नये. तुलनाकाराची व्यक्तिगत विचारसरणी, आवड-निवड किंवा पसंत-नापसंती, अभिनिवेश यांना येथे स्थान नाही. हा अभ्यास वस्तुनिष्ठपणे, नि:पक्षपातीपणे करणे अपेक्षित आहे. हा अभ्यास मनाच्या कक्षा विस्तारणारा असला पाहिजे. साहित्याचे मूल्यमापन करणे किंवा उत्कृष्ट साहित्याचे निकष ठरविणे, हे या अभ्यासाचे उद्दिष्ट नाही.

या अभ्यासाच्या मुळाशी आधारभूत गृहितक आहे की, भिन्न भिन्न देशांत, भिन्न भिन्न भाषांत निर्माण होणाऱ्या साहित्यांमधील मानवी मनाची अभिव्यक्ती ही सारखीच आहे. माणूस हा अंतिमत: एकच आहे. अशा वैश्विक एकात्मतेचे भान नसण्यामुळे साहित्य व्यवहारामध्ये निर्माण झालेली संकुचित व आग्रही वृत्ती नाहीशी होऊन साहित्याची आणि एकूण जीवनाचीही जाणीव अधिक विकसित होण्यासाठी ही अभ्यासपद्धती अत्यंत उपयुक्त व म्हणून महत्त्वाची आहे.

## १.३ समारोप

अशा प्रकारे या घटकाचा अभ्यास करताना आपण तौलनिक साहित्याभ्यास पद्धतीची पूर्वपीठिका प्रथम समजावून घेतली. युरोपमधील प्रबोधनकाळात नेमक्या कोणत्या सामाजिक, सांस्कृतिक घडामोडींमुळे या अभ्यासपद्धतीचा उदय झाला, हे आपण पाहिले. या अभ्यासपद्धतीचा विकास करण्यासाठी तेथील विविध अभ्यासकांनी मांडलेले महत्त्वाचे सिद्धान्त अभ्यासले. युरोपातील साम्राज्यवादाचा परिणाम म्हणून भारतात या अभ्यासपद्धतीच्या उदयासाठी अनुकूल परिस्थिती कशी निर्माण झाली, हे पाहिले. या अभ्यासपद्धतीला चालना देण्यासाठी विविध व्यक्ती आणि संस्था यांनी कोणते योगदान दिले, हे जाणून घेतले. अनेक अभ्यासकांनी निर्धारित केलेली या अभ्यासपद्धतीची संकल्पना, स्वरूप व महत्त्व समजावून घेतले. या घटकाच्या अभ्यासामुळे तुमचा साहित्यविषयक व जीवनविषयक दृष्टिकोन अधिक व्यापक व परिपक्व होईल, यात शंका नाही.

## १.४ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

### ❑ योग्य पर्याय निवडा.

१. 'तौलनिक साहित्याभ्यास : तत्त्वे व दिशा' हा ग्रंथ कोणी संपादित केला?

*(अ) आनंद पाटील* *(क) चंद्रशेखर जहागीरदार*

*(ब) वसंत बापट* *(ड) भालचंद्र नेमाडे.*

२. १९ व्या शतकात फ्रान्समध्ये जर्मन व फ्रेंच साहित्याचा तौलनिक अभ्यास कोणी केला?

*(अ) गटे* *(क) मादाम स्टेल*

*(ब) पोज्नेट* *(ड) दांते.*

३. विविध भाषांमध्ये वाङ्मयीन आदानप्रदान व्हावे, यासाठी रवींद्रनाथ टागोर यांनी कोणती संस्था स्थापन केली?

*(अ) आंतरभारती* *(क) भारतीय विद्याभवन*

*(ब) विश्वभारती* *(ड) साहित्य अकादमी.*

४. कालिदासाचे 'शाकुंतल' आणि शेक्सपियरचे 'द टेम्पेस्ट' या नाटकांचा तौलनिक अभ्यास कोणी केला?

*(अ) ह. ना. आपटे* *(क) मॅथ्यू अर्नोल्ड*

*(ब) बंकिमचंद्र चटर्जी* *(ड) विजयकुमार दास.*

५. भारतविद्या (Indology) ही ज्ञानशाखा कोणी सुरू केली?

*(अ) सरोजिनी नायडू* *(क) सर विल्यम जोन्स*

*(ब) रवींद्रनाथ टागोर* *(ड) लॉर्ड मेकॉले.*

६. 'साहित्य ही काळ, वंश आणि परिवेश यांची निर्मिती असते' हा सिद्धान्त कोणी मांडला?

*(अ) हिपोलिट तेन (ब) मित्शेल (क) जॉन ड्रायडन (ड) टी. एस. इलियट.*

७. 'तौलनिक साहित्य' या संज्ञेचा वापर सर्वप्रथम कोणी केला?

*(अ) मादाम स्टेल (ब) दांते (क) मॅथ्यू अर्नोल्ड (ड) एस. एस. प्रावर.*

८. कालिदासाच्या 'अभिज्ञान शाकुंतलम्' या नाटकाचा इंग्रजी अनुवाद कोणी केला?

*(अ) चार्ल्स विल्किन्स* *(ब) अलेक्झांडर ग्रँट*

*(क) जी. एच. वेस्टकोट* *(ड) सर विल्यम जोन्स.*

९. 'विश्वसाहित्य' या संकल्पनेचा पुरस्कार सर्वप्रथम कोणी केला?

*(अ) रवींद्रनाथ टागोर* *(क) सरोजिनी नायडू*

*(ब) गटे* *(ड) साने गुरुजी.*

१०. 'साहित्यनिर्मिती ही एकाच वेळी क्रिएटिव्ह आणि क्रिटिकल असते', हे विधान कोणाचे?

*(अ) टी. एस. इलियट* *(क) अमिय देव*

*(ब) हेन्री एच. एच. रेमाक* *(ड) गणेश देवी.*

## ❑ उत्तरे :-

१. *(क) चंद्रशेखर जहागीरदार*

२. *(क) मादाम स्टेल.*

३. *(ब) विश्वभारती*

४. *(अ) ह. ना. आपटे.*

५. *(क) सर विल्यम जोन्स.*

६. *(अ) हिपोलिट तेन.*

७. *(क) मॅथ्यू अर्नोल्ड.*

*८. (ड) सर विल्यम जोन्स.*

*९. (ब) गटे.*

*१०. (अ) टी. एस. इलियट.*

## १.५ सरावासाठी स्वाध्याय

### १.५.१ दीर्घोत्तरी प्रश्न

१. तौलनिक साहित्याभ्यासाची सांस्कृतिक पार्श्वभूमी विशद करा.

२. तौलनिक साहित्याभ्यासाची संकल्पना व स्वरूप स्पष्ट करा.

### १.५.२ लघुत्तरी प्रश्न

१. मित्शेल यांचे तुलनेविषयीचे तीन सिद्धान्त स्पष्ट करा.

२. तौलनिक साहित्याभ्यासाची उद्दिष्टे स्पष्ट करा.

३. साहित्यव्यवहारातील तुलनेचे स्थान स्पष्ट करा.

## १.६ उपक्रम

१. विविध अभ्यासकांनी तौलनिक साहित्याभ्यास पद्धतीचे उपयोजन करून लिहिलेल्या ग्रंथांचे वाचन करा.

२. विविध अभ्यासकांनी केलेल्या तौलनिक अभ्यासाच्या विषयांची यादी तयार करा.

३. तौलनिक अभ्यास करता येईल, अशा संभाव्य विषयांची वर्गात चर्चा करा व यादी करा.

४. कोणत्याही एका विषयावर तौलनिक अभ्यास पद्धतीचे उपयोजन करून किमान एक शोधनिबंध लिहा.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१. 'तौलनिक साहित्याभ्यास', वसंत बापट, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९८१

२. 'तौलनिक साहित्याभ्यास : तत्त्वे आणि दिशा', संपा. चंद्रशेखर जहागीरदार, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९२

३. ‘भारतीय संदर्भात तौलनिक साहित्याभ्यास’, गणेश देवी, सौरभ प्रकाशन, कोल्हापूर, १९९२

४. ‘तौलनिक साहित्य : नवे सिद्धांत आणि उपयोजन’, आनंद पाटील, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८

५. ‘तौलनिक साहित्य’, निशिकांत मिरजकर,

६. ‘तौलनिक साहित्य आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय’, र. बा. मंचरकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००३

७. ‘तुलनात्मक साहित्य’, नगेंद्र, नॅशनल पब्लिशिंग हाउस, नई दिल्ली

८. ‘भारतीय साहित्याची संकल्पना’ (डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर गौरवग्रंथ), संपा. द. दि. पुंडे, प्रथमा प्रकाशन, पुणे, १९९०

९. ‘साहित्य-सिद्धान्त’, रेने वेलेक आणि ऑस्टीन वॉरन, अनु. स. गं, मालशे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८२.

❑❑❑

# तौलनिक साहित्याभ्यासाचे मूलभूत आधार

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ राष्ट्रीय साहित्य

२.२.२ विश्वसाहित्य

२.२.३ भारतीय साहित्य

२.३ समारोप

२.४ स्वयं–अध्ययन प्रश्न व उत्तरे

२.५ सरावासाठी स्वाध्याय

२.६ उपक्रम

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## २.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणांस,

१. राष्ट्रीय साहित्य ही संकल्पना कशी उदयास आली हे कळेल.

२. धर्म शिक्षण भाषा आणि साहित्य या साऱ्यांशी मिळून त्या–त्या राष्ट्राची परंपरा निर्माण होते.

३. राष्ट्रीय साहित्याचे गुणविशेष म्हणजे काय ते कळेल.

४. भारतीय साहित्य आणि विश्वसाहित्य यांचा बोध होईल.

## २.१ प्रास्ताविक

वेगवेगळ्या राष्ट्रातील साहित्याची तुलना करणे हा तौलनिक साहित्याभ्यासातील फार महत्त्वाचा

भाग आहे. साहित्य ही बोलून चालून व्यक्तिप्रतिभेतून साकार होणारी वस्तू आहे. राष्ट्रीय साहित्याची तुलना उथळ होऊ नये म्हणून तौलनिक साहित्याला काही पथ्ये पाळावी लागतात. सार्वत्रिक आणि अपरिवर्तनीय अशा 'राष्ट्रीय गुणधर्मावर लक्ष केंद्रित केले तर तो तुलनात्मक अभ्यास वरवरचा आणि उथळ होईल' म्हणून साहित्याच्या विकसन प्रवृत्तीवर तुलना केंद्रित करणे लाभदायक ठरते.'

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ राष्ट्रीय साहित्य

वेगवेगळ्या राष्ट्रातील साहित्यांची तुलना करणं हा तौलनिक साहित्यामधील एक फार लोकप्रिय अभ्यासक्रम आहे. फ्रेंच साहित्य आणि जर्मन साहित्य किंवा फ्रेंच साहित्य आणि इंग्लिश साहित्य यांचे असे तुलनात्मक अभ्यास केले गेलेले आहेत. त्यातूनच 'राष्ट्रीय साहित्य' ही संकल्पना उदयास आलेली आहे. राष्ट्रीय साहित्य म्हणजेच एका देशाचे, एका भाषेचे आणि एका संस्कृतीचे साहित्य असे त्या संकल्पनेचे स्वरुप आहे. या संकल्पनेच्या उदयापासूनच तिच्या विरोधातील सूर तीव्र झालेले आढळतात. ही संकल्पना स्वयंसंकुचित असून तिची अर्थकक्षा मुळातच छोटी आहे असे तेव्हापासून म्हटले गेले आहे. कारण मुळातच 'राष्ट्र' ही संकल्पनाच कल्पनेने रचलेले एक 'रचित' आहे.

राष्ट्रे ही नैसर्गिकरित्या निर्माण झालेली नसून इतिहासातील घटनाक्रमानुसार माणसाने निर्माण केलेली असतात. ती जन्मतात, भरभराट पावतात आणि नष्टही होतात. कुरु, पांचाल, मगध इत्यादी प्राचीन भारतातील राष्ट्रे आज कुठे आहेत? १९४७ पूर्वी पाकिस्तान आणि १९७१ पूर्वी बांगलादेश या राष्ट्राचे आस्तित्व कुठे आहे? मानवी वंशाचा वांशिक घटक, भूप्रदेश आणि हवामान यांचे भौगोलिक घटक, लोकसंख्या आणि व्यवसाय हे आर्थिक घटक तसेच कायदेकानू आणि शासनयंत्रणा हे राजकीय घटक या सर्वांनी मिळून 'राष्ट्र' ही संकल्पना साकारलेली असते. धर्म, शिक्षण, भाषा आणि साहित्य या साऱ्यांची मिळून त्या त्या राष्ट्राची परंपरा निर्माण होते. कोणत्याही बाह्य आघाताने वांशिक, भौगोलिक, आर्थिक अथवा राजकीय घटकांमध्ये बदल घडून आले की, 'राष्ट्र' या संकल्पनेची परिणामे बदलतात.

''साहित्य ही बोलून चालून व्यक्तिप्रतिभेतून साकार होणारी वस्तू आहे. तर मग एखाद्या राष्ट्रातील अनेक साहित्यिकांनी निर्माण केलेल्या साहित्य समुच्चयाला काही समान गुणधर्म असतात हे मानणे कितपत संयुक्तिक आहे? 'राष्ट्रीय वैशिष्ट्ये' नावाची वस्तुच मुळात अस्तित्वात असते काय?'' त्या त्या राष्ट्राचे भौगोलिक स्थान, ऐतिहासिक परंपरा, भाषिक, विशेष साहित्याची विकास परंपरा इत्यादींच्या सहाय्याने राष्ट्रीय साहित्याचे गुणविशेष सामान्यत: निश्चित केले जातात. शिवाय प्रत्येक राष्ट्रातील मानव

समाजाची एक विशिष्ट जीवनसरणी असते. त्यातून त्याचा जीवनविषयक दृष्टिकोन आकार घेत असतो. या जीवनविषयक दृष्टिकोनाचे प्रतिबिंब राष्ट्रीय साहित्यात उमटणे अपरिहार्य असते.

वेगवेगळ्या राष्ट्रांचे आत्मतत्व त्या त्या राष्ट्रीय साहित्याच्या आधारे ठरविण्याचा प्रयत्नांना ऐतिहासिक महत्त्व आहे. एकाच भाषेतील साहित्यात वेगवेगळ्या राष्ट्रांच्या साहित्याचा समावेश होतो. तेव्हा राष्ट्रीय साहित्याचे प्रश्न अधिक गुंतागुंतीचे होतात. उदाहरणार्थ इंग्लिश या भाषेमध्ये ब्रिटीश साहित्य, आयरिश साहित्य आणि अमेरिकन साहित्य या तीन वेगवेगळ्या राष्ट्रीय साहित्यांचा समावेश होतो. 'इंग्लिश साहित्य' या एका छत्राखाली आयरिश साहित्य आणि अमेरिकन साहित्य यांचा एकत्रित विचार करावा, तर राष्ट्रीय साहित्य म्हणून त्यांच्यामधील डोळ्यात भरणाऱ्या वेगळेपणाचे काय करावे असा प्रश्न, निर्माण होतो. पूर्वी अमेरिकेत लिहिले जाणारे साहित्य 'वसाहतीचे इंग्लिश' म्हणून ओळखले जात असे. पण काळाच्या नेमक्या कोणत्या टप्प्यापासून ते तसे ओळखले जाण्याचे बंद झाले व स्वतंत्र राष्ट्रीय साहित्य म्हणून ते केव्हा गणले जाऊ लागले, हे ठरविणे तसे सोपे नाही. राजकीय स्वातंत्र्य मिळाले एवढ्यामुळेच हे घडून आले आहे का? की खुद्द लेखकांना झालेली राष्ट्रीयतेची जाणीव त्याच्या मुळाशी आहे का? की राष्ट्रीय लेखनविषयक व स्थानिक मातीचा रंग' यांचा उपयोग त्याला कारणीभूत आहे? की निश्चित स्वरुपाच्या राष्ट्रीय शैलीचा उद्‌भव झाल्याचे ते फलित आहे? असे मूलगामी प्रश्न रेन वेलेक यांनी या संदर्भात उभे केले आहेत. अशाच तऱ्हेचे प्रश्न भारतातील सिंधी साहित्य आणि पाकिस्तानातील सिंधी साहित्य, भारतातील बांगला साहित्य आणि बांगला देशातील बांगला साहित्य किंवा भारतामधील तामिळ साहित्य आणि श्रीलंकेतील तामिळ साहित्य यांच्याबाबत उभे केले जाऊ शकतात.

राष्ट्रीय साहित्यांची तुलना उथळ होऊ नये म्हणून तौलनिक साहित्याला काही पथ्ये पाळावी लागतात. सार्वत्रिक आणि अपरिवर्तनीय अशा 'राष्ट्रीय गुणधर्मा' वर लक्ष केंद्रित केले तर तो तुलनात्मक अभ्यास वरवरचा आणि उथळ होईल. त्यामुळे एकंदर राष्ट्रीय साहित्याचे विहंगमावलोकन करुन विशिष्ट कालखंडावर अथवा त्या त्या राष्ट्रीय साहित्याच्या विकसन प्रवृत्तीवर तुलना केंद्रित करणे लाभदायक ठरते. इंग्लिश आणि फ्रेंच साहित्याच्या सातत्याने विकसित होणाऱ्या साहित्याची तुलना सातत्याने विकसित न होणाऱ्या जर्मन साहित्याशी अशा तऱ्हेने करणे उपयुक्त ठरेल, असे एस. एस. प्रावर यांचे म्हणणे आहे. त्यातही या तुलनेचा बहुतांशी भाग इतिहासातील एखाद्या विशिष्ट कालखंडाशी आणि एखाद्या विशिष्ट वाङ्‌मय प्रकाराच्या ऐतिहासिक विकासक्रमाशी संबंध असावा असेही त्यानी बजावलेले आहे. राष्ट्रवादाचे स्वच्छंदतावादी स्वरुप आणि वाङ्‌मय इतिहास लेखनातील आधुनिक प्रवृत्ती यांच्यामध्ये निकटचा संबंध असल्यामुळे राष्ट्रीय साहित्याच्या संकल्पनेला जास्त वाव मिळत गेला, असे रेन वेलेक यांना वाटते. रॉय पास्कल यांनी केलेली इंग्लिश कादंबरी आणि जर्मन कादंबरी यांची तुलना राष्ट्रीय साहित्यांच्या तुलनेत एक नमुना म्हणून एस. एस. प्रावर यांनी उदाहरणादाखल दिलेली आहे.

## २.२.२ विश्वसाहित्य

'विश्वसाहित्य ही संज्ञा पहिल्यांदा गटे यांनी वापरली. त्यांनी योजलेली मूळ जर्मन संज्ञा "Weltlitaratur' अशी होती, तिचा इंग्लिश अनुवाद "World Litarature' असा करुन तो समीक्षकांनी प्रचलित केला. भारतामध्ये रवींद्रनाथ ठाकूर यांनी १९२१ मध्ये एका व्याख्यानात 'विश्वसाहित्य' ही संकल्पना मांडली तेव्हापासून भारतीय समीक्षकांनी 'विश्वसाहित्य' ही संज्ञा प्रचलित केली. मात्र वेगवेगळ्या समीक्षकांना 'विश्वसाहित्य' या संज्ञेच्या अभिप्रेत असलेल्या अर्थछटा भिन्नच आहेत. आणि त्यानुसार या संज्ञेच्या अर्थकक्षाही भिन्न होतात. गटे यांचे स्वप्न होते की, जगातील यच्चयावत साहित्ये कधीतरी एकात्म होतील. ''एका वैश्विक कार्यालयात प्रत्येक राष्ट्राने आपापल्या वाट्याला आलेली भूमिका वठवावी'' व सर्व साहित्यांचे एकात्मिकरण होऊन त्यातून एक महान संश्लेषण सिद्ध व्हावे असे ध्येय होते. हे ध्येय साकार होताना आणि झाल्यानंतर जगातील साहित्याचे जे स्वरुप असेल त्याला गटे यांनी 'विश्वसाहित्य' हे अभिधान दिले आहे.

तथापि काही समीक्षकांनी 'विश्वसाहित्य' ही संकल्पना 'अखिल जगातील महान साहित्यकृतींचे भांडार' या अर्थाने उपयोजिली आहे. होमर, शेक्सपिअर, गटे, कालिदास, तुकाराम, टॉलस्टॉय, चेकॉव्ह यांच्यासारखे साहित्यकार आणि 'रामायण, महाभारत, ईलियड, ओडिसी, गीतांजली, आऊटसायडर' या सारख्या साहित्यकृती साऱ्या जगात प्रतिष्ठाप्राप्त असतात आणि ती प्रतिष्ठाही कालजयी असते. या अशा सगळ्या साहित्याला मिळून 'विश्वसाहित्य' असे काही समीक्षक संबोधतात. न. चि. केळकर यांनी मांडलेली 'अक्षर साहित्य' ही संकल्पना याच प्रकारची आहे. ''प्रत्येक पिढीची अभिरुची आणि स्मरणशक्ती या जोडचाळणीतून गाळल्यावर जे शिल्लक उरते ते अक्षर वाङ्मय'' असे न. चि. केळकरांनी म्हटले आहे. तेव्हा जगभरातील अक्षर वाङ्मयाचे भांडार म्हणजे विश्वसाहित्य असे या अर्थछटेनुसार ठरते. रवींद्रनाथ ठाकूर यांनी देखील ह्या माणसात 'विश्वसाहित्य' ही संज्ञा प्राय: याच अर्थाने वापरली होती. अक्षर वाङ्मय आणि विश्वसाहित्य' या संज्ञांच्या अर्थकक्षामध्ये थोडासा फरक करता येईल. 'अक्षर वाङ्मय' हे स्मृती आणि अभिरुची यांच्या सीमारेषा ओलांडून जात असले तरी ते त्या त्या राष्ट्रापुरतेच असू शकते. परंतु 'विश्वसाहित्य' मात्र राष्ट्राच्याही सीमा ओलांडून अखिल जगात कौतुकाचा, आदराचा व सन्मानाचा विषय बनलेले असते असे म्हणता येईल. 'विश्वसाहित्य' या संज्ञेची आणखी एक अतिव्याप्त अर्थछटा आहे. 'विश्वातील सगळे साहित्य' अशा अर्थीही काही समीक्षक ही संज्ञा वापरतात. विश्वातील सगळ्या साहित्याचे मिळून जे एक संकुल तयार होते, त्याला उद्देशून ही संज्ञा वापरली जाते. किंवा दुसऱ्या पद्धतीने सांगावयाचे तर 'विश्वसाहित्य' संज्ञा 'साहित्यविश्व' या अर्थाने गृहित धरली जाते. विश्वसाहित्यामध्ये राष्ट्राच्या सीमा ओलांडणाऱ्या साहित्याविषयक चळवळींचा तसेच नव्या पद्धतींचा अभ्यास केला जातो, तर तौलनिक साहित्यांमध्ये दोन किंवा अधिक साहित्यांमधील परस्परसंबंधाचा

अभ्यास अंतर्भूत होतो, असा फरक त्यांनी केला आहे. या भूमिकेचा स्वीकार केला तर विश्व साहित्य आणि तौलनिक साहित्य शेवटी परस्परांत विलिन होतात, असे मानावे लागते.

## २.२.३ भारतीय साहित्य

'भारतीय साहित्य' ही संज्ञा प्रथमत: पाश्चात्य भारतविद्याशास्त्राच्या (Indologists) अभ्यासकांनी वापरली. भारतातील वाङ्मयेतिहासकारांनी सुरुवातीला या संज्ञेचा स्वीकार केला नाही. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात विविध भारतीय भाषांतील वाङ्मयेतिहासकारांनी आपला भाषेतील साहित्याचा स्वतंत्रपणे इतिहास गोळा करण्यातच समाधान मानले. एकोणिसाव्या शतकांतील प्राच्यविद्याशास्त्र यांच्या "Orientalists" दृष्टीने 'भारतीय साहित्य' म्हणजे संस्कृत, प्राकृत व अपभ्रंश या भाषांमध्ये निर्माण झालेले साहित्य, एवढाच सीमित अर्थ होतो. मेकॉले आणि मॅक्समूलर या दोघांनीही याच अर्थाने 'भारतीय साहित्य' या संज्ञेचा वापर केला आहे. मेकॉले यांनी तो कुचेष्टेने व तुच्छतेने केला आहे आणि मॅक्समूलर यांनी श्रद्धेने केला आहे; पण दोघांच्या वापरातील अर्थकक्षा एकच आहे. 'राष्ट्रीय साहित्य' या संकल्पनेची जी सर्वसाधारण अर्थकक्षा आहे, त्यापेक्षा 'भारतीय साहित्य' ही संकल्पना खूपच वेगळी आहे. किंबहुना ते 'राष्ट्रीय साहित्य' या संकल्पनेच्या ठराविकतेला एक आव्हानच आहे आणि याला कारण म्हणजे भारतीय जीवनामध्ये शतकानुशतके मुरलेली आणि भारतीय जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनलेली अनेकता हे होय. या देशात एक दोन नव्हे तर अगणित भाषा एकत्र नांदत आहेत. भारतीय राज्यघटनेने प्रारंभी चौदा भारतीय भाषा भारताच्या प्रमुख भाषा म्हणून मान्य केल्या होत्या. कालांतराने या यादीत भर पडत गेलेली दिसते. पुन्हा या सर्व भाषांच्या वेगवेगळ्या बोली भाषा या असंख्य विविध भाषा एकाच वेळी भारतात पिढ्यान्‌पिढ्या गुण्यागोविंदाने नांदत आहेत. इंग्लिशमध्ये ज्याला 'Love-hate relationship' म्हणतात. भारतीय भाषांमध्ये पारस्परिक संबंध आहेत. भाषिक वाङ्मयीन आणि सांस्कृतिक क्षेत्रात आदान प्रदान व प्रेमपूर्ण सहजीवन अनुभवास येते आणि दुसरीकडून पारस्परिक स्पर्धा, कटुता आणि द्वेष यांचा प्रत्यय येतो. मराठी आणि कोकणी, मराठी आणि कन्नड, कन्नड आणि तामिळ, असमिया आणि बांगला, बिहारी हिंदी आणि इलाहाबादी हिंदी, यांच्यामध्ये प्रेम-घृणायुक्त संबंध सातत्याने आढळून येतात. अशा तऱ्हेचे पूर्विध्यपूर्ण भाषिक सहजीवन मिरवणारे भारत हे जगाच्या पाठीवरील एकमेव राष्ट्र आहे.

भारतामध्ये साहित्यसृजन करणारे साहित्यकार बहुभाषिक असल्याचे आणि अनेक भाषांमधून सहजतेने साहित्याचे सृजन करीत असल्याचे चित्र पहावयास मिळते. संत नामदेवांनी सातशे वर्षापूर्वी मराठी आणि हिंदुस्थानी या दोन्ही भाषात आपल्या आध्यात्मिक अनुभूतीला काव्यरुप दिले होते. दुसरे मध्ययुगीन कवी विद्यापती यांनी अवहत (प्राकृत) संस्कृत आणि मैथिली अशा तीन भाषांमध्ये काव्यनिर्मिती केली होती. सुप्रसिद्ध कथाकार, प्रेमचंद यांनी प्रथम काही वर्षे उर्दूमध्ये कथालेखन केले,

नंतर ते हिंदीमध्ये कथालेखन करु लागले. काका कालेकरांनी मराठी, गुजराती आणि हिंदी या तीन भाषांमध्ये साहित्याचे सृजन केले आणि या तिन्ही भाषांच्या साहित्यपरंपरेमध्ये स्वत:चे स्थान निर्माण करुन ठेवले. कमलादास यांनी मल्याळम् आणि इंग्लिश या दोन्ही भाषांमध्ये काव्य आणि गद्य लेखन केले. अरुण कोल्हटकर यांनी मराठी आणि इंग्लिश या दोन्ही भाषांमध्ये काव्य निर्माण करुन स्वत:चा वेगळा ठसा उमटविला. 'भारतीय साहित्य' या संकल्पनेच्या आव्हानात्मकतेचा हा एक पैलू आहे. भारतीय साहित्यामध्ये केवळ साहित्यकारच नव्हे, तर साहित्यकृतीदेखील बहुभाषिक असल्याचे अनोखे दृश्य पाहावयास मिळते. कालिदासांचे सुप्रसिद्ध नाटक, 'अभिज्ञान शांकुतलम्' केवळ संस्कृतमध्ये लिहिलेले नसून संस्कृत शौरसेनी, महाराष्ट्री आदि मागधी या चार वेगवेगळ्या भाषांमध्ये त्यातली भिन्न-भिन्न पात्रे बोलतात, अशा तऱ्हेची बहुभाषिक साहित्यकृती भारतात निर्माण होऊ शकते याचा अर्थच असा की, भारतामध्ये अशी एक बहुभाषिक स्थिती विद्यमान होती की जिच्यामध्ये भिन्न भाषा लोकांना भिन्न एकांतिक गटांमध्ये विभाजित करीत नव्हत्या. तर लोकांना परस्परांशी संवाद करण्यास आणि भाषांचे अडथळे उल्लंघून जाण्यास उद्युक्त करीत होत्या. बौद्ध साहित्य भांडारातील 'थेरीगाथा' मधील काही रचना संस्कृतमध्ये आहेत, तर बाकीच्या बहुतांश रचना पालीमध्ये आहेत. ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवातील 'प्रारंभीचे पाच श्लोक' संस्कृतमध्ये असून बाकी सर्व ग्रंथ मराठीमध्ये ओवी वृतात आहे.

'मल्याळम' साहित्यात 'मणिप्रवाळम' नावाचा एक काव्यरचनाप्रकार आहे. त्यामध्ये काव्याची एक ओळ मल्याळममध्ये आणि एक ओळ संस्कृतमध्ये अशी संपूर्ण काव्याची रचना असते. ही मणिप्रवाळम रचनाप्रवृत्ती केवळ मल्याळम भाषेपुरतीच सीमित नाही. ती अन्य भारतीय भाषांत देखील पाझरलेली दिसते. संत नामदेवांची 'गौळणी ठकविल्या । गौळणी ठकविल्या' अशा प्रारंभाची एक गौळण आहे. गोविंदाने केलेला गोपिवस्त्रहरणाचा प्रसंग या गौळणीत वर्णन केलेला आहे. मात्र या पाच गौळणी पाच वेगवेळ्या भाषा बोलणाऱ्या, पाच भिन्न प्रकारची ओळख मिळवणाऱ्या मराठी, कानडी, मुसलमानी, कोकणी आणि गुजरी अशा आहेत. गोविंदाला त्या आपली वस्त्रे परत करण्याची विनवणी आपापल्या भाषेत करतात. त्यासाठी कन्नड, फार्सी, मराठी, कोकणी आणि गुजराती अशी पाच भाषांतील विनवणीची पाच कडवी नामदेवांनी या गौळणीत गुंफली आहेत. 'मणिप्रवाळम' रचनेचे मराठीतील हे सर्वात जुने आणि सर्वात उत्कृष्ट उदाहरण आहे. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी 'आनंदमठ' या कादंबरीमध्ये समाविष्ट केलेले आणि पुढे राष्ट्रगीताचा दर्जा प्राप्त झालेले 'वंदेमातरम' हे गीत बांगला आणि संस्कृत या भाषातील ओळी एकत्र गुंफून लिहिलेले असल्यामुळे, ती एक प्रकारची 'मणिप्रवाळम' रचनाच आहे. सावरकरांच्या स्वतंत्रतेचे स्तोत्र या कवितेत -

*''जयोऽस्तु ते श्रीमहन्मंगले। शिवास्पदे शुभदे।*
*स्वतंत्रते भगवति। त्वामहं यशोयुता वंदे''*

हे ध्रुवपद  शुद्ध संस्कृतमध्ये असून कवितेच्या बाकी सर्व ओळी मराठीत रचल्या आहेत. प्रत्येक मराठी कडव्यानंतर संस्कृत ध्रुपद येत असल्यामुळे ही देखील एक प्रकारची मणिप्रवाळम रचनाच आहे.

भारतासारख्या खंडप्राय देशात प्राचीन प्राचीन काळापासून आजतागायत विविध तऱ्हेच्या धार्मिक राजकीय सामाजिक, प्रावृतिक आंदोलनाच्या समवेत साहित्याची निर्मिती होत राहिली आहे. विभिन्न भौगोलिक, भाषिक आणि सामाजिक अस्मिता जपणाऱ्या या देशाने एका विशिष्ट पातळीवर एकात्मतेला जपले आहे. विविधतेतील एकता हे या देशाचे जीवनसूत्र आहे. विविध भाषांमधून विविध प्रकारांनी अभिव्यक्त झालेल्या साहित्यातूनही हे जीवनसूत्र कसे गुंफले गेले आहे याची चिकित्सा 'भारतीय साहित्य' या संकल्पनेच्या मुळांशी आहे. १९४५ मध्ये 'पेन' PEN संस्थेच्या अखिल भारतीय संमेलनाच्या पहिल्या अधिवेशनाच्या अध्यक्षा सरोजिनी नायडू यांनी म्हटले होते, 'भारत एक आहे, आणि अखंड आहे, भारतीय प्रजा अनेक भाषांत बोलत असेल पण सर्वांचे हृदय एक आहे.' आणि डॉ. राधाकृष्णन यांचे वचन (जे साहित्य अकादमीने आपले ब्रीद वाक्य म्हणून स्वीकारले आहे) तर सर्वश्रुत आहे.

'भारतीय साहित्य एकच आहे, परंतु ते अनेक भाषांमधून लिहिले जाते.' अर्थात भारताच्या विविध भाषांमध्ये निर्माण झालेल्या साहित्यकृतीमध्ये आढळून येणाऱ्या साम्यस्थळांची सूची म्हणजे भारतीय साहित्य नव्हे. साम्यस्थळांच्या शोधाइतकेच किंवा त्याच्यापेक्षाही थोडे जास्त महत्त्व प्रत्येक भाषेतील साहित्याच्या वेगळेपणाला आहे. प्रत्येक फुलांची स्वतंत्र ओळख व सुंदरता याचे भान ठेवून वेगवेगळ्या फुलांचा पुष्पगुच्छ बनवला जातो. त्याच्याशी 'भारतीय साहित्य' या संकल्पनेचे साधर्म्य आहे.

भारतीय साहित्याची पार्श्वभूमी अत्यंत समृद्ध आणि बहुआयामी आहे. सर्व भारतीय भाषांमध्ये या पार्श्वभूमीतूनच साहित्याचा उद्‌भव झालेला आहे. या पार्श्वभूमीच्या केंद्रस्थानी वेदांत तत्वज्ञान आहे. पुनर्जन्म, कर्मविपाक आणि नियतीवाद हे या तत्वज्ञानाचे तीन पैलू आहेत. भारतीय साहित्यातील कोणत्याही भाषेतील कोणतीही साहित्यकृती घेतली तरी तिच्या आशयसुत्रात आणि आकृतीबंधात हे तत्वज्ञान निहित असलेले आढळेल. अर्थात भारतीय साहित्यात निहित असलेले हे वेदांत तत्वज्ञान अस्तिकपक्षी असेल किंवा नास्तिकपक्षीही असेल. कारण वेदांत तत्वज्ञानाचा आदर करणारी एक मोठी कालव्यापी परंपरा जशी भारतात आहे, तशीच वेदांत तत्वज्ञानाला विरोध करणारी व त्याविरुद्ध बंड करणारी चार्वाक, बुद्ध, फुले, आंबेडकर यांची ही एक मोठी प्रभावी परंपरा भारतात आहे. एक तर वैदिक तत्वज्ञानाचा स्वीकार करुन अथवा त्याला विरोध करुनच तेथील लोकांची जीवनसरणी शतकानुशतके घडत गेलेली आहे. म्हणजेच या ना त्या स्वरुपात, सकारात्मक अथवा नकारात्मक रीतीने, वैदिक तत्वज्ञान हे भारतीयांच्या जीवनधारणेत आणि म्हणून भारतीय साहित्यात, अनुस्युत असते. पाचव्या शतकांतील तमिळ अलवारांपासून विसाव्या शतकातील अरविंद - विनोबा - तुकडोजी - रजनीश आठवले शास्त्री यांच्यामार्फत भक्तीची आणि त्या अनुषंगाने भक्तिसाहित्याची एक धारा भारतामध्ये वाहत

राहिलेली आहे. ती एक आध्यात्मिक – सामाजिक पायावर उभी राहिलेली देशव्यापी वाङ्मयीन चळवळ आहे. एका अलौकिक अनुभूतीची उत्कट धुंदी ही या भक्तिसाहित्याची प्रेरणा आहे. 'प्रेमपिसे भरले अंगी' अशा भावावस्थेत या साहित्याची निर्मिती झालेली आहे. पुन्हा पुन्हा जन्माला यावे आणि परमेश्वराच्या उत्कट भक्तीचे सुख भोगावे, ही मनिषा या भक्तिकाव्यातून कवींनी व्यक्त केली आहे.

*''भोगावरी आम्हा घातला पाषाण । मरणा मरण आणियले''*

अशा विरक्त जीवनवृत्तीने हे संतकवी जीवनाला सामोरे गेलेले आहेत. भक्तिकाव्याची ही उत्कट परंपरा हे भारतीय साहित्याचे एक अभिन्न अंग आहे.

भारताचा इतिहास अनेक प्रकारच्या वैविध्यपूर्ण राजकीय संघर्षानी युक्त आहे. अशोकाचे साम्राज्य, विजयनगरचे साम्राज्य, मुघलांचे साम्राज्य, मराठ्यांचे साम्राज्य अशी अनेक साम्राज्ये या देशात भरभराट पावली आणि लयास गेली. छत्रपती शिवाजी, छत्रपती संभाजी, टिपू सुलतान, राणी लक्ष्मीबाई, राणी चन्नमा यांच्यासारखे पराक्रमी राज्यशासक या देशात आपल्या रणकौशल्याने अजरामर झाले. ब्रिटीशांच्या महासत्तेविरुद्ध भगतसिंगादी क्रांतिकारकांनी, टिळकादी लोकनेत्यांनी, गांधीसारख्या महात्म्यांनी प्रभावी लढे दिले. या सगळ्यातून एक संकलित राजकीय उलाढालीचा इतिहास या देशाला लाभला आहे. तसेच राजाराम मोहनरॉय, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर, डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्यासारख्या विचारवंतांनी परखडपणे प्रबोधन करुन या देशातील समाज ढवळून काढला आहे व प्रगतशील बनवला आहे. हे सगळे राजकीय आणि सामाजिक संचित भारतीय साहित्यात या ना त्या स्वरुपात प्रतिबिंबित झाले आहेत. मग ती मामोनी रायसम गोस्वामी यांची 'छिन्न मरता'सारखी आसमिया कादंबरी असो किंवा भालचंद्र नेमाडे यांची 'हिंदू' सारखी मराठी कादंबरी असो, की अरुंधती रॉय यांची 'गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज'सारखी इंग्लिश कादंबरी असो. सावरकरांची मराठी कविता असो सुब्रहमण्य भारतीची तमिळ कविता असो, की सुभद्राकुमारी चौहान यांची हिंदी कविता असो. स्वातंत्र्यापूर्वी गांधीजींनी 'खेड्याकडे चला' हा संदेश भारतीय लोकांना दिला होता. स्वातंत्र्यानंतर भारताचे झपाट्याने औद्योगिकीकरण होऊ लागले परिणामता: खेड्याकडून इतरांकडे लोकांचा ओघ सुरु झाला. शहरामध्ये लोकसंख्येचा स्फोट होण्याची परिस्थिती निर्माण झाली आणि झोपडपट्ट्या तयार झाल्या. तिकडे खेड्यांचे वेगाने शहरीकरण होऊ लागले आणि त्याचे स्वत्व हरपले. त्यातून खेडे आणि शहर असा एक द्विध्रुविय संघर्ष निर्माण झाला हा संघर्ष भारतीय साहित्याच्या आशयसुत्रांपैकी एक महत्त्वाचे आशय सूत्र आहे.

भारतातील समृद्ध पुराणकथांनी भारतीय साहित्याला अनेकपदरी मिथकांचा समृद्ध वारसा दिलेला आहे. कोणत्याही भाषेतील साहित्यकार सहजतेने या मिथकांचा वापर करतो, त्याची पुनर्रचना करतो आणि नव्या अर्थछटांच्या परिवेशात त्यांचे आकृतीबंध गुंफतो. भारतीय मिथके ही भारतीय साहित्याच्या सृजनप्रक्रियेतील नित्यनूतन खाण आहे. भारतीय साहित्य मूलत: मौखिक परंपरेने प्रसृत झाले. वेदांचे

विशिष्ठ स्वरावरोहात पठण करुनच वेद जिवंत ठेवले गेले. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे प्रसृत झाले. संतांचे अभंगही मौखिक परंपरेनेच प्रसृत होत राहिले. साहित्यकृतिची हस्तलिखिते तयार झाली आणि त्याच्या प्रती तयार केल्या जाऊ लागल्या तरी मौखिक प्रसार परंपरा टिकून राहिली. हस्तलिखिते तयार करण्याचे काम कष्टप्रद असल्यामुळे आणि प्रतीची संख्या मोजकी असल्यामुळे, एका पुराणिक बुवाने ग्रंथांचे वाचन करावयाचे आणि भोवताली जमलेल्या, श्रोतृवर्गाने श्रवण करावयाचे अशी पद्धत पडली. या प्रसारपद्धतीचे प्रतिबिंब ज्ञानेश्वरी आणि दासबोध या सारख्या ग्रंथाच्या रचनाबंधात पडलेले दिसून येते. या दोन्ही ग्रंथांची रचनाच वक्ता-श्रोता संवाद या पद्धतीची केलेली आहे. ज्ञानेश्वर आणि रामदास हे दोघेही या ग्रंथामध्ये श्रोत्यांशी संवाद करतात. त्यांना अवधानाची विनवणी करतात त्यांची स्तुती करतात. श्रोते प्रश्न उपस्थित करतात. विषयांतर होऊ लागले तर दटावतात. योग्य ठिकाणी रसिकतेने दाद देतात. समूहांतर्गत ग्रंथवाचनाची जी प्रसारपद्धती रुढ होती, त्यातूनच हा रचनाबंध या ग्रंथात स्वीकारलेला आहे. साहित्याच्या प्रसारणांची आणखी एक पद्धत भारतामध्ये अस्तित्वात होती ती म्हणजे, सादरीकरण. साहित्यकृती श्रोतृवर्गापुढे सादर करताना ती अभिनय संगीत, नृत्य चित्र इत्यादी अन्य कलांच्या सहाय्याने अधिक परिणामकारक आणि अधिक मनोरंजक स्वरुपात प्रस्तुत करणे. कीर्तन, तमाशा, गौळण, सोंगीभजन, भारुड, गोंधळी आख्यान, पोवाडे, लावणी, चित्रकथा ही अशा सादरीकरणाची विविध रुपे होती त्यानंतर मुद्रणाचा शोध लागला, मुद्रणामुळे साहित्याचा प्रसार वेगाने आणि मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता निर्माण झाली. तशीच साहित्याची आस्वादप्रक्रियाही बदलली. साहित्य ही समुहाने सार्वत्रिकपणे आस्वादण्याची गोष्ट होती. ती एकट्याने खाजगीपणे अनुभवण्याची बाब बनली त्यामुळे साहित्याची परिमाणे बदलली. पुढे इंटरनेटचा जमाना आला.

भारतीय साहित्यात काळाच्या ओघात काही वाङ्मय प्रकार परिपुष्ट झाले, काही रुपांतरीत झाले, तर काही विलुप्त होऊन गेले. संस्कृत साहित्यात महाकाव्य हा सर्वात महत्त्वाचा काव्यप्रकार होता. काळाच्या ओघात तो लुप्त झाला. बांगलामध्ये मधुसुदन दत्त यांनी 'मेघनादवध' हे रामायणाधिष्ठित महाकाव्य लिहिले, परंतु त्याचे नाते संस्कृत महाकाव्याशी नसून इंग्लिश महाकाव्यांशी होते. मराठीतील पंडीत कवींनी लिहिलेली आख्याने ही महाकाव्य या वाङ्मय प्रकाराची भ्रष्ट नक्कल होती. तमिळमधील 'परणि' हा काव्यप्रकार महाकाव्यजनित असला तरी महाकाव्याची भव्यता त्यामध्ये नाही मराठी कवी यशवंत यांनी 'छत्रपती शिवराय' हे महाकाव्य रचले, त्याचे महत्त्व केवळ वाङ्मयेइतिहासातील नोंदीपुरतेच राहिले. संस्कृतमधील पाच विदग्ध महाकाव्ये आणि दोन तमिळ महाकाव्ये एवढ्यापुरताच 'महाकाव्य' हा वाङ्मयप्रकार भारतीय साहित्यात सिमीत झाला. भारतीय नाटकाचा मूळ धागा हरवून नवे भारतीय नाटक उदयास आले. कथा, आख्यायिका, किस्सा, दास्ता, कहाण्या हे मुळातले भारतीय कथाप्रकार लुप्त झाले. लीळा हा प्रकार मराठी महानुभाव साहित्याने निर्माण केला. त्यातच तो विरुन गेला. एकोणिसाव्या शतकात कथा कादंबरी हे वाङ्मय प्रकार पाश्चात्य साहित्यातून भारतीय साहित्यात आले.

ललित निबंध प्रवासवर्णन, आत्मचरित्र हे वाङ्मय प्रकारही असेच पाश्चात्य साहित्यातून आले. भारतीय साहित्याने हे आपलेसे केले.

शेवटी साररुपाने असे म्हणता येईल की, भारतीय साहित्यात दृष्टिकोनाची एक एकात्मता आहे. कारण भिन्न भाषांतील लेखकांचे स्फूर्तिस्थान समान आहे. आणि त्यांची भावनात्मक व ज्ञानात्मक अनुभूतीही समान आहे. या देशात चौफेर सारखेच ताणतणाव कार्यरत असून त्यातून समान वाङ्मयीन प्रतिक्रिया निर्माण झाल्या आहेत व सर्वांना समान अशा प्राक्कथा व प्रतिमांचा एक खजिना निर्माण झाला आहे. भाषिक माध्यम कोणतेही असो, भारतीय लेखक वैशिष्ट्यपूर्ण असा भारतीय स्वरात बोलत असतो आणि ते अगदी साहजिकच आहे.

पराकाष्टेच्या विविधतेतून आंतरिक एकता दाखविणारे भारतीय साहित्य इतर कोणत्याही राष्ट्रीय साहित्यापेक्षा पृथगात्म आणि तौलनिक साहित्याच्या अभ्यासाला एकीकडून पोषक आणि दुसरीकडून आव्हानात्मक आहे.

## २.३ समारोप/सारांश

राष्ट्रीय साहित्याची तुलना उथळ होऊ नये म्हणून 'राष्ट्रीय गुणधर्मावर लक्ष केंद्रित केले तर तो तुलनात्मक अभ्यास वरवरचा आणि उथळ होईल त्यामुळे एकंदर राष्ट्रीय साहित्याचे विहंगमावलोकन करून विशिष्ट कालखंडावर अथवा त्या-त्या राष्ट्रीय साहित्याच्या विकसन प्रवृत्तीवर तुलना केंद्रित करणे लाभदायक ठरते. विश्वसाहित्य ही संकल्पना पहिल्यांदा गटे यांनी वापरली, त्यांनी योजलेली मूळ जर्मन संज्ञा Weltilitaratur अशी होती. काही समीक्षकांनी विश्वसाहित्य ही संकल्पना अखिल जगातील महान साहित्य कृतीचे भांडार या अर्थाने उपयोजिलेली आहे. ''विश्वसाहित्य म्हणजे विश्वातील सगळे साहित्य अशा अर्थीही काही समीक्षकांनी संज्ञा वापरलेली आहे.''

## २.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **सकल जाणीव** : अनेक कला मिळून सिध्द केलेली जाणीव.

२. **राष्ट्र** : समाज भाषिक आणि वाङ्मयीन परंपरा ज्या लोकसमुदायात एकवटतात.

३. **अक्षर वाङ्मय** : जागतिक साहित्यिकाचे साहित्य 'विश्वात्मक साहित्य.'

४. **विश्वसाहित्य** : विश्वमान्य साहित्य.

५. **भारतीय साहित्य** : संस्कृत व प्राकृत भाषेतील साहित्याचा अंतर्भाव या साहित्यात होतो.

६. **राष्ट्रीय साहित्य** : सकल जाणिवाचे व राष्ट्र घटकाचे साहित्य ते साहित्य.

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

❑ **योग्य पर्याय निवडा.**

१. राष्ट्रीय साहित्याची तुलना उथळ होऊ नये म्हणून तौलनिक काय करावे लागते?

*(अ) पथ्ये पाळावी लागतात* *(क) प्रभाव पडावा लागतो*

*(ब) तुलना करावी लागते* *(ड) यापैकी नाही.*

२. 'राष्ट्र' ही संकल्पना कल्पनेने रचलेले काय आहे?

*(अ) भाकित* *(क) रचित*

*(ब) नाटक* *(ड) श्राव्य.*

३. साहित्य ही बोलून चालून साकार होणारी कोणती वस्तू आहे?

*(अ) व्यक्तीप्रतिभा* *(क) समाजनिष्ठ प्रतिभा*

*(ब) सामूहिक प्रतिभा* *(ड) यापैकी नाही.*

४. न. चि. केळकर यांनी कोणती संकल्पना मांडली?

*(अ) अक्षर साहित्य* *(क) वाङ्मय साहित्य*

*(ब) शब्द साहित्य* *(ड) वरीलपैकी सर्व.*

५. खालीलपैकी 'विश्वसाहित्य' ही संकल्पना कुणी मांडली?

*(अ) न. चि. केळकर* *(क) माधव ज्युलियन*

*(ब) रवींद्रनाथ टागोर* *(ड) रवींद्र जैन.*

❑ **उत्तरे :-**

१. *(अ) पथ्ये पाळावी लागतात.*

२. *(क) रचित.*

३. *(क) समाजनिष्ठ प्रतिभा.*

४. *(अ) अक्षर साहित्य.*

५. *(ब) रवींद्रनाथ टागोर.*

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

### २.६.१ दीर्घोत्तरी प्रश्न

१. राष्ट्रीय साहित्य व विश्वसाहित्य या संकल्पनांचा परस्पर संबंध स्पष्ट करा.

२. 'भारतीय साहित्य व राष्ट्रीय साहित्य' या संकल्पनांचा परस्पर संबंध स्पष्ट करा.

३. भारतीय साहित्याची संकल्पना आणि स्वरूप स्पष्ट करा.

४. विश्वसाहित्याची संकल्पना व स्वरूप स्पष्ट करा.

### २.६.२ लघुत्तरी प्रश्न

१. भारतीय साहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.

२. राष्ट्रीय साहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.

३. विश्वसाहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.

## २.७ उपक्रम

१. कोणत्याही दोन साहित्यकृतींचा अभ्यास करून त्यांची तुलना करा.

## २.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **निशिकांत मिरजकर** : *'तौलनिक साहित्य'*, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

२. **वसंत बापट** : *'तौलनिक साहित्याभ्यास'*, मौज प्रकाशन, पुणे.

३. **आनंद पाटील** : *'तौलनिक साहित्य नवे सिध्दांत आणि उपयोजन'*, साकेत प्रकाशन, पुणे.


❑❑❑

सत्र-३ : घटक-३

# तौलनिक साहित्याभ्यासाची वैशिष्ट्ये

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ तुलना-साहित्याभ्यासाचे साधन

३.२.२ तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्त्व

३.२.३ तुलनात्मक साहित्याभ्यासाचे स्वरूप

३.२.४ तौलनिक साहित्याभ्यासाचा उद्देश

३.२.५ तौलनिक साहित्याभ्यासासाठी साहित्याचे स्वरूप

३.२.६ सांस्कृतिक-सामाजिक आदानप्रदान

३.२.७ आदानप्रदानाची कारणे

३.३ समारोप

३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक अभ्यासासाठी संदर्भग्रंथ


## ३.० उद्दिष्टे

१. तुलनात्मक साहित्याभ्यासाचे महत्त्व समजावून घेणे.

२. तुलना-साहित्याभ्यासाचे महत्त्वाचे साधन कसे आहे ते समजावून घेणे.

३. वाङ्मय परंपरा व वाङ्मयाच्या अभ्यासाचे महत्त्व समजावून घेणे.

४. अभिव्यक्ती हे साहित्य निर्मितीचे साधन आहे, ते समजावून घेणे.

५. तौलनिक साहित्य व सांस्कृतिक-सामाजिक आदानप्रदानाची कारणमीमांसा करणे.

## ३.१ प्रास्ताविक

तौलनिक साहित्याभ्यास ही साहित्याच्या अभ्यासाची एक नवी शाखा आहे. 'तौलनिक' या विशेषणामुळे या साहित्याभ्यासाला जे वेगळे परिमाण प्राप्त होते. तेवढ्यापुरतीच चर्चा महत्त्वाची आहे. तौलनिक साहित्याभ्यासात तुलना आधारभूत आहे, हे स्पष्टच आहे. साहित्याभ्यासाला तुलना हा मूलभूत आधार आहे, ही गोष्ट सहज लक्षात येण्याजोगी आहे. तुलनेसाठी एकापेक्षा अधिक साहित्याची अपेक्षा असणार हे उघड आहे. इंग्रजीमध्ये 'Comparative Literature' असा शब्दप्रयोग रूढ झाल्यामुळे या विषयाच्या अभिधानावरच पुष्कळ टीका झाली.

तुलना हाच एक स्वतंत्र सिध्दांत आहे असे डॉ. आनंद पाटील यांचे मत आहे. ते म्हणतात, ''तुलना हाच एक स्वतंत्र सिध्दांत आहे. ही भूमिका एकदा ठामपणे स्वीकारली, म्हणजे तुलना हाच वाङ्मय निर्मितीचा पाया कसा आहे, याचा उलगडा होत जातो.'' कोणताही लेखक विशिष्ट विषय, तपशील, पात्रे वैगरे निवडताना तुलना करीतच असतो. त्याच्या शब्दांच्या निवडीतही तुलनात्मकता अंगभूत असतेच.

साहित्याच्या विचारात तुलनेशिवाय पान हलत नाही. साहित्यकृतींच्या तुलनेमधूनच आपल्या आपल्या मनातील साहित्याविषयीचे तारतम्य निर्माण होऊ लागते. साहित्याच्या अभ्यासात जर तुलना ही नेहमीच आधारभूत असते. तर कोणत्याही साहित्याभ्यासाला, तौलनिक म्हणावयास काय हरकत आहे, असा आक्षेप येथे सहजच निष्पन्न होईल. विशिष्ट साहित्याभ्यासात अनुस्यूत असलेली तुलना ही सहसा अप्रकट असते आणि पुष्कळवेळा गृहितही धरलेली असते. साहित्याचे उत्तम-मध्यम-अधमत्व ठरविणे आणि मूल्यकल्पना निश्चित करणे. एवढाच हेतू अशा तुलनेमागे असतो. क्वचित दोन लेखकांच्या प्रवृत्तींची, निर्मितीची तुलना होत नाही असे नाही. तेवढ्यापुरती तौलनिक साहित्याभ्यासांची पध्दती अवलंबिली जात असेलही. पण विशिष्ट साहित्याभ्यासात हा भाग गौणच असतो. तौलनिक साहित्या-भ्यासात मात्र एकापेक्षा अधिक साहित्यांच्या संदर्भात प्राणभूत तत्त्व म्हणून तुलनेचा उघड अंगीकार केलेला असतो.

तुलनात्मक साहित्य अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट करताना मॅलोन म्हणतात, ''वाङ्मयाभ्यासातील परिपूर्ण अपेक्षा आणि जबाबदाऱ्यांचे भान तौलनिक साहित्यात ठेवले जाते. म्हणून हे क्षेत्र अधिक फलदायी आहे.'' तुलनात्मक अभ्यासाचे महत्त्व आज निश्चितच निर्विवाद आहे. आजच्या युगात तुलनात्मक अभ्यासाच्या साहाय्याने विभिन्न भाषा, शैली, राष्ट्र तसेच त्यांची संस्कृती इत्यादींना आपण एकाचवेळी अभ्यासासाठी घेऊ शकतो.

दोन भिन्न राष्ट्रे अथवा दोन परस्पर भिन्न संस्कृती ह्यात आदानप्रदान होण्याची शक्यता नव्हती.

पण जित जेते संबंधामुळे सांस्कृतिक विनिमय हा भाषा, साहित्य, आचारविचार अशा अनेक क्षेत्रांत घडून येतो. त्यामुळे तुलनात्मक साहित्याभ्यासाचे महत्त्व, वाङ्मयाचा अभ्यास, सांस्कृतिक, सामाजिक आदानप्रदान प्रक्रिया अभ्यासणे महत्त्वाचे ठरते.

## ३.२ विषय विवेचन

भिन्न भाषातील साहित्याचा अभ्यास करणे हा तौलनिक साहित्याचा एक उद्देश आहे, ज्यामुळे त्या साहित्याचे उच्च अभिज्ञान व रसास्वादन होईल. त्याचबरोबर त्या भाषांतील साहित्याविषयी सर्वसमावेशक अशा विचारधारेचा विकास होईल. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये प्राचीन किंवा आधुनिकतेला फारसे महत्त्व नाही. वस्तुस्थिती अशी आहे की, जे तुलना करणारे असते ते तौलनिक साहित्याभ्यासाचे विषय बनते.

## ३.२.१ तुलना–साहित्याभ्यासाचे साधन

कोणत्याही साहित्याच्या संशोधनाचा अभ्यास करतेवेळी तुलनात्मक अभ्यासाला महत्त्व प्राप्त होते. संशोधन आणि तुलनात्मक अभ्यासामध्ये काही विशेषता दिसून येतात. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये गंभीर अन्वेषण, परीक्षण, निष्कर्ष, साहित्यिक, समीक्षा इ. प्रक्रियांचा उपयोग केला जातो.

तुलनात्मक अध्ययनाची उपयोगिता स्पष्ट करताना डॉ. आनंद पाटील म्हणतात, ''जग एक आहे असे विज्ञान म्हणते, पण आपण घर करून राहतो ते जग एक नाही, त्यात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक वगैरे पध्दतींची विविधता आहे. अशा विघटन पावलेल्या जगात अनेकात एकता शोधायला तौलनिक साहित्य उपयोगी पडते.'' वाङ्मयाच्या इतिहासातील 'वाङ्मय' वा साहित्य आणि तुलना यांच्या साहचर्यातून विकसित झालेली 'तौलनिक साहित्य' ही संकल्पना विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात प्रतिष्ठा पावलेली आहे.

माणसाचे विचार तुलनेच्या आधाराशिवाय अस्तित्वातच येऊ शकत नाही. 'अ' हा 'ब' आहे किंवा 'अ' हा 'ब' नाही. ही तर्कशास्त्रातील कोरडी विधानेदेखील तुलनामुक्तच असतात. सगळे तर्क कल्पनाविश्व हे तुलनेशिवाय शक्यच नाही. कोणतीही व्यक्ती आपला आत्मनिष्ठ विचार दुसऱ्याला सांगू इच्छिते. तेव्हा साम्य–वैष्यमाचा आधार घेऊनच वस्तुनिष्ठ म्हणून रूढ होते. आपण वापरतो ते प्रत्येक विशेषण सापेक्ष आणि म्हणून तुलनाधिष्ठित असते. साहित्याच्या क्षेत्रात तर उक्त आणि अनुक्त तुलना सर्वव्यापी असल्याचे आढळते. मानवी मनाच्या व्यवहारात तुलनातत्व अनादी काळापासून अतिशय महत्त्वाचे ठरले आहे.

साहित्याच्या तुलनात्मक अभ्यासाविषयी वसंत बापट म्हणतात, ''कोणत्याही कवीविषयी अथवा

लेखकाविषयी होणारी आपली धारणा नेहमी अन्यसापेक्षच असते. संस्कृत कवींच्या मालिकेत व्यास, वाल्मिकी, भास, कालिदास, भवभूती इत्यादींना आपण महत्त्व देतो ते प्रकट किंवा अप्रकट तुलनेच्याच साहाय्याने आणि ते महत्त्व इतरांना देत नाही याचे कारणही तेच. आपण वाचलेल्या साहित्याचा एक उठावाचा नकाशा आपल्या मनात तयार होतो आणि त्याच्यामध्ये उत्तुंग शिखरे कोणासाठी, सपाटीवर वस्ती कोणाची आणि दऱ्याखोऱ्यांत कोणाला टाकावयाचे याचा आपण नकळत विचार केलेला असतो. याचाच अर्थ असा की, त्या साहित्याच्या अंतर्गत असलेल्या साहित्यिकांचा तसेच साहित्यकृतींचा आपण तुलनेने विचार करतो आणि त्याचे स्थान ठरवतो.'' म्हणजेच मूल्यमापनात्मक दृष्टी आपणाजवळ असल्याशिवाय कोणत्याही साहित्याची समीक्षा अभ्यास होत नाही.

तौलनिक साहित्य या संकल्पनेला वाङ्मय व वाङ्मयाभ्यासाच्या अर्थपूर्ण संकल्पनेचे योगदान लाभावे. हा अमेरिकन तुलनाकारांचा आग्रह राहिला आहे. कारण तौलनिक साहित्याचा खरा फायदा एकापेक्षा अधिक राष्ट्रांतील साहित्यकृतींचा विचार करण्यात आहे. दोन भाषांत काम करण्यात तुलनाकारांची कसोटी लागते. किमान दोन भाषांच्या आधारे तुलना करण्याची शक्ती हेच त्याचे हत्यार आहे. पण त्या हत्याराचा वापर कसा करावा हे तौलनिक साहित्य सांगत नाही. म्हणजे 'तुलना' हा साधनावर अभ्यासकांचा ताबा राहिला पाहिजे. अभ्यासकाने आपला कब्जा घेता कामा नये. वाङ्मयाभ्यासापासून 'तौलनिक साहित्य' कसे वेगळे आहे, हे त्या संकल्पनेत स्पष्ट व्हायला हवे.

डॉ. आनंद पाटील तौलनिक साहित्याभ्यासासाठी चार गृहितके सांगतात ती थोडक्यात पुढील प्रमाणे :-

१) अभ्यास व संशोधनात साहित्यकृतीवर प्रकाश पडावा, तिचे रसग्रहण व्हावे हे गृहित असते. वाङ्मयातील कलाकृतीवर नवा प्रकाश पडत नाही, तोपर्यंत अशी चिकित्सा तौलनिक साहित्याचा भाग बनत नाही.

२) साहित्यकृतीचे विश्लेषण तिच्या ऐतिहासिक संदर्भातच करावे, हे गृहित धरले जाते. हे संदर्भ केवळ भाषिक किंवा राजकीय मर्यादांपर्यंत थांबत नाहीत. तुलनाकाराला कलाकृतीच्या बौध्दिक व वाङ्मयीन संदर्भाच्या विशाल चौकटीचे भान असावे लागते.

३) साहित्य ही मानवी कल्पनाशक्तीची निर्मिती आहे. ती प्रत्यक्षार्थवादी (Positivistic) चिकित्सेला बळी पडत नाही. माहिती संकलनात प्रत्यक्षार्थवादी विज्ञानातील तंत्राचे फायदे बऱ्याच वेळा होतात. परंतु केवळ प्रत्यक्षार्थवादी पुरावे आणि पध्दतीवर विसंबून साहित्यकृतीच्या अर्थ व मूल्यमापनाविषयीच्या निष्कर्षाप्रत पोहोचता येत नाही.

४) वाङ्मयकृतीचा संपूर्ण अर्थ व अंतिम मूल्यमापन केवळ तुलनेद्वाराच सिध्द होणे शक्य आहे. पाश्चात्य वाङ्मय एक आहे, परिपूर्ण आहे, असा दावा तज्ज्ञ करतात, परंतु ते ऐक्य प्रवाही आहे.

वरील गृहितकांना समोर ठेवून अभ्यासकांचे अर्थपूर्ण काम तुलना करण्याचे आहे. त्याचा हेतू फक्त साहित्यकृती समजण्यात व तिच्या आस्वादात भर घालण्याचा असला पाहिजे. मॅलोनने साहित्यकृती समजून घेण्यावर जास्त भर दिलेला आहे. प्रभाव चिकित्सा, वाङ्मय प्रकारांचा इतिहास, कल्पना व दंतकथांची कारकिर्द अशा अभ्यासापेक्षा तो दोन साहित्यकृतींच्या तौलनिक वाचनातून शैलीतील, साम्यभेद, नमुने व कल्पनांतील फरक यावर प्रकाश टाकण्यावर जोर देतो. एका संहितेत प्रतिकात्मकतेने व्यक्त झालेल्या अनुभवांची परिणामकारकता आणि व्यामिश्रता याची तुलना दुसऱ्या संहितेत व्यक्त झालेल्या अनुभवाच्या परिणामकतेशी आणि व्याभिश्रतेशी करणे म्हणजेच साहित्याचे मूल्यमापन होय.

आदर्श तुलनाकार एक संहिता दुसऱ्या संहितांशी जोडून तौलनिक मूल्यमापन करायला अधिक योग्य असतो. एकापेक्षा अधिक भाषांतील किंवा राष्ट्रांतील वाङ्मय अभ्यासतो, म्हणून तो काही तुलनाकार ठरत नाही. दोन किंवा अधिक राष्ट्रांतील वाङ्मयाशी तौलनिक साहित्य निगडीत असते. वाङ्मयाभ्यासातील परिपूर्ण अपेक्षा आणि जबाबदाऱ्यांचे भान तौलनिक साहित्यात ठेवले जाते, म्हणून हे क्षेत्र अधिक फलदायी आहे, असे तौलनिक साहित्याचे जोरदार समर्थन मॅलोनने केले आहे.

## ३.२.२ तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्त्व

तौलनिक साहित्याभ्यासाने विश्वसाहित्याला एकत्रित आणले जाऊ शकते आणि कमीत कमी कष्टात विश्वसाहित्याचे ज्ञान मिळवू शकतो. तसेच तौलनिक साहित्याभ्यासामुळे अभ्यासकाला आपल्या साहित्याबरोबरच इतर भाषेतील किंवा इतर साहित्यकृतींच्या गुणदोषांची माहिती तर होतेच परंतु त्याच्याबरोबरच आपल्या साहित्याची उंची किंवा श्रेष्ठता सुध्दा माहिती होते. तौलनिक साहित्याभ्यासामुळे अभ्यासकांची दृष्टी व्यापक बनू शकते. तसेच अभ्यासक चिकित्सक होण्यास मदत होते.

भिन्न भाषांतील साहित्याचा अभ्यास तौलनिक साहित्याभ्यासाचा मूळ उद्देश आहे. या अभ्यासाने सर्व साहित्याचे उच्च अभिज्ञान व रसास्वादन होऊन त्या भाषांतील साहित्याविषयी सर्वसमावेशक विचारधारा निर्माण होईल. तुलनात्मक अभ्यासामुळे विविध राष्ट्र, राज्य तसेच दोन संस्कृतींमध्येही आदानप्रदान शक्य आहे. तुलनेमध्ये एक श्रेष्ठ दुसरी कनिष्ठ असा रोख नसून साधर्म्य वैधर्म्याच्या तुलनेमधून दोन्ही साहित्यकृतींचे अंतरंग अधिक चांगल्यारितीने समजून घेणे अपेक्षित असते. तसेच श्रेष्ठ अशा साहित्यिकांचे आकलन कोणत्याही प्रकारचे पूर्वग्रह दुषितता न ठेवता अधिक वस्तुनिष्ठपणे करता येते. तसेच दोन श्रेष्ठ कलाकृतींच्या अभ्यासाने वैश्विक मूल्यांची जाणीव होते. साहित्य निर्मितीतील

अनेकविधता, अनेकता याचे भान येते. आपल्या भाषेबद्दलचा, साहित्याबद्दलचा नकारात्मक दृष्टिकोन बदलू शकतो. त्यामुळे इतर भाषेचा व साहित्याचा अभ्यास होणे, साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे या क्रिया आपोआप घडून येतात. इतर साहित्याचे कौतुक व सहिष्णुता करण्याची प्रवृत्ती निर्माण होते.

तुलनात्मक अभ्यासाचे महत्त्व आज निर्विवाद आहे. आजच्या काळात तुलनात्मक अभ्यासाने विभिन्न भाषा, शैली, राष्ट्र तसेच त्यांची संस्कृती इत्यादींना आपण एकाचवेळी अभ्यासासाठी येऊ शकतो. आपला परिसर किंवा एका मर्यादित क्षेत्रातून बाहेर येऊन समान किंवा राष्ट्राच्या व्यापक प्रदेशापर्यंत पोहचू शकतो. आपण स्वत:ला श्रेष्ठ समजण्याच्या भावनेचा लोप होतोच पण तुलनात्मक अभ्यासाच्या साहाय्याने दुसऱ्यांच्या साहित्यकृतींना श्रेष्ठ ठरवितो.

तुलनात्मक साहित्याभ्यासाने भारतीय साहित्य व पाश्चात्य साहित्यातील श्रेष्ठ-कनिष्ठ, चांगले-वाईट, स्तरीय-अस्तरीय असे मूल्यमापन करता येते. अशा पध्दतीने अभ्यास झाल्यास आपल्या भारतीय साहित्याला श्रेष्ठ व दर्जात्मक स्वरूप प्राप्त करून देण्यास मदत होते. तुलनात्मक अभ्यास केवळ साम्य वैषम्य प्रकट करणारा नसून सांस्कृतिक प्रवृत्तींच्याद्वारा मानवीय कार्यक्षेत्रातील अन्य क्षेत्रातील पारंपरिक संबंधातूनही प्राप्त होणारा असतो. तसेच दोन भिन्न भाषा व साहित्यातील साहित्यकारांची तुलना केल्यानंतरच त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक किंवा वैचारिक इ. गोष्टींचा, त्यांच्या खरेपणाचा पत्ता लागतो.

तौलनिक अभ्यासामुळे राष्ट्राच्या विकासामध्ये जो फायदा होतो, त्या संदर्भात वसंत बापट म्हणतात, ''मानवविद्यामध्ये (Humanities) या विद्येचे आगळे स्थान आहे, आता त्याच्या पुढे भिन्न-भिन्न मानवसमाज आपआपल्या वर्तुळात नांदणार नाहीत. त्यांचा परस्परांवर सतत परिणाम होणार आहे आणि या परिणामांचे वा प्रभावांचे मुख्य वाहन साहित्यिक असणार आहेत. याची जाणीव ज्याला आहे त्याला तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्त्व पटेल.'' तुलनात्मक अभ्यासाचे महत्त्व संपूर्ण मानवजातीच्या एक होण्याच्या कल्पनेला जोडून वसंत बापटांनी या अभ्यासपध्दतीचे महत्त्व स्पष्ट केले आहे.

## ३.२.३ तुलनात्मक साहित्याभ्यासाचे स्वरूप

दोन व्यक्ती, वस्तू, प्रवृत्ती, समाज, वर्ग, संस्कृती, परंपरा, धारणा, मान्यता आदी विषयांमधील साम्यभेदांची मीमांसा करणे म्हणजे तौलनिक साहित्याभ्यास होय. तुलना करणे हा मानवाचा स्वाभाविक धर्म आहे. तुलना मानवाला प्रगतीशील बनविते. तुलनेतून कोणत्याही एका वस्तूची, व्यक्तीची दुसऱ्या वस्तू अथवा व्यक्तिच्या गुणदोषांची तुलना करून त्यातील श्रेष्ठ कनिष्ठतेला अभिव्यक्त करणे होय.

तुलनेचे हे संदर्भ व्यावहारिक असले तरी साहित्याचा अभ्यास करताना तुलनेने अधिक व्यापकता प्राप्त होते. आपण तुलनात्मक साहित्याभ्यास करताना आपणाला अधिक दक्ष रहावे लागते. साहित्यामध्ये समीक्षकाची जी भूमिका असते, तशीच भूमिका तौलनिक साहित्याभ्यासकाची असावी लागते. तौलनिक साहित्याभ्यास करताना काही सूत्रे हाती येतात :-

१) तौलनिक साहित्य ही साहित्यिक इतिहासाची शाखा आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर ही शाखा बैटन आणि पुस्कीन, गटे आणि कार्लाईल, स्काट आणि विग्जी अशा लेखकांमध्ये असणाऱ्या थेट साहित्यिक संपर्कावर भाष्य करते. – **जी. एम. कर्रे.**

२) आंतरराष्ट्रीय साहित्यिक अनुबंधाचा इतिहास म्हणजे तौलनिक साहित्य होय. – **गयार्ड**.

३) तौलनिक अध्ययन हे नवे विज्ञान असून ते प्रामुख्याने विविध साहित्यातील परस्पर अन्योन संबंधातील समस्यांवर संशोधन करते. - **अम्मा सैट्टारेविग्नास**.

४) तौलनिक अध्ययन ही साहित्यिक समस्यांची अभ्यास करणारी शाखा आहे. ज्यात एकाहून अधिक साहित्य गुंतलेले असते. – **नरेश गुहा**.

वरील सूत्रांचा विचार करता एकसमान तत्त्व दिसते ते म्हणजे- साहित्याभ्यास. हा एकापेक्षा अधिक साहित्यकृतींशी संबंधित असतो. यावरून तौलनिक साहित्याभ्यास म्हणजे विविध देश अथवा वेगवेगळ्या भाषेशी संबंधित असणाऱ्या लेखकांमध्ये चालणाऱ्या साहित्यिक देवाण-घेवाणाची समीक्षा होय. पण याचा अर्थ असा नाही की, परस्पर संपर्क नसलेल्या साहित्यकृतींचे तौलनिक पध्दतीने अभ्यास होऊ शकत नाही. अलीकडे तौलनिक साहित्याभ्यासाच्या स्वरूपामध्ये बदल होऊन दोन परस्पर भिन्न अथवा परस्पर अस्पर्शित कृतींचेही तौलनिक अध्ययन करता येऊ शकते.

तुलनात्मक अध्ययनाचे स्वरूप ठरवित असताना सैध्दांतिक मांडणीची आवश्यकता असते. भिन्न भाषांतील भाषिक साहित्यातील अंत:संबंध शोधणे हे केवळ तौलनिक अध्ययनामुळेच साध्य होते. साहित्य अथवा साहित्यकृतींच्या तौलनिक अध्ययनासाठी कोणतीही निर्दिस्त चौकट असत नाही. यासाठी तौलनिक निकषांची रचना आवश्यक असते. सर्वसामान्यपणे खालील मुद्यांच्या आधारे तुलना केली जाऊ शकते.

## १. कालखंडाच्या आधारे :-

यामध्ये दोन भिन्न भाषेतील अथवा एकाच कालखंडामध्ये लिखित साहित्य अथवा साहित्यिक प्रवाहाचा अभ्यास केला जातो. उदा. 'महाराष्ट्रातील वारकरी संतकवींचा उत्तर भारतातील तेराव्या, चौदाव्या व पंधराव्या शतकातील तत्त्वज्ञान आणि वाङ्मयावर पडलेला प्रभाव.' किंवा हिंदीतील 'हिंदी

और मराठी के उपन्यासों मे नारी जीवन का चित्रण' (१८८० ते १९४० ई. तक) अशाप्रकारे कालखंडाच्या आधारे तुलनात्मक अभ्यासामध्ये कोणत्याही कालखंडाचा आधार घेऊन तुलनात्मक साहित्याभ्यास करता येतो.

## २. विषयाच्या आधारे :-

दोन भिन्न भाषेतील अथवा एकाच भाषेमध्ये एकाच विषयावर लिहिल्या गेलेल्या साहित्यकृतींचा तौलनिक अभ्यास केला जातो अथवा भिन्न भाषेतील किंवा एका भाषेतील, एकाच विषयावर लेखन केलेल्या साहित्यिकांचे अध्ययनही या प्रकारामध्ये केले जाते. परंतु अशी तुलना करीत असताना त्या साहित्यिकांमध्ये लक्षणीय संबंध अथवा समानांश असणे गरजेचे असते. उदा. 'महाभारतावरील मराठी व कन्नडमधील कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास' किंवा 'मराठी संतवाङ्मयावर योगवसिष्ठाचे झालेले परिणाम' अशा पध्दतीने मूळ विषयाच्या आधारे तुलनात्मक अभ्यास करता येतो.

## ३. भावनेच्या आधारे :-

भारत देशामध्ये राहणाऱ्या सर्वच साहित्यिकांची मानसिकता जवळजवळ एकसारखी असते. तरी पण आपल्या मानसिकतेला साहित्याच्या माध्यमातून कवी किंवा लेखक भावनांच्या माध्यमातून अभिव्यक्त करत असतात. अशाच दोन समान भावनांना घेऊन तुलनात्मक अभ्यास करता येतो. उदा. 'सूरदास अणि संत एकनाथ यांच्या साहित्यातील कृष्ण भक्तीच्या भावनेचा तुलनात्मक अभ्यास' किंवा 'गोस्वामी तुलसीदास आणि समर्थगुरू रामदास यांचा भक्तिभावनेचा तुलनात्मक अभ्यास.'

## ४. वातावरणाच्या आधारे :-

दोन भिन्न भाषेतील अथवा एकाच भाषेतील लेखकांनी साहित्यकृतीमध्ये चित्रित केलेल्या वातावरण या घटकाला केंद्रस्थानी ठेवून केलेले अध्ययन म्हणजे वातावरणाच्या आधारावर तौलनिक अध्ययन होय. जसे 'रणजित देसाई आणि शिवाजी सावंत यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यातून व्यक्त होणारे वातावरण' किंवा कन्नडमधील 'गिरीश कर्नाड आणि विजय तेंडुलकर यांच्या नाटकातून प्रतिबिंबित होणारे वातावरण' अशा विषयातून वातावरण या घटकाधारे तौलनिक अध्ययन करता येते.

## ५. आशयाच्या आधारे :-

वेगवेगळ्या लेखकांच्या साहित्यातील आशय कमी-अधिक प्रमाणात वेगवेगळे असू शकतात. परंतु काही वेळा भाषा वेगळी असूनसुध्दा आशय मात्र एकसारखे असतात, तेव्हा अशा विषयांच्या आधारे तुलनात्मक अभ्यास केला जाऊ शकतो. उदा. 'स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील कादंबरीतील

आशयसूत्रांचा तुलनात्मक अभ्यास' किंवा 'मुक्तिबोध आणि भा. रा. तांबे यांच्या कवितांचा आशयाच्या आधारे तुलनात्मक अभ्यास.'

### ६. कथनाच्या आधारे :-

विविध लेखकांच्या साहित्यकृतीतील कथनविषय कमी-अधिक प्रमाणात वेगवेगळे असू शकतात. बऱ्याचवेळा भाषा वेगवेगळी असली तरी कथनविषय एकसारखाच असतो. तेव्हा अशा साहित्यकृतींचा अभ्यास याप्रकारे करता येतो. उदा. हरिभाऊ आपटे यांच्या 'पण लक्षात कोण घेतो?' आणि कन्नडमधील बोळार बाबुराय यांची 'वाग्देवी' या कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास.

### ७. शैलीच्या आधारे :-

कुणीही कलाकार आपल्या कृतीला आकर्षक बनविण्यासाठी रचनेचे नवे वेगवेगळे प्रयोग करीत असतो. विविध भाषेतील साहित्यिकांच्या साहित्यकृतींच्या त्यांच्या रचना कौशल्याचा तुलनात्मक अभ्यास केला जातो. उदा. 'मराठी आणि हिंदीतील कादंबऱ्यांचा शैलीच्या दृष्टिकोनातून अभ्यास' किंवा 'मराठीतील सुनितांचा शैलीदृष्टिकोनातून अभ्यास.'

अशाप्रकारे वरील मुद्यांच्या आधारे साहित्याचा किंवा साहित्यकृतींचा तौलनिक अभ्यास करता येतो.

## ३.२.४ तौलनिक साहित्याभ्यासाचा उद्देश

मानववंशाच्या कल्याणाकरिता जेवढी काही तत्त्वे आधारभूत असतात. त्यांचा तौलनिक साहित्याभ्यासात समावेश करायला हवा. वसंत बापटांच्या मते, ''तौलनिक साहित्याभ्यासाचा हेतू काय? या प्रश्नाचे उत्तर इतर मानवी विद्यांचा जो हेतू असेच द्यावे लागेल.'' तौलनिक साहित्याभ्यासाने संशोधकाचा दृष्टिकोन व्यापक बनू शकतो. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विचारांची देवाणघेवाण व विश्लेषण होऊ शकतो. एका विस्तृत परिप्रेक्ष्यातील विविध भाषेतील साहित्याचे अध्ययन करणे ज्यातून त्या साहित्याचे अभिज्ञान, रसास्वाद होईल आणि त्या भाषेतील साहित्याविषयी विशिष्ट विचारधारांचा विकास होईल.

तसेच आधुनिक तंत्रज्ञानामुळे जग जवळ येत असताना या विभिन्न देशांमध्ये मानवतावाद, विश्व-मानवतावाद, मानवातील बंधुभावाची भावना वृध्दिंगत होणे गरजेचे आहे. तौलनिक साहित्याभ्यासाद्वारे आपण हा विश्वमानवतावाद जोपासू शकतो. तसेच एका साहित्यकृतीची दुसऱ्या साहित्यकृतीशी तुलना करणे हा तौलनिक साहित्याभ्यासाचा उद्देश आहे. परंतु या तुलनेद्वारे साहित्यकृतीतील श्रेष्ठ

कनिष्ठता दाखविणे गैर आहे. उलट विविध भाषेतील साहित्यकृतींच्या तौलनिक अध्ययनामुळे त्या साहित्यकृतीतील एकरूपता, समानता तसेच विभिन्नतेचे विश्लेषण करता येते. जे ज्ञानाची कक्षा रूंदावण्यास मदत करतात.

तौलनिक साहित्याभ्यासंबंधी असे म्हणता येईल की, तौलनिक अध्ययनामुळे ज्ञानाचा विस्तार होतो. तौलनिक अध्ययनामुळे व्यक्ती आपले राज्य, देश, भाषा आणि काळाची बंधने झुगारून विश्व साहित्य व मानव आदी संकल्पनांच्या आधारे विश्वबंधुता ही संकल्पना रुजवू शकतो. तसेच तौलनिक साहित्याभ्यासातून दोन जीवनशैलींचा परिचय होतो. सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक तत्त्वांचे ज्ञान साहित्यातून चित्रित झालेल्या व्यक्ती, समाजजीवनाच्या आधारे होते. परस्परांच्या आचार-विचारांची माहिती मिळू शकते. परस्परांच्या भाषेचे सामर्थ्य लक्षात येऊ शकते. दोन भिन्न भाषिक साहित्याचा अभ्यास म्हणजे दोन भिन्न भाषिक साहित्याचा अभ्यास म्हणजे दोन भिन्न भाषिक समाजाच्या संस्कृतीचाच अभ्यास असतो. या दृष्टीने प्रादेशिक भाषेतील साहित्याभ्यासातून भारतातील निरनिराळ्या प्रदेशातील संस्कृतींची ओळख होऊन भारतीय संस्कृतीच्या जडणघडणीत प्रादेशिक संस्कृतीचे स्थान लक्षात येते. त्यातून राष्ट्रीय एकात्मतेचा भाव विकसित होतो.

तौलनिक साहित्याभ्यासातून अन्य भाषेची प्रकृती आणि साहित्य परंपरेचे ज्ञान आपणास होते. त्यातून दोन्ही भाषेत समृध्दता येऊ शकते. तौलनिक साहित्याभ्यासात दोन्ही भाषेतील म्हणी, वाक्प्रचार यांच्यातील साधर्म्य-वैधर्म्याचा विचार करणे महत्त्वाचे ठरते. वाक्प्रचार आणि म्हणी यांच्यात समूहजीवनाचा अनुभव आणि परंपरागत शहाणपण Wisdom साठविलेले असते. तौलनिक साहित्याभ्यासाचे उद्दिष्ट स्पष्ट करताना डॉ. निशिगंधा व्यवहारे म्हणतात की, ''तौलनिक साहित्याभ्यासातून भारतातील विभिन्न भाषांना परस्परांच्या जवळ आणता येते. एकमेकांना संस्कृतीची ओळख करून देता येते. तसेच वेगवेगळ्या भाषेतील साहित्य परंपरांची माहितीही होते. मात्र, यासाठी तौलनिक साहित्याभ्यासकाला बहुभाषक होण्याची आवश्यकता आहे. आपल्या मातृभाषेची अस्मिता जोपासत बहुभाषक होणे ही आजच्या काळाची तसेच तौलनिक साहित्याभ्यासाच्या दृष्टिनेही गरज आहे.'' तसेच मराठी भाषा आणि साहित्यापुरते बोलायचे झाल्यास मराठी साहित्याला संस्कृत, प्राकृत, अर्धमागधी या भाषेतील साहित्याच्या प्रेरणा लाभलेल्या आहेत. इंग्रजी साहित्याकडून व साहित्यिकाकडूनही आपण काही साहित्यविषयक ज्ञान घेतलेले आहे. मराठी साहित्याला एक संपन्न आणि समृध्द परंपरा आहे. ही परंपरा अधिक वृध्दिंगत करावयाची असेल, संपन्न बनवायची असेल तर अन्य भाषेतील साहित्य परंपरेची व साहित्याची ओळख करून घेणे हेही तौलनिक साहित्याभ्यासाचे उद्दिष्ट ठरू शकते.

आणि एक महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे भिन्न भाषेतील साहित्याचा तौलनिक अभ्यास करताना त्या साहित्याची सर्जनात्मक वैशिष्ट्ये लक्षात घेऊन आपल्या भाषेतील साहित्याच्या सर्जनात्मक

वैशिष्ट्यांशी त्यांची तुलना करून काही एक वेगळेपण आढळल्यास त्याची कारणमीमांसा करता येईल. तसेच 'एकापेक्षा अधिक' ही संकल्पना तौलनिक साहित्याभ्यासात रूजू शकेल. म्हणजेच मराठी-इंग्रजी-फ्रेंच अशा तीन किंवा अधिक भाषेतील साहित्याचा तुलनात्मक अभ्यास होऊ शकेल. तसेच भिन्न भाषेतील साहित्य परंपरेबरोबरच त्या भाषिक समाजाच्या संस्कृतीची व भूप्रदेशाचीही तौलनिक साहित्याच्या अभ्यासकाला माहिती होईल. कारण साहित्य समाज आणि संस्कृती यांच्यातील परस्परसंबंध निकटचे असतात. त्यामुळे कोणत्याही भाषेतील साहित्याचा अभ्यास करताना भूप्रदेश, समाजवास्तव व समाजाची संस्कृती यांचा विचार करावा लागतो. समाजाच्या जडणघडणीवर, भाषेवर, कलाविष्कारावर, इतिहासावर भौगोलिक परिस्थितीचा परिणाम होत असतो व या साऱ्याचे प्रतिबिंब साहित्यात पडत असते.

## ३.२.५ तौलनिक साहित्याभ्यासासाठी साहित्याचे स्वरूप

तौलनिक साहित्याभ्यासासाठी नेमके साहित्य कोणत्या स्वरूपाचे असावे याबाबत डॉ. निशिगंधा व्यवहारे पुढीलप्रमाणे निकष लावतात.

१) समकालीन साहित्य.

२) समकालीन लेखक.

३) साहित्याच्या समानप्रवृत्ती.

४) साहित्यातील समान विचारसरणी.

५) समान साहित्यप्रकार.

तौलनिक साहित्याभ्यासासाठी दोन भिन्न भाषेतील समकालीन महत्त्वाचे लेखक, कवी व त्यांचे साहित्य, समकालीन विचारप्रणाली, पुरस्कृत साहित्य, समकालीन साहित्य परंपरा, प्रेरणा आणि प्रवृत्तीमूलक साहित्याची निवड करून त्यातील साधर्म्य-वैधर्म्याची तुलना केलेली असते. उदा. मराठी हिंदीतील संतकविता, संत तुकाराम, संत कबीर यांच्या काव्यातील सामाजिकता, तसेच समकालीन विचारप्रणाली, समाज जीवनाचे चित्रण, साहित्याच्या प्रवृत्ती ही तत्त्वे स्वीकारून दोन भिन्न भाषेतील साहित्याचा तौलनिक अभ्यास करता येतो. उदा. मराठी व कन्नड भाषेतील पौराणिक वाङ्मय.

एखादा विशिष्ट साहित्यप्रकार घेऊनही तौलनिक अभ्यास करता येतो. कथा, कादंबरी, नाटक, कवितांचा दोन भिन्न भाषेतील लेखकांच्या विचारावर आधारित अभ्यास महत्त्वाचा ठरेल. उदा. मराठी-कानडी कवितेतील सामाजिक कविता, मराठी-हिंदीतील साहित्यिकांची आत्मचरित्रे, मराठी-गुजरातीतील

आधुनिक कथा वाङ्मय तसेच दोन भिन्न संस्कृतीतील, विचारधारेतील लेखकांच्या व्यक्तिमत्त्वाचा व त्यांच्या साहित्याचा अभ्यास तौलनिक पध्दतीने करता येईल, त्यांच्या साहित्य निर्मितीतील प्रेरणा, त्यांच्या साहित्याचे स्वरूप-विशेष, साहित्याचे वेगळेपण, साहित्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन इ. वाङ्मयीन चिकित्सा तौलनिक पध्दतीने करता येईल. उदा. मराठी-हिंदीतील कथालेखिका. मराठी-इंग्रजीतील नाट्यलेखक.

तौलनिक साहित्याभ्यासाच्या निकषाबाबत डॉ. निशिगंधा व्यवहारे म्हणतात, ''तौलनिक साहित्याभ्यास हा दोन भिन्न भाषांतील साहित्याचा तुलनीय घटकांच्या आधारे केलेला समीक्षणात्मक अभ्यासच असतो'' असे म्हणता येते. साहित्य-समीक्षा व्यवहारात साहित्यमूल्ये, जीवनमूल्ये, कलात्मकता इत्यादी आधारे आपण साहित्यकृतीचे तुलनात्मक मूल्यांकन करीतच असतो. एखादी साहित्यकृती चांगली आहे, श्रेष्ठ आहे किंवा कलात्मकदृष्ट्या सामान्य आहे, असे जेव्हा आपण त्या साहित्यकृतीच्या समीक्षेत आपला अभिप्राय नोंदवितो तो आपण निश्चित केलेल्या तुलनीय घटकांच्या आधारे, साहित्यमूल्यांच्या आधारे, तसेच तौलनिक साहित्याभ्यासात भिन्न भाषिक समाजाच्या साहित्यातील साम्यस्थळांचा शोध घेऊन त्यांची कारणमीमांसा अभिप्रेत असते. तसेच समाज, संस्कृती यांच्या वेगळेपणाचा साहित्यावर कोणता परिणाम होतो, याचा वेध घेणेही अभिप्रेत असते. तौलनिक साहित्याभ्यासात दोन भिन्न भाषेमधील साहित्यातील सारखेपणा व वेगळेपणा कोणकोणत्या साहित्यांतर्गत तसेच साहित्यबाह्य घटकांतून आलेला आहे याची चिकित्सा करण्याला महत्त्व असते.

## ३.२.६ सांस्कृतिक-सामाजिक आदान-प्रदान

साहित्यातील आदानप्रदान हे मनोरंजक व उद्बोधक असते. ही आदानप्रदानाची प्रक्रिया अतिप्राचीन काळापासून चालत आलेली आहे. परंतु या प्रक्रियेचा वेग आधुनिक काळात वाढल्याचे दिसून येते. साहित्य हे लिखित व मौखिक असल्याने मौखिक साहित्यात आदानप्रदानाची शक्यता जास्त असते. उदा. आदिवासी समाजातील कथा-कहाण्यांची झालेली देवाणघेवाण निरनिराळ्या लोकसमूहात लोक-जीवनाचा एक अविभाज्य भाग म्हणून मौखिक साहित्याची निर्मिती व प्रचलन आदिम काळापासून ते आतापर्यंत टिकून राहिलेले आहे. वेदकाळ, रामायण-महाभारत, पुराणकाळ, इतिहासकाळ, मध्ययुगीन काळ ते अर्वाचीन काळ असा मौखिक साहित्याचा प्रवास झालेला आहे. तसेच भारतातील बऱ्याच कथा पाश्चात्य देशात गेल्या तेथील भाषेत या कथांची भाषांतरे ही झालेली आहेत. एका भाषेतील कथा दुसऱ्या भाषिक समूहात असेही या साहित्याचे आदानप्रदान होताना दिसते. भारतातील साहित्य अनेक देशात भाषांतरीत झालेले आहे. बृहत्कथा, पंचतंत्र, कथा-सरित्सागर, जातककथा इ. कथा साहित्य युरोपमध्ये गेले, तर तिकडच्या इसापकथा, अरेबियन नाईटच्या कथा भारतात आल्या. या आदानप्रदानाची कारणे अनेक आहेत.

## ३.२.७ आदान-प्रदानाची कारणे

### १. भटके आणि फिरस्ती लोकसूमह (जिप्सी) :-

जगामधील भटक्या जमातींनी इकडच्या कहाण्या तिकडे पोहचविण्याचे काम अतिशय व्यापक प्रमाणावर केलेले आहे, त्यांना जिप्सी म्हणतात. आंध्रप्रदेशापासून राजस्थान, बलुचिस्तान या मार्गाने मध्य आशियात, तेथून पश्चिम आशियात पुढे उत्तर आफ्रिका व दक्षिण युरोपमध्ये भ्रमंती करीत असत, आजही करतात. या भटकंतीतून लौकिक समजुती, सामाजिक आचार-विचार, लोकगीते, कहाण्या, भाषिक विशेष या गोष्टींची देवाणघेवाण होते. तसेच आपल्या देशात मौखिक परंपरेने लोकानुरंजन करणारे निरनिराळ्या प्रकारचे कलावंत पुरातन काळापासून आहेत. त्यात प्रवचन करणारे, लोकोपदेश करणारे, शाहीर येतात. सूत, चारण, भाट, शाहीर, गोंधळी, चित्रकथी, डवरी, भराडी, पुराणिक, खेळिये, बहुरूपी, सोंगाडे, भांड असे अनेक प्रकार आहेत. शेतकऱ्यांच्या औदार्यावर ही मंडळी उपजिवीका करीत असल्याने ही मंडळी गावोगावी फिरत असत, त्यामुळे शास्त्रज्ञान, इतिहास, पुराणाची देवाणघेवाण होत असे. कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्र प्रदेशात लावणी, पोवाडे यांचे आदानप्रदान दिसते. वीरगाथा, श्रृंगारिक गीते, सांप्रदायिक गीते, भक्तिगीते यांच्या विनिमयाला पुष्कळच संधी होती. यात आधुनिक काळात नाटक मंडळींची भर पडली. ही मंडळी फिरस्ती असतात. यांचे परदेश दौरे होतात. यातूनच शेक्सपिअरची नाटके युरोपमध्ये पोहोचविण्यात नटसंच आणि नाटक मंडळ्यांचा मोठा वाटा आहे. शेक्सपिअर जर्मनीत प्रिय झाला. फ्रान्समध्येही रोमँटिक संप्रदायात त्यांच्या नाटकांना अतिशय अनुकूल प्रतिसाद लाभला.

दोनशे वर्षांपूर्वी तंजावरच्या मराठी राज्यात दक्षिणेकडील नृत्यकला, 'कुरवंजी' नामक नाट्यप्रकार आणि महाराष्ट्रातील दशावतार, लळीत यासारखे खेळ यांचा मिलाफ घडून आला. कर्नाटकातील नाटक मंडळीमुळे महाराष्ट्रात पौराणिक नाटके अवतरली तर आंध्रमध्ये नाट्यलेखनाची प्रेरणा मराठी नाटकातून मिळाली.

### २. व्यापारी/धर्मोपदेशक :-

व्यापार उद्यमामुळे शहरातून विविध भाषिक समाज वस्तीला येतात. त्यामुळे आंतरप्रदेशीय किंवा आंतरराष्ट्रीय देवाणघेवाण होते. पॅरिस, लंडन, न्यूयॉर्क ही शहरे जागतिक महत्त्वाची विनिमय केंद्रेच आहेत. आपल्या देशात दिल्ली, कलकत्ता, मुंबई, बेंगलोर, हैद्राबाद, मद्रास अशा शहरांना ऐतिहासिक, राजकीय अथवा सांस्कृतिक कारणामुळे बहुभाषिक केंद्राचे स्वरूप आले आहे. अशा शहरात साहित्यिक व साहित्याचे आदानप्रदान होते. द्विभाषिक किंवा बहुभाषिक शहरात ही देवाणघेवाण आपोआपच घडत. यामध्ये हिंदी आणि ऊर्दू, कानडी आणि तेलगू, कानडी आणि मराठी अशा पध्दतीने ही देवाणघेवाण होते.

ज्यू व्यापाऱ्यांच्या भ्रमंतीतून भारतातील बरेच कथासाहित्य पाश्चात्य देशात गेले. भारतीय कथा साहित्याच्या युरोप, अरबस्तान या देशात झालेल्या प्रसरणाला पाश्चिमात्य अभ्यासकांनी दुजोरा दिलेला आहे. बौध्द धर्माच्या प्रसारासाठी अनेक धर्मप्रसारक जगातल्या अनेक देशात गेले होते. भारतीय धर्म आणि तत्त्वज्ञानाबरोबरच त्यांनी कथासाहित्य आपल्या सोबत नेले होते. तिबेट, चीन, सिलोन अशा देशात आपल्या कथा त्यांच्या माध्यमातूनच लोकजीवनात प्रचलित झाल्या. आर्य आणि अनार्य यांच्या आलेल्या संपर्कातूनही मौखिक साहित्याची देवाणघेवाण झाल्याचे स्पष्ट पुरावे भारतीय साहित्यात मिळतात. बऱ्याच अभ्यासकांनी लोककथांचा एका ठिकाणाहून, प्रदेशातून, देशातून अन्य ठिकाणी प्रसार होतो, हे मान्य केलेले आहे. भारतातील 'पंचतंत्राचे' प्राचीन काळातच इराणमध्ये भाषांतर झाले. नंतर पंचतंत्र सिरियम गेले. त्यानंतर पंचतंत्राचा अरबीत 'कलीलह-दिमनह' या नावाने अनुवाद करण्यात आला.

## ३. भारतात आलेले वेगवेगळ्या देशातील प्रवासी :-

प्राचीन काळी केवळ पर्यटनासाठी, इतर देशातील जनजवीन, संस्कृती व भूप्रदेश पाहण्याच्या उद्देशाने आलेल्या ह्यू-एन.सिंग, फाहियान, मॅगेस्थेनिस यासारख्या अन्य देशातून आलेल्या प्रवाशांनी आपल्या देशातील साहित्याची देवाणघेवाण केलेली दिसून येते. त्याकाळात दळणवळणाची साधने नसतानाही प्रवास होत असत व त्यातून साहित्याची देवाणघेवाण होत असे. इंग्रजांच्या भारतातील आगमनाने भारतीय साहित्याचा अभ्यास केला. जर्मन विद्वान शौपेनहोअर, तेरडेर, गटे, इत्यादींनी भारतीय साहित्यावर प्रभावित होवून अभ्यास केला. काट, शौपेनहोअर, हार्टमन, शेलिंग, हेगेल यांनी भारतीय तत्त्वज्ञान विषयक साहित्याचा अभ्यास केला. त्याचा प्रभाव भारतीय अभ्यासकांवरही झाला. या आदानप्रदान प्रक्रियेतून भिन्न भाषिक संस्कृतीच्या साहित्य विश्वात समृध्दता येते. साहित्याकडे पाहण्याची एक नवी दृष्टी प्राप्त होते. बहुसंस्कृतीतील जीवन विशेष लक्षात येतात. ही प्रक्रिया जगातील अनेक देशात घडत गेली व साहित्यात भरच पडत गेली.

## ४. व्यक्ती व संस्था :-

साहित्यिक आदानप्रदानाचे काम डोळसपणे आणि हेतूपूर्वक करणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांचे या क्षेत्रातील महत्त्व अनन्यसाधारण आहे. आंतरराष्ट्रीय साहित्यिक विनिमयाला वाहून घेणाऱ्या 'PEN' यासारख्या संस्था गेली अनेक वर्षे आपले काम करतात. दुसऱ्या महायुध्दानंतर अस्तित्वात आलेल्या 'युनेस्को' संघटनेने आदानप्रदानाच्या क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. तुकाराम किंवा कबीर यासारख्या संतांचे साहित्य जगभर पोहचविण्याचे काम युनेस्कोमुळेच शक्य झाले. आपल्या देशातही विश्वभारती, आंतरभारती, भारतीय विद्याभवन यासारख्या संस्था आदानप्रदान प्रक्रियेत अग्रेसर आहेत. तसेच प्रकाशन गृहे, नियतकालिके ही ध्येयवादी वृत्तीने काम करीत आहेत. काही व्यक्तिंना पाश्चात्य व आपल्या

साहित्याची महत्तमता कळते, साहित्यातील उपयुक्तता कळते. अशा व्यक्ती आदानप्रदान प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावतात. या संदर्भात ड्रायडन, येट्स, एझ्रा पाउंड, वॉल्ट व्हिटमन, इमर्सन, रवींद्रनाथ टागोर, सानेगुरूजी अशा व्यक्तिंनी आदानप्रदानाचे काम केलेले दिसून येते. भारतात देखील भिन्न-भिन्न प्रांतामध्ये आपआपल्या भाषेत विलक्षण मोठी कामगिरी करणारे जे लेखक आहेत, त्यांच्या स्वभाषिक समाजाला परिचय करून देणे महत्त्वाचे आहे. केवळ लेखकांच्यात नव्हे तर साहित्य प्रवृत्तींचा, साहित्यिक आंदोलनाचा, नवनिर्मितीचा, तंत्राचा व साहित्य व्यवहाराचा परिचय करून देणे महत्त्वाचे आहे.

## ५. परकीय सत्ता :-

मध्ययुगीन काळात काही राजसत्ता उदयास आल्या. परकीय आक्रमणांची लाटच भारतात आली. परकीय राजसत्तेबरोबरच, लोकसमृध्दी भारतात आले. त्यातून भिन्न संस्कृतीचा वावर झाला. राजसत्तेबरोबर सांस्कृतिक अभिसारणास गती मिळाली. त्यामुळे साहित्याचे आदानप्रदान करणाऱ्यामध्ये मागध, सूत, भाट, चारण यासारख्या पारंपरिक संस्था इतिहास, काळात निरनिराळ्या राज्यात फिरून आपल्या राजाचे व राज्याचे गुणगान गात. त्यातूनही साहित्याचे आदानप्रदान झाले. मोगलांच्या काळात भारताचा मुस्लिम संस्कृतीशी संबंध आला. त्यातून मोगलांच्या चित्र, संगीत, वास्तूकला, भाषा, साहित्य यांचे आदानप्रदान झाले. मुल्ला मौलवी, अरबी, पारशी जाणकार, लेखक, कवी यांनी यात महत्त्वाची भूमिका बजावली. मोगलांच्या भारतावरील सत्तेने फारशी भाषेचा मोठा परिणाम मराठीवर झालेला दिसून येतो.

मध्ययुगीन काळात लोकगायकांच्या संस्थांचाही राजदरबारात संचार असे. हे लोकगायक, पुराण, कीर्तन, प्रवचन, धर्मविचार, वीर पराक्रमी पुरुषांचे पराक्रम लोकांना ऐकवित. उत्तर भारतातील रामलीला, कर्नाटकातील यक्षगान, आंध्रातील नाट्यपरंपरा इ. देवाणघेवाण झालेली दिसते. सातवाहन, वाकाटक यासारख्या राजसत्तेमुळे महाराष्ट्राचा, मराठी मुलुखाचा अनेक प्रदेशाशी संबंध आला. तसेच याच काळात महानुभाव, वारकरी संप्रदायाचे कार्य महत्त्वाचे आहे. या दोन्ही संप्रदायांचा इतर राज्याशी संपर्क होता. संत नामदेवांचे अभंग थेट पंजाबपर्यंत जाऊन हिंदी व पंजाबी भाषेत अभंग रचले.

इंग्रज, डच, पोर्तुगीज, फ्रेंच यांचे वास्तव्य भारतात होते. पुढे इंग्रजांनी दिडशे वर्ष राजसत्ता भोगली. त्यामुळे इंग्रजी भाषेचा, साहित्याचा आणि संस्कृतीचा भारतीयांवर प्रभाव पडला. तसेच भारतीय जीवन, कला, साहित्यात इंग्रजांनीही रसही दाखविला. इंग्रजांनी भारतीय लोकजीवन, संस्कृती, कला, साहित्य, तत्त्वज्ञान आणि भाषा यांचा अभ्यास करण्यास सुरूवात केली. तसेच युरोपियनांनीही भारत, चीन, इराण, अरबस्तान या देशातील कला, साहित्य व संस्कृतीचा अभ्यास सुरू केला.

## ६. स्थलांतर :–

स्वातंत्र्योत्तर कालखंडात साहित्य–संस्कृतीच्या आदान–प्रदानाला गती आली. भारतातील विविध प्रदेशात तसेच जगातील अन्य देशात शिक्षण, उद्योग, नोकरी, व्यापार आणि पर्यटनाच्या निमित्ताने आदान–प्रदान होते. नोकरी, शिक्षणाच्या निमित्ताने भारतीय जगातल्या निरनिराळ्या देशांत जाऊन वास्तव्य करू लागले आहेत. आजच्या घडीला दोन कोटी भारतीय निरनिराळ्या देशात वास्तव्य करून राहिलेले आहेत.

औद्योगिकीकरणामुळे, जागतिकीकरणामुळे नोकरी व शिक्षणात भरमसाठ विकास झाला. त्यामुळे मुंबई, कलकत्त्यासारखी मोठी शहरे विकासाचे केंद्र बनले. भारताच्या कानाकोपऱ्यातून या शहरांकडे लोक वास्तव्य करू लागले. त्यातून भिन्न भाषिक समूह निर्माण होऊन संस्कृती व साहित्याची आदानप्रदान होऊ लागली. भारताबाहेरही इंग्लंड, अमेरिका, सौदी अरब या देशातून मराठी मंडळे स्थापन झाली आहेत. त्यातून विश्वसाहित्य संमेलनाचे आयोजन होऊ लागले आहे.

## ७. अनुवादक :–

आपल्या साहित्याखेरीज अन्य भाषेतील साहित्याची ओळख होणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे विविध जागतिक भाषांत साहित्याचे अनुवाद होत आहेत. त्यातून तौलनिक साहित्याभ्यासाला चालना मिळते. जागतिकीकरणाचा आधुनिक तंत्रज्ञानाचा परिणाम साहित्यावर होत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरातून विविध भाषा, विविध संस्कृती आणि भिन्न भिन्न भाषांतील साहित्य, साहित्याचे अनुवाद उपलब्ध होत आहेत. परंतु जागतिक संदर्भात चिनी, जपानी, रशियन, जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश इ. भाषांचे अनुवाद होण्यात अडचणी आहेत. भारतीय चौकटीत राहून आपली मजल दोन–चार भाषांपलीकडे नाही.

## ८. संगणक, इंटरनेट, वेबसाईट :–

आधुनिक तंत्रज्ञानात झालेल्या विकासातून संगणक, इंटरनेट, वेबसाईट, दूरचित्रवाणी, भ्रमणध्वनी आणि विविध वाहिन्या अशा माध्यमातून जगातल्या अनेक देशांशी एका क्षणात संपर्क होत आहे. या तंत्रज्ञानामुळे कमी वेळात जगातल्या साहित्याशी आपण जोडले गेलो. निरनिराळ्या भाषेतील साहित्य इंटरनेटद्वारा आपल्यांना घरबसल्या मिळू लागले. तसेच इंटरनेटच्या माध्यमातून विविध भाषेतील साहित्य भाषांतर करून मिळू लागले आहे.

थोडक्यात प्राचीन काळापासून सुरू झालेली साहित्याच्या आदानप्रदानाची प्रक्रिया आजही घडताना दिसते आहे. बदलत्या काळाप्रमाणे, जीवन प्रवाहाप्रमाणे या आदानप्रदानाच्या माध्यमात बदलही घडत आलेले आहेत. तौलनिक साहित्यभ्यासाच्या वाटचालीत आदानप्रदान माध्यमांचे महत्त्वाचे योगदान लाभलेले आहे.

## ३.३ समारोप

एकंदरीत या घटकात तुलनात्मक साहित्याभ्यासाचे साधन कसे आहे, तुलनात्मक साहित्याभ्यासाचे स्वरूप, तुलनात्मक साहित्याभ्यासाची उद्दिष्टे, साहित्याभ्यासाचे स्वरूप, आदानप्रदानाची कारणमीमांसाचे विवेचन करण्यात आलेले आहे. तौलनिक साहित्याभ्यासाला महत्त्व प्राप्त झालेले आहे. तुलनात्मक अभ्यासाने व्यक्तिच्या ज्ञानात भर पडते. त्याशिवाय राष्ट्रीय एकात्मतेचा भाव विकसित होतो. तेव्हा व्यक्तिजीवन, साहित्याचे क्षेत्र, राष्ट्रीय भावना विकसित करण्यात तुलनात्मक अभ्यासाचे महत्त्वाचे योगदान असते. तौलनिक साहित्याभ्यासातून भिन्न-भिन्न भाषिक समाजाच्या संस्कृतीची त्यांच्या विचारसरणीची, त्यांच्या जीवन जगण्याच्या पध्दतीची ओळख होते. त्यातून आपल्याला साहित्यात संपन्नता आणता येते.

## ३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. **Comparative Literature :** तुलनात्मक साहित्य.

२. **निर्विवाद :** बिनतक्रार, नि:संशय.

३. **रोमँटिक :** सौंदर्यवादी.

४. **नामक :** नाव.

५. **बहुभाषिक :** एकापेक्षा जास्त भाषा अवगत असणारा.

## ३.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

### ❑ खाली दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा.

१. 'तौलनिक साहित्याभ्यास हा अनेक साहित्याधिष्ठित अभ्यास असतो' हे विधान कोणी केले आहे?

*(अ) वसंत बापट* *(क) डॉ. निशिगंधा व्यवहारे*

*(ब) डॉ. आनंद पाटील* *(ड) चंद्रशेखर जहागीरदार.*

२. भाषा, प्रदेश, देश, काल, संस्कृती यांच्या सीमा ओलांडून केलेल्या अभ्यासाला .......... साहित्याभ्यास असे म्हणतात.

*(अ) वर्णनात्मक* *(ब) तौलनिक* *(क) ऐतिहासिक* *(ड) भावनिक.*

३. विश्वसाहित्याची, सर्वसमावेशकतेची संकल्पना कोणाच्या साहित्याभ्यासाच्या संकल्पनेत आहे.

*(अ) प्रावर* *(क) चँडलर*

*(ब) इंद्रनाथ चौधरीक* *(ड) वसंत बापट.*

४. 'मराठी-हिंदी काव्यातील भक्तिविचार' हा संशोधन विषय कोणत्या साहित्याभ्यासात प्रकाशन येतो?

*(अ) तौलनिक* *(क) ऐतिहासिक*

*(ब) वर्णनात्मक* *(ड) सांस्कृतिक.*

५. 'The Budhist Stories' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे?

*(अ) चँडलर* *(क) बेनफे*

*(ब) ऱ्हीस डेव्हिडस* *(ड) फॉस्टर.*

६. जगामधील भटक्या जमाती कहाण्यांची आदानप्रदान करतात म्हणून त्यांना ............ म्हणतात.

*(अ) जिप्सी* *(ब) शाहीर* *(क) फिरस्ते* *(ड) भिक्षू.*

७. फादर स्टीव्हन्सने कोणता ग्रंथ लिहिला?

*(अ) ख्रिस्तपुराण* *(क) The Budhist Stories*

*(ब) ॲना कॅरेबिना* *(ड) Comparative Literature.*

८. 'सर्वश्रेष्ठ ज्ञानाची प्राप्ती तुलनेवरच आधारित आहे' हे मत कोणाचे आहे?

*(अ) वसंत बापट* *(क) डॉ.आनंद पाटील*

*(ब) मॅक्समुलर* *(ड) टॉलस्टॉय.*

९. व्यक्ती जीवन साहित्याचे क्षेत्र व राष्ट्रीय भावना विकसित करण्यात कोणत्या अभ्यासाचे योगदान महत्त्वाचे आहे?

*(अ) वर्णनात्मक* *(ब) ऐतिहासिक* *(क) तौलनिक* *(ड) सांस्कृतिक.*

१०. 'पंचतंत्राचा' अरबीत कोणत्या नावाने अनुवाद करण्यात आला आहे.

*(अ) कलीलह दिमनह* *(क) बृहत्कथा*

*(ब) यक्षगान* *(ड) कथा सरित्सागर.*

❑ **उत्तरे :-**

१. *(अ) वसंत बापट.*

२. *(ब) तौलनिक.*

३. *(क) चँडलर.*

४. *(अ) तौलनिक.*

५. *(ब) ऱ्हीस डेव्हिडस.*

६. *(अ) जिप्सी.*

७. *(अ) ख्रिस्तपुराण.*

८. *(ब) मॅक्समुलर.*

९. *(क) तौलनिक.*

१०. *(अ) कलीलह दिमनह.*

## ३.७ सरावासाठी स्वाध्याय

### ३.७.१ दीर्घोत्तरी प्रश्न.

१. तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्त्व व स्वरूप स्पष्ट करा.

२. सांस्कृतिक, सामाजिक आदान-प्रदानाचे स्वरूप स्पष्ट करून आदान-प्रदानाची कारणे स्पष्ट करा.

### ३.७.२ लघुत्तरी प्रश्न.

१. तुलनात्मक साहित्याभ्यासाची उद्दिष्टे स्पष्ट करा.

२. तुलनात्मक साहित्याभ्यासाचे स्वरूप स्पष्ट करा.

३. तुलना साहित्याभ्यासाचे महत्त्वाचे साधन कसे ते थोडक्यात स्पष्ट करा.

४. तौलनिक साहित्याभ्यास कोणकोणत्या घटकाद्वारे केला जातो ते स्पष्ट करा.

५. सांस्कृतिक-साामजिक आदानप्रदानाचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करा.

## ३.८ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ

१. **बापट वसंत :** *''तौलनिक साहित्याभ्यास''*, मौज प्रकाशन, मुंबई, १ ली आवृत्ती, १९८१.

२. **पाटील आनंद :** *''तौलनिक साहित्य : नवे सिद्धांत आणि उपयोजन''*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती १९९८.

३. **डॉ. चंद्रशेखर जहागिरदार :** *''तौलनिक साहित्याभ्यास तत्त्वे आणि दिशा''*.

४. **डॉ. निशिगंधा व्यवहारे :** *''तौलनिक साहित्याभ्यास संकल्पना व स्वरूप''*.

❑❑❑

सत्र-३ : घटक-४

# तौलनिक साहित्याभ्यासाच्या दिशा

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ तौलनिक साहित्याभ्यासाच्या दिशा

४.२.२ व्दैभाषिक साहित्यकृतींचा अभ्यास

४.२.३ आशय सूत्रांचा अभ्यास

४.२.४ वाङ्मयप्रकारांचा अभ्यास

४.२.५ वाङ्मयीन कालखंडाचा अभ्यास

४.२.६ वाङ्मयप्रवाह आणि चळवळी यांचा अभ्यास

४.३ समारोप/सारांश

४.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक अभ्यासासाठी संदर्भग्रंथ


## ४.० उद्दिष्टे

१. तौलनिक साहित्याभ्यासाच्या दिशा.

२. व्दैभाषिक साहित्यकृतींचा अभ्यास.

३. आशय सूत्रांचा अभ्यास.

४. वाङ्मय प्रकारांचा अभ्यास.

५. वाङ्मयीन कालखंडाचा अभ्यास.

६. वाङ्मय प्रवाह आणि चळवळी यांचा अभ्यास.

## ४.१ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रहो, मागील घटकात आपण तौलनिक साहित्याभ्याच्या वैशिष्ट्यांवर चर्चा केली. या घटकात आपणास तौलनिक साहित्याभ्यासांच्या दिशा या विषयावर चर्चा करावयाची आहे.

नोकरी, उद्योग व्यवसाय, प्रवास यामुळे जग हे एक छोटे खेडे होत चालले आहे. त्यामुळे अनेकविध संस्कृतीचे एकत्रीकरण होत आहे. लोकांनी व्यापार उत्पादने, नोकरी यासाठी संस्कृतीचा स्विकार करण्यास सुरुवात केली. जगभरात सेवा पुरवण्यासाठी व त्यांचा वापर व उपभोग करण्यासाठी लोक असे जवळ येत आहेत तसे आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, साहित्यिक परंपरांचे आदानप्रदान वाढले आहे. संचार, वाहतूक, सेवा, इमारती, रस्तेबांधणी यामुळे विविध भागातील देशातील व्यक्ती एकत्र येत आहेत. पूर्वी समुद्रपर्यटन निषिध्द मानले जातहोते. स्त्रीशूद्रांना तर शिकण्याचा हक्कच नव्हता, त्यामुळे अनेक भ्रामक समजुतींनी समाज पोखरला होता. आपले जगणे साहित्यातून यायलाही खूप उशीर झाला. फक्त मौखिक वाङ्‌मयातून आपल्या मनातील हुंकाराचा आविष्कार केला जात होता. प्राचीन अभिजातवादी, पुराणपरंपरामतवादी, ईश्वरविषयक कर्मकांडविषयक साहित्यग्रंथच निर्माण होत गेले. जसजसे जग उत्क्रांत होत गेले तसतशा साहित्यनिर्मितीच्या प्रेरणाही बदलत गेल्या. नवनवीन विषय हाताळले जाऊ लागले.

संचार व दळणवळणाची साधने वाढत गेली. तशी माणसाची आंतरसास्कृतिक आदानप्रदाने ही वाढत गेली. एका व्यक्तीस अनेक भाषांचे अनेक संस्कृतीचेज्ञान होऊ लागले. त्यामुळे तौलनिक साहित्याच्या अभ्यासाची गरज भासू लागली. दोन किंवा दोनपेक्षा अधिक भाषांचा अभ्यास, त्यातील साहित्य व्यवहाराचा व संस्कृतीचा अभ्यास तौलनिक साहित्यामध्ये महत्त्वाचा ठरला आहे. एका विशिष्ठ देशाच्या मर्यादा ओलांडून तौलनिक साहित्य हे साहित्याच्या अभ्यासबरोबरच मानवी आविष्कारक्षेत्रे असे चित्रकला, शिल्पकला, वास्तुकला, संगीत, तत्त्वज्ञान, इतिहास, सामाजिक विज्ञान म्हणजेच राजकारण, अर्थशास्त्र, समाजशास्त्र त्याचबरोबर विज्ञान व धर्म या साऱ्यांचा अभ्यास करणे. एकूणच राष्ट्राच्या सीमा ओलांडून तौलनिक साहित्याभ्यास केला जातो. रेने वेलेक यांच्या मते, इतिहास हा तौलनिक साहित्याभ्यासाचा केंद्रबिंदू आहे, परंतु इतिहासापेक्षा सांस्कृतिक इतिहास हा तौलनिक साहित्याभ्यासाचा भाग आहे. १९व्या शतकातील नेपोलियनच्या काळातील वासाहतिक सत्ता आणि इंग्रजांची इतर राष्ट्रांवर असणारी सत्ता त्याचे झालेले दुष्परिणाम आणि साहित्यातून त्याचे उमटलेले प्रतिबिंब या गोष्टी तौलनिक साहित्याभ्यासामध्ये तपासल्या जातात. दुसऱ्या महायुद्धातील जर्मनी, जपान त्यांचे भाषिक एकत्त्व व औद्योगिकीकरण आणि या साऱ्यातून राष्ट्रीयत्वाची, एकात्मतेची भावना त्या देशात वाढीस लागली, याचाही साहित्यावर खूप मोठा प्रभाव पडला आहे. तौलनिक साहित्याभ्यासाचा आणि राष्ट्रीयत्वाचा निकटचा संबंध येतो.

भाषा आणि संस्कृती एकमेकांपासून वेगळे करता येत नाहीत. फर्डिनेंड ब्रुनेतिअर यांच्या मते,

'आपणच आपल्याशी तुलना केली तर आपण स्वत:लाही नीट ओळखू शकत नाही. इतरांशी तुलना केल्यानंतर आपण नेमके कोठे आहोत हे मात्र कळते.' तर पंडित आवळीकरांच्या मते, 'ज्याला फक्त इंग्लंड माहित आहे त्याला इंग्लंड तरी पूर्णपणे माहित असतो का? किंवा ज्याला मराठी किंवा भारतीय भाषा व वाङ्मय माहीत आहे त्याला मराठीपण किंवा भारतीयत्व तरी नेमकेपणाने माहीत असणे शक्य आहे का? या प्रश्नाचे उत्तरे शोधण्यासाठी तौलनिक साहित्याभ्याची खरी गरज आहे. तौलनिक साहित्याभ्यास करत असताना साम्य, भेद, प्रभव व प्रभाव या चारही अंगानी साहित्यकृतीचा अभ्यास करावा लागतो. प्रभावाचा अभ्यास करत असताना साहित्यकावर कोणत्या घटकांचा प्रभाव पडला आहे हे शोधणे गरजेचे ठरते. साहित्यिक आपले वाङ्मय लिहित असताना अनेक घटकांचा वापर करतो. परंपरेने चालत आलेले आदिबंध तो साहित्यातून वापरतो. अनेक मिथके, प्रतिमा, प्रतिके यांचाही तो वापर करीत असतो. त्याच्या लेखनातून मानवी मनाचे दर्शन घडते. मानवी संस्कृतीचे संचित तो उलगडून दाखवत असतो. प्राक्कथा, लोकविद्या, मानसशास्त्रीय, आदिबंध, अनुकरण, परंपरा व नुतनीकरण या साऱ्यांचा प्रभाव त्याच्या साहित्यावर पडत असतो. लेखकाचे साहित्य या प्रभावापासून दूर राहू शकत नाही. या प्रभावाचा विचार आपणास या प्रकरणात करावयाचा आहे.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ तौलनिक साहित्याभ्यासाच्या दिशा

तौलनिक साहित्याभ्यास ही वाङ्मयीन अभ्यासाची शाखा ही कालपरवा आलेली नाही. अनेक वर्षे झाली तरी मराठी साहित्यविचारात म्हणावा तितका विचार व अभ्यास पद्धतीचा झाला नाही. मुळात असा अभ्यास करता येतो का? हा विचाराच मुळी अनेक विद्वानांच्या गळी उतरलेला नाही. वर्षामागून वर्षे लोटली तरी ही साहित्य संकल्पना आपणास सुपरिचित खऱ्या अर्थाने झाली नाही असे खेदाने म्हणावे लागते. १८ व्या शतकात या अभ्यास शाखेचा प्रपंच मांडला गेला आज २१ व्या शतकातही आपणास त्या विषयावर लिहिली गेलेली ५-६ पुस्तके व थोडसे लिखाण या पलीकडे काही मिळत नाही. त्यामुळे निशिकांत मिरजकरांच्या मते महाराष्ट्रातील काही विद्यापीठांतील प्रबंधाची शीर्षके वाचून हसू येते हे म्हणणे रास्त वाटते.

विद्यापीठीय पातळीवर तौलनिक साहित्य भारतात सुस्थिर झाले आहे, असे डॉ. निशिकांत मिरजकर म्हणतात. त्यावेळी याही गोष्टींचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते की किती विद्यापीठांमधून तौलनिक साहित्याभ्यास हा विषय शिकविला जातो? महाराष्ट्रातील विद्यापीठांमधून किती विद्यार्थी हा विषय घेऊन अभ्यास करतात किंवा संशोधन करतात हाही संशोधनाचा मुद्दा आहे. एकंदर मराठी साहित्याचे अभ्यासक, संशोधक व रसिक यांच्या मनामध्ये या तौलनिक साहित्याभ्यास पद्धतीची चौकट व्यवस्थित तयार झालेली नाही. दोन लेखक, दोन साहित्यकृती, दोन कालखंड दोन आशयसूत्रे

यांच्याभोवतीच संशोधन कार्य फिरताना दिसत आहे. एकाच भाषेतील दोन लेखक, साहित्यकृती किंवा कालखंडाचा अभ्यास तौलनिक साहित्याच्या अभ्यास पध्दतीत अभिप्रेत नाही तर भिन्न भाषिक साहित्यिक व साहित्यकृती या अभ्यास पध्दतीमध्ये अभिप्रेत आहेत.

अभ्यासकाला किमान दोन भाषा व्यवस्थितरित्या येत असतील तरच अशा अभ्यासपध्दती विकसित होऊ शकतात. सानेगुरूजींनी आंतरभारतीची संकल्पना मांडली, त्याच्या पाठीमागे हीच प्रेरणा होती. भाषाविषयक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांने भारतीय भाषा शिकाव्यात. भारतात विविधतेतील एकात्म संस्कृती समजून घ्यावी. विविध भाषा, विविध प्रांत, त्यांच्या चालीरिती, परंपरा यांचे ज्ञान आपणास असावे तरच आपण अधिक प्रगल्भ होऊ शकतो ही त्यांची धारणा होती. रवींद्रनाथ टागोरांनीही विश्वसाहित्याची संकल्पना मांडली त्यापाठीमागेही वैश्विकतेची भावना होती.

तौलनिक साहित्याला समकालीन स्वत्वाच्या प्रादेशिक आधाररेषांचे पक्के अधिष्ठान असते. तौलनिक साहित्याची समीक्षा ही राष्ट्रीयता व भाषांच्या सीमा छेदणारी असते. वाङ्मय, कला, मानवी आविष्कार क्षेत्रे यांचाही विचार तौलनिक साहित्याभ्यासामध्ये होतो. परस्परांचे व्यमिश्र संबंध व पारस्परिक आदानप्रदाने यांचा अभ्यास तौलनिक साहित्याभ्यासामध्ये अभिप्रेत असतो. दोन साहित्यिक किंवा कलाकृती यांचा एकमेकांवर पडलेला प्रभाव किंवा प्रभावाची देवाणघेवाण, त्यांच्यातील समान प्रेरणास्थाने, समाज तत्वप्रणाली, वाङ्मयीन सर्जनाला कारणीभूत होणारी परिस्थिती व समान आधारसामग्री यामुळे तौलनिक साहित्याभ्यास अगदी व्यवस्थितरित्या करता येतो. तौलनिक साहित्यसमीक्षेचे उपयोजन हे आकलन, आस्वाद व मूल्यमापन या तिन्ही कार्यक्षेत्रांत महत्त्वपूर्ण रीतीने करता येते असे डॉ. मिरजकर म्हणतात.

तौलनिक साहित्याभ्यासाच्या दिशाही डॉ. मिरजकरांनी सांगितलेल्या आहेत.

(अ) साहित्याच्या अनेकतेचे भान.

(ब) सहिष्णतेचा विकास वृधा अभिनिववेशाचा निरास.

(क) भारतीय स्तरावरील एकात्म वाङ्मयतेतिहास.

(ड) सर्जनशीलतेचा डोळस प्रत्यय.

(इ) वाङ्मय प्रकारांचा आवाका.

(ई) मिथकांची अनेकपदरी समृध्दता.

(उ) सामायिक प्रेरणास्त्रोतांचा साक्षात्कार.

(ऊ) वाङ्मयाच्या स्वरूपाविषयीची प्रगल्भता.

### अ) साहित्यातील अनेकतेचे भान :-

तौलनिक साहित्यसमीक्षा साहित्यातील अनेकतेचे भान सतत जागृत ठेवत असते. आपल्याला एखादी गोष्ट आवडली तर ती दुसऱ्याला आवडलीच पाहिचे हा वृथा अहंकार टाकून त्या साहित्यकृतीतील एकात्म समष्टीचे दर्शन घडविणे अभ्यासक म्हणून आपले कर्तव्य असते. साहित्यव्यापारासाठी एक निरोगी वातावरण तयार करून त्या साहित्यकृतीतील बलस्थाने समजावून घेता आली पाहिजेत.

### ब) सहिष्णुतेचा विकास वृथा अभिनिवेशाचा निरास :-

आपल्या मनात असणाऱ्या अनेक गोष्टी आपल्याला जशाच्या तशा साहित्यकृतीला ताडून पाहता येत नाहीत. मिरजकर म्हणतात की, या अतिसंवेदनशील भावुकतेमधून अभ्यासकाने समीक्षकाने बाहेर यायला पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणचे दुसऱ्यांच्या मताचा आदर करायला शिकले पाहिजे. वृथा अभिनिवेश हा माणसाला मारक असतो, तसाच साहित्य व्यापारालाही घातक असतो. नाण्याच्या दोन्ही बाजू लक्षात घेऊन साहित्यकृतीचे मूल्यमापन करणे गरजेचे ठरते.

### क) भारतीय स्तरावरील एकात्म वाङ्मयतेतिहास :-

भारतीय स्तरावर एकात्म वाङ्मयाचा इतिहास विविध भाषेतील साहित्याच्या उद्‌गम विकास व त्यांचा इतिहास अभ्यासत असताना अनेक नवनवीन गोष्टी उजेडात येतात. साहित्यातील श्रेष्ठ कनिष्ठता न ठरवता त्यांच्यातील जोडले गेलेले दुवे तौलनिक अभ्यासाने स्पष्ट करता येतात.

### ड) सर्जनशीलतेचा डोळस प्रत्यय :-

वाङ्मयीन सर्जनशीलता ही व्यापक संज्ञा आहे. सर्जनशीलतेचे विविध पैलू आपणास तौलनिक साहित्याभ्यासाने पडताळून पाहता येतात. सर्जनशीलता व त्याची प्रभावरूप चिकित्सा करता येते.

### इ) वाङ्मय प्रकाराचा आवाका :-

अनेकविध भाषांमध्ये अनेक प्रकारचे साहित्य निर्माण होत असते. दुसऱ्या भाषेतील साहित्य आपण वाचले तर स्वभाषेतील साहित्य आपणास नीटपणे समजू शकेल. यामध्ये श्रेष्ठ कनिष्ठता ठरवायची नसते तर त्या दोन साहित्यकृतीमधील साम्य, भेद, प्रभाव यांचा अभ्यास करावयाचा असतो. वाङ्मय प्रकारांची सैद्धांतिक मांडणी करण्यासाठी तौलनिक साहित्यसमीक्षा ही अत्यंत महत्त्वाची ठरते.

### ई) मिथकांची अनेकपदरी समृध्दता :-

साहित्यामधून येणारी मिथके, प्रतिमा, प्रतिके ही थोडयाफार अंगाने वेगवेगळी असतात. एकाच भाषेतील एकाच प्रांतातील साहित्यात अशा प्रकारच्या मिथकांचा प्रतिभांचा, प्रतिकांचा वापर मोठया

प्रमाणावर होतो व एकसुरीपणा व एकांगीपणा लेखनामध्ये दिसतो. विविध भाषेतील वाङ्मयातून आलेली मिथके, प्रतिमा, प्रतिके आपणास तौलनिक साहित्यभ्यासाने तपासता येतात व नवीन साहित्यकृतीमध्ये त्यांचे उपयोजन करता येते.

### उ) सामायिक प्रेरणास्रोतांचा साक्षात्कार :-

कोणत्याही भाषेतील साहित्यनिर्मितीमागे कोणते ना कोणते प्रेरणास्त्रोत असतेच. जागतिक क्रांत्या, महायुध्दे, वीरपुरूष साहित्याचे प्रेरणास्रोत असतात. निग्रो साहित्यातून येणारी सूर्य ही प्रतिमा दलित कवितेने स्वीकारली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलितांच्या जीवनातील सूर्य म्हणून नावारूपाला आले त्यामुळे डॉ. आंबेडकर हे दलित साहित्याचे प्रेरणास्रोत बनले ते फक्त मराठी साहित्यापुरतेच मर्यादित राहिले नाहीत तर संपूर्ण भारतीय साहित्यातून त्यांचा गुणगौरव केला गेला. महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज ही प्रेरणास्थाने साहित्याची प्रेरणास्थाने बनली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज महाराष्ट्राच्या अस्मितेचा मानबिंदू ठरले असे नव्हे तर संपूर्ण जगभर त्यांच्या कार्याचा गौरव केला जातो व त्यांच्या राजनीतीचा अभ्यास केला जातो. अशा सर्व प्रेरणास्त्रोतांचा अभ्यास आपणाला तौलनिक साहित्यभ्यासाने करता येतो. त्यामुळे विविध भाषातील साहित्यातून येणारे प्रभावाचे समान दुवे शोधता येतात. 'मानवाचे अंती गोत्र एक' या उक्तीचा प्रत्यय तौलनिक साहित्याच्या अभ्यासाने येतो.

### ऊ) वाङ्मयाच्या स्वरूपाविषयीची प्रगल्भता :-

वाङ्मयाचे स्वरूप नेमके कसे असावे याबाबत अनेक अभ्यासकांमध्ये मत मतांतरे आहेत. कला म्हणजे काय? ती जीवनासाठी असते की कलेसाठी? यावरूनही वाद निर्माण झाले. साहित्याचे स्वरूप कसे असावे हे ठरवताना अनेक भाषांतील साहित्याचा अभ्यास केल्यास साहित्याचे स्वरूप ठरवणे सोयीचे ठरते. वाङ्मयाविषयीच्या संकल्पना अधिक प्रगल्भ बनवण्यासाठी तौलनिक साहित्याभ्यास अतिशय महत्त्वाचा ठरतो. उदाहरण दयायचे झाले तर मराठी व हिंदी कादंबरी वाङ्मयप्रकारांचा अभ्यास करताना आपणास असे दिसते की मराठी साहित्यामध्ये प्रादेशिक कादंबरी हा वाङ्मयप्रकार मानवा की नको याविषयी मतभेद आहेत. ग्रामीण व प्रादेशिक कादंबरीत नेमका भेद काय आहे हे अभ्यासकांनी दाखवून दिले आहे. अशा प्रकारे तौलनिक साहित्याभ्यासाच्या दृष्टीने अशा प्रकारचे अभ्यास महत्त्वाचे ठरतात व वाङ्मयीन अभिरूची वाङ्मयीन महात्मता व संकल्पनाची प्रगल्भता वाढवण्यास उपकारक ठरतात.

## ४.२.२ व्दैभाषिक साहित्यकृतींचा अभ्यास

साहित्य भिन्न भिन्न भाषांमध्ये होत असले तरी अंतिमदृष्टया त्यात मानवी मनाचा आविष्कार त्यामध्ये असतो. तौलनिक साहित्याभ्यासकाची दृष्टी तटस्थ, वस्तुनिष्ठ अशी असली पाहिजे. तौलनिक

विचारांची परिणती आत्मश्लाघ किंवा आत्मनिंदा यातील एकामध्ये होता कामा नये. साहित्याचे गुणमापन करणे अथवा उत्कृष्ट साहित्याचे नियम सिध्द करणे ही तौलनिक साहित्याभ्यासाची उद्दिष्टे नाहीत तर भिन्न भिन्न परंपरांचे भान ठेवणे साहित्यातील साम्य आणि भेद यांचा शोध घेणे अपेक्षित आहे. सर्व साहित्य म्हणजे माणसाच्या समान आशा निराशांचे सुखदु:खाचे मनाच्या भावनात्मक क्रिया प्रतिक्रियांचे कलात्मक दर्शन आहे आणि त्यादृष्टीने ते एकरूप आहे ही श्रध्दा या अभ्यासामागे असली पाहिजे आपण साहित्याला जन्म देणाऱ्या प्रतिभावंताच्या मनाची स्पंदने पाहत असताना तेथे राष्ट्रीय व भाषिक सीमा आपण ओलांडल्या तरच त्या स्पंदनाचे आपणास उत्कट भान येईल. साहित्य प्रकार, साहित्यातील पुराकथा, साहित्याचे आकृतीबंध आणि इतर क्षेत्रामध्ये आढळणाऱ्या साम्य वैषम्यामागे कोणती समान सूत्रे आहेत. हे पाहताना कलेची क्षितीजे अधिक विस्तारत जातील. त्या दृष्टीने तौलनिक अभ्यास करणे गरजेचे आहे.

साहित्याच्या निर्मितीमागे लेखकाची व्यक्तिगत प्रतिभा असते. प्रत्येक साहित्यकृती काही प्रमाणात अनन्यसाधारण असते. अशी एक भूमिका घेतली तर साहित्याच्या क्षेत्रात तुलना संभवत नाही. तथापि दोन साहित्याच्या क्षेत्रात तुलना संभवत नाही. तथापि दोन साहित्यकृती, दोन लेखक यांच्यात काही साम्य आढळते त्यांच्यामागे काही समान प्रभाव आहेत हे पाहिले पाहिजे त्यामुळे साहित्याच्या व्यवहारात तुलना सहजपणे व अपरिहार्यपणे घडणारी प्रक्रिया ठरते.

लेखनप्रक्रियेत लेखक एका बाजूने साहित्यनिर्मिती करतो आणि दुसऱ्या बाजूने तिची समीक्षाही करतो या अर्थाने साहित्यनिर्मिती ही एकाच वेळी 'क्रिएटीव्ह' आणि 'क्रिटीकल' असते असे टी. एस. इलियट म्हणतो. वाङ्मयाची निर्मिती करताना लेखकासमोर अनेक पर्याय असतात. साहित्यिक हा निर्वात पोकळीत जगू शकत नाही. त्यामुळे तो आपल्या प्रज्ञेच्या व प्रतिभेच्या कसोटीवर सभोवतीच्या उपलब्ध पर्यायांची तुलना करतो व साहित्यनिर्मिती करतो त्यामुळे साहित्यनिर्मिती ही एका अंगाने सर्जक क्रिया असते तर दुसऱ्या अंगाने तौलनिक चिकित्सा असते. साहित्यकृतीच्या आंतररचनेचा अभ्यास करताना तिच्या अंतर्गत घटकांचे विश्लेषण करावे लागते व सुट्या घटकांची परस्परांशी तुलना करून साहित्यकृतीतील आंतरसंबंधाचा बोध घ्यावा लागतो.

अशा प्रकारे एका साहित्यकृतीचे वाचन आकलन व आस्वाद घेतानाही रसिकाचे मन तुलनाव्यापारात गढलेले असते. यावरून तुलना ही लेखकनिष्ठ व रसिकनिष्ठ (वाचकनिष्ठ) आहे हे आपल्या लक्षात येईल.

एखाद्या साहित्यकृतीचे वेगळेपण लक्षात घ्यावयाचे असेल तर इतर साहित्यकृतीपेक्षा ती कशी व किती वेगळी आहे हे तुलना करूनच ठरवावे लागते. निरनिराळ्या साहित्यकृतीतील साम्यशोधन व भेदनिदर्शन तुलनेनच शक्य होते. एका साहित्यकृतीची दुसऱ्या साहित्यकृतीशी केलेली तुलना हे तुलनेचे

मूळ रूप पण एका साहित्यकृतीची दोन किंवा अधिक लेखक, वाङ्मय प्रकार, वाङ्मयीन प्रवाह ,परंपरा यांचा विचार केल्यास तुलनेचे क्षेत्र विस्तारत जाते.

अनेकामधील एकत्त्व किंवा सामान्यत्त्व तुलनेने कळते तसेच अनेकांचे एकमेकांपासून असणारे वेगळेपणही तुलनेनेच कळते. साहित्याच्या तौलनिक अभ्यासातून साहित्यसिध्दांत आणि साहित्यतत्त्वे शोधता येतात. त्याचप्रमाणे जुन्या साहित्यसिध्दांताची सत्यासत्यता पडताळून त्यांचे उपयोजन करणे सोपे होते.

तुलना हे साहित्यांचे सर्वगामी व सर्वसंचारी साधन आहे. त्यामुळे साहित्याच्या अभ्यासात तुलनेचा वापर होतोच पण त्याची व्याप्ती पाहिली असता भिन्नभाषिक साहित्य परंपरा आणि सांस्कृतिक संदर्भ यांचा व्यापक संदर्भ लक्षात घेऊन त्याचा वापर केला जातो आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन, वाढत्या सांस्कृतिक संकरातून आलेला बहुसांस्कृतिकवाद झपाटयाने होणारे जागतिकीकरण, इंटरनेट चा वापर यामुळे वाङ्मयाकडे पाहण्याची तौलनिक दृष्टी विकसित झाली आणि तिला तौलनिक साहित्याचे रूप आले.

तौलनिक साहित्याभ्यास हा समीक्षेचा दृष्टिकोन आहे. साहित्याचा स्वीकार, संप्रेक्षण, प्रभाव, अनुकरण, साम्यस्थळे, संरचना, विचारप्रणाली, आशयसूत्रे, हेतू, मिथके, शब्दकळा, शैली व आध्यात्म अशा साहित्याभ्यासाच्या विविध क्षेत्रांना स्पर्श करणारी साहित्याभ्यासाची एक शाखा आहे. समाजशास्त्र, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, मानवशास्त्र, इतिहास, भाषाशास्त्र, शैलीशास्त्र व सौंदर्यशास्त्र या सर्व विषयांना स्पर्श करते.

साहित्याभ्यास करताना एक लक्षात घ्यावे लागते की तौलनिक साहित्याभ्यास हा एकभाषिक साहित्याचाही होऊ शकतो तसेच भाषांतरे वाङ्मयप्रकारांची वैशिष्टये, त्यांच्या स्वरूपातील बदल, वाङ्मयीन चळवळी, वाङ्मयीन संप्रदाय, साहित्याचे आंतरदेशीय संबंध, वाङ्मयीन कालखंड, वाङ्मयाचा इतिहास यांचा विचार राज्य, देश, काल, भाषा ओलांडल्याशिवाय पूर्ण करता येणार नाही.

साहित्याचा आदर्श अभ्यास हा तौलनिक आणि व्यामिश्र असतो असे Istavan soter म्हणतो. साहित्याचा आदर्श अभ्यास 'तौलनिक' असतो याचा अर्थ असा की इतर साहित्याच्या पार्श्वभूमीवर तो राष्ट्रीय साहित्याचे पूर्ण दर्शन घडवतो व अभ्यास 'व्यामिश्र' असतो म्हणजेच साहित्य आणि संस्कृतीची इतर क्षेत्रे यांना सामोरा जाणारा असतो. साहित्याच्या अनेक क्षेत्रांना स्पर्श करणारी आणि वेगवेगळ्या अंगानी साहित्याचा विचार करणारी शाखाचा संबंध सामाजिक व चरित्रात्मक परिस्थितीशी जोडला तरी चालतो. कारण कोणतेही वाङ्मय निर्वात पोकळीत वाढू शकत नाही. तपस्वी देखील समाजातील एक विशिष्ट प्रवृत्ती दाखवतो असे रेमाक म्हणतो. त्यामुळेच खाडिलकरांच्या 'कीचकवध' या नाटकावर

ब्रिटीश सरकारने बंदी आणण्याचे कारण आपल्याला समजते. कर्झनच्या जुलमी राजवटीचे रूपक तयार करण्याचे काम खाडिलकरांनी केले. त्याच काळात आठ बंगाली नाटकांवर बंदी आली. त्यामुळे सामाजिक परिस्थितीचा संबंध साहित्याशी आलेला दिसतो. एका कलाकृतीच्या आधारे समग्र कालखंडातील समाजाचे चित्र तयार करता येणे कठीण आहे पण कलाकृती ही मानवी कल्पनेची निर्मिती असते. तिचे 'स्वायत्त' असे आतले नियम असतात. त्याचाही विचार तुलनेत व्हावयास हवा. साहित्यकृतीतील संबंध शोधणे हे आपले ध्येय असले तरी तिच्यातील ऐतिहासिक व सौंदर्यशास्त्रीय पुरावा म्हणून नातेसंबंध शोधणे अधिक चांगले ठरते. शैलीशास्त्रीयदृष्टया अभ्यास तौलनिक साहित्यात व्हायला हवा. इतिहासाचा विचार करताना शैली साधने केंद्रस्थानी असली पाहिजेत. दोन लेखकांतील साम्यभेद शोधणे एका दृष्टीने फायद्याचे असते. मतप्रणाली, शैली, रचना एका अथवा दोन साहित्यातील कलाकृती आणि विशिष्ट किंवा निरनिराळया कालखंडातील असल्या तरी त्यांची सर्वांगीण तुलना आवश्यक ठरते. लेखकाच्या समग्र साहित्यकृतीची तुलना केल्यास विश्वसाहित्यातील काही चिरंतन प्रमाणके निश्चित करता येतील. काही देश, समाज तयार प्रभाव प्रक्षेपक किंवा स्वीकारक असतात. विशिष्ट सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भात साहित्यकृतीची निर्मिती त्यांचे स्वागत स्वीकार यांच्या सांघिक आंतरविद्याशाखीय अभ्यास तौलनिक अभ्यासामध्ये केला जातो.

आतापर्यंत साहित्याकडे एका व्यक्तीची निर्मिती म्हणून पाहिले जात होते. पण साहित्याकडे आंतरराष्ट्रीय दृष्टीने पहाण्यास तौलनिक साहित्याने शिकवले साहित्य ही एक आंतरसांस्कृतिक आणि आंतरभाषा वैज्ञानिक दृश्यघटना असते. अशा साहित्यांचा इतिहास व तत्त्वज्ञान व समीक्षा यांच्या साहाय्याने केलेला संश्लेषक अभ्यास म्हणजे तौलनिक अभ्यास असे पिकास्सो आणि रूसो यांना वाटते.

तौलनिक साहित्यामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या तुलना व प्रश्न आणि तत्त्वे यांचा समावेश असल्याचे दिसते. त्यामुळे साहित्याच्या वेगवेगळया क्षेत्रांना तौलनिक साहित्य स्पर्श करते. शैलीशास्त्र, मार्क्सवाद, स्त्रीवाद, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, अर्थशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, तत्त्वज्ञान व संस्कृती, विज्ञान या सर्वाचा अंतर्भाव तौलनिक साहित्याभ्यासामध्ये असल्याचे दिसते. कोणत्याही कलाकृतीचा तौलनिक अंगाने विचार करताना या सर्व घटकांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे वाङ्मयाचा सर्वांगीण अभ्यास करण्यास तौलनिक साहित्य मदत करत असल्याचे दिसते. आज भाषाशास्त्रामध्येही तौलनिक अभ्यासपध्दती वापरलेली दिसते. याचा अर्थ आज प्रत्येक शाखेमध्ये तौलनिक साहित्याभ्यासास महत्त्व प्राप्त होत असल्याचे दिसते.

तौलनिक दृष्टीने साहित्याचा अभ्यास करणारे अभ्यासक मात्र आज कमी आहेत. हिंदीमध्ये जितके तुलनेवर संशोधन झाले आहे. तितके मराठीत नाही कारण आज मराठी विषय शिकवणाऱ्या विद्यापीठामध्ये अभ्यासक्रम पाहिला असता क्वचित ठिकाणी तौलनिक साहित्याचा अंतर्भाव केल्याचे दिसते. पदवी

शिक्षणामध्ये तौलनिक साहित्याभ्यासाचा अंतर्भाव केल्यास पुढे शिक्षण घेणाऱ्या व संशोधन करणाऱ्या अभ्यासकांना त्याचा निश्चितपणे उपयोग होईल. पदव्युत्तर शिक्षणामध्ये सुध्दा तौलनिक साहित्याभ्यास ऐच्छिक केल्याने विद्यार्थ्यांचा तिकडे कल अगदी कमी प्रमाणात असल्याचे दिसते. याचे दुसरे कारण असे ही सांगता येईल. की तौलनिक साहित्यावरील मराठी भाषेत असणाऱ्या ग्रंथाची संख्या कमी आहे. मराठी भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्याला इंग्रजीसारख्या ग्रंथाचा आधार घेऊन अभ्यास करणे कठिण ठरते. आज तौलनिक साहित्याभ्यास एक आंतरविद्याशाखा म्हणून नावारूपाला येत आहे. याचे श्रेय पाठीमागील तुलनाकारांना द्यावे लागते. त्यामध्ये डॉ. आनंद पाटील, डॉ. जहागिरदार, डॉ. र. बा. मंचरकर, डॉ. वसंत बापट, डॉ. बांदिवडेकर, डॉ. गणेश एन. देवी, डॉ. शर्मा, डॉ. नवलकिशोर इ. अभ्यासकांची नावे अग्रक्रमाने घ्यावी लागतील. या ठिकाणी सर्व अभ्यासकांची नावे घेणे अशक्य आहेत. तरीही या सर्व अभ्यासकांना धन्यवाद दिले पाहिजेत. आज थोडयाफार प्रमाणात तौलनिक अभ्यासकांची संख्या वाढत आहे. त्याचे सारे श्रेय या भारतीय अभ्यासकांना द्यावे लागेल.

आंतरविद्याशाखीय संश्लेषणातून प्राप्त होणारी मर्मदृष्टी तौलनिक साहित्यात महत्त्वाची ठरते. हे या अभ्यासशाखेचे महत्त्वाचे वैशिष्टय ठरते, असे आंतरविद्याशाखीय अभ्यास नवनिर्माणाची प्रतिती देतात. त्यामुळे अनेक अभ्यासपध्दती शोधक्षेत्रामध्ये वापरण्याची मुभा मिळते व त्यातूनच नवे काहीतरी गवसल्याचा आनंद मिळतो.

एखादा साहित्यप्रकार शिकविताना त्याची सुरूवात पाश्चिमात्य देशात कधी झाली आपणास शिकवले जाते परंतु भारतीय भाषांमधून त्या त्या साहित्यप्रकाराची सुरूवात कधी, कोठे कशी झाली याचे उत्तर आपणास माहीत नसते. या प्रश्नांची उत्तरे तौलनिक अभ्यासाशिवाय आपणास मिळणार नाहीत. भारत देशाच्या संदर्भात विचार केला तर आपण तुलना केली तरच खऱ्या अर्थाने भारतीय साहित्याचा अभ्यास केल्याचे समाधान मिळेल. आज आपणास शेक्सपियर, लिओनार्दो, पिक्कासोसारखे साहित्यिक, चित्रकार ज्ञात आहेत. पण शेजारील प्रांतातील महत्त्वाचे लेखन करणारे साहित्यिक, कलावंत आपणास माहित नसतात, ही दुर्दैवाची बाब आहे. त्यासाठी सर्व भारतीय भाषांचा तौलनिक अभ्यास करणे व आपली स्वतंत्र भारतीय तौलनिक साहित्याभ्यासाची पठडी तयार करणे अत्यंत गरजेचे आहे. नंतरच परदेशातील वाङ्मयाचा तुलनेसाठी अंगीकार करावा असे वाटते.

तुलनेद्वारे मानवास ज्ञानाची प्राप्ती होते तुलना ही प्राकृतिक समानता, सांस्कृतिक परंपरेतील समानता आणि प्रभाव स्वीकारक व प्रभावक या सर्व गोष्टीची केली जाते. तुलनाकारांने दोन भाषेतील दुवा म्हणून उपयुक्त ठरावे भारतीय विद्यापीठांतून साहित्यांचा अभ्यास करताना पाश्चिमात्य साहित्याचीच ओळख करून देवून चालणार नाही तर त्यांना भारतीय भाषांमधील साहित्यकृतीची ओळख करून देणे तितकेच महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने अभ्यासक्रमात बदल करावे लागतील पण हा दृष्टिकोन स्वीकारला

तरच भारतीय प्रादेशिक भाषांमधील वाङ्मयीन कलाकृतींची ओळख अभ्यासकांना विद्यार्थ्यांना होईल असे वाटते. आज विद्यापीठातून शिक्षण घेणारे विद्यार्थी त्या त्या प्रादेशिक भाषेतील वाङ्मयाचा अभ्यास करतात ही संकुचित वृत्ती सोडून भारतीय भाषांचा व त्यातील साहित्यकृतीचा अभ्यास व्हावयास पाहिजे. सानेगुरूजींनी आंतरभारतीची संकल्पना मांडली. त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांसाठी भारतीय उपखंडातील वेगवेगळया भाषांची माहिती व्हावी. त्यांच्या संस्कृतीचा परिचय व्हावा. त्यादृष्टीने प्रयत्न व्हावा असे त्यांना वाटत होते. त्यांच्या संकल्पनेचा जर भाषा विभागांनी स्वीकार केला तर आंतरभारतीची संकल्पना आपण साकार करू शकू. एकात्म भारत घडण्यास त्याद्वारे मदतच होईल आणि आपल्या या भारतीय संस्कृतीची इतर देशातील संस्कृतीशी तुलना करणे अधिक सोयीस्कर ठरेल. आपल्या जवळ जे उपलब्ध आहे ते सोडून आपण फक्त पाश्चात्य वाङ्मयाशी तुलना करण्याची वासाहतिक मनोवृत्ती सोडावयास हवी. याचा अर्थ असाही नव्हे की फक्त भारतीय भाषांना हीन स्थान मिळते आहे. त्याची उंची आपणास जगाला दाखवता येईल या दृष्टीने येथे नमूद करावेसे वाटते.

शेवटी 'मानवांचे अंती गोत्र' एकच या कवीवचनाचा प्रत्यय तौलनिक अभ्यासाने येईल यात शंका नाही.

## ❑ संस्कृतिसन्मुखता तौलनिक साहित्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य :-

संस्कृतिसन्मुखतेतून तौलनिक साहित्याचा जन्म झाला. साम्राज्यविस्तार हे महत्त्वाचे कारण संस्कृती संकरापाठीमागे असल्याचे दिसते. अगदी प्राचीन काळापासून आपण मानव संस्कृतीकडे पाहिले तर साम्राज्यविस्ताराच्या दृष्टीने अनेक लढाया झालेल्या दिसतात. जग जिंकण्यास निघालेला सिकंदर असेल वा नेपोलियन बोनापार्ट असेल त्यांनी आपले जगज्जेतेपद मिळण्यासाठी अनेक साम्राज्ये पादाक्रांत केली. त्यांनी अनेक देशांच्या, राज्यांच्या सीमा ओलांडून भारतावर आक्रमण केले. अगदी भारतीय राजेरजवाड्यांच्या विचार केला तरी साम्राज्यविस्तारासाठी एकमेकांवर चढाया करणे. त्यांचे भूप्रदेश ताब्यात घेण्याची एक प्रकारची ईर्ष्या दिसते. पेशव्यांनी अटकेपार झेंडा रोवला. पानिपतची लढाई ही आपणास त्याचीच साक्ष देते. १८१८ ला पेशवाईच्या अस्तानंतर इंग्रजी सत्तेची पाळेमुळे संपूर्ण भारतभर रोवली. इंग्रजांनी शिक्षणाच्या सुविधा, दळणवळणाच्या सुविधा भारतात आणल्या. त्यांनी आर्थिकदृष्टया आपणास कंगाल बनवले हे तिरस्करणीय असले तरी त्यांनी दिलेल्या ज्ञानाच्या प्रकाशात आपण आपणास ओळखू शकलो. आपणास स्वत:चे भान आले त्यांच्या संस्कृतीशी आपल्या भारतीय संस्कृतीची तुलना केली व आपले आत्मभान जागृत झाले. हे ही आपणास विसरता येणार नाही. इंग्रजांनी दळणवळणाच्या सोयी निर्माण केल्या त्यामुळे सांस्कृतिक आदान प्रदाने वाढली. यातूनच आपणास आपल्या संस्कृतीची इंग्रजांच्या संस्कृतीशी तुलना करता आली. स्वत:स पडताळून पहाता आले. त्यांच्या वाङ्मयाच्या अभ्यासाने भारतीय तत्त्वज्ञानाने त्यांच्याही साहित्यावर प्रभाव पडला. अशा रीतीने लढाया साम्राज्याविस्तार,

वसाहतीकरण, लोकसमूहांचे स्थलांतर, प्रवास अशा दोन निरनिराळ्या कारणांनी दोन संस्कृती समोरासमोर उभ्या ठाकतात. तेव्हा सामाजिक, आर्थिक, राजकीय बदलामुळे सांस्कृतिक आघात होतात. दोन संस्कृती प्रवाह जेव्हा परस्परांना सन्मुख होतात. तेव्हा एकमेकांकडे डोळसपणे पाहिले जाते. सांस्कृतिक आकलनासाठी नव्या ज्ञानक्षेत्राची गरज निर्माण होते. एका चिकित्सक आणि तौलनिक दृष्टीने दोन्ही सांस्कृतिक विचार होऊ लागतो. तौलनिक सांस्कृतिक चिकित्सेचा भाग म्हणून साहित्याच्या तौलनिक अभ्यासाला आरंभ झालेला दिसतो.

मध्ययुगामध्ये हिंदू व इस्लाम या दोन संस्कृती समोरासमोर आल्या तेव्हा एकमेकींना नाकारण्यापासून स्वीकारण्यापर्यंतचे अनेक पवित्रे दोन्ही संस्कृतीतील साहित्यात दिसतात. इंग्रज, फ्रेंच, डच, पोर्तुगीज यांच्या संस्कृतीचा संबंध भारतीय समाजमनावर, वाङ्मयावर त्याचे परिणाम झाले. त्यामुळे संस्कृती संकराच्या या प्रक्रियेचे साद पडसाद तौलनिक दृष्टीने न्याहाळणे ही तौलनिक साहित्याची एक दिशा आहे.

खऱ्या वैश्विकतेमागे जागतिक पातळीवर बहुविधतेचा संगम घडून एक प्राचीन व भव्य मानवी स्वप्न प्रत्यक्षात यावे अशी ओढ आहे. दुसऱ्या मानवसमूहाविषयी त्यांच्या संस्कृती विषयी माणसाला एक प्रकारची जिज्ञासा आणि कुतूहल असते. दुसऱ्या संस्कृतीच्या प्रकाशात आपल्या संस्कृतीला ताडून पहाता येते. आपला समाज पहाता येतो दुसऱ्याला जाणण्यातच मानवाला स्वत:ची खरी ओळख होते. अशा सांस्कृतिक कुतूहलाचा एक भाग म्हणून तौलनिक साहित्याचा उदय झाला. आपल्या गावाव्यतिरिक्त ज्याने दुसरे गाव पाहिले नाही. त्याला आपले गावच चांगले वाटते पण त्याला त्याचे गाव तरी नीट समजले का? हा प्रश्न उरतोच.

कोणत्याही साहित्याचे यथार्थ आकलन दुसऱ्या साहित्याच्या संदर्भातच होऊ शकते अशी तौलनिक साहित्याची धारणा आहे व या धारणेवरच साहित्यकृती एकमेकींशी ताडून पहाणे त्याचे तौलनिक अर्थनिरूपण व मूल्यमापन करणे हे तौलनिक साहित्याचे मूळ स्वरूप आहे. यादृष्टीने 'व्यंकटेश माडगूळकर व फणीश्वरनाथ रेणु यांच्या कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास' हा विषय अभ्यासासाठी निवडला आहे. व्यंकटेश माडगूळकर हे महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातले तर फणीश्वरनाथ रेणु हे बिहारमधील पूर्णिया या जिल्हयातले. या दोन भिन्न भाषासंस्कृतीतील साहित्यकृती एकमेकींशी तुलना करून त्यांचे मूल्यमापन करणे हा अभ्यासाचा मुख्य विषय आहे.

''तंत्र, भाषा, शैली आणि संरचना या वाङ्मय घटकांच्या तुलना असू शकतात. साहित्याच्या प्रेरणा, प्रवृत्ती, प्रवाह, चळवळी संप्रदाय अभिरूची अशा वाङ्मय व्यवहारातील या तुलना असू शकतात. साहित्यकृती, लेखक वाङ्मय प्रकार कालखंड आणि वाङ्मयाचा इतिहास अशा सगळया महत्त्वाच्या अभ्यासप्रकारातील या तुलना असू शकतात. लोकसाहित्य, भाषांतर यासह साहित्याचे सर्व प्रकार त्यात समाविष्ट होऊ शकतात.

तौलनिक साहित्याभ्यासामध्ये वेगवेगळे देश त्यांच्या भाषा, संस्कृती आणि साहित्यपरंपरा यांचा तौलनिक अभ्यास केला जातो. त्यास काळाचे बंधन नसते. त्यामुळे साहित्य आणि संस्कृती यांची तौलनिक चिकित्सा केली जाते. त्यामुळे तुलनेचा अमर्याद विस्तार असल्याचे जाणवते. साहित्यामुळे इतर कलांना विषय मिळतात. दोन वेगवेगळया, भाषा, दोन समाज, त्यांची संस्कृती या स्थलकालाच्या सीमा ओलांडून अभ्यासण्याचे सामर्थ्य तौलनिक साहित्याच्या अभ्यासामागे असल्याचे दिसते. विविध ज्ञानशाखांचा अभ्यास तौलनिक साहित्यामध्ये केला जातो. धर्माच्या कुशीतून व धर्म प्रेषितांच्या मुशीतून बाहेर पडलेले साहित्य अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था यांच्या प्रेरणांनी प्रभावित साहित्य आपल्या जीवन- जाणिवांनी आणि सौंदर्याने विविध क्षेत्रावर आपला ठसा उमटवित असते. त्यामुळे साहित्य आणि जीवन धर्म, विज्ञान व अर्थ यांच्या परस्परसंबंधाचा त्यांच्या क्रिया-प्रतिक्रियांचा अभ्यास तौलनिक साहित्यामध्ये केला जातो. ललितकला साहित्य आणि ज्ञानशाखा जीवनक्षेत्रे यांच्यातील संवाद विरोधाचा, संबंधाचा आणि आंतरक्रियांचा अभ्यास तौलनिक साहित्याभ्यासामध्ये केला जातो. लौकिक व अलौकिक अशा दोन्ही दृष्टिकोनातील समान घटकांचा शोध तौलनिक साहित्यामध्ये घेतला जातो. लौकिक व अलौकिक मतभेदांचा मागोवा तौलनिक साहित्यामध्ये घेतला जातो. समीक्षेत ज्या संकल्पना वापरल्या जातात त्यांची परकीय साहित्याच्या संदर्भात तपासणी करून समीक्षा अधिक नेमकेपणाने कशी करता येईल याचे दिशादर्शन केले जाते.

मौखिक साहित्याचाही अभ्यास तौलनिक साहित्यात केला जातो. मौखिक साहित्याची ग्रांथिक वाङ्मयाशी होणारी आंतरक्रिया त्यातील मूलाधाराचा शोध, आशय रूप यांचाही अभ्यास आरंभीच्या काळात तौलनिक साहित्याभ्यासात केला जात होता. आज तौलनिक अभ्यासाची क्षेत्रे विस्तारली आहेत. साहित्य ही मानवी व्यक्तिकरणाची कला आहे. मानवी भावस्पंदनाचे एक नवनिर्माणशील सृजनक्षम क्षेत्र आहे. तिचा देश भाषा संस्कृतिनिरपेक्ष विचार करून सर्वसाधारण तत्त्वांचा व आवृत्त संरचनाचा शोध घेतला जातो. थोडक्यात तुलनेच्या आधाराने केलेला साहित्यांचा अभ्यास तो तौलनिक साहित्याभ्यास असे आपणास म्हणता येते.

युरोपियन राष्ट्रांच्या साम्राज्यशाही महत्त्वाकांक्षेमुळे जगात झालेले राजकीय जुलूम आणि आर्थिक शोषण कितीही तिरस्करणीय असले तरी साम्राज्याच्या घडामोडीमुळेच समाज समाजातील सांस्कृतिक तटभिंती कोसळल्या ही वस्तुस्थिती आहे. जित आणि जेते यांच्यामधील विनिमय व्यापार उदिमापुरता रहात नाही तर तो भाषा, साहित्य, आचार-विचार, उच्चार अशा अनेक क्षेत्रात घडून येतो. जेत्यांचा प्रभाव जितावर पडावा आणि त्यांनी जेत्याकडून अनेक गोष्टी स्वीकाराव्या हे तर स्वाभाविकच आहे. पण जेते ही जिताकडून काही उचल करतातच. दोन मानवसमाज कोणत्याही कारणांने एकत्र आले की त्यात सांस्कृतिक विनिमय अपरिहार्य असतो म्हणून तर जित राष्ट्रांचा अपरिमित सांस्कृतिक ठेवा पाहून युरोपियन विचारवंत थक्क झाले आणि परिणामी भारत चीन, अरबस्तान आणि इराण या राष्ट्रांच्या

साहित्य संस्कृतीचा अभ्यास भारतामध्ये होऊ लागला. राष्ट्रे आपल्या वैशिष्ट्यांचा शोध घेत असताना आपसामधील साम्याचाही बोध त्यांना होत होता कम्युनिस्टांच्या जाहिरनाम्यात कार्ल मार्क्सने याची दखल घेतली दिसते.

भारतीय तौलनिक साहित्याभ्यासाची सुरूवात लॉर्ड मेकॉलेच्या तुच्छतापूर्ण पत्राने झाली असेच म्हणावे लागेल. तो म्हणतो ''पौर्वात्यांच्या विद्येची पौर्वात्यच जी किंमत करतात ती पत्करायला मी तयार आहे. मी पुष्कळांना विचारले पण सगळयांचे मत एकच एखाद्या चांगल्या युरोपियन ग्रंथालयातील अलमारीत जेवढे ज्ञानभांडार असेल तेवढे पौर्वात्यांच्या संपूर्ण साहित्यात नाही. युरोपियन काव्यांशी तुलना व्हावी. इतकी लायकी आपल्या काव्यात आहे असे म्हणणारा एकही नेटीव्ह भेटलेला नाही. काव्य तर नव्हेच पण शास्त्रीय ज्ञान देणारा एकही ग्रंथ युरोपियनांच्या पासंगाला देखील कोणी पुरायचे नाही. संस्कृत भाषेतील एकूण एक ग्रंथातील ज्ञानाची गोळाबेरीज केली तरी तिची किंमत इंग्लंडमधील प्राथमिक शाळेत शिकवल्या जाणाऱ्या इतिहासाच्या चोपडी एवढीही ठरणार नाही असे म्हणण्यात मी बिलकुल अतिशयोक्ती करत नाही.... '' अशा रीतीने मेकॉलेच्या या दर्पोक्तीचा कोणीही समंजस माणूस धिक्कारच करील. परंतु या तुच्छ लिखाणाची तुलना युरोपिय साहित्यांशी केली त्यामुळे मेकॉले सारख्या अहंगंडाने पछाडलेल्यासाठी त्याच्या मताचे खंडन करण्यासाठी भारतीय व युरोपियन विद्वांनाची लेखणी उचलली.

साहित्य भिन्न-भिन्न भाषांत असले तरी अंतिमदृष्ट्या मानवी मनाचा आविष्कार त्यामध्ये असतो. हे जाणल्याशिवाय दोन साहित्यामध्ये तुलना होऊ शकत नाही. तौलनिक साहित्याभ्यास करणाऱ्या व्यक्तीने कुणाचीही अवास्तव स्तुती अथवा निंदा करण्याचा हेतू ठेवू नये. भिन्न भिन्न परंपरांचे भान ठेवणे, साहित्यातील साम्य विरोधाची कारणमीमांसा करणे या गोष्टींचा अंतर्भाव तौलनिक साहित्याभ्यासामध्ये होतो. तौलनिक साहित्यभ्यासात मात्र एकापेक्षा अधिक साहित्याच्या संदर्भात प्राणभूत तत्त्व म्हणून तुलनेचा उघड अंगीकार केलेला असतो. एक साहित्याधिष्ठीत अभ्यासापेक्षा अनेक साहित्याधिष्ठित अभ्यासाची कक्षा व्यापक असते. अशा व्यापक कक्षेत तुलना करणे हे तौलनिक साहित्याभ्यासाचे एक प्रमुख लक्षण ठरते. एकभाषिक साहित्याची सीमारेषा ओलांडल्याशिवाय तौलनिक साहित्याची सुरूवात होणार नाही. याचा अर्थ असाही नव्हे की एका भाषिक साहित्यामध्ये तुलना संभवत नाही दोन किंवा अधिक भाषासाहित्यामध्ये विशिष्ट प्रवृत्तीला, आकृतिबंधाला, प्रकाराला, प्रवृत्तीला, रचनेला समानता किंवा भिन्नता कशी व कोणत्या गोष्टीमुळे आली याचा शोध तौलनिक साहित्याभ्यासामध्ये घेतला जातो. प्रभाव साधर्म्य वैधर्म्य यामागच्या कारणांचा शोध तौलनिक अभ्यासामध्ये घेतला जातो.

तुलना दोन किंवा अधिक साहित्यकृतीमध्ये केली जाते अर्थात दोन किंवा अधिक राष्ट्रीय साहित्यातही ती करते या सर्व विवेचनावरून तौलनिक साहित्याच्या अभ्यासाची व्याप्ती आपल्या लक्षात येते. यानंतर तौलनिक साहित्याभ्यासाचे स्वरूप ध्यानात घ्यावे लागते.

## ❑ दोन लेखकातील आंतरक्रियांचा अभ्यास :-

तौलनिक साहित्याभ्यास करताना दोन लेखकांचा त्यांच्या वाङ्मयकृतीचा विचार करावा लागतो. प्राचीन काळापासून विचार केला तर आपणास असे दिसून येईल की दोन अथवा अधिक प्रसिध्द साहित्यिकांमध्ये श्रेष्ठतेच्या दृष्टीने स्थान ठरविण्यासाठी संस्कृत व अन्य भारतीय भाषांच्या साहित्यामध्ये तुलना करण्याची पध्दती प्रचलित होती. ही तुलना कोणत्याही सैध्दांतिक अथवा शास्त्रीय पध्दतीवर आधारलेली नव्हती कारण त्यास व्यक्तिसापेक्षतेचा भाग अधिक असल्याचे आपणास दिसते. त्यामुळे तुलना कधी कधी अप्रत्यक्ष तर कधी कधी परस्पर विरोधीही आढळतात.

उपमा कालिदासस्य, भारवेर्थ गौरवम् ।
दण्डिन, पदलालित्यम् माघे सन्ति त्रयोगुणा:।।

या उदाहरणामध्ये वस्तुत: कालिदास, भारवि, दंडी व माघ या व चार संस्कृत महाकवींची तुलनाच असलेली दिसते. कालिदासाचे उपमा वैभव, भारवीचा अर्थगौरव, दंडीचे पदलालित्य अशा विशिष्ट गुणांचा माघ कवींमध्ये समुच्चय असल्याचे सांगितले आहे.

तौलनिक साहित्याभ्यासामध्ये उच्च-नीचतेचा समभाव दाखवला जात नाही तर त्यांच्यामध्ये साम्ये कोणती आहेत. त्यांच्यातील भेद काय आहेत व समान प्रभव परंपरा कोणती त्यांचा प्रभाव कसा पडला अशा चारही अंगांनी अभ्यास केला जातो. वैयक्तिक अभिनिवेश, पूर्वग्रह, किंवा विशिष्ट दृष्टिकोन यातून इतरांच्यापेक्षा एक श्रेष्ठ असे दाखवण्याचे प्रयोजन तुलनात्मक साहित्याभ्यासात संभवत नाही. खऱ्या तुलनात्मक अभ्यासामध्ये दोन साहित्यांच्या साहित्यिक संबंधाची सम्यक तुलनाच अपेक्षित असते. त्यात श्रेष्ठता, कनिष्ठता, उच्चता, निम्नता इत्यादी गोष्टींचा विचार अभिप्रेत असत नाही.

दोन लेखकांचा विचार करता आपणास असेही दिसून येते की काहीवेळा एकच लेखक भिन्न - भिन्न भाषामध्ये लेखन करत असतो. प्रस्तुत प्रबंधविषयातील फणीश्वरनाथ रेणू हे लेखकमहोदय बंगाली, हिंद, नेपाळी वगैरे भाषाकोविद असलेले दिसून येतात. त्यांची या भाषांवर पकड असलेली दिसते. त्यामुळे विविध भाषांमधील अनेक साहित्यिकांशी त्यांचा परिचय अथवा संबंध आला असणे साहजिकच आहे. मराठीतील नामदेवासारखे संतकवी ही मराठी आणि हिंदी या भाषांमध्ये लेखन करताना दिसतात. त्यामुळे भिन्न भाषांमधील एकाच लेखकाच्या साहित्याचा तौलनिक साहित्याभ्यासही होऊ शकेल.

दोन लेखकांच्या साहित्यकृतींचा तौलनिक अभ्यास करताना त्यांच्या भोवतालच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, भौगोलिक पर्यावरणाचा ही विचार करावा लागतो. प्रस्तुत प्रबंधातील व्यंकटेश माडगूळकर आणि फणीश्वरनाथ रेणू हे दूरच्या प्रदेशातील असूनही त्यांच्या लेखनामध्ये मोठया प्रमाणात साम्य असल्याचे जाणवते याचे कारण काय? या विविध कारणांचा शोध घेताना मानसिक

परिस्थितीचाही विचार करावा लागतो. कार्ल मार्क्सच्या विचारानुसार आर्थिक परिस्थिती समाजाची मानसिकता तयार करते. त्यामागे फ्रॉईडचा मनोवाद असलेला दिसतो. दोन किंवा अधिक लेखक त्यांच्या साहित्यकृती यांचा अभ्यास करताना मानवी मनाचे गोत्र अंती एकच या उक्तीचा प्रत्यय आपणास येताना दिसतो.

समान सांस्कृतिक संचितांचाही आपणास दोन लेखकांच्या आंतरक्रियांचा अभ्यास करताना विचार करावा लागतो. भिन्न भिन्न प्रदेशांत असूनही दोघांची भाषा वेगळी असूनही त्यांच्यामध्ये विलक्षण साम्य आढळते यापाठीमागे समान सांस्कृतिक संचिताचा धागा असलेला दिसतो. तुलनाभ्यासामध्ये साहित्यातून लेखकांच्या विचारांमध्ये दिसणारे विचार सूत्र महत्त्वाचे असले तरी कधी कधी त्यांची जीवनपध्दती, जीवनातील घटना यातही योगायोगाने इतके साम्य आढळते की ते पाहून आश्चर्य वाटावे. बऱ्याच वेळा दोन लेखकांमधील एक लेखक बऱ्याच अगोदर होऊन गेलेला असेल तर दुसऱ्या नंतरच्या लेखकावर त्यांचा प्रभाव पडणे साहजिक आहे. पण बरेच वेळा असे घडतही नाही. पहिल्याचे वाङ्मय भाषाभिन्नतेमुळे किंवा काही अन्य कारणामुळे वाचलेले नसले तेव्हा समानता असलेली दिसते. माडगूळकर आणि रेणू यांच्या वयामध्ये फक्त ६ वर्षाचे अंतर आहे. तेव्हा समानतेची अन्यही कारणे शोधावी लागतात, हेही तौलनिक साहित्याभ्यासाने समजते व आपली दृष्टी अधिक व्यापक बनते.

अशा प्रकारे दोन लेखकातील आंतरक्रियांचा अभ्यास त्यांच्या सभोवतालचे संपूर्ण पर्यावरण, ऐतिहासिक, समाजशास्त्रीय दृष्टिकोन लेखकाने मांडलेले तत्त्वज्ञान त्यांचे वैयक्तिक चरित्र त्यांची शैली यांच्या अनुषंगाने अभ्यास करावा लागतो.

## ४.२.४ वाङ्मय प्रकारांचा अभ्यास/साहित्यप्रकारांचा अभ्यास

साहित्यप्रकाराची संकल्पना समजून घेणे अगत्याचे ठरते. साहित्यप्रकार संकल्पनेला कांट व क्रोचे या दोन सौंदर्यमीमांसकांनी तात्त्विक विरोध केला आहे. व्यावहारिक सोय करण्यासाठी आपण साहित्यप्रकार संबोधतो असे त्यांचे मत आहे. सर्वसामान्य रसिक वाचकांना ते पुस्तक कोणते आहे ते समजावे, ग्रंथपाल, संपादक, प्रकाशक यांना वर्गीकरण करण्यासाठी सोपे जावे यासाठी साहित्याचे प्रकार कल्पिले जातात असे त्यांना वाटते. कोणत्याही दोन साहित्यप्रकारांची कितीही सूक्ष्म छाननी केली तरी त्यामधील भेद हे केवळ वर्णनात्मक पातळीवरच राहतात कारण कोणतीही साहित्यकृती पूर्णत: दुसऱ्या साहित्यकृतीपेक्षा वेगळी असत नाही. त्यातीत वेगळेपण काही मुद्यांच्या आधारे दाखवले जाते. हे जरी खरे असले तरी अभ्यासकांना, संशोधकांना अभ्यास करण्यासाठी साहित्यप्रकाराची संकल्पना अभ्यास करण्यासाठी साहित्यप्रकाराची संकल्पना समजून घेणे गरेजे ठरते. प्रत्येक कलाकृती अनन्यसाधारण असेल तर कोणत्याच कलाकृतीचे वर्गीकरण करता येणार नाही व तिचे तार्किक निकषही सांगता येणार नाहीत.

प्रत्येक कलाकृतीचा घाट अनन्य असतो असे जरी असले तरी तो घाट निर्माण होताना सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, भौगोलिक, मानसिक वाङ्मयीन गोष्टींचा प्रभाव त्यावर पडतोच. तसे झाले नसते तर सर्व कलाकृती साचेबंद व एकसुरी जन्मल्या असल्या. जातिनिरपेक्ष फूल जसे आपणास शोधून आणता येत नाही तसा जातिनिरपेक्ष वाङ्मय प्रकार शोधता येणार नाही. सर्वसाधारण साहित्य–व्यवहार हा प्रकारधिष्ठितच असतो. साहित्याची निर्मिती वा वाचन हे एखाद्या साहित्यप्रकाराच्या पूर्व जाणिवेतूनच होते. त्या साहित्यप्रकाराच्या बंदिशाची, एकंदर जडण–घडणीची, त्याच्या प्रभावाची कल्पना लेखकाला असते आणि वाचकाला ही कोणत्याही साहित्यव्यवहाराची जी एक पूर्व परंपरा असते तिच्यामधून हे वाङ्मय प्रकारांचे भान उभयतांना आलेले असते. त्यातूनच कवितेचे कवितापण, नाटकाचे नाटकपण ओळखण्याची खूण गवसते आणि आस्वादन, मूल्यमापन असा साहित्य व्यवहार पुढे वाटचाल करू लागतो, असे डॉ. सुरेश जोशी यांनी वाङ्मय प्रकाराची संकल्पना स्पष्ट करताना म्हटलेले आहे.

साहित्य प्रकाराची संकल्पना समजल्यानंतर त्या साहित्यकृतीची सर्वांगीण उकल करण्यासाठी तपासावा लागतो. तौलनिक साहित्याच्या अभ्यासामध्ये अशा प्रकारचे नातेसंबध तपासणे सहज शक्य होते. ग्रामीण कादंबरीच्या तौलनिक साहित्याच्या अभ्यासामध्ये अशा प्रकारचे नातेसंबध तपासणे सहज शक्य होते. ग्रामीण कादंबरीचा तौलनिक अभ्यास करत असताना त्यात त्या भाषेतील ग्रामीण व कादंबरीची सुरूवात नेमकी कधी कशी झाली याचा अभ्यास केला जातो. स्त्रीवादी असो वा दलित या साहित्यप्रवाहातील ती ती कलाकृती तिचा उद्‌गम विकास वाटचाल या टप्प्यांचा अभ्यास आपणास तौलानिक साहित्यभ्यासाच्या परिशीलनाने शक्य होतो. दोन भाषिक साहित्यकृतींचा अभ्यास करताना त्या त्या भाषेतील साहित्यप्रकारांची संकल्पना तिचे स्वरूप याचे आकलन करता येते आपण आपले घर कधी पडताळून पाहू शकतो तर दुसऱ्याचे घर बघितल्यानंतर ही सर्वसामान्य संकल्पना तौलनिक साहित्याच्या अभ्यासालाही लागू पडते. या ठिकाणी तुलना महत्त्वाची नसते तर आपल्यासारखे तिथे काय आहे? त्यांच्यासारखे आपल्याकडे का नाही? दोघात नेमका भेद कोणता? याचा शोध नकळतच आपण घेत असतो. साहित्याचा तौलनिक अभ्यास करताना साधर्म्य, वैधर्म्य, उद्‌गम आणि प्रभाव या गोष्टींचा विचार करावा लागतो.

साहित्यप्रकाराची संकल्पना म्हणजे मूलभूत गुणधर्मावर आधारलेले वर्गीकरण होय. नॉथ्रोप फ्राय यांनी त्रिस्तरीय भेदव्यवस्था उलगडून दाखविली आहे.

(अ) मिथ्य रचनालक्ष्यी भेद सुखात्म, शोकात्म, नावल विडंबन.

(ब) प्रस्तुतीकरण लक्ष्यी भेद नाटय ,पाठय, गेय व संहिता.

(क) नायकलक्ष्यी भेद नायकांचे स्वभावगुण, पुराण, नावल, उत्तम, अधम, दैवी.

संस्कृती भिन्नतेप्रमाणे यामध्ये फेरबदल होत असल्याचे दिसते. प्रत्येक संस्कृतीचे स्वत:चे खास साहित्यप्रकार असतात असे रेन वेलेके पृ.२६२ यांनी साहित्यसिद्धांत या पुस्तकामध्ये म्हटलेले आहे. इंग्रजी समीक्षक ई. एस. उलास यांनी नाटक, कथा व गीत असे तीनच मूलभूत प्रकार मानलेले आहेत. डॉ. द. भि. कोलते यांच्या मते, खरोखरच वाङ्मय प्रकार हे समीक्षेत आणि वाङ्मयेतिहासाने निर्माण केलेल थोतांड आहे. या विधानाचा आपण विचार केला तर हे विधान चुकीचे असल्याचे दिसून येईल. कलाकृती अनन्यसाधारण असते ती कलावस्तू असते हे जरी मान्य केले तरी तिचे वर्गीकरण केल्याशिवाय सर्वसामान्य वाचक, रसिक, अभ्यासक यांना समजाणार नाही. आडनाव, वडिलांचे नाव आपण लावतो. आता आईचेही नाव लावतो त्यापाठीमागे एक निश्चित उद्देश असतो. तसा ती फक्त साहित्यकृती आहे म्हणणे म्हणजे मी फक्त माणूस आहे असे सांगण्यासारखे होईल. आपली ओळख ही आपल्या अनन्यसाधारणत्वातून होणार नाही तर आपल्यातील काही एक गुणवैशिष्टयांच्या जोरावर करता येईल. म्हणूनच कलाकृतीचे नियमन करणरे जे नियम आहेत हे आपणास लक्षात घ्यावे लागतात. उचित आशय, अभिव्यक्ती, शैली, तंत्र, घडणे याचे विशिष्ट संकेत किंवा नियमांनी ती ती कलाकृती बांधलेली असते.

डॉ. पाटणकर म्हणतात की, या वर्गीकरणाच्या संकल्पना पुरेशा लवचिक ठेवल्या पाहिजेत. वर्गीकरणाला सर्वस्वी विरोध करणे शक्य नाही, कारण वर्गीकरणाशिवाय तुलना, तुलनेशिवाय यथार्थ मूल्यमापन व मूल्यमापनाशिवाय समीक्षाव्यवहार संपन्न होणार नाही. पाश्चात्य साहित्यपरंपरेत सांगण्याचा दाखवण्याचा आणि भावविण्याचा करार असे तीन करार आढळतात. त्यामुळे कथनात्म, नाटयात्म, आणि भावकाव्यात्म असे तिहेरी वर्गीकरण करता येते. या तीन पायाभूत करारातूनच अनेक साहित्यप्रकार सिध्द होतात असे डॉ. मिलिंद मालशे यांना वाटते. तौलनिक साहित्याभ्यासाने विविध साहित्यप्रकार का उदयाला येतात, काही अल्पजीवी का ठरतात, या प्रश्नांचे उत्तर शोधता येते. साहित्य प्रकाराचे प्रकारात्न कसे झाले, विविध भाषेतील अशा प्रकारात्न झालेल्या साहित्यकृतींचा अभ्यास तौलनिक साहित्याभ्यासाने करता येतो. फक्त दोन भाषेतील कलाकृतींचाच नव्हे तर दोन कालखंड दोन वाङ्मयप्रकार, वाङ्मयप्रवाह वाङ्मयीन चळवळी, वाङ्मय प्रकारातील आशयसूत्रे यांचाही तौलनिक साहित्याभ्यास करणे शक्य आहे. यामुळे विविध भाषांमधील साहित्यकृती, वाङ्मयप्रवाह, वाङ्मयप्रकार, त्यातील आशयसूत्रे, त्यावर पडलेला प्रभाव यांचा अभ्यास होईल. व असा अभ्यास एकूण वाङ्मयाच्या इतिहासाला नवीन बदलाला चालना देऊ शकेल असे वाटते.

एकूणच वरील विवेचनाचा विचार केल्यास वाङ्मय प्रकार, साहित्य प्रकार आपणास पुढील प्रकारे पाहता येतात.

(अ) कादंबरी (ब) कथा (क) कविता (ड) नाटक (इ) आत्मचरित्र (ई) चरित्र (उ) निबंध.

## अ) कादंबरी :-

कथनात्म करारातून हा साहित्यप्रकार सिद्‌ध झालेला आहे. कादंबरीचे अचूक लक्षण आणि मोजक्या शब्दात विशिष्ट गुणधर्म पटवून देणे तसे अवघड काम आहे. तरीही कादंबरीची वैशिष्टये अधोरेखित करावी लागतात. कादंबरी हे कथात्मक गद्याचे भरपूर लांबी असलेले रूप असते. या वाङ्‌मय प्रकारात कथनाला व निवेदनाला महत्त्व असते. लघुकथा व लघुकादंबरीपेक्षा मानवी जीवन व्यवहाराचे दर्शन अधिक व्यापक स्वरूपात घडविता येते. कादंबरीतून घटना व्यक्ती, वातावरण इ. घटकांच्या सहाय्याने मानवी जीवनाशी निगडीत असणाऱ्या वास्तवाच्या विविध स्तरीय, व्यामिश्र रूपाचे दर्शन घडविता येते. लोकसाहित्याचा विचार करता मौखिक साहित्यामध्ये कथा, कविता, पुराणकथा, दंतकथा, लोककथा, नीतिकथा, प्रवासकथा, साहसकथा, अद्‌भुतरम्य कथा असा प्रवाह आपणास दिसतो. कादंबरी हा वाङ्‌मय प्रकार कथात्म वाङ्‌मयामध्ये मोडत असल्यामुळे वरील कथात्म वाङ्‌मयाच्या परंपरेशी कादंबरीचे नाते टिकून असलेले दिसते, सर्वसाधारणपणे कादंबरी ही वास्तववादी प्रवृत्तीची निदर्शक नाही हेही आपणास जाणवते. कादंबरीला लाभणारा वाचकवर्गही मोठा असतो. त्यामुळे रंजक कादंबरी ही मोठया प्रमाणात वाचली जाते.

पाश्चात्य देशामध्ये अठराव्या शतकात कादंबरीची वैशिष्टये प्रकट झालेली दिसतात. एकोणिसाव्या शतकात एक महत्त्वाचा वाङ्‌मय प्रकार म्हणून कादंबरीला ओळखले जाऊ लागले. आपण ज्या जगात जगतो, वावरतो त्या सत्य जगाचा आभास निर्माण करणारी शब्दसृष्टी ही साहित्याच्या निर्मितीमागील मूळ प्रेरणा म्हणावी लागेल. त्यामुळे जीवनाविषयक अनुभवांची घडण करणारी, कल्पनाप्रधान, रंजक कादंबरी म्हणूनही कादंबरीच्या वैशिष्ट्याकडे पहावे लागेल. कविता आणि नाटक ह्यांच्याइतका कादंबरी हा वाङ्‌मय प्रकार बंदिस्त स्वरूपाचा नाही. म्हणून हा वाङ्‌मयप्रकार स्थिरावून देखील त्याचे काव्यशास्त्र निर्माण झालेले नाही. हा डॉ. उषा हस्तक यांचा अभिप्राय अतिशय महत्त्वाचा ठरतो. कादंबरीचे काव्यशास्त्र निर्माण होण्यासाठी तौलनिक साहित्याभ्यासाची खरी गरज आहे. कादंबरीचा मूळ घटक म्हणजे तिचा निर्माता असतो ज्या प्रेरणातून कादंबरीचे मूर्त रूप साकार झाले आहे त्या प्रेरणांचा शोध तौलानिक साहित्याभ्यासाने घेता येतो. कोणतीही कादंबरी ज्या युगामध्ये निर्माण होते त्या युगाचा ठसा त्या कादंबरीवर पडलेला असतो. त्यामुळे त्या युगाची भाषा, परंपरा, राहणीमान आचारविचार, संस्कृती त्यामुळे त्या युगाची भाषा, परंपरा, राहणीमान, पोशाख, जेवणातील पदार्थ यांचेही दर्शन कादंबरीतून घडते. व्यक्तिचित्रणाची पद्‌धती, तिची भाषा, निवेदन यातूनही वेगळेपण आपणास शोधता येते. त्यासाठी तौलानिक साहित्याभ्यासपद्‌धती महत्त्वाची ठरते. कादंबरीचे प्रकार पाहिले असता आपणास कादंबरीची रचनातंत्रे निवेदनपद्‌धती, तिची भाषा, घडणाऱ्या घडामोडी दिसून येतात. ऐतिहासिक, सामाजिक, पौराणिक, विज्ञान काल्पनिक, प्रेमप्रधान, रंजनप्रधान कादंबऱ्या बरोबरचे, कादंबरीच्या रचनेनुसार व

लांबीनुसार, लघुकादंबरीच्या रचनेनुसार व लांबीनुसार लघुकादंबरी व दीर्घकादंबरी असेही प्रकार कल्पिले जातात. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये दोन भाषांमधील कादंबरीची रचनातंत्रे, आशयसूत्रे, भाषाशैली, निवेदन पद्धती, यांचा अभ्यास केला जातो.

## ब) कथा :-

कथा हा कथनात्मक साहित्याच्या परंपरेशी प्रदीर्घ व अतूट जोडलेला वाङ्मय प्रकार आहे. मौखिक परंपरेशी नाते सांगणारा हा वाङ्मय प्रकार आहे. पूर्णत भावनाविरहित आणि वस्तुनिष्ठ अशा कथांपासून ते अत्यंत भावघन अशा सामाजिक मनाचे चित्रण करणाऱ्या कथा, व्यक्तींच्या मनातील खळबळीचे चित्रण असो की, माणसाने आयुष्यात कसे वागावे असे सांगणाऱ्या कथा असोत. नाना प्रकारच्या कथा लिहिलेल्या दिसतात. दहा ते पंधरा पानाच्या कथेपासून ते पन्नास साठ पानांचीही कथा आपणास दिसते. ती लघुकादंबरी वाटावी इतकी मोठीही असते. लघुकथा व दीर्घकथा असे कथेच्या लांबीवरून आपणास वर्गीकरण करता येते. इंदूमती शेवडे यांनी कथेच्या स्वरूपाबाबत लिहिताना म्हटले आहे की, ''स्वतंत्र वाङ्मय प्रकार म्हणून कथेचे अस्तित्व अबाधित आहे. तिची पृथगात्मता कायम राहिली आहे. एक पृथगात्म वाङ्मय प्रकार म्हणून तिची व्यवच्छेदक लक्षणे, तिच्यातील अनुभवाची एकात्मकता, एकजिनसीपणा, एक विविधता आणि दुसरे या गुणांशी संलग्न असलेले तिचे एक संस्कारित्व.'' तर सुधा जोशी कथेच्या स्वरूपाबाबत म्हणतात, ''कथेचे लघुरूप व तिच्या संस्काराची एकता यामुळे तिच्या रचनेत, संघटनेत, काही विशेष स्वभावतःच येतात. एककेंद्रितता, संक्षेप, संपृता, काटेकोर नेमकेपणा हे कथेच्या कलातंत्राचे खास विशेष म्हणता येतील.'' यावरून आपणास एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे कथेच्या विशेषांच्या वर्णनात्मक परामर्श घेणे शक्य होते. भालचंद्र नेमाडे यांनी लघुकथा हा कमी लांबीचा चिंचोळा भाषिक अवकाश पुरविणारा, एकसुरी आशयसूत्रातून स्थलकालाचे संकुचित म्हणून तीव्र संवेदन देणारा प्रकार आहे. असे कथेच्या बाबतीत सांगितले आहे. कथेची सुरूवात, मध्य व शेवट यातून कथेचा परिणाम साधला जातो. कथा ही कमीत कमी शब्दात जास्त आशय सांगते. कालचा व अवकाशाचा एक मोठा परिघ तिने व्यापलेला असतो. कथेचे स्वरूप नैसर्गिकरित्या लघु असल्याने त्यातून एकच एक संस्कार उमटत असतो, त्यामुळे आशयाच्या व्याप्तीला मर्यादा येतात व आकरावर आपोआप बंधन येते. कथेमध्ये समग्र जीवनातील एखादया तुकडयाचे चित्रण केलेले असते. सामान्य व्यक्तीच्या जीवनातील विशिष्ट टप्पा, जीवनानुभव साधण्याचा प्रयत्न करते. कथेमध्ये रचनेचे व अनुभवाचे एककेंद्रित्व असते. अनुभवांची एकता त्यामुळे आपणास पहावास मिळते. गंगाधर गाडगीळ म्हणतात की, भावकाव्याशी नाते सांगणाऱ्या शैलीत लघुकथा लिहिता येते. परंतु या शैलीत कादंबरी लिहिणे अवघड जाते.

कथा ही कथानक, पात्रे, वातावरण, निवेदन पद्धती, भाषा या विविध घटकांनी साकारत असते.

हे सगळे कथेचे मूलघटक आहेत. कथाकार या सर्वांच्या आश्रयाने आपली कथा साकार करीत असतो. घटनाप्रसंग पात्रांच्या कृती, अन्य तपशील भाषा यांची अर्थपूर्ण रीतीने गुंफण केलेली असते. कथेतील अनुभव हे लेखकाला प्रत्यक्ष आलेले असू शकतात किंवा कल्पनारम्यतेची जोड देवून अद्‌भुतरम्यही केलेले असू शकतात. या दृष्टीने व्यंकटेश माडगूळकरांच्या, कथा आपणास पाहता येतील. माणदेशी माणसांचे चित्रण करताना त्यांनी अनुभवलेल्या अनेक व्यक्ती त्यांनी आपल्या कथेमधून आणलेल्या दिसतात तर हिंदी साहित्यातील फणीश्वरनाथ रेणू यांनीही आपल्या कथांमधून तळागाळातील, विकासापासून दूर असलेला माणूस केंद्रस्थानी आणला आहे. त्यादृष्टीने माडगुळकरांची सर्व्हिस मोटर व फणीश्वरनाथ रेणूंची पंचलाइट ही कथा तौलनिक अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. कथेतील व्यक्तिबरोबरच ती व्यक्ती ज्या विशिष्ट स्थलकालांच्या चौकटीत, एका विशिष्ट भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक परिघात घडत असते त्यातून कथेचे वातावरण घडत असते. उदा. माडगूळकरांची धर्मा रामोशी, तांबोळयाची खाला, रामा मैलकुली यासारख्या कथा आपणास पाहता येतील. कथेतील पात्र, घटना, प्रसंग, नाटय, संघर्ष याबातीत वातावरण हा अतिशय महत्त्वाचा घटक आहे. निवेदन हेही कथेचे व्यवच्छेदक लक्षण म्हणून पाहिले जाते. निवेदकाच्या तोंडून कथा सांगणे किंवा तृतीयपुरूषी निवेदन केले जाते. कथेची भाषा ही एका कल्पित विश्वाची भाषा असली तरी कथेतील रस, रूप, गंध संवेदना साकार करण्याचे सामर्थ्य भाषेत असते. भाषेचे रूढ संकेत मोडून किंवा नव्या भाषिक अभिव्यक्तीचा वापर करून कथा लिहिली जाते. फणीश्वरनाथ रेणूंनी आपले साहित्यलेखन करताना त्यांच्या प्रदेशाची प्रदेश विशिष्ट बोली वापरली आहे. हिंदीतून जरी त्यांनी लेखन केले असले तरी बिहारमधील उपबोली मैथिली, नेपाळच्या सीमावर्ती भागात बोलली जाणारी बोली या सर्वाचा वापर केला आहे. सीमावर्ती भागातील लेखन करणाऱ्या लेखकांच्या लेखनातून तेथील भाषा ही साहित्यातून येत असते. आज डॉ. नंदकुमार मोरे व डॉ. राजन गवस यांनी त्यांच्या प्रदेशातील चंदगडी बोलीला वैभवाचे दिवस आणले आहेत. युजीसीच्या अभ्यासक्रमामध्ये तिची दखल घेतली गेल्याचे दिसते. चंदगडी बोलीमधील खास शब्द, वाक्‌प्रचार, म्हणी, लोकसमजुती, लोकभ्रम हे तेथील लेखकांच्या कथा साहित्यातून आपणास पहावयास मिळतील. तौलनिक साहित्याभ्यासातून अशा विविध बोलींचा परिचय अभ्यासकांना होतो. झारखंडमध्ये बोलली जाणारी नागपुरी बोली व महाराष्ट्रामध्ये बोलली जाणारी नागपुरी बोली यातील साम्यभेद प्रभव-प्रभाव आपणास तौलनिक साहित्याच्या अभ्यासाने पडताळून पाहता येईल.

## क) कविता :-

कविता ही मानवी अभिव्यक्तीचा आद्य आविष्कार गणली जावी इतकी प्राचीन आहे. गीत गुणगुणणे हा माणसाचा सहज स्वभाव आहे. श्रम विसरण्यासाठी एका विशिष्ट ताल, सूर व लयीत

काही ना काही गुणगुणणे हा माणसाचा स्वभाव आहे. मौखिक परंपरेतून चालत आलेली कविता श्री संत ज्ञानेश्वरांच्या अमृतमय शब्दातून साकार होऊन संत नामदेवांच्या अवीट भक्तीतून मराठी माणसांच्या मनावर अधिराज्य गाजवत पुढे आली. महानुभाव पंथाचे योगदानही त्यामध्ये अतिशय महत्त्वाचे आहे. संत तुकोबांच्या साध्या सरळ व अर्थवाही शब्दातून एकनाथांच्या लौकिक अलौकिक जीवनाच्या मांडणीतून लोकशिक्षणाचे काम करीत आली आहे. पंडित कवींच्या काळात अलंकार प्राचुर्याने नटलेली कविता, शाहिराच्या डफातून शृंगाराची उधळण करीत इंग्रजी भाषेचे प्रभाव झेलीत मार्गक्रमण करीत राहिली. आधुनिक काळातील कविता केशवसुतांनी नव्या मनातील नव्या दमाचा शूर शिपाई बनून बदलाची तुतारी फुंकली कविवर्य भा. रा. तांबे, कुसुमाग्रज, कवी अनिल, कवी नारायण सुर्वे, ना. धो. महानोर, बा. भ. बोरकर, कवी ग्रेस यांनी कवितेला नवा आशय आणि परिघ मिळवून दिला. मराठी कवितेतील नव्या वाटा व नवी वळणे या कवींनी मराठी कवितेला बहाल केली. वसंत बापट, विंदा करंदीकर, मंगेश पाडगांवकर, सुरेश भट, बहिणाबाई चौधरी, आनंद यादव, विठ्ठल वाघ यांनी मराठी मनाचे आणि मराठी कवितेचे अस्सल सौंदर्य उलगडून दाखवण्याचे काम केले. आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही अंगानी मराठी कविता प्रौढ होत गेलेली दिसते. प्रौढत्व जपणारी मराठी कविता नऊ रसांबरोबरच सत्य, शिव, सौंदर्य, स्वातंत्र्य, समता, बंधता, प्रेम, विश्वास, संघर्ष, व्यथा, वेदना, विद्रोह, नकार या सर्व जीवनमूल्यांचे दर्शन घडवित मराठी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवू लागली असल्याचे दिसते.

कवितेच्या निर्मितीमागे उत्स्फूर्तता आणि सहजप्रेरणा आहे. अनुभवाचे आकलन, संप्रेषण आणि स्वीकार या साऱ्याला कविता लय प्राप्त करून देते. कवितेच्या व्याख्यांचा अभ्यास केला तर आपल्या ही गोष्ट लक्षात येते. सहजस्फूर्त भावनांचा उत्कट व लयबद्ध आविष्कार म्हणजे कविता असते. कवितेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे तिचे अल्पाक्षरत्व होय. एक असीम व विराट असा आकृतिबंध, अनुभव कमीत कमी शब्दात मांडण्याचे सामर्थ्य कवितेमध्ये असते. डॉ. निशिकांत मिरजकर आपल्या साहित्य रंग आणि अंतरंग या पुस्तकात कवितेचे वैशिष्ट्य सांगताना म्हणतात, ''कविता हा असा विलक्षण साहित्य प्रकार आहे की, त्यात अतिसीमित, अल्पाक्षरी आकृतीबंधता, अनुभवाचे केवढे तरी विराट स्वरूप सामावले जाऊ शकते. अत्यंत उत्कट ऐंद्रिय संवेदना, त्या संवेदनानी जागविलेल्या उत्कट भावना, ऐंद्रिय संवेदनाच्या पलीकडे पोचणारी भावनांची झेप, प्रत्यक्ष अनुभव आणि त्या अनुभवाविषयी मनात उमटलेल्या प्रतिक्रिया विशिष्ट आणि सार्वत्रिक यांना विंधणारा जीवनाचा आलेख व्यक्तिगत आणि विश्वात्मक स्तरांवर झालेली अनुभवाची सरळ मिसळ, जीवनदर्शन आणि जीवनभाष्य हे सगळे एकाच वेळी कवितेच्या सीमित आकृतिबंधात सामावते.''

तौलनिक साहित्याच्या अभ्यासाने विश्वात्मक भाषेतील असे अनुभव व या अनुभवाची विश्वात्मक स्तरावर आलेली प्रचिती यांचा वेध घेता येतो. विविध क्रिया प्रतिक्रिया, अनुभवांचे

समष्टीकरण तौलनिक साहित्याच्या अभ्यासाने आपणास जाणून घेता येते. विशिष्ट काव्य परंपरा, काव्य प्रवाह, कवितेची निर्मिती प्रक्रिया आपणास विविध भाषेतील कवितांचा अभ्यास केल्यास अधिक चांगल्या प्रकारे लक्षात घेता येऊ शकते. जपानी कवितेतील हायकू व मराठी कवितेतील हायकू यांचा तौलनिक अभ्यास अतिशय सुंदर रितीने करता येईल. त्यासाठी अभ्यासकाल जपानी व मराठी या दोन्ही भाषा अवगत असल्या पाहिजेत. संस्कृत काव्याचे अनुकरण करणारे भाषेचा वृथा डौल मिरवणारे कृत्रिम रचनासौंदर्याच्या आहारी गेलेले असे विविध कवी आपणास संस्कृत आणि मराठी कवितांच्या तौलनिक अभ्यासाने अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता येतील. १९२० ते १९३० या कालखंडातील स्वातंत्र्य प्रेमाने भारलेली कविता १९४० नंतर पहिल्या महायुध्दाचे व दुसऱ्या महायुध्दाचे भीषण संहार टिपणारी कविता, औद्योगिकरण, वाढते शहरीकरण, भांडवलशाही साम्यवादी विचारसरणी या साऱ्यांचा प्रभाव मराठी कवितेवर पडला.

'पिपात मेले ओल्या उंदीर
माना पडल्या मरगळल्याविण'
किंवा
'तू एक मुंगी मी एक मुंगी'

ही मानवी जीवनातील जगण्यात निर्माण झालेली विफलता भारतीय इतर भाषेत कशी प्रकट झाली आहे. हे तौलनिक साहित्याभ्यासाने पाहणे अगत्याचे ठरते. आज आपल्या शेजारी असणाऱ्या राज्यात अनेक ज्ञानपीठ विजेते साहित्यिक आहेत. पण त्यांच्या साहित्याचा साधा गंधही आपणास नाही. याचे कारण काय? हे शोधण्याची गरज आहे. मराठी, कन्नड, मल्याळम, तेलगू, तमिळ, बंगाली, ओडीसी, गुजराथी, हिंदी, आसामी अशा बहुविध भाषांमध्ये साहित्याची निर्मिती होत आहे. तौलनिक साहित्याचा अभ्यास करत असताना दोन भाषांतील कवितांचा तौलनिक अभ्यास मग तो दोन कवींचा, दोन वाङ्मय प्रकारांचा, प्रवाहांचा किंवा कालखंडाचा असो करणे अतिशय गरजेचे आहे. भारतीय भाषांमधील व्यक्त होणाऱ्या एकात्म भारतीयतत्वाची ओळख करून घेण्यासाठी असे अभ्यास आवश्यक ठरतात.

वृत्तछंद, मुक्तछंद, विमुक्तछंद असा रचनाबंधाचाही तौलानिक अभ्यास आपणास करता येतो. प्रतिमा व प्रतिके यांचा केला गेलेला वापर, हाही व्दिभाषिक कवितांचा भाषिक आविष्कार तौलनिक साहित्याभ्यासात करता येईल. कवितेच्या विविध प्रकारांचा उदा. भक्तिगीत, भावगीत, नाटयगीत, स्फूर्तिगीत, चित्रपटगीत, बालगीत, बडबडगीत, कूटगीत, कोळीगीते, स्त्रीगीते, लोकगीते, आरत्या, गण, गौळण, लावणी, आर्या, पोवाडे, गझल, हझाल, हायकू, वात्रटिका, चावटिका, लोचटिका, कणिका, गोंधळ, भारूड, सवाल-जवाब, श्लोक, सुनित, फटका, रूबाया, चारोळी, मराठी शायरी, कथा,

कविता, चिंतनगर्भ, कविता, विडंबन असे मराठी कवितेतील विविध प्रकार आपण इतर भाषेतील कवितांशी तुलनात्मक अभ्यासाने अभ्यासू शकतो व अशा अभ्यासाची मराठी साहित्याला खरी गरज आहे.

## क) नाटक :-

'काव्येषु नाटकं रम्यम्' असे संस्कृत साहित्यिकांनी म्हटले आहे. भरताचे नाटयशास्त्र तर प्रसिद्ध आहे. प्राचीन व अर्वाचीन काव्यशास्त्रज्ञांनी नाटकाला दाखवण्याचा प्रकार म्हणून संबोधले आहे. मराठी साहित्यातील नाटकांचा विचार करता प्राचीन काळापासून विधीनाटये ही चालत आलेली दिसतात. अलिकडील काळात जन्मास आलेले पहिले नाटक म्हणून विष्णूदास भावे यांच्या सीतास्वंयवर या नाटकाचा आपण उल्लेख करतो. म्हणूनच सांगली शहराला नाटयपंढरी म्हणतात. परंतु या नाटयपंढरीपेक्षा सर्वात जास्त नाटके कोल्हापूर शहरामध्ये होतात हेही वास्तव नाकारता येत नाही. गो. ब. देवल, आण्णासाहेब किर्लोस्कर यासारख्या नाटयप्रभूंनी नाट्यकलेला गौरवाचे दिवस आणले. नाटक हा समाजाच्या अभिरूचीला आवाहन करणारा सशक्त कलाप्रकार आहे. महात्मा फुले यांचे तृतीय रत्न हे नाटक संहिताप्रधान नाटक आहे. लोकरंजन, प्रबोधन आणि जीवनदर्शन या तीन पातळ्यावर नाटक कार्यरत असते. असे डॉ. हिमांशू स्मार्त म्हणतात. नाटक ही प्रयोगरूप व मिश्र कला आहे. लिखित संहितेचा दिग्दर्शक, नटसंच, तंत्रसहायक यांच्या समन्वयातून प्रयोग होत असतो. लोकनाट्ये व मूकनाट्ये यांच्या लिखित संहिता अभावानेच पहायला मिळतात.

नाटकांमध्ये साहित्य संहिता, संगीता, रंगमंच सजावट, रंगभूषा, नेपथ्य, अभिनय, पात्ररचना या नाटकाच्या महत्त्वाच्या बाबी म्हणून गणल्या जातात. भरताने आपल्या नाट्यशास्त्र या ग्रंथात विभाव, अनुभाव व व्यभिचारी भाव यांच्या संयोगातून रसाची निष्पत्ती होते हे सूत्र मांडले आहे. ते या बाबींच्या आधारावरच मांडले आहे. १८४३ ते १९०० या काळात अनेक रूपांतरीत व अनुवादित नाटके रंगमंचावर आली. शेक्सपियर, कालिदास, भवभूती, बर्नाड शॉ आदि नाटककरांच्या नाटकांचा पगडा त्यावर मोठ्या प्रमाणावर असलेला दिसतो. तौलनिक साहित्याच्या अभ्यासाने नाटकांच्या संहिता व त्यांच्यावर पडलेले प्रभाव आपणास अभ्यासता येतात. २० व्या शतकाच्या आरंभामध्ये सामाजिक सुधारणा, शिक्षण प्रसार, नवमतांचा आग्रह यामुळे नाट्यसंहितेत अनेक बदल होत गेले. भा.वि. वरेरकर वि. ज. कीर्तने त्यानंतर अत्रे, पु. ल. देशपांडे, विजय तेंडुलकर, सतीश आळतेकर, महेश एलकुंचवार यांच्यासारख्या नाटककारांनी मराठी नाटयदालन समृध्द केले.

दलित रंगभूमीवरील नाटक परंपरा लक्षात घेताना आपणास प्रेमानंद गज्वी, दत्ता भगत, टेक्सास गायकवाड, रामनाथ चव्हाण यांच्यासारखे नाटककार नजरेसमोर येतात. प्रायोगिक नाटकांचा विचार करता संहिता आणि प्रयोगशीलता, कथानक विषय, संवाद, रंगमंच यांच्या वापरामध्ये आलेली प्रगल्भता,

नवतेचा आग्रह, आधुनिक विचार मतप्रवाहाचा आदर व जीवनदर्शनाचा स्वीकार या गोष्टी दिसतात. तर दलित रंगभूमीमध्ये समताधिष्ठित मूल्यव्यवस्थेची मांडणी, शोषणाविरूध्द बंड, मानवतावादी आशयसूत्रांचा वापर, बुध्द, फुले, चार्वाक, आंबेडकर यांच्या तत्वज्ञानाचा आधार अशी काही वैशिष्ट्ये दिसतात. एकूणच या सर्व गुणवैशिष्ट्यांचा अभ्यास तौलनिक साहित्याच्या अभ्यासाने अधिक चांगल्या प्रकार करता येऊ शकतो.

### ❑ चरित्र/आत्मचरित्र :-

आत्मचरित्र ही संकल्पना आज मराठी साहित्यामध्ये खूप मोठया प्रमाणावर प्रसिध्द झाली आहे. आत्मचरित्रापेक्षा आत्मकथन हा साहित्यप्रकार मोठ्या प्रमाणात रसिकमान्य झाला आहे. महत्त्वाची कामगिरी करणाऱ्या लोकमान्य व्यक्तीचे चरित्र लिहिले जाते. तर स्वत:चे अनुभव आत्मचरित्र आत्मकथनातून मांडले जातात. मराठीमध्ये महानुभाव पंथामध्ये गोविंदप्रभूचरित्र आपणास पहावयास मिळते तर नामदेवांच्या अभंगवाणीमध्ये संत ज्ञानेश्वर यांचे चरित्र आपणास स्फूट स्वरूपात पहावयास मिळते. चरित्रलेखनाचा हा आरंभ पुढे मराठी साहित्यात बहरत गेला. १९६० नंतर चरित्र लेखनापेक्षा आत्मचरित्र, आत्मकथने मोठ्या प्रमाणावर लिहिली गेली. 'मास्तरांच्या सावलीत' कृष्णाबाई सुर्वे, 'मला उद्ध्वस्त व्हायचय' मल्लिका अमरशेख 'जीण आमचं' बेबी कांबळे, 'आयदान' उर्मिला पवार अशी काही ठळक आत्मकथने चरित्रे स्त्रीलेखिकांनी लिहिली आहेत. 'बलुतं' दया पवार, 'आठवणींचे पक्षी' प्र. ई. सोनकांबळे, 'उचल्या' लक्ष्मण गायकवाड, 'उपरा' लक्ष्मण माने ही आत्मकथने मराठी साहित्यामध्ये मोलाची भर घालताना दिसतात.

तौलनिक साहित्याचा अभ्यास करताना विविध भाषिक आत्मकथनांचा व चरित्रांचाही अभ्यास मराठी साहित्याच्या इतिहासात मोलाची भर घालेल. त्या दृष्टीने भिन्न भाषिक चरित्र व आत्मचरित्रांचा तौलानिक अभ्यास होणे अतिशय गरजेचे आहे.

## ४.२.६ वाङ्मय प्रवाह आणि चळवळी यांचा अभ्यास

तौलनिक साहित्याभ्यासामध्ये वाङ्मय प्रवाह व वाङ्मयीन चळवळी यांचा अभ्यास अतिशय महत्त्वाचा आहे. भारतीय भाषेतील साहित्याचा विचार करावयाचा झाला तर सर्वच भारतीय साहित्याचा प्रवास एकसारखा नाही. वाङ्मयातील विविध प्रवाह व चळवळी यांचा प्रभाव व प्रवासही कमी अधिक फरकाने पडलेला आहे. पाश्चात्य देशातील वाङ्मयीन चळवळी व वाङ्मयीन प्रवाह भारतीय साहित्यावर मोठया प्रमाणावर प्रभाव टाकतात त्यामुळे तिकडे संपुष्टात आलेली चळवळ भारतीय साहित्यात नवी म्हणून स्वीकारली जाते. भारतीय भाषिक साहित्यामध्ये वाङ्मयीन संकल्पनांची मांडणी नव्याने कितीदा केली जाते याचाही विचार व्हायला हवा. आज पर्यावरणवादी समीक्षेची संकल्पना मराठी साहित्यातील

अभ्यासकांना किती प्रमाणात माहिती आहे हा संशोधनाचा मुद्दा आहे. कारण मराठी साहित्याच्या अभ्यासात पर्यावरणवादी समीक्षेची संकल्पना आता मूळ धरू लागली आहे त्यामुळे विद्यापीठीय अभ्यासक्रमात ही संकल्पना कुठेच दिसून येत नाही. या समीक्षेविषयी लिहिलेली पुस्तकेही अगदी नगण्य आहेत. याचा अर्थ वाङ्मय प्रवाह व चळवळी या सर्वच भाषांमध्ये एकाचवेळी उदयास आलेल्या नाहीत. या सर्वांचा अभ्यास तौलनिक साहित्याभ्यासाने करता येतो.

## ❑ वाङ्मय प्रवाह आणि चळवळी यांचा अभ्यास

मराठी साहित्यामध्ये प्राचीन काळापासून साहित्यनिर्मिती होत असल्याचे दिसते. महाकाव्ये, पुराणकथा यातून वाङ्मयाचा प्रवाह समृध्द होत गेला. धार्मिक ग्रंथ, टीका, याबरोबरच पंडित कवींच्या काव्यातून शाहिरांच्या लावण्या व पोवाड्यातून हा प्रवाह उत्तरोत्तर बहरत गेला. इंग्रजांच्या आगमनानंतर भाषांतर युग सुरू झाले. मराठी साहित्यामध्ये साहित्यसंकल्पना मूळ धरू लागल्या त्यावर विचामंथन सुरू झाले त्यातूनच साहित्याविषयीची एक नवी जाणीव तयार होऊ लागली.

मराठी साहित्यामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विशेषत: १९६० नंतर काही ठळक वाङ्मय प्रवाह उदयास आले. वि. स. सुखठणकरांनी 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' हा कथा संग्रह लिहिला आणि ग्रामीण साहित्यातील नवे जग वाचकांसमोर आले. त्या अगोदर ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे साहित्य प्रमाणात निर्माण होत होते. परंतु व्यंकटेश माडगूळकरांची 'बनगरवाडी' ही कादंबरी प्रकाशित झाली आणि ग्रामीण व प्रादेशित साहित्याच्या क्षेत्रात तिने खळबळ उडवून दिली. आपण 'बनगरवाडी' या कादंबरीला मैलाचा दगड म्हणून संबोधतो. तसाच प्रकार हिंदी साहित्यामध्येही आपणास पहावयास मिळतो. 'देहाती दुनिया' नंतर फणीश्वरनाथ रेणू यांची 'मैला आँचल' ही कादंबरी प्रसिद्ध झाली आणि हिंदी साहित्यामध्ये ती मैलाचा दगड ठरली.

महात्मा ज्योतिराव फुले यांनी देशातील शुद्र-अतिशुद्र समाजाच्या उन्नतीसाठी एक विचारसरणी मांडली त्या विचारसरणीस अनुसरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'शिका, संघर्ष करा, संघटीत व्हा' हा मूलमंत्र दिला. व्यथा, वेदना, विद्रोह, व नकार मांडण्याची अस्मिता जागवली त्यामुळे मराठी साहित्यात ग्रामीण, दलित व स्त्रीवादी हे तीनही प्रवाह समांतरपणे विकसित होत गेले.

## ❑ ग्रामीण साहित्याचा प्रवाह :-

ग्राम या शब्दाचा आपण बारकाईने अभ्यास केला तर आपणास असे जाणवते ते म्हणजे ग्राम म्हणजे गाव होय. मग मूल्यवाचक व वर्णनवाचक म्हणूनही या शब्दाकडे पहावे लागते. ग्रामजीवनाचे स्वरूप, जातिबद्ध समाज रचना, कुटुंब व्यवस्था, तेथील चालीरिती, रूढी परंपरा, समाज जीवन भाषा, पोशाख, नैसर्गिक व भौगोलिक परिस्थिती यांचा विचार येथे अभिप्रेत असतो. ग्रामीण आणि नागर या

दोन्ही संज्ञा भिन्न आहेत. त्या परस्पराविरोधी आहेत. जीवनाच्या सर्व पातळ्यांवर त्या स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व व अर्थ घेऊन उभ्या आहेत. ग्रामीण भागातील समस्या व नागरी समस्या, वेगवेगळया आहेत. ग्रामीण भागात असणारे उद्योग व नागरी भागातील उद्योगामध्ये तफावत, शिक्षण किंवा इतर समस्याही वेगवेगळ्या आहेत. आज २१ व्या शतकात जग हे ग्लोबल खेडे झाले आहे असे आपण म्हणतो तरीही खऱ्या विकासापासून दूर असलेला, वीजेची सोय नाही, एस. टी. ची सोय नाही. रस्ते, पाणी अशा काहीही सोयी नाहीत, असा भागही या २१ व्या शतकातील महासत्ता होणाऱ्या भारतामध्ये आहेच. आजही आपणास एका बाजूला भारत व दुसऱ्या बाजूला इंडिया असलेला दिसून येतो. आपणास भारतातील ग्रामीण भागाचा विचार करावयाचा आहे.

ग्राम आणि नगर जुन्या संकल्पना असल्या तरी वाढते औद्योगिकरण, सार्वत्रिक शिक्षण व त्यांचे दूरगामी परिणाम यामुळे या दोन्ही संकल्पनेतील फरक जास्त स्पष्ट होत गेला. मराठी साहित्याचा प्रवाह साधारणत: १९२० नंतर सुरू झाला असे म्हटले जाते. कारण १९२० च्या दरम्यान ग्रामीण जीवनाचे ठळक वेगळेपण नोंदवले जावू लागले. महात्मा गांधीनी 'खेड्याकडे चला' ही हाक दिली आणि अनेकांच्या नजरा या ग्रामीण भागाकडे वळल्या. लोकहितवादी यांनी याच काळात 'ग्राम रचना' हा ग्रंथ लिहिला. ताराबाई शिंदे यांच्या 'स्त्री-पुरूष तुलना' या ग्रंथातही कारागिरांची कारागिरी संपत असल्याचा निर्देश झाला. महात्मा फुले यांच्या 'गुलामगिरी', 'ब्राम्हणांचे कसब', 'शेतकऱ्यांचा आसूड'मधून शेतकऱ्याच्या हलाखीचे चित्रण आले. मराठीमध्ये 'जानपद' गीतांच्या रूपाने ग्रामीण कविता लिहिली जाऊ लागली. या गीतांना किसान गीते किंवा गोपगीते असेही म्हटले जात होते. कथा, कविता, कादंबरी या तीनही वाङ्मय प्रकारातून ग्रामीण साहित्य मोठया प्रमाणात लिहू लागले जाऊ लागले त्यामध्ये ग. ल. ठोकळ, र. वा. दिघे, माडगूळकर, वि. वा. हडप, सोपानदेव चौधरी, शंकर पाटील, आनंद यादव, रा. रं. बोराडे, उद्धव शेळके, विश्वास पाटील, भास्कर चंदनशिव, ना. धों, महानोर, इंद्रजित भालेराव, चंद्रकुमार नलगे अशी काही सलग परंपरा आपणास निर्देशित करता येते.

ग्रामीण भागाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कृषिसंस्कृती होय. या कृषिसंस्कृतीशी संपूर्ण गाव बांधलेला दिसतो. ग्रामसंस्कृतीचे स्वरूप पहात असताना शेती हा ग्रामीण भागाचा केंद्रबिंदू असल्याचे दिसते. शेतीच्या भोवतीच सगळी ग्रामसंस्कृती बांधलेली आहे. त्यामुळे खेड्यांची आंतररचनाही शेतीमुळेच तयार झाली आहे. ही ग्रामसंस्कृती स्वतंत्र व वैशिष्ट्यपूर्ण आहे. बारा बलुतेदार हा अलुतेदार, ब्राम्हण, वतनदार, चौगुला व पाटील या सर्वांनी ग्रामसंस्कृतीचे धागे एकमेकांत विणले आहेत. व्यवसायातून कारू व नारू ही संकल्पना उदयास आली. शेतकरी म्हणजे गाय व कारू-नारू म्हणजे वासरू ही संकल्पना त्या काळी रूढ झाली. यातूनच शेतकरी व त्यावर आधारित व्यावसायिक यांचे एकत्व असल्याचे दिसते. जाती-पाती अस्पृश्यता ही त्या काळात मोठ्या प्रमाणात होती असे असले तरी गावातील महत्त्वाच्या प्रसंगी सर्व जाती एकत्र येऊन गावगाडा चालवत असल्याचे दिसते.

गावातील ग्रामदैवताच्या पालखीला कापड कोणी आणायचे. सासनकाठी कोणी आणावयाची? तेल कोणी घालावयाचे? अब्दागिऱ्या, छत्र-चामरे कोणी धरावयाची? वाद्ये कोणी वाजवायची? हा एक अलिखित नियम होता. त्यानुसार प्रत्येक जातीला गावगाड्यातील रूढीपरंपरेत जपलेल्या दिसतात.

## ❑ ग्रामीणता व प्रादेशिकता

ग्रामीणता व प्रादेशिकता या दोन्ही संकल्पना वेगवेगळया आहेत. त्यामध्ये काही अंशी साम्य असले तरी महत्त्वाचे वेगळेपण म्हणजे प्रादेशिक साहित्यामध्ये समूह केंद्रस्थानी असतो तसे ग्रामीण साहित्यामध्ये होत नाही. प्रादेशिक साहित्य हे प्रदेशाविशिष्ट असते. माणदेश हा कोणताही देश नाही तर सातारा, सांगली व सोलापूर जिल्ह्यातील माण नदीकाठचा हा दुष्काळी प्रदेश होय. तेथील संस्कृती ही माणदेशी संस्कृती म्हणून ओळखली जाते. ग्रामीण व्यवसाय व ग्रामसंस्था यातून ग्रामीण जीवन नियत झालेले असते. तसे प्रदेशाच्या बाबतीत होत नाही. ग्रामीण जीवन मुख्यत्वे शेतीने बांधलेले असते. तर प्रदेशाचा विचार करता शेतीबरोबरच इतर व्यवसाय व त्यांच्या म्हणून एक चालीरिती आपणास पहावयास मिळतात. त्यामुळे ग्रामीण व प्रादेशिक साहित्य हे वेगवेगळे ठरते.

## ❑ ग्रामीण साहित्याची चळवळ

महात्मा फुले यांच्या काळापासून ग्रामीण साहित्य लिहिले जात होते. या काळात वेगळया साहित्याची दखल घेतली गेली नसली तरी १९२० नंतर ग्रामीण साहित्याची दखल बऱ्यापैकी घेतली गेली. सदाशिव पेठी वातावरण, तिथली भाषा याचा वाचक-रसिकांना कंटाळा आला होता. धुम्रपानाच्या वलयात, मद्याचे घुटके घेत असलेल्या मध्यमवर्गीयांची चित्रणे वाचून रसिकांना उंबग आला होता. त्याच काळात ग्रामीण भागाकडे लक्ष देण्याची गरज महात्मा गांधीजीनी पटवून दिली त्यावेळी ग्रामीण भागाकडे लेखकांचे लक्ष वळले जावू लागले. परंतु खऱ्या अर्थाने १९७० नंतर ग्रामीण साहित्याच्या चळवळीची भाषा सुरू झाली. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, १९७० नंतर एकूण मराठी साहित्य ग्रामीण चळवळींच्या, ग्रामीण साहित्याच्या बाबतीत प्रतिकूल अभिप्राय नोंदवले जाऊ लागले. प्रकट-अप्रकटपणे या साहित्यचळवळींच्या विरोधी सूर लावू लागला.

१९७० पूर्वी ग्रामीण साहित्य व इतर साहित्यामध्ये फारसे अंतर नव्हते. प्रयोगशीलता, मनोविश्लेषण यातून काही साहित्य लोकांच्या नजरेत भरत होते. लेखनाचे संकेत व प्रस्थापित अभिरूची यांचे संबध परस्परपूरक होते. १९६० नंतर या प्रस्थापित अभिरूची यांचे संबंध परस्परपूरक होते. १९६० नंतर या प्रस्थापित अभिरूचीशी एक प्रकारचा संघर्ष सुरू झाला. स्वातंत्र्यानंतर जी ग्रामीण भागातील पिढी लिहू लागली होती तिला वरवर लिहिल्या गेलेल्या साहित्याचा तिटकारा येऊ लागला आपण कुठे आहोत. आपला गाव कुठे आहे. आपला संघर्ष आपले जगणे हे कुठे आहे हे शोधण्याचा त्यांनी प्रयत्न सुरू केला

आणि वास्तवाची/अनुभवाची प्रतिकृती ग्रामीण साहित्यात उमटली आणि ग्रामीण साहित्याची चळवळ जोर धरू लागली.

## ❑ दलित साहित्याची चळवळ

दलित साहित्याच्या प्रवाहालाच नवे नामाधिमान लाभले आहे ते म्हणजे फुले–आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य हे होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने, कार्याने प्रेरित झालेल्या, जागृत होऊन शिक्षित बनलेल्या नवतरूणांनी नवजाणिवा आणि मानवी मूल्ये यांचे संवर्धन करण्यासाठी आपल्या अनुभवांना शब्दांच्या रूपातून साकारले व हा दलित साहित्याचा प्रवाह सुरू झाला. स्वातंत्र्योत्तर काळातील हा प्रवाह ग्रामीण साहित्याच्याबरोबर समांतर वाटचाल करताना दिसत आहे. आशय, अभिव्यक्ती, अनुभव, भाषाशैली यांच्या वेगळेपणामुळे दलित साहित्य आकाराला आले आहे.

दलित जाणीव ही दलित साहित्याच्या केंद्रस्थानी आहे. वर्षानुवर्षे अन्याय, अत्याचार व गुलामगिरी यांच्या गर्तेत खितपत पडलेल्या समाजाला डॉ. आंबेडकरांनी नवसंजीवनी दिली. पिढ्यान्पिढ्या पाण्यापासून, शिक्षणापासून वंचित असलेल्या गुलामांना त्यांच्या गुलामगिरीची जाणीव करून दिली त्यामुळे सर्वार्थाने दलित ठरवलेल्या माणसांचे वेदनादायी चित्रण शब्दबद्ध झाले.

## ❑ उदय व वाटचाल

६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ.आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. रिपब्लिकन पक्षाने डॉ. आंबेडकरांच्या पश्चात या चळवळीचे उत्तरदायित्व स्वीकारले. शेडयुल्ड कास्ट फेडरेशन बरखास्त करून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या नावाचा पक्ष स्थापन झाला. दरम्यानच्या काळात गंगाधर पानतावणे यांचे अस्मितादर्श हे त्रैमासिक सुरू होते. त्यामुळे त्या मासिकांने दलित साहित्यिकांना एक चांगले न्यायपीठ मिळवून दिले. 'आम्ही विद्रोही' यासारखी मासिके जोमाने पुढे आली. ९ जुलै १९७२ मध्ये दलित पँथर चा उदय झाला व दलितांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी ही क्रांतिकारी संघटना उभी ठाकली. संघटना बांधणी, मोर्चे, आंदोलने यावर भर दिला गेला. दलित पँथर, बौध्द तत्व प्रणालीनुसार चालविली पाहिजे व साम्यवादापासून दूर राहिले पाहिजे ही राजा ढाले यांची भूमिका तर ढसाळांची मार्क्सवादी भूमिका यातून आंबेडकरवाद व मार्क्सवाद असा वाद उत्पन्न झाला.

या साऱ्याचा परिणाम दलित साहित्याच्या चळवळीवर आपणास स्पष्टपणे दिसून येतो. साहित्य हे समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. प्रचलित साहित्य निर्माण करणे हे डॉ. आंबेडकरांना मान्य नव्हते. त्यामुळे २ मे १९५४ रोजी विदर्भ साहित्य संघापुढे त्यांनी ''उदात्त जीवनमूल्ये आणि सांस्कृतिक मूल्ये आपल्या साहित्यातून आविष्कृत करा. आपले यश आकुंचित, मर्यादित ठेवू नका, तिचं तेज

खेडयापाडयातील अंधार दूर होईल असं परावर्तित करा. आपल्या देशात उपेक्षितांचे, दलितांचे दु:खितांचे फार मोठे जग आहे हे विसरू नका. त्यांचे दु:ख व्यथा नीट समजावून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांचे जीवन उन्नत करण्यास झटा, त्यातच खरी मानवता आहे'' हा संदेश दिला. यातूनच पुढे दलित साहित्याने डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा सार प्रवर्तित केला. डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेतून १५ ऑगस्ट १९४९ रोजी दलित साहित्य सेवक संघाची स्थापना झाली होती तिला पाठबळ मिळाले.

दलित साहित्याची प्रेरणा ही फुले, शाहू, आंबेडकर यांचीच आहे. चातुर्वण्य व्यवस्थेने नाडलेला प्रत्येक मानव हा दलित आहे. वेदना, विद्रोह, नकार, मानवतावाद, विज्ञाननिष्ठा यावर दलित साहित्याची चळवळ उभी असलेली दिसते.

## ❑ स्त्रीवादी साहित्य चळवळ :–

कोणतीही स्त्री ही स्त्री म्हणून जन्माला येत नाही. तिला बाई म्हणून तयार केल जातं, हे सिमॉन द बोव्हा यांनी सांगितलेलं विदारक सत्य हे स्त्रीवादी साहित्याच्या चळवळीचे प्रेरणास्थान व केंद्रस्थान आहे. वर्षानुवर्षे स्त्री ही माणूस नाही हेच इथल्या समाज परंपरेने दाखवून दिले आहे. **'यत्र नार्यस्तु पुज्यन्ते तत्र रमन्ते देवत:'** या संस्कृत सुभाषिताने स्त्रीची पूजा करायला सांगितले तर **'पिता रक्षति कौमार्ये, भ्राता रक्षान्ति यौवने, रक्षान्ति स्थाविरे पूत्र: न स्त्री स्वातंत्र्यमर्हती'** हे मनूने सांगितले. त्यामुळे एकतर स्त्री ही देवी आहे. आदिशक्ती आहे. नसेल तर ती गुलाम आहे. दासी आहे असेच भासविले गेले.

साठोत्तरी मराठी वाङ्मयामध्ये विविध साहित्यप्रवाह उदयास आले. यामध्ये ग्रामीण, दलित, आदिवासी, भटक्या विमुक्त, स्त्रीवादी अशा विविध प्रवाहांचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो. स्त्रीवाद हा पाश्चात्य देशांकडून आलेला प्रवाह आहे. स्त्रियांच्या समस्यांचा विचार करणारी ही चळवळ असून स्त्री ही तिच्या केंद्रस्थानी आहे. एकूण सर्वच जाती धर्मामध्ये स्त्रीला दुय्यम तत्त्वाची वागणूक दिली गेली. केवळ चूल आणि मूल हेच तिचे जीवनकर्तव्य असून ७ च्या आत घरात आले पाहिजे कारण स्त्री ही काचेचे भांडे आहे. त्यामुळे तिने तिच्या शीलाचे रक्षण केले पाहिजे हा पोकळ सांस्कृतिकवाद स्त्रीच्या मनावर ठसवला गेला. आर्थिक शोषण, शारीरिक शोषण, मानसिक शोषण अशा विविध शोषणाला व अत्याचाराला बळी पडलेली स्त्री ही आधुनिक समीक्षापद्धतीमध्ये पर्यावरणीय स्त्रीवाद या नावाने मूळ धरू लागली आहे. तौलनिक साहित्याच्या अभ्यासाने विविध भाषांमधील अशा विविध स्त्रीवादी चळवळी व वाङ्मय यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

स्त्रीचे माणूस म्हणून जगणे, त्याच्या आड येणारे पुरूषी वर्चस्व, विवाहसंस्थेमुळे स्त्री स्वातंत्र्यावर येणारी बंधने, या बंधनावर स्त्रीने केलेली मात याचा विचार स्त्रीवादी साहित्यामध्ये केलेला आहे.

स्त्रीवादी चळवळीचा उगम स्त्रीमुक्ती चळवळी व स्त्रीवादी प्रणालीतून झालेला आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रीला स्वतंत्र स्थान मिळावे ही स्त्रीवादाची महत्त्वाची सूत्रे आहेत. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळाला, मतदानाचा अधिकार मिळाला, राजकीय क्षेत्रात आरक्षण मिळाले, नोकरीत आरक्षण मिळाले हे सर्व फलीत आहे. पुरूषसत्ताक व्यवस्थेला नकार देत ही चळवळ उभी असल्याचे दिसते. स्त्रीवादी विचारांची बीजे या चळवळीने ब्रिटीश लेखिका व्हर्जिनिया वुल्फ यांच्याकडून स्वीकारली आहेत.

स्त्रीवादी विचारसरणी स्त्री-पुरूष समानतेचा आग्रह धरते. पारंपरिक रूढ संकेतांना नकार देते. स्त्रीचा माणूस म्हणून विचार करणारी, लादलेले स्त्रीपण झुंगारणारी, मानसिक व बौध्दिक विकास साधणारी स्वत:चे स्वत्व गवसलेली अशी ही चळवळ असून त्याचे काही प्रवाह ही आपणास दिसतात. १) अँग्लो अमेरिकन स्त्रीवाद, २) फ्रेंच स्त्रीवाद, ३) कृष्णवर्णी यांचा स्त्रीवाद. याबरोबर हालमतवादी स्त्रीवाद, उदारमतवादी स्त्रीवाद, समाजवादी स्त्रीवाद, मार्क्सवादी स्त्रीवाद अशा काही क्रांतिकारी स्त्रीवादी चळवळीचे स्वरूप आपणास अभ्यासता येते. स्त्रीवादी साहित्याच्या अभ्यासक डॉ. मंगला वरखेडे यांनी 'स्त्रीवादी समीक्षा : संकल्पना आणि उपयोजन' या ग्रंथात- १) जहाल स्त्रीवाद २) मवाळ स्त्रीवाद ३) मूलतत्ववादी स्त्रीवाद ४) पर्यावरणवादी स्त्रीवाद ५) कृष्णवर्णीय स्त्रीवाद असे पाच प्रवाह सांगितले आहेत. तर वसंत आबाजी डहाके यांनी समाज स्त्रीवादी, चिन्हार्थ स्त्रीवादी, मानस स्त्रीवादी, मार्क्सवादी, ब्लॅक स्त्रीवाद आणि प्रतिसाद, भाषण, कृती, विरचनावादी, युंगवादी प्राक्कथनात्मक, वसाहतवादविरोधी, उत्तरसंरचनावादी, प्रति-स्त्रीवादी असे सात प्रवाह सांगितले आहेत. या सर्वांचा अभ्यास तौलनिक साहित्याच्या अभ्यासाने अधिक चांगल्या प्रकारे करता येऊ शकतो.

## ❑ भटक्या विमुक्तांची चळवळ :-

समाजव्यवस्थेच्या घुसळणीतून साहित्यव्यवहार ही घुसळून निघतो त्यामुळे समाजाच्या स्तरानुसार साहित्याचेही विविध प्रकार व प्रवाह जन्माला येतात. भटक्या विमुक्तांच्या साहित्याची चळवळ ही त्यापैकीच एक होय. साठोत्तरी मराठी कालखंडातील काही प्रवाह ठळकपणे आपल्या नजरेत भरतात. त्यापैकी भटक्या विमुक्तांचा साहित्यप्रवाह हाही होय. आज भारत देश राजकीय दृष्टिकोनातून एक दिसत असला तरी धार्मिकदृष्टया अजूनही तो एकसंघ नाही. तसेच जाती दृष्ट्याही तो एकसंध नाही. आम्ही सारे भारतीय आहोत. एकमेकांचे भाऊ आहोत असे म्हणायचे आणि प्रत्यक्ष जात धर्म, भाषा, प्रांत, प्रदेश पाणी यावर भांडण करायचे हा इथला शिरस्ता आहे. वैचित्र्यपूर्ण मानवी समूहाबद्दल सर्वांना आकर्षण असते. त्यामुळे इंग्रज अभ्यासक मोक्सवर्थ केनेडी, इंथोवेन इत्यादींनी अशा जाती-जमातींचा अभ्यास केला. भारतीय अभ्यासक लोकहितवादी, चिं. ना. अत्रे, गो. मं. कालेलकर, भा. दि. फडके, रामनाथ चव्हाण, लक्ष्मण माने यांचा उल्लेख करावा लागतो.

भटक्या विमुक्त जमाती यात तीन शब्द आहेत. भटका म्हणजे भटकत राहणारा अस्थिर असणारा, विमुक्त म्हणजे मोकळा असलेला बंधन नसणारा तर जमाती म्हणजे त्यांचा समुदाय होय. यांना गुन्हेगार म्हणून संबोधले गेले. काळाच्या ओघात बऱ्याच जमाती या समाजामध्ये स्थिर झाल्या. काही प्रयत्न करत आहेत. पण फासेपारधी जमातीसारखी जमात अजूनही स्थिरावली नाही. त्यामुळे त्यांची भाषा त्यांचे साहित्य यावर अजून म्हणावे तसे संशोधन होऊ शकलेले नाही. महाराष्ट्रामध्ये गावगाड्यांशी संबंधित त्यांचे जीवन नसते. कायम भटकंती हेच जीवन असून त्यांच्यावर गुन्हेगार म्हणून शिक्का मारलेला दिसून येतो. त्यांच्यामध्ये जातपंचायतीला कायद्यापेक्षा महत्त्व आहे. त्यांच्या जातपंचायतीचे वर्चस्व आजही कमी झालेले नाही. भटक्या विमुक्तातील जाती, पोटजाती, रूढी, परंपरा, काम, पालातले जीवन या सर्वांचे चित्रण भटक्या विमुक्तांच्या साहित्यातून येते.

भटक्या विमुक्तांची चळवळ ही संकल्पना फारशी रूजलेली नसली तरी आता मात्र ही चळवळ फोफावताना दिसत आहे. अस्तित्वासाठी असलेला संघर्ष, जातपंचायतीविरूध्द आवाज, भटक्या प्रवृत्तींविरूध्द प्रचार, गुन्हेगारी शिक्का पुसण्यासाठीची धडपड, उच्चनीचतेच्या संकल्पनांना फाटा, परंपरेला नकार व स्वत:च्या प्रश्नांचा व त्यावरील उत्तराचा शोध यातून ही चळवळ उभी राहिली आहे. तौलनिक साहित्याच्या अभ्यासातून अधिक चांगल्या प्रकारे विविध भाषिक साहित्याच्या अभ्यासातून आपणास ह्या चळवळी पाहता येतील.

## ❑ आदिवासी साहित्याची चळवळ :-

आपल्या वैशिष्टयपूर्ण जीवनशैली, बोलीभाषा, रूढी, परंपरा, आचार-विचार, पोशाख व निसर्गाची असलेली जवळीक यामुळे आदिवासी समाज हा वेगळा म्हणून ओळखला जातो. साठोत्तरी परिवर्तनाच्या कालखंडात आदिवासी लोकांचे जीवनचित्रण करणारे साहित्य निर्माण होऊ लागले त्यालाच पुढे आदिवासी साहित्याची चळवळ म्हणून ओळखले जाऊ लागले. आदिवासी संस्कृती, जीवन व्यवहार, दु:खीपणाचे भावविश्व, वेदना, विद्रोह, नकार या भावनेतून हा समाज स्वत:चे जगणे साहित्यातून मांडू लागला. खरेतर हे सर्व मूलनिवासी म्हणून ओळखले जातात. नंतर आलेल्या लोकांनी म्हणजेच आर्यांनी त्यांना सुपीक भूप्रदेशातून पिटाळून लावले व आपली सत्ता प्रस्थापित केली. हे बाहेर पडलेले गिरिजन अर्थात निसर्गाच्या सानिध्यात, मूळ प्रदेशापासून दूर, डोंगर कपारीतून, प्रगतीपासून शेकडो मैल दूर गेले. परिवर्तनाच्या या कालखंडात आपल्या वाटयाला आलेल्या संघर्षाचे चित्रण करू लागले. मधुकर वाकोडे यांची 'झेलझपाट' ही कादंबरी त्या दृष्टीने उल्लेखनीय ठरते. आदिवासी साहित्य हे वनसंस्कृतीचे बिरसामुंडा, तंटा भिल्ल यांच्या क्रांतिकारक चळवळीचे संघर्षाचे गीत आहे. आदिमातेच्या संवेदनाचा हुंकार म्हणजे स्वत:चा बचाव करणारे आदिवासी आज आधुनिक बुभूक्षित व लुटारू नक्षल्यांच्या कचाटयात सापडले आहेत. त्याचेही चित्रण त्यांच्या साहित्यातून येताना दिसते.

निसर्गाशी तादात्म्य पावलेला, स्वच्छंदी, व स्वतंत्र वृत्तीचा आणि आधुनिक जगाच्या संपर्कामुळे भ्रष्ट न झालेला समाज म्हणजे आदिवासी होय असे आदिवासी संस्कृतीचे अभ्यासक डी. एन. मुजुमदार म्हणतात, आदिवासी म्हणजे समान नाव धारण करणाऱ्या एका विशिष्ट भूप्रदेशावर निवास करणाऱ्या, एकाच प्रकारची भाषा बोलणाऱ्या विवाह, व्यवसाय या बाबतीत समाजन निषेध नियमाचे पालन करणाऱ्या व निश्चित अशा काही मूल्यांची विचारांची जोपासना करणाऱ्या कुटुंबाचा समूह होय. भिन्नभाषिक साहित्याच्या तौलनिक अभ्यासाने अधिक चांगल्या प्रकारे आदिवासी साहित्याचा अभ्यास करता येऊ शकतो.

प्राचीन आदिवासी राज्ये, त्यांचे राजे, त्यांचा इतिहास इत्यादींचा आदिवासी लोकांना अभिमान आहे. भारतीय स्वातंत्र्य लढयातील बिरसा मुंडा, तंटा भिल्ल यांचा पराक्रम त्यांच्या वैभवाची साक्ष आहे. बाबा आयाम, व्यंकटेश अत्राम, नेताजी राजगडकर, ठक्कर बाप्पा हे सामाजिक नेतृत्व व आदिवासी लोकसंस्कृतीची मूल्ये यांना प्रेरणा मानून आदिवासी लोकसंस्कृतीची मूल्ये यांना प्रेरणा मानून आदिवासी जीवन जगत आहेत. फुले, शाहू, आंबेडकर यांचे समाजवादी विचार हे आदिवासी साहित्य चळवळीचे मूळ प्रेरणास्रोत आहे. १९६० नंतर आदिवासी वाडया-वस्त्या शिक्षित होऊ लागल्या. नागरी जीवनाशी त्यांचा संबध येऊ लागला. संविधानिक आरक्षणामुळे जगण्याचा मार्ग त्यांना सापडला. १० व ११ नोव्हेंबर १९७९ साली चंद्रपूर जिल्हयातील भद्रावती येथे संमेलन भरले. आदिवासी साहित्यातून व्यक्त होण्यासाठी ती एक मोठी घटना ठरली.

आदिम संस्कृतीशी नाते, आदिम सामाजिकता आदिवासीचे होणारे शोषण, भाषाविशेष, निसर्गसानिध्यात प्रदेशविशिष्ठता असे काही आदिवासी साहित्य चळवळीचे विशेष आपणास सांगता येतील. एकूणच आदिवासी साहित्याची चळवळ मराठी साहित्यप्रांतात आज स्थिरावताना दिसत आहे.

## ❑ वाङ्मयीन कालखंडाचा अभ्यास :-

वाङ्मयीन कालखंडाच्या अभ्यासामध्ये कालखंडाचा निश्चित कालबिंदू सांगणे अवघड आहे. त्यासाठी वाङ्मयीन इतिहासाचे अभ्यासक. रा. श्री. जोग, व. दि. कुलकर्णी, म. ना. अदवंत, ग. म. जोशी, श्री. ना. बनहट्टी, गं. बा. सरदार, प्र. न. जोशी व अभ्यासकांच्या अभ्यासपूर्ण संशोधनाचा आधार द्यावा लागतो. १८०० ते १९६० या विस्तृत कालखंडाचे वाङ्मय अभ्यासकांनी १) १८०० ते १८७४, २) १८७४ ते १९२०, ३) १९२० ते १९६० असे तीन कालखंड ढोबळ मानाने केले आहेत. काही अभ्यासकांनी १८०० ते १८७४ या कालखंडाला भाषांतरयुग, १८७४ ते १९२० या कालखंडाला निबंधमालायुग तर १९२० ते १९६० या कालखंडाला सुवर्णयुग असे म्हटले आहे. प्रत्येक कालखंडाचे वेगळेपण समजून घेण्यासाठी त्या कालखंडाचे स्वतंत्र वैशिष्टय व कालखंडाचा कलाटणी देणाऱ्या साहित्यिकांचा तसेच त्यांच्या साहित्याचा आढावा घेणे क्रमप्राप्त आहे.

## ❑ वाङ्मयाचे कालखंड (१८००-१८९४) :-

महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय इ. घटकांना महत्त्वाचे स्थान आहे. सामाजिक स्थित्यंतराचा परिणाम समाजमनावर होणे हे ओघाने येते. परिणामी प्रत्येक कालखंडाचे स्वरूप, वैशिष्ट्यानुसार त्या कालखंडातील साहित्य आकार घेते. इ.स.१८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाला. व ब्रिटिशांचा एकछत्री अंमल संपूर्ण भारतावर सुरू झाला. भारतात ब्रिटिशांचे आगमन झाले ही घटना साहित्यविचारामध्ये बदल घडवणारी ठरली. पाश्चात्यांचे नवविचार, नवशिक्षण याकडे भारतातील साहित्यकारांचे लक्ष गेले. मुद्रण कलेचा शोध, इंग्रजी शाळांना महत्त्व, एल्फिन्स्टनचे उदारमतवादी धोरण, सिध्द सिध्दांत, वूडचा खलिता इ. ठळक घटनांच्या प्रभावातून महाराष्ट्रातील पहिली सुशिक्षित पिढी उदयाला आली. धर्मप्रसाराच्या हेतूने ख्रिश्चन मिशनऱ्यांनी त्यांच्या साहित्याचा मराठी अनुवाद केला साहजिकच मराठी गद्यलेखनाला चालना मिळाली, दक्षिणा प्राईजसारख्या कमिटीमुळे काव्यनिर्मितीला चालना मिळाली. शिक्षणप्रसाराच्या कार्यामुळे जगन्नाथ शंकर शेठ, म. फुले, बाळशास्त्री जांभेकर इ. सारख्या समाजसुधारकांचा जन्म झाला एकूणच नवीन वाङ्मययुगाचा पाया घालण्याचे काम भाषांतर युग किंवा तमोयुगात झाले.

### अ) भाषांतर युग वैशिष्ट्ये :-

१. शिवाजी महाराज, नाना फडणवीस यांनी छापण्याचे यंत्र महाराष्ट्रात आणले होते असे ब्रिटिशपूर्व संदर्भ आढळतात. मात्र भारतात मुद्रणकलेचा प्रसार करण्याचे श्रेय पाश्चात्यांना दयावे लागते. मराठी भाषा शिकण्यामध्ये विल्यम कॅरे, हॉल, नॉट यांनी सहभाग घेतला. चार्लस् बिल्किन्स, पंचानन चर्मकार, डॉ. कॅरे यांच्या प्रयत्नामुळे बायबल चे मराठीमध्ये भाषांतर झाले. यानंतर देवनागरी लिपीच्या माध्यमातून धर्मप्रसार करण्यासाठी अनेक पुस्तकांचे मराठी भाषांतर करण्यात आले. उदा. १) पंचोपाख्यान-१८२२ २) विदुरनीती-१८२३, ३) सिंहासनबत्तिशी-१८२४, ४) केनडीचा कोश-१८२४, ५) महाराष्ट्र भाषाचे कोश-१८२९, ६) मोल्सवर्थचा कोश-१८३१ इ. मराठीमध्ये भाषांतर झालेले साहित्य वाचल्यामुळे भारतीय लोकांमध्ये जागृती होऊ लागली म्हणून मुद्रण स्वातंत्र्यावर ब्रिटीश अधिकाऱ्यांनी अनेक बंधने घातली. इ. स. १८८२ मध्ये लॉर्ड रिपनने ती बंधने दूर केली. मुद्रणकला साहित्याच्या क्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल होऊन आली.

२. बिटिशांच्या आगमनापूर्वी भारतात आधुनिक शिक्षणाला महत्त्व नव्हते. वेद, पुराण, शास्त्राभ्यासाचे शिक्षण दिले जात होते. ब्रिटिशांच्या आगमनामुळे आधुनिक शिक्षणाचा प्रसार झाला. इ. स. १९२० मध्ये एल्फिन्स्टनच्या पुढाकारामुळे बॉल्बे नेटिव्ह स्कूल बुक अॅण्ड स्कूल सोसायटी ची स्थापना झाली. त्यामुळे शालेय विषयातील पुस्तक प्रसिध्दीला प्रोत्साहन

मिळाले. मेजर कँडीने शास्त्रशुद्ध लिखाणाचे महत्त्व पटवून दिले. दक्षिणा प्राईज कमिटीमुळे अनेक लेखक सर्वपरिचित झाले या कालखंडात डॉ. कॅरे यांच्या प्रयत्नामुळे मराठी भाषेचे व्याकरण १८०९ प्रकाशित झाले. तसेच त्यांनी पंचतंत्रे, हितोपदेश इ. पुस्तके मराठी वाचकांसाठी खुली केली.

३. ब्रिटिशांच्या आधुनिक विचारणसरणीमुळे भारतीय समाजसुधारकांनी तत्कालीन समाजव्यवस्थेमध्ये बदल करण्यासाठी अनेक पुरोगामी चळवळी उभारल्या. उदा. १) ब्राम्हो समाज-२० ऑगस्ट १८२८, २) मानवधर्म सभा-२२ जून १८४४, ३) परमहंस सभा-१८४९, ४) प्रार्थना समाज- ३१ मार्च १८६७, ५) सत्यशोधक समाज-२८ सप्टेंबर १८७३.

४. लोकजागृतीच्या चळवळींमधून पुरोगामी विचार सर्व मानवजातीपर्यंत पोहोचविण्याचे माध्यम यातून वृत्तपत्र, नियतकालिकांचा उदय झाला. मराठीतील पहिले वृत्तपत्र दर्पण इ. स. १८३२ मध्ये बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केले. त्यामुळे त्यांना मराठी वृत्तपत्राचे जनक म्हणतात. याशिवाय मुंबई अखबार, दिग्दर्शन, प्रभाकर, ज्ञानप्रकाश, सुबोधपत्रिका, प्रबोधन चळवळी बरोबर साहित्यचळवळींमध्ये महत्त्वाचे स्थान मिळाले आहे.

५. भाषांतराच्या काळात ज्ञानप्रसार जलद गतीने करण्याच्या हेतुने विविध पुस्तकांचे भाषांतर झाले. त्यामुळे या कालखंडात लालित्यपूर्ण साहित्याची उणीव आहे.

६. लोकांना अक्षरज्ञान व्हावे, त्यांना वाचनाची गोडी लागावी, त्यांना कमी वेळेत अनेक विषयांचा परिचय व्हावा यासाठी अनुकरणाचा साहित्यनिर्मिती झाली. व्यक्तिच्या अंगच्या गुणांना भाषांतरामध्ये वाव मिळाला नाही.

७. मराठी भाषेच्या अभ्यासाकडे विशेष लक्ष देणारा हा कालखंड व्याकरण, कोश यांची देणगी देतो.

८. न्यायमूर्ती रानडे यांच्या मते, हा कालखंड गुणवत्तेच्या दृष्टीने तेवढा समाधानकारक वाटत नाही. तथापि याच कालखंडात प्रांतातील इतर भाषांच्या तुलनेने मराठी भाषेने केलेली प्रगती विस्मयावह आहे आणि अपेक्षापूर्तीपेक्षा अपेक्षानिर्मिती दृष्टीने हा कालखंड महत्त्वाचा आहे.

९. एकूणच निबंधकार चिपळूणकर, कादंबरीकार ह. ना. आपटे, कवी केशवसुत, नाटककार गो. ब. देवल यांच्यासारख्या अनेक लेखकांच्या पूर्वतयारीचा हा कालखंड होता.

## ब) १८७४ ते १९२० :-

भाषांतराच्या कालखंडानंतर इ. स. १८७४ मध्ये विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेने वैचारिक विचारांच्या माध्यमातून भाषाविषयक विविध विषयांची उकल केली. चिपळूणकरांच्या परखड

वाढीने भाषांतराचे जोखड फेकून दिले हा कालखंड जागृत पिढीचा होता. सुशिक्षित पिढीने ठोसपणे आपले विचार व्यक्त करायला सुरूवात केली. लेख, निबंध, लघुनिबंध, ललित लेख इ. मधून नवनवीन वैचारिक विषयाचा प्रचार झाला. पाश्चात्यांच्या निबंधवाङ्मयाचा परिणाम म्हणजे मराठीतील दर्जेदार निबंधलेखन होय.

## ☼ वैशिष्ट्ये :-

१. प्रस्तुत कालखंडात गोपाळराव हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांची शतपत्रे धर्मविचार, स्त्री-पुरूष समाजात, ब्राम्हणविरोधी, अर्थविषयक विचारांमुळे नावारूपाला आली. लोकहितवादींची १०८ शतपत्रे, प्रभाकर वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाली. आपले विचार निर्भिडपणे मांडणाऱ्या लोकहितवादींना आद्य निबंधकार संबोधले जाते.

२. या कालखंडात म. फुले यांचे कसदार लेखन मराठी साहित्यामधून समोर आले. 'तृतीयरत्न', 'शेतकऱ्यांचा आसूड', 'गुलामगिरी', 'सार्वजनिक सत्यधर्म', 'अखंड' इ. सारखी ग्रंथसपदा आजही संशोधनाचा विषय म्हणून ओळखली जात आहे.

३. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेमुळे कालखंडाला उठावदारपणा आला. चिपळूणकरांनी निबंधमालेतून इतिहास, भाषा, भाषांतर, असल्या देशाची स्थिती, मराठी भाषेची स्थिती, लेखनशुद्धी इ. विषयांवर प्रभावी विचार व्यक्त केले आहेत. यातून त्यांची भाषाविषयक मते व्यक्त होतात.

४. या कालखंडात बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, बापू छत्रे, दादोबा पांडुरंग तर्खडकर, गो. ना. मांडगावकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर यांच्यासारख्या निबंधकारांनी नाविन्यपूर्ण विषयांना लेखनातून खुले केले.

५. लो. टिळक, गो. ग. आगरकर, शि. म. परांजपे, न. चिं. केळकर या साहित्यिकांनी परखड, प्रगतशील विचारांचे बहुमोल योगदान मराठी निबंधवाङ्मयाला दिले आहे.

६. काळकर्ते शि. म. परांजपे यांनी आपल्या रसपूर्ण लेखनातून विनोद, उपहासाच्या माध्यमातून स्वकीय, परकीय, काल्पनिक, काव्यात्मक, इ.चा मेळ घातला.

७. अ. ब. कोल्हटकरांच्या संदेश वृत्तपत्राने मोठ्या अक्षरांचे मथळे देण्याची प्रथा सुरू केली. हे या कालखंडाचे महत्त्वाचे वैशिष्टय म्हणता येईल.

८. केसरी, सुधारक, विविध ज्ञानविस्तार इ. नियतकालिकांनी अनेक निबंध लेखन, ग्रंथसंपदा यांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

## क) १९२० ते १९६० :-

हा कालखंड राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा आहे. इ. स. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांचे युग संपून गांधीजींचे युग सुरू झाले. म. गांधीजींनी सत्याग्रह, अहिंसा, असहकारसारख्या चळवळींची सुरूवात केली. याचा जनमनावर प्रभाव पडला. समाजातील घटनांचे पडसाद साहित्यातून शब्दबध्द होतात. त्यामुळे या कालखंडातील लेखकांच्या साहित्यकृतींवर असणारा गांधीयुगाचा प्रभाव असण्यासाठी तौलनिक पध्दतीचा उपयोग होतो. ह. ना. आपटे, केशवसुत, गो. ब. देवल, बालकवी, रा. ग. गडकरी इ. ज्येष्ठ लेखकांची पिढी १९२० पर्यंत पडद्याआड गेली होती आणि १९२० नंतर शि. म. परांजपे, श्री. कृ. कोल्हटकर, न. चिं. केळकर, वि. सी. गुर्जर या नव्या पिढीने राजकीय, सामाजिक यासारख्या घटनांना लालित्यपूर्ण आकार दिला होता. १९४५ चे दुसरे महायुध्द, १९४७ चे भारत स्वातंत्र्य या महत्त्वाच्या घटनांचा साहित्याबरोबर सर्व घटकांवर परिणाम झाला.

### ☼ वैशिष्ट्ये :-

१. १८९० ते १९१७ या करमणूक कालखंडातील हरिभाऊंच्या कथा मध्यमवर्गीयांच्या जीवनावर आधारित होत्या. हरिभाऊ आपटे यांनी दैनंदिन लोकांचे जीवन कथेमधून वाचकांसमोर उघड केले. वाचकांची करमणूक करणाऱ्या 'काळ तर मोठा कठीण आला', 'कसे दिवस गेले', 'तपकिरीने वाचवले', 'थट्टा की धडा' अशा विनोदी, कौटुंबिक कथांचा पायंडा हरिभाऊंनी पाडला.

२. हरिभाऊंच्या कथेनंतर वि. सी. गुर्जर यांच्या 'द्राक्षांचा घोस' (१९२५) हा कथासंग्रह प्रसिध्द झाला. रंजक, रहस्यमय, सुरूवात व शेवटी कलाटणी देणारी कथा असे या कालखंडाचे वैशिष्ट्य आहे.

३. १८९५-१९३५ या मनोरंजन कालखंडामधून का. र. मित्र, वि. सी. गुर्जर, श्री. कृ. कोल्हटकर, वा. म. जोशी, वा. गो. आपटे, चि. वि. जोशी, वा. ना. देशपांडे इत्यादी लेखकांनी 'मनोरंजन' या मासिकातून लेखन केले आहे.

४. मनोरंजन कालखंडात स्त्री-विषयक दृष्टिकोन बदलू लागला होता. 'मनोरंजन' मासिकाचे 'यत्र नार्यस्तु पुज्यन्ते रमन्ते तत्र देवता' हे ब्रीदवाक्य होते. हा कालखंड सुधारणावादी विचारांचा होता. स्त्री-शिक्षण, स्त्री-वाङ्मय, स्त्री-सुधारणा याकडे विशेष लक्ष दिले जात होते.

५. फक्त भाषांतर करण्यापेक्षा गुणात्मक, मनोरंजनात्मक लेखन करण्याकडे लेखकांचा कल होता.

६. आनंदीबाई शिर्के यांनी स्त्रियांचे विविध प्रश्न कथेतून चित्रित केले.

७. १९२५ ते १९४६ हा कालखंड फडके-खांडेकरांच्या सुरस रेखीव, काव्यात्मक, आदर्श, कथातंत्राचा होता. फडकेंनी आकर्षक भाषेमधून लेखन तंत्रशास्त्राला महत्त्व दिले. वि. स. खांडेकरांनी 'रूपककथा' मराठीमध्ये आणल्या.

८. यशवंत किर्लोस्कर (इ.स. १९२६-१९४५) कालखंडात य. गो. जोशी यांच्या 'शेवग्याच्या शेंगा' हा कथासंग्रह विशेष गाजला. कौटुंबिक जीवनाचे वेगळेपण तात्त्विक व चिंतनशील स्वानुभवावर आधारित कथा य. ग. जोशी यांनी मराठीमध्ये आणल्या. याशिवाय वि. वि. बोकील, अनंत काणेकर यांनी दर्जेदार लेखन केले.

९. प्रस्तुत कालखंडातील स्त्रीची दु:खे बंडखोरपणे मांडण्यासाठी विभावरी शिरूरकर (बाळूताई खरे) यांनी 'कळ्यांचे निश्वास' (१९३३) हा कथासंग्रह लिहिला. विभावरी शिरूरकर यांनी रूढ, प्रचलित लेखन विषयांना छेद दिला आणि प्रौढ कुमारिका, लग्नाचे वाढते वय, संमती विरोधी लग्न, कुमारिकेची दु:खे यांसारखे विषय सहजसुंदर भाषेमध्ये मांडले. याच कालखंडात कमलाताई टिळक, मालतीबाई दांडेकर यांनी लेखन केले.

१०. र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ (कडू साखर), कुसुमावती देशपांडे, वामन चोरघडे, वि. वि. जोशी (वायफळचा मळा), प्र. के. अत्रे या लेखकांनी कथासाहित्यामध्ये भर घातली आहे. १९४५ नंतर नवकथा उदयाला आली.

११. १९२० ते १९६० या कालखंडामध्ये कथेबरोबर कादंबरी, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र असे साहित्य प्रकार उभारी घेत होते. वा. म. जोशी, श्री. व्यं. केतकर, ना. सी. फडके, वि. दा. सावरकर, ग. त्र्यं. माडखोलकर, भा. वि. वरेरकर तसेच ग्रामीण कादंबरीमध्ये र. वा. दिघे, श्री. ना. पेंडसे, व्यंकटेश माडगूळकर यांनी प्रसंग वर्णन, ग्रामीण वास्तव चित्रण केले आहे.

१२. भा. वि. वरेरकर, प्र. के. अत्रे, मो. ग. रांगणेकर, वि. दा. सावरकर, वि. वा. शिरवाडकर, वसंत कानेटकर, पु. ल. देशपांडे, विजय तेंडूलकर यांच्या नाट्यलेखनाबरोबरच कवितेमध्ये भा. रा. तांबे, माधव ज्युलियन, य. दि. पेंढारकर, शं. के. कानेटकर यांनी उत्कृष्ट लेखन केले आहे.

१३. एकूणच भाषांतराच्या कालखंडापासून मराठी साहित्याचा प्रवास लक्षात घेता लेखनामध्ये आशय, विषय, तंत्र इ.मध्ये लक्षात येण्यासारखा बदल दिसून येतो. साहित्य लेखनामधील हे स्थित्यंतर 'तुलनेच्या' साहाय्याने अभ्यासले जाऊ शकते.

## ड) १९६० नंतर :-

१९२० ते १९६० या चाळीस वर्षाच्या काळात महाराष्ट्रात राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक दृष्ट्या बरेच बदल झाले, या बदलाचा परिणाम १९६० नंतरही ओसरला नाही. राजकीय, सामाजिक चळवळी शिक्षणाचा प्रसार यामुळे विखुरलेले जग जवळ आहे व लोकांमध्ये वैचारिक देवाण घेवाण मोठ्या प्रमाणात सुरू झाली. १९४७ ते १९६० या नेहरू युगाच्या कालखंडात स्वतंत्र भारताला अनेक समस्यांना सामना करावा लागला.

### ☼ वैशिष्ट्ये :-

१. १९६० नंतरच्या कथा साहित्याचा विचार करता सत्यकथा, अभिरूची कालखंडात जी. ए. कुलकर्णी यांचे निळा सावळा, पारवा, हिरवे, रावे, पिंगळा, वेळ हे कथासंग्रह अस्तित्ववादी विचार घेऊन साहित्यामध्ये अवतरले. या कालखंडात दिलीप चित्रे, ज्ञानेश्वर नाडकर्णी, तारा वनारसे, जयवंत दळवी, विजय राजाध्यक्ष इ. लेखकांनी मराठी साहित्याला हातभार लावला.

२. १९६० नंतरच्या कादंबरीमध्ये नव्या जाणिवा दिसू लागल्या. अस्तित्ववाद, ज्ञानवाद, स्त्रीवाद, ग्रामीण, ऐतिहासिक, दलित इ. वाङ्मय प्रकार लेखकांनी समृध्द केले. ना. सी. फडके, अण्णाभाऊ साठे, रणजित देसाई, उध्दव शेळके, शंकर पाटील, शंकरराव खरात, बाबूराव बागुल, वि. स. खांडेकर, गो. नी. दांडेकर, भालचंद्र नेमाडे इ. लेखकांनी या कालखंडात नवनवीन प्रयोग केले.

३. अर्थमूल्य, भ्रमनिरास, अस्तित्वाचा शोध, वास्तवपूर्ण लेखन, मनोविश्लेषणाला महत्त्व, वासनेचे प्रत्यक्ष चित्रण, विकृत मानवी स्वभाव या वैशिष्टयांचा परिपाक म्हणजे १९६० नंतरचा कालखंड होय.

४. १९६० नंतर अनेक प्रवाहातून नाटयलेखन झाले. पाश्चत्य रंगभूतीच्या पार्श्वभूमीवर लेखनामध्ये संगीत नाटक, रूपांतरीत नाटक, लोकनाटये, वास्तवावादी , मनोविश्लेषणात्मक नाटके, मराठीमध्ये अवतरली. अनेक नाटककारांच्या डोळस दृष्टीमुळे १९६० नंतर रंगभूमीवर व्यापक नाटयविषय आले.

५. नाटयलेखनाबरोबर कवितेमध्ये विं. दा. करंदीकर, मंगेश पाडगावकर, वसंत बापट, पु. शि. रेगे, आरती प्रभू, कवी ग्रेस, ना. धों. महानोर, नारायण सुर्वे, दया पवार, नामदेव ढसाळ इ. लेखकांनी प्रेम, निसर्ग, वेदना, विद्रोह, स्त्रीकेंद्री कविता लिहिल्या आहेत.

६. एकूणच साहित्यामध्ये निसर्ग, वास्तव, ऐतिहासिक, चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथन त्यांना चांगले दिवस आले.

## ४.३ समारोप/सारांश

या सर्व कालखंडाचा व वैशिष्ट्यांचा विचार करता भारतीय साहित्यविश्वामध्ये सर्व वाङ्मय प्रकार एकाचवेळी एकसमान उदयाला आलेले नाहीत. तौलनिक साहित्याचा अभ्यास करत असताना विविध भाषिक साहित्यामध्ये हे वाङ्मयप्रकार कसेकसे बदलत गेले, त्याच्यावर कोणत्या गोष्टींचा प्रभाव पडला आहे, त्याची वेगळी वैशिष्ट्ये कोणती आहेत. या सर्व गोष्टींचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. एखाद्या वाङ्मय प्रकाराचा किंवा वाङ्मय प्रवाहाचा उद्‌गम, विकास, ऱ्हास कसकसा होत गेला हे तौलनिक साहित्याभ्यासाने अधिक चांगल्या प्रकारे अभ्यासता येऊ शकेल.

## ४.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. **द्वैभाषिक** : दोन भाषा.

२. **साम्यशोधन** : दोन कलाकृतींची साम्यता शोधणे.

## ४.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

### ❑ योग्य पर्याय निवडा.

१. चांगल्या युरोपियन ग्रंथालयातील अलमारीत जेवढे ज्ञानभांडार असेल तेवढे पौर्वात्याच्या संपूर्ण साहित्यात नाही असे कोणी म्हटले आहे?

*(अ) नॉथ्रॉप फ्राय* *(ब) विल्यम शेक्सपिअर*

*(क) लॉर्ड मेकॉले* *(ड) लॉर्ड बेंटिक.*

२. साहित्य प्रकार संकल्पनेला कोणत्या पाश्चात्य सौंदर्यमीमांसकाने तात्त्विक विरोध केला आहे?

*(अ) कांट व क्रोचे* *(ब) लॉर्ड मेकॉले* *(क) ॲरिस्टॉटल* *(ड) फ्रॉइड.*

३. मिथ्य रचनालक्ष्यी भेद, प्रस्तुतीकरण लक्ष्यी भेद, नायकलक्ष्यी भेद असा भेद कोणी केला आहे?

*(अ) नॉथ्रॉप फ्राय* *(ब) विल्यम शेक्सपिअर*

*(क) कांट व क्रोचे* *(ड) लॉर्ड मेकॉले.*

४. 'साहित्य सिद्धांत' या पुस्तकामध्ये प्रत्येक संस्कृतीचे स्वत:चे खास साहित्य प्रकार असतात, असे कोणी म्हटले आहे?

*(अ) रेने वेलेक* *(ब) कांट* *(क) क्रोचे* *(ड) नॉथ्रॉप फ्राय.*

५. आशयसूत्रास इंग्रजीत काय म्हटले जाते?

*(अ) Subject (ब) Plot (क) Charactor (ड) Theme.*

६. ................. यांनी नाटक, कथा व गीत असे तीनच मूलभूत प्रकार मानलेले आहेत?

*(अ) डॉ. कृ. पां. कुलकर्णी (ब) डॉ. आनंद यादव*

*(क) ई. एस. डलास (ड) वि. भि. कोलते.*

७. मौखिक वाङ्मयातील संहिता या नंतरच्या साहित्यातील .............. म्हणून वाचकांसमोर येताना दिसतात?

*(अ) आशयसूत्रे (ब) कल्पनाबीज (क) संहितासूत्र (ड) इतिहास.*

८. 'विश्वसाहित्याची' संकल्पना कोणी मांडली?

*(अ) रवींद्रनाथ टागोर (ब) सानेगुरुजी*

*(क) बंकिमचंद्र चटर्जी (ड) डॉ. द. भि. कुलकर्णी.*

९. 'आंतरभारती'ची संकल्पना कोणी मांडली?

*(अ) रवींद्रनाथ टागोर (ब) सानेगुरुजी*

*(क) बंकिमचंद्र चटर्जी (ड) डॉ. द. भि. कुलकर्णी.*

१०. तौलनिक साहित्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य कोणते मानले जाते?

*(अ) अनुवाद (ब) संस्कृतिविन्मुखता (क) साहित्यसंकर (ड) संस्कृतिसन्मुखता.*

## ❑ उत्तरे :-

१. *(क) लॉर्ड मेकॉले.*

२. *(अ) कांट व क्रोचे.*

३. *(अ) नॉथ्रॉप फ्राय.*

४. *(अ) रेने वेलेक.*

५. *(ड) Theme.*

६. *(क) ई. एस. डलास.*

७. *(अ) आशयसूत्रे.*

८. *(अ) रवींद्रनाथ टागोर.*

९. *(ब) सानेगुरुजी.*

१०. *(ड) संस्कृतिसन्मुखता.*

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

### ❑ अ) लघुत्तरी प्रश्न.

१. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये आशयसूत्रांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो, या विधानाची थोडक्यात चर्चा करा.

२. तौलनिक साहित्याभ्यासातील वाङ्मयप्रकारांच्या अभ्यासाचा थोडक्यात आढावा घ्या.

३. वाङ्मयीन कालखंडाचा अभ्यास तौलनिक साहित्याभ्यासामध्ये कसा करता येईल ते थोडक्यात लिहा.

४. वाङ्मयीन प्रवाहांचा अभ्यास तौलनिक साहित्याभ्यासामध्ये कसा करता येईल ते थोडक्यात लिहा.

५. वाङ्मयीन चळवळींचा अभ्यास तौलनिक साहित्याभ्यासामध्ये कसा करता येईल ते थोडक्यात लिहा.

### ❑ ब) दीर्घोत्तरी प्रश्न.

१. तौलनिक साहित्याभ्यासाच्या दिशा स्पष्ट करा.

२. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये द्वैभाषिक साहित्यकृतींचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो, या विधानाची सविस्तर चर्चा करा.

४. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये वाङ्मयीन कालखंडाचा अभ्यास कसा करता येईल, ते सविस्तरपणे लिहा.

५. संस्कृतिसन्मुखता हे तौलनिक साहित्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे, या विधानाचा परामर्श घ्या.

६. भिन्नभाषिक वाङ्मयीन चळवळींचा अभ्यास तौलनिक साहित्याभ्यासामध्ये कसा करता येईल ते लिहा.

## ४.७ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ

१. **कालवडे सुधाकर** : *'साहित्य संशोधन स्वरूप : तुलनात्मक पद्धती, संशोधन स्वरूप आणि पद्धती'*, संपा. सु. रा. चुनेकर, पठारे, धर्म, शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर, १९८३, पान नं. ४१.

२. **चौधरी इंद्रनाथ** : 'तुलनात्मक साहित्य की भूमिका', नॅशनल पब्लिकेशन हाऊस, दिल्ली, १९८३, पान नं. ६१.

३. तत्रैव पृ. ४१, पृ. ७८.

४. **बापट वसंत** : *'तौलनिक साहित्याभ्यास : मूलतत्त्वे व दिशा'*, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९८१, पान नं.२.

५. **पाटील आनंद** : *'तौलनिक साहित्य : नवे सिद्धांत आणि उपयोजन'*, उनि. पान नं. ४१.

६. **जाधव रा. ग.** : *'मराठी वाङ्मय : स्वातंत्र्योत्तर संदर्भ'*, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९८, प्रस्तावना.

७. **देवी गणेश एन.** : *'भारतीय संदर्भात तौलनिक साहित्याभ्यास'*, सौरभ प्रकाशन, कोल्हापूर, १९९२, पृ. २८.

८. **जहागिरदार चंद्रशेखर** : *'तौलनिक साहित्याभ्यास : तत्त्वे आणि दिशा'*, सौरभ प्रकाशन, कोल्हापूर, १९९२, पृ. २८.

९. **मंचरकर र. बा.** : *'तौलनिक साहित्य आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय'*, प्रतिमा उनि. पृ. ४२, पृ. ४८, पृ. ३३,

१०. **शर्मा मनोरमा** : *'तुलनात्मक अध्ययन स्वरूप और समस्याएँ'*, राजूरकर राजमल वोरा, उनि. पृ.४१.

११. इंग्रजी-इंग्रजी-मराठी डिक्शनरी, पृ. १४४.

१२. **मंचरकर र. बा.** : *'तौलनिक साहित्य आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय'*, प्रतिमा प्रकाशन, पुणे. पृ. २६.

१३. **पाटील आनंद** : *'तौलनिक साहित्य : नवे सिद्धांत आणि उपयोजन'*, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९८, पृ. २४.

❑❑❑

सत्र–४ : घटक–१

# तौलनिक साहित्यातील विविध संप्रदाय

## (अभिजातवाद, सौंदर्यवाद, वास्तववाद, आधुनिकतावाद, पाश्चात्त्य तुलनात्मक विचार)


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ फ्रेंच संप्रदाय

१.२.२ अमेरिकन संप्रदाय

१.२.३ जर्मन संप्रदाय

१.२.४ पूर्व युरोपिय (रशियन) संप्रदाय

१.२.५ भारतीय संप्रदाय : तौलनिक भारतीय साहित्य

१.२.६ अभिजातवाद

१.२.७ सौंदर्य : रोमॅंटिसिझम

१.२.८ वास्तववाद

१.२.९ आधुनिकतावाद

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.५ स्वयं–अध्ययन प्रश्न व उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रहो, जीवनातील सर्वच क्षेत्रामध्ये साहित्याला महत्त्वाचे स्थान आहे या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणांस,

१. अभिजातवाद म्हणजे काय ते समजून घेता येईल.

२. सौंदर्यवाद म्हणजे काय ते समजून घेता येईल.

३. वास्तववाद म्हणजे काय ते समजून घेता येईल.

४. आधुनिकतावाद म्हणजे काय ते समजून घेता येईल.

या सर्व घटकाबरोबरच पाश्चात्त्य तुलनात्मकतेचा विचार करावयाचा आहे.

## १.१ प्रस्तावना

सदर प्रकरणात तौलनिक साहित्यातील विविध संप्रदायांचा विचार करावयाचा आहे. या ठिकाणी एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की, ह्या संप्रदायांची नांवे फ्रेंच संप्रदाय, जर्मन संप्रदाय अशी त्या त्या देशांवरून पडली असली तरी, त्याचा अर्थ असा नव्हे की, तो संप्रदाय त्या त्या देशामध्ये प्रचलित असलेल्या तौलनिक साहित्याच्या अभ्यासपद्धतीपुरता मर्यादित आहे. किंवा त्या त्या देशातील साहित्यावर आधारित तुलनेचाच विचार त्यामध्ये आहे. तर हे संप्रदाय तौलनिक साहित्याच्या अभ्यासपद्धतीची वेगवेगळी रूपे त्यांच्यामध्ये लक्ष ठरलेली वाङ्मयाची वेगवेगळी अंगे, त्यातील तर-तम भाव यांवर आधारलेले आहेत. ते विशिष्ट देशांची नावे धारण करतात याचे कारण इतकेच की त्यांचा उदय आणि विकास त्या त्या देशांमध्ये झालेला आहे. आणि तौलनिक साहित्याचे उपयोजन करणारी एक मोठी परंपरा त्या त्या देशांमध्ये प्रचलित आहे. आजच्या परिस्थितीमध्ये जगाच्या कुठल्याही भागातील तुलनाकार समीक्षक या विशिष्ट देशाचे अभिधान धारण करणाऱ्या संप्रदायाच्या अनुसारे तौलनिक साहित्याचे उपयोजन करू शकतो, करताना आढळतो.

उदाहरणार्थ मराठीमध्ये ब्रिटीश नाटकांचा मराठी नाटकांवरील वसाहत काळातील प्रभाव शोधताना आनंद पाटील यांनी तौलनिक साहित्याच्या फ्रेंच संप्रदायाचे फार सुंदर उपयोजन केले आहे. तर त्यांच्याच 'ब्रिटीश बॉम्बे आणि पोर्तुगीज गोव्यातील वाङ्मय' या पुस्तकात त्यांनी अमेरिकन संप्रदायाचा अवलंब केलेला आहे. वसंत आबाजी डहाके यांच्या 'कवितेविषयी' या पुस्तकात देखील अमेरिकन संप्रदायाचा फार चांगल्या तऱ्हेने अवलंब केलेला आहे.

# १.२ विषय विवेचन

## १.२.१ फ्रेंच संप्रदाय

फ्रेंच संप्रदाय हे तौलनिक साहित्याचे आद्यपीठ म्हणावे लागेल. तौलनिक साहित्याची प्रतिष्ठापना झाल्यावर पहिल्यांदा त्याचे गंभीरपूर्वक उपयोजन फ्रान्समध्ये झाले. नंतरही फ्रान्स तौलनिक साहित्यात

सतत आघाडीवर राहीले. तौलनिक साहित्याच्या उपयोजनाचे शिस्तबद्ध कानून तेथेच प्रथम रुढ झाले. १९२८ मध्ये सोरबाँ विद्यापीठात ॲबेल विल्लमॉ (Abel Villemain) यांची तौलनिक साहित्याचे प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली आणि तौलनिक साहित्य विद्यापीठीय अभ्यासक्रमात आले. अठराव्या शतकातील साहित्य विद्यापीठीय अभ्यासक्रमात आले. अठराव्या शतकातील फ्रेंच लेखकांचा इतर साहित्य व युरोपिय चैतन्यावरील प्रभाव हा अभ्यासक्रम त्यांनी विद्यापीठात राबविला. इंग्लिश साहित्य व फ्रेंच साहित्य, फ्रेंच साहित्य इटालियन साहित्य यामधील पारस्परिक प्रभावांचे विश्लेषण करणारा हा अभ्यासक्रम होता. १९३० मध्ये झां-झाक् आंपॅर यांनी म्हटले की, 'तौलनिक साहित्याभ्यासाशिवाय (Ampere) वाङ्मयेतिहास कधीच परिपूर्ण होऊ शकत नाही.'

'प्रभाव संकल्पना' हा फ्रेंच संप्रदायाचा कणा आहे. तौलनिक साहित्य म्हणजे प्रभावांचा अभ्यास असे जणू समीकरणच फ्रेंच संप्रदायाने प्रस्थापित केले. भिन्न भाषांमधील साहित्यकृतीची अथवा साहित्यिकांची वा साहित्य प्रवाहाची तुलना करताना प्रत्यक्ष तुलनेपेक्षा प्रभावांच्या माध्यमातून दोहोमधील संबंध प्रस्थापित करणे हे फ्रेंच संप्रदायाला जास्त महत्त्वाचे वाटते. शेक्सपिअर आणि त्यांचे समकालीन फ्रेंच नाटककार यांची तुलना करण्यापेक्षा मॉतेन या फ्रेंच लेखकाच्या ग्रंथाची किती माहिती श्रेसपियरना होती आणि त्या माहितीचा त्यांनी आपल्या नाटकांमध्ये कसा व किती वापर केला आहे, याचा शोध घेणे अधिक महत्त्वाचे आहे, अशी फ्रेंच संप्रदायाची धारणा होती. प्रभाव कोणत्या माध्यमातून प्रस्थापित होतो, याचा शोध घेण्यासाठी ग्रंथालयाबरोबरच लेखकांचे पत्रव्यवहार, दैनंदिन, प्रवासवर्णने यांचाही धांडोळा घेणे आवश्यक आहे, असे या संप्रदायाने मानले पुरावे गोळा करून प्रभावांची निश्चिती करण्यावर त्याने भर दिला.

एका भाषेतून एखाद्या वाङ्मयप्रकाराचा झालेला अस्त आणि दुसऱ्या भाषेत त्या वाङ्मयप्रकारांचा झालेला उदय यांमध्येही प्रभावजन्य संबंध प्रस्थापित करण्याकडे या संप्रदायाचा कल दिसून येतो. प्रभावांचा अभ्यास हा फ्रेंच संप्रदायाचा केंद्रबिंदू पहिल्यापासून होताच. प्रभावांचा अभ्यास करता करता फ्रेंच संप्रदायाने स्वीकाराच्या प्रक्रियेवर लक्ष केंद्रित करण्यास सुरुवात केली आणि हळूहळू त्याच्या अभ्यासाचे केंद्र प्रभावाकडून स्वीकाराकडे सरकले. हे घडण्यास तौलनिक साहित्याच्या जर्मन संप्रदायाची प्रेरणा कार्यशील ठरली. या वळणामुळे फ्रेंच संप्रदायाचा संशोधनाचा रोख देणाऱ्याकडून घेणाऱ्याकडे वळला.

## १.२.२ अमेरिकन संप्रदाय

फ्रेंच संप्रदायापेक्षा अमेरिकन संप्रदाय बराच अलीकडचा आहे; परंतु त्याने बरेच सामर्थ्य, प्रतिष्ठा आणि लोकप्रियता प्राप्त केलेली आहे. बहुसंस्कृतिवाद आणि अनेकतावाद हा अमेरिकन जीवन

शैलीप्रमाणेच तौलनिक साहित्याचा अमेरिकन संप्रदायाचाही पाया आहे. फ्रेंच संप्रदायामध्ये प्रभावाचा शोध घेण्यासाठी संहिताबाह्य पुरावे गोळा करण्याची जी अवाजवी धडपड केली जाते ती अमेरिकन संप्रदायास मान्य नाही. इतिहास आणि चरित्रात्मक संशोधनाच्या पलीकडे गेले पाहिजे असा या संप्रदायाचा आग्रह आहे. साहित्यबाह्य पुराव्यांना बाजुला सारून संहिता व लेखकाच्या लेखनप्रक्रिया यांवर लक्ष केंद्रित केले पहिजे असे या संप्रदायाचे धोरण आहे.

फ्रेंच संप्रदाय आणि अमेरिकन संप्रदाय यांच्यातील महत्त्वाचा फरक म्हणजे अमेरिकन संप्रदाय साहित्याच्या तौलनिक अभ्यासात अन्य कलांचाही सहजपणे समावेश करतो. किंबहुना, त्याला कोणत्याच कलेचा समावेश वर्ज्य नाही. चित्रकला, शिल्पकला, वास्तुकला, संगीत, चित्रपट, नृत्य सर्व काही साहित्याच्या बरोबरीने तुलनेसाठी घेऊन तौलनिक विवेचन समृद्ध करण्यावर अमेरिकन संप्रदायाचा कटाक्ष आहे. त्यामुळे अमेरिकन संप्रदायाने तौलनिक साहित्याला एक व्यापक व विशाल परिमाण दिले.

## १.२.३ जर्मन संप्रदाय

फ्रेंच संप्रदाय आणि अमेरिकन संप्रदाय यांच्यातील दुवा म्हणजे जर्मन संप्रदाय होय. हेन्री रेमाक यांनी हे मत व्यक्त केले आहे. जर्मन संप्रदाय हे मध्यम मार्ग आहे. फ्रेंच संप्रदाय साहित्यबाह्य पुरावे गोळा करून प्रभावांचा मागोवा घेण्यावर आणि तपशीलांवर भर देतो, तर अमेरिकन संप्रदाय संहितेशी एकनिष्ठ राहण्याचा आग्रह धरून अन्य कलांच्या साहाय्याने संहितेवर प्रकाश टाकण्यास उत्तेजन देतो. जर्मन संप्रदाय हा मध्यम मार्ग आहे. जर्मन तौलनिक साहित्य संघटनेच्या पहिला मेळावा १९७० मध्ये भरला. या मेळाव्यामध्ये झालेल्या चर्चेमध्ये तौलनिक साहित्याची काही वैशिष्ट्ये अधोरेखित केली गेली. वाङ्मयीन सिद्धान्त मांडताना ते केवळ एकाच भाषेतील वाङ्मयाला लागू पडणारे असता कामा नयेत, तर विविध भाषांतील वाङ्मयांना ते लावून दाखवता आले पाहिजेत. असा एक महत्त्वाचा विचार या मेळाव्यात मांडला गेला. यातून तौलनिक साहित्य आणि समीक्षाशास्त्र यांच्यातील घट्ट नाते दिसून येते.

साहित्याचा विचार सामाजिक व ऐतिहासिक संदर्भातच झाला पाहिजे, तो कालातीत अथवा गूढवादी असावयास नको, असाही आग्रह या मेळाव्यात मुखर झाला. आणि स्वीकार प्रक्रियेतील प्रश्नांवर चर्चा झाली. जर्मन संप्रदायाने नेहमीच स्वीकारप्रक्रियेला केंद्रस्थानी मानलेले आहे. जर्मन संप्रदायाचे वैशिष्ट्य म्हणजे स्वीकारप्रक्रियेच्या अंतर्गत त्यांनी वाचकांच्या प्रतिसादालाही महत्त्वाचे स्थान दिले संहितेचा परिणाम वाचकांवर काय आणि कसा झाला, याचा शोध घेणे त्यांनी अनिवार्य मानले.

जर्मन संप्रदायाने भाषांतर हा स्वतंत्र वाङ्मयप्रकार मानून तौलनिक साहित्यात त्याचा समावेश करण्याचा आग्रह धरला. जर्मन कवी ग्यएटे यांनी जी विश्वसाहित्याची संकल्पना प्रसृत केली तिलाही या संप्रदायाने तौलनिक साहित्यात मानाचे स्थान दिले.

## १.२.४ पूर्व युरोपिय (रशियन) संप्रदाय

रशियामध्ये तौलनिक साहित्याचा श्री गणेशा वेसोलोव्हस्की यांनी एकोणिसाव्या शतकांमध्ये केला. मोठ्या साहित्यपरंपरेतील लेखकांचा प्रभाव लहान लेखकांवर कसा पडतो याची चिकित्सा त्यांनी केली. त्यानंतर व्ही. एम. झिर्मुन्स्की, आय. जी. न्युपोका, ए. एन. वुश्मीन बी. एल. सी श्कोन इत्यादी सिद्धान्तवादी समीक्षकांनी विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात तौलनिक साहित्याच्या क्षेत्रात भरीव कार्य केले. त्यामुळे त्यांचा संप्रदाय तयार झाला. तुलनात्मक चिकित्सा केल्याविना साहित्यातील मूल्यविषयक सिद्धान्त प्रस्थापित होऊ शकतात, ह्या पूर्वापार धारणेला या साऱ्यांनी तीव्र विरोध केला. त्यांच्या रशियन ग्रंथाची भाषांतरे इंग्लिशमध्ये झालेली नसल्याकारणाने भारतामध्ये या संप्रदायाविषयी विशेष माहिती नव्हती.

## १.२.५ भारतीय संप्रदाय : तौलनिक भारतीय साहित्य

१९९३ मध्ये 'कंपॅरेटिव्ह लिटरेचर असोसिएशन ऑफ इंडिया' (CLAL) च्या वतीने दिल्ली विद्यापीठात भरलेल्या आंतरराष्ट्रीय तौलनिक साहित्यपरिषदेमध्ये, परदेशांतून आलेल्या तौलनिक साहित्याच्या अभ्यासकांनी वारंवार एक सूर आळवला ''फ्रेंच संप्रदाय अमेरिकन संप्रदाय जर्मन संप्रदाय आणि रशियन संप्रदाय यांच्याप्रमाणे भारतीय संप्रदाय तौलनिक साहित्यात प्रस्थापित झाला पाहिजे. कारण भारतीय साहित्याच्या अंतर्गतच प्रस्थापित संप्रदायापेक्षा वेगळ्या प्रकाराने तौलनिक साहित्याचे उपयोजन करण्याची क्षमता आहे आणि तशी आवश्यकताही आहे.''

वेगवेगळ्या भारतीय भाषांमधील साहित्यांच्या पारस्परिक संबंधाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने एक बांधणी तयार करणे हे तौलनिक भारतीय साहित्याचे प्राथमिक उद्दिष्ट असायला हवे. भारतीय साहित्य हे स्वभावत:च वाड्मयीन संबंधाचे एक जाळे आहे आणि तौलनिक साहित्याच्या भारतीय संप्रदायात ह्या वास्तवाचे प्रतिबिंब उमटले पाहिजे. अर्थातच भारतीय संप्रदायास विविध भाषांमधील भारतीय साहित्यामध्ये आढळणाऱ्या केवळ साम्यांचा शोध घेऊन चालणार नाही, तर त्यांच्यामधील भिन्नत्वाचाही शोध घ्यावा लागेल. तरच त्यांच्यामधील पारस्परिक संबंधाचे वास्तव स्पष्ट होईल. तौलनिक पाश्चात्त्य साहित्य वेगवेगळ्या राष्ट्रीय साहित्यांचा अभ्यास करते, तर तौलनिक भारतीय साहित्य वेगवेगळ्या भाषांमधील एकाच राष्ट्रीय साहित्याचा अभ्यास करते, हा दोहोमधील मूलभूत फरक सतत लक्षात ठेवला पाहिजे. कारण साहित्य हे जरी भाषेतून निर्माण होत असले तरी ते भाषेपुरते सीमित राहत नाही, तर भाषेच्या सीमा ओलांडून संबंधित संस्कृतीशी आपले नाते प्रस्थापित करते, हे भारतीय साहित्याइतके प्रखरतेने अन्य कुठल्याही साहित्यात प्रतीत होत नाही. बहुभाषिकता हे भारतीय समाजातील वास्तव आहे आणि परिणामत: ते भारतीय साहित्याचेही वास्तव आहे. विविध भाषासंकुलातील भाषा

शतकानुशतके एकमेकांसोबत नांदत आहेत आणि परस्परांशी संबंध ठेवून आहेत असा भारतीय समाजाखेरीज दुसरा कुठलाही समाज जगाच्या पाठीवर नाही.त्यामुळे तौलनिक साहित्याच्या भारतीय संप्रदायाचे स्वरूप अंतर्बाह्य वेगळे असणे आणि ते एकमेकांद्वितीय असणे क्रमप्राप्त आहे.

भारतीय संप्रदायाला आणखी एक काम अनिवार्यपणे करावे लागणार आहे. आणि ते म्हणजे इंग्लिश साहित्याच्या भारतीय साहित्यावरील प्रभावाचा सर्वांगीण शोध घेणे. दीडशे वर्षे अवघा भारत ब्रिटीश साम्राज्याच्या जोखडामध्ये परतंत्र होता. या काळात ब्रिटीश सत्तेने भारतातील वेगवेगळ्या भाषांचा विकास खुटंविण्याचे कार्य सर्वोत्तोपरी केले. सर्वच भारतीय भाषांमध्ये समृद्ध वाङ्मयीन परंपरांचे संचित असल्यामुळे या भाषा जिवंत राहिल्या. तथापि त्यांच्या साहित्यावर जेत्यांच्या इंग्लिश भाषेतील वाङ्मयाचे गाढ संस्कार झाले. हा प्रभाव मूळच्या समृद्धीय वाङ्मयीन संचितामुळे विविधांगी व भिन्नदिक स्वरूपाचा झाला. भारतीय लेखकाला प्राचिन वाङ्मयाचा एक सुरक्षित वारसा लाभलेला असतो. हा समृद्ध वारसा अनेक प्रकारच्या अडचणीमधून तगून आलेला असतो. भारतीय लेखक या वारशाला भावनिक दृष्ट्या समर्पित असतो, एवढेच नव्हे, तर त्याचे मन या वारसाने व्यापून टाकलेले असते. त्यामुळे हा वारसा त्याचे पाश्चात्त्य प्रभावापासून कळत-नकळत रक्षण करत राहतो. त्यामुळे भारतीय लेखकाची मानसिकता सतत एका तणावाखाली असते. एकीकडे नैसर्गिकरीत्या बनलेली प्रतिकाराची व स्वयंभूषणाच्या अट्टाहासाची भूमिका आणि दुसरीकडे आधुनिक दिमाखदार पश्चिमेचे वलय व मोहिनी यांच्यातील हा तणाव असतो असे भारतीय लेखकाच्या तणावग्रस्त मानसिकतेचे विश्लेषण निर्मला जैन यांनी केले आहे. या तणावग्रस्त मानसिकतेची दखल घेऊन त्या अनुषंगानेच तौलनिक साहित्याला भारतीय संप्रदायाला काम करावे लागणार आहे.

## १.२.६ अभिजातवाद

वाद ही संज्ञा या ठिकाणी Controversy या अर्थाने या ठिकाणी वापरलेली नाही हे या ठिकाणी आपण लक्षात घ्यायला हवे. 'वाद' ही संज्ञा एक सैद्धान्तिक विचारप्रणाली, विशिष्ट विचारांचा समूह वा विशिष्ट संप्रदाय वा प्रवाह या अर्थाने वापरलेली आहे. इंग्रजीतील 'ism' या संज्ञेला पर्यायी म्हणून मराठीत 'वाद' ही संज्ञा योजिली जाते.

### १. अभिजातवाद :-

अभिजातवाद (Classicism) ही पाश्चात्त्य कला साहित्यक्षेत्रातील प्राचीन काळापासून चालत आलेली एक प्रवृत्ती, दृष्टिकोण व विचारसरणी आहे. 'कलासिसिझम' ही संज्ञा जरी साधारणपणे १९ व्या शतकापासून प्रचलित असली तरी ती ज्या विशेषणापासून बनलेली आहे, ती क्लासिक,

'क्लासिकल' ही विशेषणे मात्र प्राचीन काळापासून अस्तित्वात आलेली दिसून येतात 'अभिजातवाद' ही संज्ञा एका विशिष्ट काळात एका निश्चित अर्थाने वापरली जात होती असे चित्र दिसत नाही या संज्ञेला वेगवेगळे अर्थ चिकटलेले दिसतात.

- क्लॅसिक किंवा क्लॅसिकल म्हणजे श्रेष्ठ, महान अव्वल दर्जाचे असा एक अर्थ आहे.
- क्लॅसिक वा क्लॅसिकल याचा दुसरा अर्थ विद्यालयांमध्ये अभ्यासले जाणारे साहित्य असा आहे.
- इसवी सनाच्या १६ व्या शतकात क्लासिक वा क्लासिकल या संज्ञाचा अर्थ महान मानदंड म्हणून मानल्या जाणाऱ्या साहित्यकृती आणि साहित्याच्या वैशिष्ट्यपूर्ण विकासाचे कालखंड असा केलेला पहावयास मिळतो हा अर्थ आजही प्रचलित आहे.
- क्लॅसिक किंवा क्लॅसिकल याचा आणखी एक अर्थ म्हणजे प्राचीन ग्रीक किंवा रोमन साहित्याचे अनुकरण करणारे साहित्य असा आहे.
- रोमॅटिसिझमच्या विरुद्ध असणारा वाद म्हणजे अभिजातवाद असाही एक अर्थ आहे.

अभिजातवादाच्या या विविध अर्थामधून एक महत्त्वाची गोष्ट लक्षात येते की, अभिजातवादाचा एकच एक अर्थ गृहीत धरता येत नाही. एखादी विशिष्ट भाषाशैली, विशिष्ट रूपतत्त्वांचा स्वीकार, विशिष्ट प्रवृत्ती एखादा कालखंड विशिष्ट सौंदर्यकल्पना यापैकी एक किंवा अनेक, सर्वच गोष्टी अभिजातवादाने सूचित केल्या जाऊ शकतात. अभिजातवादी साहित्याने प्राचीनांचे अनुकरण करताना ते आशय व रूप अशा दोन्ही अंगानी केले आहे. अभिजातवादात आशयाची विश्वात्मकता, शाश्वतता, भव्योदात्तता यांवर भर दिला गेला आहे. त्यामुळे ज्याचे आवाहन सार्वत्रिक आहे, ज्यातून चिरंतन प्रश्नाची मांडणी केलेली आहे. ज्यातून राष्ट्र व समूह यांच्या मनाचा आविस्कार होतो. ज्यात तात्त्विक स्वरूपाला प्राधान्य आहे, अशा आशयावर अभिजातवाद्यांनी आपले लक्ष केंद्रित केले आहे. व्यक्तीपेक्षा येथे समष्टीला महत्त्व प्राप्त झाले आहे. स्वभावचित्रणातील प्रातिनिधिकता महत्त्वाची ठरली. बुद्धीच्या प्राबल्यामुळे अभिजातवादात निर्मितिप्रक्रियेत स्फूर्तीपेक्षा जाणीवपूर्वकतेला महत्त्व देण्यात आले बुद्धीचेच एक अंग म्हणून या वादाला वस्तुनिष्ठतेलाही महत्त्व प्राप्त झाले. विशिष्टता, व्यक्तिनिष्ठता या ऐवजी सामान्यांवर, सार्वत्रिकतेवर भर देण्याच्या अभिजातवादी प्रवृत्तीमुळे वस्तुनिष्ठता आवश्यक ठरली. व्यक्तींचे, घटनांचे वस्तुनिष्ठ रीतीने चित्रण करून त्यातील सार्वत्रिकता, विश्वात्मकता स्पष्ट करता येऊ शकते. अशी धारणा येथे होती. मात्र वस्तूंच्या सत्त्वाचा आविष्कार करायचा असल्यामुळे तिचे परिपूर्ण रूप दाखविण्यासाठी आदर्शीकरण करण्यावरही या वादाने भर दिला.

## १.२.७ सौंदर्य : रोमँटिसिझम (Romanticicm)

या ठिकाणी आपल्याला साहित्यक्षेत्रातील रोमँटिसिझमचा विचार करावयाचा आहे. साहित्यक्षेत्रातही 'रोमॅंटिसिझम' ही संज्ञा अनेक अर्थानी वापरली जाताना दिसते. मराठीत रोमँटिसिझमसाठी 'स्वच्छंदतावाद', 'निर्भरशीलतावाद', 'सौंदर्यवाद', 'रोमांचवाद' अशा अनेक पर्यायी संज्ञा वापरल्या आहेत. रोमँटिसिझमच्या आजवर अनेक व्याख्या करण्यात आलेल्या आहेत. त्यातील अनेक व्याख्या ह्या परस्परविरोधी गोंधळात टाकणाऱ्या आहेत. रोमँटिसिझमचा विचार एक शाश्वत प्रवृत्ती म्हणून, त्याचप्रमाणे एक स्थलकालविशिष्ट दृष्टिकोण म्हणून केला गेला आहे. रोमँटिसिझम काहींना रुग्णावस्थेसारखा वाटला आहे. तर काहींना तो दिव्य, अलौकिक प्रतीचा वाटला आहे. काहींनी रोमँटिसिझम म्हणजे वास्तवापासून पलायन मानले आहे. तर काहींनी रोमँटिसिझम म्हणजे निसर्गाकडे परत जाणे मानले आहे. रोमँटिसिझमविषयी अशा अनेक कल्पना भूमिका वा मते प्रचलित आहेत. त्यातील काही परस्परविरोधी आहे. वादविषयक इतर संकल्पनांप्रमाणे ही देखील वादग्रस्त संकल्पना आहे.

रोमँटिसिझमचे वेगवेगळ्या देशातील वेगवेगळे आविष्कार पाहावयास मिळतात. विविध ठिकाणच्या रोमँटिसिझममागील तत्त्वज्ञानात्मक बैठकही समान नाही.

रोमँटिसिझममध्ये एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे बुद्धीला (Reason) विरोध व भावनेला, अंत: प्रेरणेला म्हणजे मेंदूपेक्षा हृदयाला महत्त्व हे आहे. रोमँटिसिझमने बुद्धीला विरोध करून कल्पनाशक्ती हे जीवनाचे केंद्र मानले. विश्वरहस्याची प्रतीती बुद्धीने नव्हे, तर कल्पनाशक्तीने येऊ शकते अशी रोमँटिसिझमची धारणा आहे. कला साहित्य यांची निर्मिती बुद्धीने होत नसून ती कल्पनाशक्तीने होते असे मानले गेले. त्यामुळे जाणिवेपेक्षा उत्स्फूर्ततेला महत्त्व प्राप्त झाले. रोमँटिसिझमने कल्पनाशक्तीला महत्त्व दिल्यामुळे कल्पनेच्या पातळीवरील हे जग अधिक महत्त्वाचे ठरले, वास्तवापेक्षा अवास्तव हे उच्चत्तर पातळीवरील आहे, असा विश्वास निर्माण झाला. त्यामुळे वास्तवापेक्षा गतकाळात रमणे, ‸ भविष्याचा वेध घेणे या गोष्टींना महत्त्व प्राप्त झाले. रोमँटिसिझममध्ये कल्पनाशक्तीचा व प्रतिभेचा विचार वेगवेगळ्या पद्धतीने करण्यात आला. कल्पनाशक्ती ही सेंद्रिय एकात्मता निर्माण करणारी संश्लेषण करणारी, नवनिर्मिती करणारी शक्ती आहे असे अनेकांनी मानलेले दिसते. परंपरेत कल्पनाशक्तीचा, प्रतिभेचा गौरव करण्यात आला आहे. कल्पनाशक्तीचा प्रतिभेच्या सामर्थ्याबद्दल, तिच्या प्रक्रियांबद्दल रोमँटिक कवि-लेखकांनी जेवढे विवेचन केले तेवढे अन्य कोणी केलेले दिसत नाही. त्यांच्या दृष्टीने कल्पनाशक्ती, प्रतिभा ही असाधारण दिव्य अद्‌भुत गूढ शक्ती आहे तिच्यामुळे विश्वातील दिव्यत्वाची अद्‌भुताची प्रचिती येते.

रोमँटिसिझमचा निसर्गाकडे पाहण्याचा दृष्टिकोण वैशिष्ट्यपूर्ण आहे. रोमँटिक कवींना दिसलेला निसर्ग कार्यकारणबद्धतेच्या शृंखलेतील, विज्ञानाच्या नियमात अडकलेला निसर्ग नाही. त्याला स्वतंत्र

व्यक्तिमत्त्व आहे. या त्याच्या स्वतंत्रपणाची ओळख पटली तरच मानव त्याच्याशी नाते सांगू शकतो. येथे निसर्ग ही एक जड नव्हे, तर चैतन्ययुक्त सेंद्रिय गोष्ट मानली गेली. निसर्ग, व्यक्ती व विश्व या सर्वामध्ये एकात्मता आहे. या सर्वांमध्ये एक चैतन्यतत्त्व आहे. हा प्रत्यय या ठिकाणी महत्त्वाचा ठरला. मानव निसर्गापासून दूर गेलेला आहे. त्यामुळे मानवी संबंधात, समाजविकृती निर्माण झाल्या आहेत. असा विचार रोमँटिसिझममध्ये पहावयास मिळतो. निसर्गापासून आपण दूर गेलेलो आहोत या जाणिवेने रोमॅंटिक कवितेमधून निसर्गाशी नवे नाते जोडण्याचा प्रयत्न केला गेला. निसर्गाविषयी अनावर ओढ या कवितांमधून व्यक्त झालेली दिसते. रोमँटिसिझमने निसर्गाप्रमाणे स्वाभाविक जगणे महत्त्वाचे मानले. ती माणसाची खरीखुरी प्रकृती ठरली. त्यामुळेच मानव-निसर्ग यांच्या संबंधाला संदर्भात रुसो ने उदात्त रानटी मानवाची (हेलश्रश डर्रीसश) कल्पना मांडली. रोमँटिसिझमचा आणखी एक महत्त्वाचा विशेष म्हणजे अज्ञातांची ओढ ध्यास हा होय. रोमॅंटिक कवी, लेखकांनी निर्मितीचे केंद्र मानवी कल्पनाशक्ती मानली.

## १.२.८ वास्तववाद (Realism)

वास्तववाद (Realism) ही साहित्यक्षेत्रातील एक चळवळ, एक विचारसरणी आहे. 'वास्तववाद' ही संज्ञा विविध प्रकारे वापरली जाते. उदा. समाजवादी वास्तववाद, चिकित्सक वास्तववाद, गतिमान वास्तववाद, बाह्य वास्तववाद, आदर्श वास्तववाद, मानसशास्त्रीय वास्तववाद, काव्यात्म वास्तववाद, राष्ट्रीय वास्तववाद, वस्तुनिष्ठ वास्तववाद, व्यक्तिनिष्ठ वास्तववाद, रोमँटिक वास्तववाद, आशावादी वास्तववाद, निराशावादी वास्तववाद असे या संज्ञेचे सुमारे २५-३० वापर डॉमियन ग्रॅटने दिले आहेत. या विविध वापरामुळे 'वास्तववाद' ही संज्ञा किती विविध परस्पर विरोधी अर्थाने वापरली जाते, ते लक्षात येते. वास्तववादाच्या निर्मितीचे एक कारण क्रिया-प्रतिक्रिया हे सूत्र आहे. रोमँटिसिझमला प्रतिक्रिया म्हणून वास्तववादाची निर्मिती झाली आहे. वास्तववादाच्या निर्मितीचे दुसरे महत्त्वाचे कारण १९ व्या शतकात प्रभावी ठरलेले अनुभववादी (Empiricist) तत्त्वज्ञान हे आहे. अनुभववाद्याच्या मते इंद्रियानुभव हाच मानवी ज्ञानाचा एकमेव पाया आहे. आदि इंद्रियानुभव हेच मानवी ज्ञानाचे प्रामाण्य असते. याचा अर्थ असा की विधानात जे सांगितलेले असते त्याची अनुभवाच्या साहाय्याने प्रतीती येऊन ते खरे किंवा खोटे ठरविता येते, ज्याची प्रतीती इंद्रियानुभवात घेता येते. अशी विधाने सत्य असतात. इंद्रियानुभवात ज्याचा पडताळा घेता येत नाही, अशा आत्मिक, आध्यात्मिक गोष्टी 'अनुभववादाने निरर्थक ठरविल्या.'

प्लेटोने खरेखुरे वास्तव हे सत्त्वाच्या पातळीवर असते असे मानले आहे. त्यांच्या मते प्रत्यक्षातील, इंद्रियानुभवाने प्रतीत होणारे जग हे केवळ या सत्त्वाचे अनुकरण असते. त्यामुळे ते खरे खुरे वास्तव नव्हे. म्हणजेच प्लेटोच्या विचारात वास्तव हे आदर्शाच्या, सत्त्वाच्या पातळीवरील वास्तव आहे. वास्तववाद्यांनी

वास्तवाच्या या कल्पनेला विरोध केला आहे. त्यांच्यामते खरे खुरे वास्तव म्हणजे आपल्या इंद्रियानुभवाने प्रतीत होणारे वास्तव होय. त्यांनी सर्व प्रकारच्या आदर्शवादांना अवास्तव गोष्टींना विरोध केला आहे. वास्तववादात केवळ विशिष्ट विषयाची आशयसामग्रीची निवड अभिप्रेत नाही. या आशयसामग्रीची विशिष्ट प्रकारची मांडणी आशयाचे विशिष्ट पद्धतीने केलेले चित्रण येथे अभिप्रेत आहे. फ्रान्समधील वास्तववादांपेक्षा इंग्लंडमधल्या वास्तववादाच्या संदर्भात काही प्रमाणात वेगळे चित्र दिसते. इंग्लंडमधील वास्तववाद जड वास्तवाच्या चित्रणांपेक्षा केवळ जंत्रीवजा पद्धतीपेक्षा माणसांच्या समाजातील, नैतिक वर्तनांशी अधिक संबंधित होता. सत्याविषयी, नैतिकतेविषयी आस्था हे या चित्रणाचे वैशिष्ट्य आहे. समकालीन समाजाचे अचूक व रोमॅंटिक नसलेले चित्रण येथे केले गेले.

## १.२.९ आधुनिकतावाद

'आधुनिकतावाद' या साहित्यातील वादसंकल्पनेचा विचार येथे करावयाचा आहे. इतर अनेक वादाच्या संकल्पनेप्रमाणे याही संकल्पनेचा संदर्भ पाश्चात्त्य साहित्याशी आहे. 'आधुनिकतावाद' ही संकल्पना इंग्रजी साहित्यात १९१० ते १९३० या कालखंडात प्रभावी ठरलेली संकल्पना आहे. १९२० पासून 'आधुनिकता' हा शब्दप्रयोग इंग्रजी समीक्षेत सर्वसाधारण अर्थापेक्षा अधिक निश्चित अशा संकल्पनात्मक अर्थाने वापरला जाऊ लागला. आणि त्याचा संदर्भ प्रामुख्याने कलेतील 'प्रयोगशीलते'शी होता. आधुनिकतावादामध्ये लेखक आणि वाचकाच्या परस्परपूरक आणि समान धारणेच्या भूमिकेपासून फारकत घेण्यात आली. बाह्यवास्तवापेक्षा माणसाच्या आंतरिक वास्तवाचा वेध घेतला जाऊ लागला प्रतिष्ठित संकेताचा स्वीकार करण्यापेक्षा प्रयोगशील बनण्याकडे कल वाढला. प्रस्तापित मुद्यांना धक्के दिले जाऊ लागले जे विषय वर्ज्य आहेत, असे मानले जायचे त्या विषयांना साहित्यात स्थान मिळू लागले. साहित्याच्या 'स्वायत्ततेचा' पुरस्कार होऊ लागला. साहित्यातील नैतिकतेचा शोध घेण्यापेक्षा सौंदर्यतत्त्वाचा शोध घेऊ पाहणारे सौंदर्यशास्त्र निर्माण होऊ लागले. स्त्री पुरुषासंबंधाचा धीट आविष्कार होऊ लागला. मानवी जीवन आणि मानवी अस्तित्वाच्या सार्थकतेबरोबरच निरर्थकतेचे दर्शनही घडवले जाऊ लागले १९३० नंतर आधुनिकतावादाला उतरती कळा लागली. या काळात पुन्हा एकदा सांस्कृतिक पर्यावरणात मोठे बदल व्हायला सुरुवात झाली. इटलीमध्ये 'फॅसिझम'चा आणि जर्मनीमध्ये 'नाझिझम'चा उदय झाला.

१९४५ नंतरच्या मराठी साहित्याच्या संदर्भात आधुनिकतावादाचा विचार केला जातो. मराठी समीक्षेने आधुनिकता असा शब्द प्रयोग न करता 'नवसाहित्य' असा शब्दप्रयोग केला. या नवसाहित्याचे प्रणेते म्हणून मर्ढेकर आणि गंगाधर गाडगीळ यांचा उल्लेख केला जातो. मर्ढेकर इंग्लंडला गेले आणि त्यांच्यावर टी. एस. इंलियंट यांच्या काव्याचा मोठा प्रभाव पडला. एलियटच्या आधुनिकतावादामागे एक निश्चित अशी ऐतिहासिक/सामाजिक पार्श्वभूमी होती. मानवी जीवनातील उद्ध्वस्ततेचा, निरर्थकतेचा,

भयानकतेचा साक्षात अनुभव जीवनातून येत होता. म्हणून त्यांच्या काव्यातून त्याचा आविष्कार होणे क्रमप्राप्त होते. त्यांच्या आधुनिकतावादाचे स्वरूपही व्यापक होते. मर्ढेकरांच्या कालखंडाची पार्श्वभूमी युरोपपेक्षा सर्वस्वी भिन्न प्रकारची होती. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा उत्कर्ष, भारताला मिळालेले स्वातंत्र्य आणि स्वातंत्र्योत्तर भारताच्या जडणघडणीची उमेद इथल्या जनजीवनात निर्माण झाली होती इथेही 'आधुनिकतावाद' आणण्याचा प्रयत्न सुरू झाला होता. पण या आधुनिकतावादाचे प्रणेते नेहरू होते. म्हणूनच या युगाला 'नेहरू युग' म्हणता येईल. या काळाचे युगचैतन्य सकारात्मक होते. नेहरूंना स्वतंत्र भारत आधुनिक बनवायचा होता. न्याय, स्वातंत्र्य, समता सर्वांगीण विकास ही उद्दिष्टे त्यांच्यासमोर होती. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे महात्म्य ते जाणून होते. इतर सर्व विकासांबरोबर शैक्षणिक सांस्कृतिक विकासासाठी त्यांनी विश्वविद्यालय अनुदान आयोग, साहित्य अकादमी, संगीत नाटक अकादमी, नॅशनल बुक ट्रस्ट, राष्ट्रीय प्रयोगशाळा इ. संस्था स्थापन केल्या या साऱ्यांच्यामागे देश आधुनिक मूल्यांनी संपन्न व्हावा असे त्यांचे स्वप्न होते. आणि ते साकारण्याचा प्रयत्न होता.

याच्या उलट शरचंद्र मुक्तिबोधांच्या 'आधुनिकतावाद' सकारात्मक असल्यामुळे तो समाजमनांशी जुळणारा होता. 'नवी मळवाट' ची त्यांची प्रस्तावना आणि त्यांना अभिप्रेत असल्याचे 'मानुषते'चे सौंदर्यशास्त्र या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. या नव्या मळवाटेवरचे पुढचे कवी म्हणून विंदा करंदीकर आणि आजचे पाईक म्हणून नारायण सुर्वेंचा उल्लेख करता येईल. १९६० नंतरच्या दशकात खूप बदल होत गेला. सामाजिक जीवनात दलित आणि स्त्रीवर्गाला झालेल्या अस्मितेच्या आणि आत्मोद्धाराच्या आणि हक्काच्या जाणीवेचे महत्त्वही वाढले. याचा अर्थ असा की, इथला 'आधुनिकतावाद' सामाजिक तत्त्वज्ञान म्हणून वावरतो आहे. आधुनिकतावाद आपल्या निर्मितीतून जपणारे विलास सारंग, किरण नगरकर, अरुण कोलटकर असे काही निवडक लेखक या काळातदेखील लिहीत आहेत.

## १.३ सारांश

तौलनिक पाश्चात्त्य साहित्य वेगवेगळ्या राष्ट्रीय साहित्याचा अभ्यास करते तर तौलनिक भारतीय साहित्य वेगवेगळ्या भाषांमधील एकाच राष्ट्रीय साहित्याचा अभ्यास करते. हा दोहोंमधील मुलभूत फरक सतत लक्षात ठेवला पाहिजे, कारण साहित्य हे जरी भाषेतून निर्माण होत असले तरी ते भाषेपुरते सीमित राहत नाही तर भाषेच्या सीमा ओलांडून संबंधित संस्कृतीशी आपले नाते प्रस्थापित करते. हे भारतीय साहित्याइतक्या प्रखरतेने कुठल्याही साहित्यात प्रतीत होत नाही. बहुभाषिकता हे भारतीय समाजातील वास्तव आहे. परिणामत: ते भारतीय साहित्यांचे वास्तव आहे. विविध भाषासंकुलातील भाषा शतकानुशतके एकमेकांसोबत नांदत आहेत आणि परस्परांशी संबंध ठेवून आहेत असा भारतीय समाजाखेरीज दुसरा कुठलाही समाज जगाच्या पाठीवर नाही. तौलनिक साहित्याच्या भारतीय सांप्रदायाचे स्वरूप अंतर्बाह्य वेगळे असले आणि ते एकमेवाद्वितीय असणे क्रमप्राप्त आहे.

## १.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. **कंपॅरेटिव्ह लिटरेचर** : तौलनिक साहित्य.

२. **क्लासिसिझम** : अभिजातवाद.

३. **रोमँटिसिझम** : सौंदर्यवाद.

४. **रिॲलिझम** : वास्तववाद.

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

❑ **योग्य पर्याय निवडा.**

१. फ्रेंच संप्रदायाचा कणा कोणता आहे?

*(अ) भाव संकल्पना* *(ब) प्रभाव संकल्पना*

*(क) विभाव संकल्पना* *(ड) इतर संकल्पना.*

२. तौलनिक साहित्याचे आद्यपीठ कोणत्या संप्रदायाला म्हणतात?

*(अ) जर्मन संप्रदाय* *(ब) अमेरिकन संप्रदाय*

*(क) फ्रेंच संप्रदाय* *(ड) रशियन संप्रदाय.*

३. फ्रेंच संप्रदाय आणि अमेरिकन संप्रदाय यांच्यातील दुवा कोणत्या संप्रदायास म्हणतात?

*(अ) रशियन संप्रदाय* *(ब) भारतीय संप्रदाय*

*(क) फ्रेंच संप्रदाय* *(ड) जर्मन संप्रदाय.*

४. जर्मन तौलनिक साहित्य संघटनेचा पहिला मेळावा कोणत्या साली भरला?

*(अ) १९६०* *(ब) १९७०* *(क) १९८०* *(ड) १९९०.*

५. विश्वसाहित्य ही संज्ञा पहिल्यांदा कोणी वापरली?

*(अ) गटे* *(ब) होमर* *(क) शेक्सपिअर* *(ड) टॉलस्टॉय.*

६. भारतामध्ये विश्वसाहित्य ही संकल्पना १९२१ साली कोणी मांडली?

*(अ) न. चि. केळकर* *(ब) रवींद्रनाथ ठाकूर*

*(क) श्री. व्यं. केतकर* *(ड) रा. भि. गुंजीकर*

७. भारतीय राज्य घटनेने प्रारंभी किती भाषांना प्रमुख भारतीय भाषा म्हणून मान्यता दिली?

*(अ) १६ (ब) १७ (क) १४ (ड) १८.*

८. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या कोणत्या कादंबरीत 'वंदे मातरम्' हे राष्ट्रगीत आले आहे?

*(अ) आनंदघन (ब) आनंदवन (क) आनंदघट (ड) आनंदमठ.*

- **उत्तरे :-**

१. *(अ) भाव संकल्पना.*

२. *(क) फ्रेंच संप्रदाय*

३. *(ड) जर्मन संप्रदाय.*

४. *(ब) १९७०.*

५. *(अ) गटे.*

६. *(ब) रवींद्रनाथ ठाकूर.*

७. *(क) १४.*

८. *(ड) आनंदमठ.*

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न.

१. अभिजातवाद आणि आधुनिकतावाद यांचे स्वरूप स्पष्ट करा?

२. वाद म्हणजे काय? ते सांगून सौंदर्यवाद व वास्तववाद यांचे स्वरूप स्पष्ट करा?

३. राष्ट्रीय साहित्याचे स्वरूप व संकल्पना स्पष्ट करा?

४. भारतीय साहित्याचे स्वरूप व संकल्पना स्पष्ट करा?

### ब) लघुत्तरी प्रश्न

१. फ्रेंच संप्रदायाचे स्वरूप स्पष्ट करा?

२. अभिजातवाद म्हणजे काय?

३. सौंदर्यवादाचे विश्लेषण करा?

४. भारतीय साहित्याचे स्वरूप थोडक्यात लिहा?

५. विश्वसाहित्याचे स्वरूप थोडक्यात विशद करा?

६. राष्ट्रीय साहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.

## १.७ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ


१. **निशिकांत मिरजकर :** *'तौलनिक साहित्य'*, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

२. **वसंत बापट :** *'तौलनिक साहित्याभ्यास'*, मौज प्रकाशन, पुणे.

३. **आनंद पाटील :** *'तौलनिक साहित्य : नवे सिद्धान्त आणि उपयोजन'*, साकेत प्रकाशन, पुणे.

४. **संपा. चंद्रशेखर जहागिरदार :** *'तौलनिक साहित्याभ्यास : तत्त्वे आणि दिशा'*, सौरभ प्रकाशन, कोल्हापूर, १९९२.

५. **संपा. द. दि. पुंडे, पद्मजा घोरपडे :** *'भारतीय साहित्याची संकल्पना'*, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००२.


❑❑❑

सत्र–४ : घटक–२

# वाङ्मयीन प्रभाव (उद्‌गम)

## प्राक्कथा, लोकविद्या, मानसशास्त्रीय, आदिबंध, अनुकरण, परंपरा व नूतनीकरण


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ प्राक्कथा

२.२.२ लोकविद्या

२.२.३ मानसशास्त्रीय प्रभाव

२.२.४ आदिबंध प्रभाव

२.२.५ परंपरा आणि नूतनीकरण

२.२.६ अनुकरण

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयं–अध्ययन प्रश्न व उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ


## २.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला;

१. वाङ्मयीन प्रभाव म्हणजे काय हे समजून घेता येतील.

२. तौलनिक साहित्याभ्यासातील प्रभव व प्रभाव संकल्पना समजून घेता येतील.

३. प्रभाव व अनुकरण यांच्यातील अनुबंध समजून घेता येईल.

४. प्राक्कथा, लोकविद्या/लोकसाहित्याचे तौलनिक साहित्याभ्यासातील महत्त्व समजून घेता येईल.

५. मानसशास्त्र व आदिबंधाचे तौलनिक साहित्याभ्यासातील महत्त्व समजून घेता येईल.

६. परंपरा व नूतनीकरण आणि तौलनिक साहित्याभ्यास यांचा अनुबंध तपासता येईल.

## २.१ प्रास्ताविक

नोकरी, उद्योग व्यवसाय, प्रवास यामुळे जग हे एक छोटे खेडे होत चालले आहे.त्यामुळे अनेकविध संस्कृतीचे एकत्रीकरण होत आहे. लोकांनी व्यापार, उत्पादने, नोकरी यासाठी संस्कृतीचा स्वीकार करण्यास सुरुवात केली. जगभरात सेवा पुरवण्यासाठी व त्यांचा वापर व उपभोग करण्यासाठी लोक जसे जवळ येत आहेत तसे आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, साहित्यिक परंपरांचे आदान-प्रदान वाढले आहे. संचार, वाहतूक, सेवा, इमारती, रस्तेबांधणी यामुळे विविध भागातील देशांतील व्यक्ती एकत्र येत आहेत. पूर्वी समुद्रपर्यटन निषिद्ध मानले जात होते. स्त्री-शूद्रांना तर शिकण्याचा हक्कच नव्हता त्यामुळे अनेक भ्रामक समजुतींनी समाज पोखरला होता. आपले जगणे साहित्यातून यायलाही खूप उशीर झाला. फक्त मौखिक वाङ्मयातून आपल्या मनातील हुंकाराचा आविष्कार केला जात होता. प्राचीन अभिजातवादी, पुराणपरंपरा मतवादी, ईश्वरविषयक कर्मकांडविषयक साहित्यग्रंथच निर्माण होत गेले. जसजसे जग उत्क्रांत होत गेले तसतशा साहित्यनिर्मितीच्या प्रेरणाही बदलत गेल्या. नवनवीन विषय हाताळले जाऊ लागले.

संचार व दळणवळणाची साधने वाढत गेली तशी माणसाची आंतरसांस्कृतिक आदानप्रदानेही वाढत गेली. एका व्यक्तीस अनेक भाषांचे अनेक संस्कृतीचे ज्ञान होऊ लागले. त्यामुळे तौलनिक साहित्याच्या अभ्यासाची गरज भासू लागली. दोन किवा दोनपेक्षा अधिक भाषांचा अभ्यास,त्यातील साहित्यव्यवहाराचा व संस्कृतीचा अभ्यास तौलनिक साहित्यामध्ये महत्त्वाचा ठरला आहे. एका विशिष्ट देशाच्या मर्यादा ओलांडून तौलनिक साहित्य हे साहित्याच्या अभ्यासाबरोबरच मानवी आविष्कार क्षेत्रे जसे चित्रकला, शिल्पकला, वास्तुकला, संगीत, तत्त्वज्ञान इतिहास, सामाजिक विज्ञान म्हणजेच राजकारण, अर्थशास्त्र, समाजशास्त्र त्याचबरोबर विज्ञान व धर्म या साऱ्यांचा अभ्यास करते. एकूणच राष्ट्राच्या सीमा ओलांडून तौलनिक साहित्याभ्यास केला जातो. रेने वेलेक यांच्या मते इतिहास हा तौलनिक साहित्याभ्यासाचा केंद्रबिंदू आहे,परंतु इतिहासापेक्षा सांस्कृतिक इतिहास हा तौलनिक साहित्याभ्यासाचा गाभा आहे. १९ व्या शतकातील नेपोलियनच्या काळातील वासाहतिक सत्ता आणि इंग्रजांची इतर राष्ट्रावर असणारी सत्ता त्याचे झालेले दुष्परिणाम आणि साहित्यातून त्याचे उमटलेले प्रतिंबिंब या गोष्टी तौलनिक साहित्याभ्यासामध्ये तपासल्या जातात. दुसऱ्या महायुद्धातील जर्मनी, जपान

त्यांचे भाषिक एकत्व व औद्योगिकीकरण आणि या साऱ्यातून राष्ट्रीयत्वाची, एकात्मतेची भावना त्या देशात वाढीस लागली; यांचाही साहित्यावर खूप मोठा प्रभाव पडला आहे. तौलनिक साहित्याभ्यासाचा आणि राष्ट्रीयत्वाचा निकटचा संबंध येतो.

भाषा आणि संकृती एकमेकांपासून वेगळे करता येत नाहीत. फर्डिनेंड ब्रुनेतिअर यांच्या मते, 'आपणच आपल्याशी तुलना केली तर आपण स्वत:लाही नीट ओळखू शकत नाही. पण इतरांशी तुलना केल्यानंतर आपण नेमके कोठे आहोत हे मात्र कळते.' तर पंडीत आवळीकरांच्या मते ज्याला फक्त इंग्लंड माहीत आहे त्याला इंग्लंड तरी पूर्णपणे माहीत असतो का? किंवा ज्याला मराठी किंवा भारतीय भाषा व वाङ्मय माहीत आहे त्याला मराठीपण किंवा भारतीयत्व तरी नेमकेपणाने माहीत असणे शक्य आहे का? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी तौलनिक साहित्याभ्यासाची खरी गरज आहे. तौलनिक साहित्याभ्यास करत असताना साम्य, भेद, प्रभव व प्रभाव या चारही अंगानी साहित्यकृतींचा अभ्यास करावा लागतो. प्रभावांचा अभ्यास करत असताना साहित्यिकावर कोणत्या घटकाचा प्रभाव पडला आहे हे शोधणे गरजेचे ठरते. साहित्यिक आपले वाङ्मय लिहीत असताना अनेक घटनांचा वापर करतो. परंपरेने चालत आलेले आदिबंध तो साहित्यातून वापरतो. अनेक मिथके, प्रतिमा ,प्रतिके यांचाही तो वापर करीत असतो. त्याच्या लेखनातून मानवी मनाचे दर्शन घडते, मानवी संस्कृतीचे संचित तो उलगडून दाखवत असतो. प्राक्कथा, लोकविद्या, मानसशास्त्रीय, आदिबंध, अनुकरण, परंपरा व नूतनीकरण या साऱ्यांचा प्रभाव त्याच्या साहित्यावर पडत असतो. लेखकाचे साहित्य या प्रभावापासून दूर राहू शकत नाही. या प्रभावाचा विचार आपणास या प्रकरणात करावयाचा आहे.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ प्राक्कथा

वाङ्मयातील प्रभावाचा अभ्यास करत असताना प्राक्कथेचा आपल्याला साकल्याने विचार करावा लागतो. प्राक् म्हणजे प्राचीन/आर्ष किंवा पूर्वी-आगोदर होऊन होऊन गेलेला सांगितलेला असा अर्थ होतो. म्हणजेच प्राचीन लोकसाहित्यातील कथांचा वाङ्मय निर्मितीवर कोणता प्रभाव पडलेला आहे हे पाहावे लागते. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये वाङ्मयीन प्रभावांचा (उद्‌गमाचा) विचार करत असताना साहित्यनिर्मितीच्या विविध अंगांचा विचार करावा लागतो. सर्वच साहित्यकृती या प्राचीन कथांमधून निर्माण झाल्या असे नसले तरी अनेक साहित्यकृतींवर लोककथांचा प्रभाव पडलेला दिसतो. भारतामध्ये अनेक भाषा बोलल्या जातात. विविध जाती-धर्म, पंथाचे लोक राहतात, परंतु या सर्वांमध्ये एक गोष्ट समान दिसते ती म्हणजे कथा सांगणे ही होय. मराठी, हिंदी, कन्नड, बंगाली, तामिळ, तेलगू, मल्यालम इत्यादी भाषेमधून भरपूर कथा आपणास पहावयास मिळतात. त्यातील बहुतांश कथा या दैवतकथा

असल्याचे दिसते. कमी अधिक फरकाने या कथा मौखिक परंपरेने त्या त्या भाषेतील लोकांच्या तोंडी आजही ऐकावयास मिळतात. याच कथाचे कल्पनाबंध व आदिबंध पुढे त्या त्या भाषेतील साहित्यातून अवतरतात. वाङ्मयातील प्रभावांचा अभ्यास करत असताना अशा कथांचा त्या त्या भाषेतील साहित्यकृतीवर कसा व किती प्रभाव पडला आहे हे पाहिले जाते.

प्राक्कथा या अभ्यासकांना, इतिहास संशोधकांना उपयुक्त असतात. या कथांमधून लोकाचार पहावयास मिळतो. संस्कृतीच्या उपासकांचा व पर्यायाने संस्कृतीचा अभ्यास या कथांमधून केला जातो. या लोककथांमधून लोकजीवन, लोकसंस्कृती, लोकमानस यांचे दर्शन घडते. मानवी अतिमानवी योनीतील व्यक्ती, संपन्न व्यक्तिमत्त्वे यांचे दर्शन घडते. समाजजीवन, धर्मजीवन, कुटुंबव्यवस्था व सर्व स्तरावरील लोक आपणास या कथांमधून दिसतात. प्राचीन धर्मग्रंथांचा अभ्यास केला तर महाभारत, रामायण, महाकाव्ये ही एक प्रकारे कथाच आहेत. या कथांचा पुढील साहित्यनिर्मितीवर खूप मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडला आहे. कर्ण ही एकच व्यक्तिरेखा 'मृत्युंजय'मधून येते तशी डॉ. रवींद्र ठाकूर यांच्या 'धर्मयुद्ध' कादंबरीतूनही येते. अनेक पौराणिक कथा या नवीन साहित्यांचा मूलाधार म्हणूनही येतात. क्रौन्च पक्षाचा वध हा रामायणाच्या निर्मितीस कारणीभूत ठरला असे मानले जाते तसे या क्रौन्चवधाचे चित्रण पुढील साहित्यातूनही आलेले दिसते.

दैवतकथांना डलजी असेही म्हटले जाते. निसर्ग, मानव यांच्यातील संघर्ष, निसर्ग शक्तीला प्रसन्न करण्यासाठी केली जाणारी विधिनाटये, विविध धर्मातील, जातीतील याचे बदलते स्वरूप, देवी देवतांच्या कथा, सृष्टीच्या उत्पत्तीच्या कथा या दैवतकथेतून येतात. दंतकथांमधून प्रदेशपरत्वे ऐतिहासिक व पौराणिक घटनेचे मूलाधार सापडतात. राम-परशुराम, नारद, पांडव, गणपती, श्रीकृष्ण, सावित्री, सीता या विविध पौराणिक व्यक्तींच्या दंतकथा आपणास पहावयास मिळतात. प्राणीकथेतून व बोधकथेतून विविध प्राणी-पक्षी यांच्याशी निगडित कथा आढळतात. परिकथा व अद्‌भुतकथांमधून नायक, नायिका यांच्या विशेष चमत्काराच्या, पराक्रमाच्या कथा पहावयास मिळतात. सुष्ट-दुष्टांचा संघर्ष या कथेत पाहावयास मिळतो. हास्यकथेतून शारीरिक, मानसिक व सामाजिक व्यंगावर उपरोधिक भाष्य केलेले दिसते. चातुर्यकथामधून चतुर व्यक्तींचे दर्शन घडते, रूपकथेतून मानवी जीवनाचे उन्नयन, सत्प्रवृत्तीचे दर्शन आपणास घडते. वृत्तकथा व कहाण्या यातून देवताविषयक शुभ-अशुभाशी संबंधित व अशुभ निवारणासाठी रचलेल्या गोष्टी पहावयास मिळतात. लौकिक, परलौकिक, इहवादी, धर्माधिष्ठित असे विविध दृष्टिकोण आपणास या कथामधून दिसतात.

लोककथांचे वाचन करत असताना आपणास प्रामुख्याने एक गोष्ट जाणवते ती म्हणजे लोकांना गोष्ट सांगण्याचे व ऐकण्याचे वेड आहे. तेव्हा या कथांच्या अंतरंगाचा आपण वेध घेतला असता या कथांची जडणघडण विविध घटनांनी झाली असल्याचे दिसते. डॉ. सी. जी. युंग यांनी देशविदेशातील

वाङ्मय तपासले. त्यांनी यातील भौगोलिक, कालिक, सांस्कृतिक विशेष बाजूला काढले आणि उरलेला जो शाश्वत आणि सार्वत्रिक असा मन:प्रवृत्तीचा भाग होता त्याचे विश्लेषण केले, तो भाग म्हणजे आदिबंध होय. ही आदिबंधाची अबोध कल्पना (A kind of unconscious Idea) समूहाच्या सांस्कृतिक परंपरेनुसार जाणिवेत आकार घेते. लोककथा, परिकथा, दैवतकथा या आदिबंधाचे अविष्कार आहेत. कल्पनाबंधातून समूहाच्या झगडयाचा, विजयाचा, पराभवाचा, विकासाचा, आशेचा निराशेचा असा सार्वत्रिक अनुभव अनुस्यूत असतो. असे कल्पनाबंध त्या त्या समाजाच्या मानसिकतेचे निदर्शक असतात. या कल्पनाबंधामध्ये आदिम प्रतीके असतात या प्रतीकांनाच मिथक असे संबोधले जाते. अशा विविध प्रतीकांचा-मिथकांचा प्रभाव साहित्यनिर्मितीवर निश्चितच पडत असतो. कथा, कविता, कादंबरी, नाटक इत्यादी साहित्यप्रकारातून असे विविध आदिबंध व कल्पनाबंध प्रकट होत असतात. जसे जुने आदिबंध प्रकट होतात तशा नव्या आदिबंधाची वीणसुद्‌धा साहित्यनिर्मितीमध्ये घातली जाते. तौलनिक साहित्याभ्यास करत असताना विविध साहित्यप्रकारातून अशा विविध प्राक्कथांचा प्रभाव दिसून येतो व त्याचा अभ्यास केला जातो. भिन्नभाषिक साहित्यातून या प्राक्कथा कशा प्रभावमूलक ठरल्या याचा अभ्यास करत असताना काही समान दुवे सापडतात, काही ठिकाणी वैधर्म्य सापडते मग ही समानता किंवा विविधता कशामुळे आली याचाही शोध प्रभव-प्रभावाभ्यासातून आपणास घेता येतो.

## २.२.२ लोकविद्या

प्राय: मौखिक परंपरेतील व जानपद समुदायाचे साहित्य, ललित कथा, श्रद्‌धा, समजुती, सुभाषिते इ. अमूर्त व अभौतिक संस्कृतीच्या विविध प्रकारांचा समावेश लोकविद्या या संकल्पनेत होतो. सामाजिक मानसशास्त्राच्या अभ्यासकांच्या भूमिकेतून 'फोकलोअरचे' स्वरूप व व्याप्ती प्रस्तुत मुद्यांमध्ये करण्यात आलेली आहे.

जानपद समुदायाच्या अनेक वर्षाच्या निसर्गबद्ध जीवनक्रमातून लोकविद्या साकारलेली असते. मर्यादित भौगोलिक क्षेत्रातील वसतिस्थान, समुदायाचा लहान आकार, नागरी जीवनाच्या संपर्काचा अभाव किंवा क्वचित संपर्क, कुटुंबकेंद्रित व्यवसायाचे प्राधान्य, व्यवसायात यांत्रिकीकरणाचा व विशेषीकरणाचा अभाव, परिणामी व्यवसायभिन्नतेमुळे निर्माण होणाऱ्या व्यक्तिजीवनाच्या भिन्नतेचा अभाव, पर्यायाने व्यक्तीचे सामान्यीकरण व अनुभवसादृश्य एकूण सामाजिक परिवर्तनाचा अभाव या वैशिष्टयांमुळे समुदाय जीवन विशिष्ट चाकोरीत स्थिरावलेले असते. माणसा-माणसातीलच संबंधांनाही निश्चित व अंतिम असे स्वरूप प्राप्त झालेले असते. परिसरातील भौगोलिक वैशिष्टयांनाही. समुदायाच्या जीवनात विशिष्ठ असे स्थान प्राप्त झालेले असते. डोंगर, नदी, वटवृक्ष गावालगतची एखादी टेकडी याबद्दलच्या आख्यायिका अगर दंतकथा समुदायामध्ये प्रसृत होतात. समुदायाच्या अस्मितेमध्ये या दंतकथांना वा आख्यायिकांना विशेष स्थान प्राप्त झालेले असते. या भौगोलिक परिसराबद्दल, त्यातील विविध वैशिष्टयांबद्दल,

समुदायातील विविध व्यावसायिकांबद्दल त्यांच्याशी येणाऱ्या नित्य-नैमित्तिक अशा संबंधाबद्दल अनके आखाडे, समजूती निश्चित झालेल्या असतात. या सर्वांचा समावेश लोकविद्या या संकल्पनेत होतो. जानपद समुदायाचा जीवनक्रम निसर्गाने व्यापलेला असतो. ऋतुचक्राच्या प्रभावाखाली व त्याला अनुसरून जनजीवनाची रहाटी चालू असते. वैयक्तिक व सामूहिक जीवनातील सुख-दुःखे या नैसर्गिक घडामोडींशी आणि कौटुंबिक जीवनाच्या रहाटीशी निगडित असतात. आनंदोत्सवाचे प्रसंग तथा भावना हेलावणाऱ्या इतर घटना त्या स्तरावरच्या असल्यामुळे त्याबद्दलच्या भावना व प्रतिक्रियाही सारख्याच असतात. याचा परिणाम म्हणून भावना व्यक्त करण्याकरिता एखादे कलामाध्यम स्वीकारले जाते. उदा. काव्य, चित्रकला शिल्पकला, नृत्य, नाटय, संगीत व त्याला समुदायाचे प्रातिनिधिक असे स्वरूप प्राप्त होते या कलाकृतीने वस्तूविषयही सर्वांच्या जीवनात क्रमाने घडणाऱ्या बऱ्या वाईट घटनांशी निगडित असे असतात. जन्म, मृत्यू, विवाह, लेकीची सासरी पाठवणी, सासुरवाशिणीची माहेरची ओढ, सासू-सून, भावजय-नणंद, दीर-भावजय आदी नात्यांतील भावसंबंध हे व असे प्रसंग सर्वांच्याच आयुष्यात येणारे आणि म्हणून सर्वांच्याच अनुभूतीचे, भावना हेलावणारे असल्याने जानपद समुदायाच्या लोकसंगीतामध्ये अन्य आविष्कारांत त्यंना प्राधान्य मिळते. या समुदायाचे जीवन हे उदरनिर्वाहाचे प्रमुख वा एकमेव साधन असेलेल्या शेतीशी निगडित झालेले असते. आणि शेती तर संपूर्णपणे निसर्गावर म्हणजे नैसर्गिक ऋतुचक्रावर अवलंबून असते. त्यामुळे पेरणीचे व सुगीचे दिवस उत्साहाचे व आनंदाचे असतात. शेतीला वरदान ठरणारा पावसाळा तर अनेक उत्साहपूर्ण प्रसंगांनी भरलेला असतो. पिकाची कापणी झाल्यावर उन्हाळयात पुढील वर्षीच्या प्रारंभापर्यंत शेतकऱ्यांना मोकळीक असते. तेव्हा सर्वत्र लग्नसराई असते. खेळ-करमणुकीसाठी हेच दिवस निवडले जातात. पावसाळयात शेतकामाचा भर असल्यामुळे सर्वत्र उत्साहाचे सामूहिक तथा कौटुंबिक सहकार्याचे वातावरण असते. हा उत्साह व आनंद या काळातील अनेक सण-समारंभ आणि त्यांना आलेले सार्वजनिक स्वरूप यातून व्यक्त होतो. सण-समारंभात नृत्य, संगीत, काव्य यांचाही भरणा असतो.

जानपद समुदाय हा मुळातच निरक्षर असल्यामुळे निसर्गात प्रत्यही दिसून येणाऱ्या अनेक घडामोडींविषयी त्यांच्यात अत्याधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोण अगर अभिक्रम दिसून येत नाही. तथापि अनुभवांच्या आधारे उपजीविकेच्या विविध साधनांचा वापरामध्ये त्यांच्यात नकळत अनुभवजन्य ज्ञान-दृष्टी आलेली असते. शेतीकाम, पशुपालन, मासेमारी, शिकार इ. प्रसंगी ते वापरीत असलेली हत्यारे वा त्यांनी लढविलेल्या हिकमती यांच्या बुडाशी अप्रत्यक्षपणे अनुभवाने मिळविलेल्या शास्त्रीय दृष्टिकोणच असतो. परंतु याची जाण त्या लोकांना नसते. त्यांच्या मते त्यांच्या जीवनातील विविध प्रसंगी त्यांना यश वा अपयश मिळणे हे विविध अतिद्रिंय शक्तींना संतुष्ट करून त्यांच्या कृपादृष्टीचा लाभ व्हावा, म्हणून विविध विधीनिषेध, व्रतवैकल्ये व कर्मकांडे यांचे काटेकोर पालन व या सर्वांविषयी माहीतगार व प्रशिक्षित पुरोहित वर्ग यांचाही प्रवेश समुदाय संस्कृतीत होतो. आणि आचरणाचे विविध प्रकार व त्यामागची भूमिका यांची भर पडते.

जानपद समुदायात प्रचलित असलेल्या व त्यांना लोकविद्येत समाविष्ट असलेल्या संर्वच कला-साहित्य प्रकारांना निसर्गक्रमाच्या जाणिवेची व अनेक वर्णाच्या चाकोरीबद्ध जीवनातून आलेल्या अनुभवजन्य शहाणपणाची पार्श्वभूमी असते. किंबहुना हे शहाणपणच त्यांच्या उक्तीतून कृतीतून व्यक्त होत असते. निसर्गचक्र एकजिनसी, समाजजीवन व्यक्तीजीवन व जीवनरहाटी याबद्दलचे त्यांचे तत्त्वज्ञान व त्यांचे व्यवहार चातुर्य त्यांच्या मैखिक साहित्यामधून व्यक्त होते. या मौखिक साहित्यात लोकगीते व लोकनाटये येतात. त्याचप्रमाणे त्यांची अस्मिता जपणाऱ्या दंतकथा, पुराणकथा, ऐतिहासिक मागोवा घेणाऱ्या अख्यायिका ध्यानी येतात.

लोकविद्या ही संकल्पना अस्तित्वात नव्हती तेव्हा शास्त्रज्ञांच्या प्राथमिक अवस्थेतील अगर आदिवासी लोकांच्या मौखिक परंपरेबद्दलची जिज्ञासा वरील विषयापुरतीच मर्यादित होती. 'लोकविद्या' या संकल्पनेचा निर्देश अगदी प्रथम विल्यम थॉमस (१८०३-१८८५) या इंग्रज वास्तुशोधकाने 'ॲम्ब्रोस मर्टन' या टोपण नावाखाली लंडनच्या 'द ॲथेनीयम' या नियतकालिकात प्रसिद्ध केलेल्या पत्रात केला होता. (१८४६) 'लोकविद्या' या संज्ञेखाली जुन्या काळाच्या चालीरीती, रूढी, विधिनिषेध, लोकश्रद्धा, पोवाडे, सुभाषिते इत्यादींची नोंद व्हावी,म्हणजे नामशेष होत चाललेल्या लोकसाहित्याच्या अवशेषांचा पुढील अभ्यासकांना उपयोग होईल, असे त्याने आग्रहाने प्रतिपादन केले. लोकविद्येची व्याप्ती नंतरच्या काळात अधिकच विस्तारत गेली. १८८८ मध्ये 'अमेरिकन फोकेलोअर सोसायटी' नावाची लोकविद्याविषयक संस्था अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात स्थापन झाली. सुरूवातीच्या काळात केवळ अप्रगत अगर प्राथमिक अवस्थेत असलेल्या जातीमधील लोककथा, अख्यायिका, लोकश्रद्धेचे प्राबल्य दाखविणारी माहिती संकलित करून तिची संगतवार मांडणी करून प्रसिद्ध करणे, एवढयापुरतीच लोकविद्येविषयी आस्था मर्यादित होती. संकलनात आलेल्या संस्कृतिविशेषांचा अर्थ लावणे अगर त्यांची स्पष्टीकरण देणे याचे फारसे महत्त्व सुरुवातीच्या काळात वाटत नव्हते. आदिम अगर प्राथमिक अवस्थेतील जमातींच्या संस्कृती ही निकृष्टच असणार अशा पूर्वग्रहातून संकलित माहितीच्या अर्थ लावला जात असे. एकोणिसाव्या शतकांच्या अखेरीस आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीस होऊन गेलेल्या लोकविद्येचे दोन प्रमुख संकलक मानवशास्त्रज्ञ म्हणजे जेम्स जॉर्ज फ्रेझर (१८५४-१९४१) आणि फ्रंटस बोऑस (१८५८-१९४२) हे होते. फ्रेझर यांनी १८९० मध्ये 'द गोल्डन बाऊ' नावाचा द्विखंडात्मक ग्रंथ लिहून त्यात धर्म आणि विज्ञान यातून उत्क्रांत होत गेलेल्या मानवी विचारांचा आढावा घेतला. बोऑस यांनी कॅनडामधील आदिवासी जमातीचा अभ्यास केला असून दंतकथा व लोककथा यांच्यासंबंधी विवेचन केले आहे. सुरुवातीच्या सामाजिक व सांस्कृतिक मानवशास्त्रज्ञांचे अभ्यासविषय हे धर्म श्रद्धा, समजूती, लोककथा, दंतकथा, आख्यायिका कर्मकांडे म्हणजे लोकविद्येत मोडणारे विषय होते. त्यातही धर्म आणि पुरोहित भगत वा वैदू व ते पीडा निवारण्याकरिता अगर रोग निवारण्याकरिता आचरित असलेली जादूटोणा, मंत्रतंत्र इ. अघोरी वा सौम्य कर्मकांडे, पाप-पुण्याच्या कल्पना इ. विषयांबद्दलची जिज्ञासा अधिक तीव्रतेने

जाणवते. या खालोखाल विवाहसंस्था, कुटुंबव्यवस्था, पतीपत्नी संबंध, त्यानंतर जमातीतील छोटया-मोठया गटांची रचना त्यांचे परस्परसंबंध त्यांचे हक्क व कर्तव्ये इ. समाजसंघटनेचे विषय येतात.

सांस्कृतिक वैशिष्ट्यांची आणि वैचित्र्यांची संगतवार नोंद करण्याचा उत्साह ओसरल्यानंतर त्याच धर्मसमजुती आणि कर्मकांडे यांचा स्पष्टीकरणात्मक अभ्यास करण्याकडे शास्त्रज्ञांचा कल दिसू लागला. विज्ञाननिष्ठ भूमिकेतून समजल्या जाणाऱ्या अंधश्रद्धा आणि त्यातही जादू, अभिचार आणि चेटूक या परस्परसंबंध विषयांकडे काहींचे लक्ष गेले. बहुतेक वन्य जमातींमध्ये या चमत्कार-त्रिकुटाचे अस्तित्व दिसून येते. एडवर्ड एव्हान एव्हान्झ-पिचर्ड या नामवंत ब्रिटिश मानवशास्त्रज्ञाने या त्रिकुटाच्या स्पष्टीकरणा-करिता अझांडे जमातीचा १९३७ मध्ये अभ्यास केला. बॉनीस्ला कास्पेर मॉलिनोस्की (१८८४-१९४२) या प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञाने 'मॅजिक सायन्स अॅड रिलिजन अॅड अदर इमेज' नावाचा ग्रंथ प्रसिद्ध केला. (१९१६) वन्य जमातीची संस्कृती-वैचित्र्यांचे स्पष्टीकरण कार्यात्मक विश्लेषणाद्वारे देणाऱ्यांमध्ये हे अग्रगण्य होत. सांप्रत ६२ विद्यापीठांमध्ये लोकविद्येचा अभ्यास आणि संशोधन चालू आहे. भारतातील मद्रास विद्यापीठामध्ये 'लोकविद्या' हा पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा स्वतंत्र विषय बनला आहे.

अशा लोकपरंपरेतील श्रद्धांवर आधारित कर्मकांडांबरोबरच लोकवाङ्मयाचा (लोककथा, दंतकथा, लोकगीते इ.) अभ्यासही तिकक्याच आस्थेने केला जात आहे. काही लोककथा सर्व भूप्रदेशांत प्रचलित आहेत. लोककला अगर दंतकथा हया केवळ वाङ्मयातील कृती आहेत म्हणून चालणार नाही. तर त्यात त्या त्या जमातींच्या संस्कृतीचे वर्णन आढळते. फ्रॅटस बोऑस यांनी उत्तर अमेरिकेतील त्सिमशीयन इंडियन नावाच्या जमातीमध्ये प्रचलित असलेल्या दंतकथांचा अभ्यास करून त्यांची भौतिक संस्कृती अर्थव्यवस्था, सामाजिक संघटना, धार्मिक श्रद्धा, व्यक्तिजीवनचक्र त्यांच्यातील गुप्त संघटना, त्यांची नीतिमत्ता आणि त्यांचे भावजीवन याविषयी माहिती उपलब्ध होत असल्याचे दाखवून दिले आहे. लोकवाङ्मय म्हणजे संबंधित जमातीचे आत्मकथन होय, असे बोऑस यांनी प्रतिपादन केले आहे. दंतकथांचा अभ्यास त्या त्या जमातीचा इतिहास, मूल्ये, आशा-आकांक्षा, आदर्श इ. माहितीकरिता आवश्यक वाटतो. त्याप्रमाणे ठराविक अगर एकच लोककला भिन्न प्रदेशातील लोकांमध्ये प्रचलित असलेली दिसून आल्यास तिच्या अभ्यासातून त्या लोकसमूहांच्या परस्परसंपर्कावर, त्यांच्या पूर्वनिवासस्थानांवर तसेच त्यांच्या स्थलांतरावर प्रकाश पडू शकतो.

अलिकडे दंतकथांच्या अभ्यासाच्या संदर्भात एक वेगळाच अभिक्रम फ्रान्समधील प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ क्लो द लेव्हीस्ट्राऊस यांनी १९६३ मध्ये प्रसिद्ध केलेल्या स्ट्रक्टरल अँथ्रपॉलॉजी या ग्रंथामध्ये प्रतिपादिला आहे. या अभिक्रमास 'संरचनावाद' असे म्हटले जाते. सामाजिक घटनांचे अगर प्रक्रियांचे विश्लेषण करून त्यांची कारणमीमांसा देण्यामागे सामाजिक मानवशास्त्रज्ञांमध्ये नेहमी ऐतिहासिक व तुलनात्मक अशा दोन अभिक्रमांचे द्वंद आपणास पहावयास मिळते. लेव्ही-स्ट्राऊस यांच्यापूर्वी सामाजिक मानवशास्त्रज्ञ

हे दंतकथांचा अर्थ संबंधित जमातीच्या ऐतिहासिक संघटनात्मक संदर्भातच लावीत असत. पंरतु लेव्ही-स्ट्राऊस यांनी अनेक जमातीमध्ये प्रचालित असलेच्या दंतकथांच्या संरचना म्हणजे कथांची चौकट अगर माडणी यांचा तुलनात्मक अभ्यास केला त्यांना त्यात विलक्षण साम्य दिसले म्हणून त्यांनी दंतकथांचे मूळ मानवी मनाच्या क्रियाप्रकियांमध्ये आहे, असे प्रतिपादले आहे. दंतकथांच्या संरचनेच्या अभ्यासाच्या आधारे हा निष्कर्ष काढलेला असतो, म्हणून या अभिक्रमात 'संरचनावाद' असे म्हटले जात असावे. लेव्ही-स्ट्राऊस यांच्याही आधी ल्यूसॅ लेव्ही-ब्र्यूल याने प्रतिपादिलेंल्या आदिम मानसशास्त्र म्हणजेच तर्कपूर्व तर्कविरहित-तर्कशून्य मनोरचना या सिद्धान्तास इतर अनेकांप्रमाणे लेव्ही-स्ट्राऊस यांनीही मान्यता दिलेली नाही. लोकसाहित्याचा अभ्यास मानवशास्त्रज्ञ आणि भाषाशास्त्रज्ञ यांनी एका वेगळया अभिक्रमातून केला आहे. समाजशास्त्र आणि सामाजिक मानवशास्त्र यांमध्ये संरचना आणि कार्य हा अभिक्रम अलीकडे आधिक लोकप्रिय झालेला दिसतो. लोकसाहित्यातही हा अभिक्रम लागू केला तर व्याकरण आणि वाक्यसंरचना यांना फारसे महत्त्व न देता त्यातून व्यक्त होणारा अर्थ - विदित होणारा संदेश याला महत्त्व देण्यात येऊ लागले. यालाच 'शब्दार्थविद्या' असे नाव देण्यात आले. शब्दार्थाला वाक्याच्या उच्चार पद्धतीला सामाजिक संदर्भ असतो. शब्दाला कोणत्या संदर्भात कोणता अर्थ प्राप्त होतो हे वाक्यरचनेवरून सांगता येत नाही. तर ते समजून होण्याकरिता सामाजिक संदर्भ समजून घेणे, उच्चारलेच्या वाक्याचे कार्य कोणते हे समजून घेणे आवश्यक ठरते.

लोकविद्या ही सीमित प्रदेशातील जनसमुदायामध्ये मौखिक परंपरेने आलेल्या लोकवाड.मय, लोकसंगीत लोकनृत्य, श्रद्धा समजुती, विविध कर्मकांडे या स्वरूपात असली तरी व्यापक बृहद् समाजाचाच तो एक अविभाज्य भाग असतो बृहद्‌परंपरेची ती एक छोटी प्रतिकृती असते. अशा रीतीने सीमित जनसमुदायाची लोकविद्या आणि बृहद्समाजाची बृहद्‌संस्कृती - परंपरा यात साधर्म्य असते.

या सर्व लोकविद्यांचा प्रभाव हा साहित्यावर पडलेला आहे. साहित्याची निर्मिती होत असताना लोकमानस हेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे दिसते.या लोकमानसाचा आविष्कार म्हणजेच लोकविद्या ही साहित्याचा मूलाधार असल्याचे दिसून येते.तौलनिक साहित्याभ्यास करत असताना लोकविद्यांचा नेमका प्रभाव कसा व किती पडला आहे हे पाहणे अगत्याचे ठरते. त्यामुळेच लोकविद्यांचा प्रभावाभ्यास हा अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. विविध भाषिक साहित्यकृतींतून लोकविद्येचा प्रभाव आपणास कसा जाणवतो हे तौलनिक साहित्याभ्यासातून तपासले जाते. त्यातून भारतीय किंवा जगभरातील साहित्यकृतींचे नेमके मूलाधार काय आहेत हे अभ्यासकांना समजून येण्यास मदत होते.

## २.२.३ मानसशास्त्रीय प्रभाव

साहित्याचा आणि मानसशास्त्राचा संबंध हा अतिशय जवळचा आहे. कोणताही साहित्यिक हा

निर्वात पोकळीत जगत नाही. तो ज्या समाजात जगतो त्या समाजाचे आचारविचार, रूढी-परंपरा, लोकभ्रम, लोकमानस, लोकसंस्कृतीचा तो वाहक बनतो. समाजातील विविध धर्म, संस्कृती, जाती यांच्याशी त्याचे नाते असते. अनेकविध व्यक्तींच्या संपर्कात तो येतो. त्यावेळी त्याच्या मानसिक आंतरक्रियामध्ये अदलाबदल होत असते. या सर्व आंतरक्रियांचे साद-पडसाद आपोआपच साहित्यातून उमटतात. एक व्यक्ती म्हणून किंवा त्याचे व्यक्तिमत्त्व हे समाजामुळेच खुलून दिसते. समाज नसता तर व्यक्ती व त्याच्या व्यक्तिमत्त्वाला अर्थही उरला नसता. त्यामुळे व्यक्तिमत्त्व ही त्या व्यक्तीची स्वत:ची आणि समाजाची एकत्रित देण असते. विविध भाषा, प्रांत व त्या साहित्यिकाचे स्वतंत्र अस्तित्व मानसशास्त्राच्या दृष्टीने साहित्यातून अवतरते. एखाद्या व्यक्तीचे अविष्कार हे त्याचे स्वतंत्र न राहता काही वेळा समाजाचे होतात कारण त्याचा स्वीकार इतर समाज घटकांनी केलेला असतो. मुळात हे संस्कार येतात तेही समाजातून व कुटुंबातूनच, या सर्वांचे प्रतिबिंब साहित्यातून पडते. एकूणच एखाद्या काळाचा, तत्कालीन समाजाचा अभ्यास करावयाचा असेल तर त्या काळातील साहित्यकृतींचा अभ्यास करणे महत्त्वाचे असते.

तौलनिक साहित्याभ्यास करत असताना विविध भाषेतील साहित्यकृतींचे तौलनिक मूल्यमापन केले जाते. त्यावेळी त्या साहित्यकृतीचे मूलाधार काय आहेत किंवा त्या साहित्यकृतीचा दुसऱ्या कोणत्या कलाप्रकारांवर किंवा साहित्यावर नेमका प्रभाव पडला आहे हे तपासले जाते. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये प्रभव व प्रभावांचा अभ्यास हा अतिशय महत्त्वाचा मानला जातो. विविध भाषिक प्रभावांचा अभ्यास करताना मानसशास्त्रीय प्रभावाचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. कारण समूहाच्या मानसिक वृत्ती-प्रवृत्ती या साहित्यातून उमटलेल्या असतात. उदाहरण पाहायचे झाले तर चिं. त्र्यं. खानोलकर यांच्या 'चानी' या कादंबरीचे पाहता येईल. लोकमानसातील गैरसमजुती, अंधश्रद्धा याचा पगडा समाजमनावर पडलेला असतो त्याचा वापर करून स्वत:चा स्वार्थ साधणारी व एरव्ही चानीचा स्पर्शही विटाळ मानणारी माणसे अगदी देवळातसुद्धा चानीशी लगट करतात. यासारख्या मानवी वृत्ती-प्रवृत्ती हा मानसशास्त्राचा विषय आहे. अशा अनेक कादंबऱ्या आपणास मराठी साहित्यातून पहावयास मिळतात तशा इतर साहित्यातूनही पहावयास मिळतात. हिंदी साहित्यातील फणीश्वरनाथ रेणू यांची 'मैला आँचल' ही कादंबरीही आपणास मानसशास्त्रीय दृष्टीने अभ्यासता येईल. गिरीश कर्नाड यांची 'हयवदन' ही कलाकृतीसुद्धा मानसशास्त्रीय अभ्यासाचा एक उत्तम नमुना म्हणून आपणास अभ्यासता येईल. बुद्धी व शरीर यात महत्त्वाचे काय? हा प्रश्न सामाजिक नीतिनियम, संकेत, शुभ-अशुभ, व सांस्कृतिक परंपरा यांच्याशी निगडित असल्याने वाचकालासुद्धा हा प्रश्न सतावत राहतो. रामायणातील एका 'क्ष' व्यक्तीच्या सांगण्यावरून रामानेही सीतेला ती गर्भवती असताना वनात सोडलं, महाभारतातील प्रिय पत्नीचे चिरहरण होत असताना नवरे नावाचे प्राणी षंढ होऊन बसले होते या मानसिकता अनेक साहित्याच्या मूलाधार बनून येतात. केवळ मराठी भाषेतीलच नव्हे तर विविध भारतीय भाषांमधून असे मानसशास्त्रीय प्रभाव आपणास जागोजागी पहावयास मिळतात.

‘लोकसाहित्यातून समूहमनाचा आविष्कार झालेला असतो’ असे प्रभाकर मांडे लोकसाहित्याची व्याप्ती सांगताना म्हणतात. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये हे समूहमनही तितकेच महत्त्वाचे ठरते. व्यक्तीची मानसिक जडणघडण ही त्या-त्या समूहमनाचा एक भाग असते. व्यक्तीचे जसे मानसशास्त्र असते तसे त्या-त्या समूहाचेही ‘सामूहिक मानसशास्त्र’ असते. मग ‘सिग्मंड फ्राइड’ने सांगितलेला ‘इडिपस मनोगंड’ ‘कॉम्प्लेक्स मनोगंड’, ‘कुटुंबाचा न्यूक्लियर मनोगंड’ हे साहित्यातून कसे अवतरतात हे पाहणे तौलनिक साहित्याचा अभ्यासविषय आहे. तौलनिक साहित्याभ्यासातील प्रभावाचा विचार करताना या मनोगंडाचा प्रभाव साहित्यकृतीवर नेमकेपणाने कसा पडला आहे हे पाहणेही अगत्याचे ठरते. समूहाला लोकमन (Volkgeist) असते असे लाझारस आणि स्टाईनथाल यांनी संशोधनाच्या आधारे स्पष्ट केले आहे. (लोकसाहित्याचे स्वरूप-प्रभाकर मांडे पान नं.६३) या लोकमनाचा प्रभाव साहित्यकृतीवर निश्चितपणे पडलेला जाणवतो. या समूहमनाचा आविष्कार, समूहाची भाषा, पुराणकथा, लोकसाहित्य, कला, वाङ्मय, रूढी यातून आविष्कृत होतो. तौलनिक साहित्याभ्यास करत असताना हा आविष्कृत झालेला प्रभाव नेमका कसा झाला आहे? व किती प्रमाणात पडला आहे? याचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. भाषा, रूढी व मिथ्स यांनी माणसाची विचारशक्ती नियंत्रित होत असते. साहित्यिकाने भाषिक आविष्कार करत असताना संबंधित कलाकृतीमध्ये भाषा ही नेमकेपणाने कशी वापरली आहे? म्हणी, वाक्प्रचार, उखाणे आहाणे याचा किती वापर केलेला आहे? रूढींचा निर्देश व मिथकांचा रंगाविष्कार त्या साहित्यकृतीतून कसा येतो? याचा विचार तौलनिक साहित्याच्या अभ्यासकांने करावयाचा आहे. विविध भाषांतील साहित्यकृतीमधून अशा प्रकारचा मानसशास्त्रीय प्रभाव कसा येत गेला आहे त्या काळाची भाषा कोणती आहे याबरोबरच त्यातून व्यक्त होणारे लोकमानस अभ्यासवयाचे आहे.

फ्रॉईडच्या मते ‘साहित्याची उत्पत्ती ही स्वप्नातून झाली.’ (प्रभाकर मांडे, लोकसाहित्याचे स्वरूप पान नं. ६४) मग मनोविश्लेषणशास्त्राच्या आधारे विविध भाषिक कलाकृती तुलनाकाराला अभ्यासता येतील यात मुळीच शंका नाही एकूणच तौलनिक साहित्याभ्यासामध्ये मानसशास्त्रीय प्रभावाचा अभ्यास हा अतिशय गरजेचा ठरतो त्यातून साहित्यकृतीची उकल, आकलन व आस्वादन योग्य प्रकारे होते.

## २.२.४ आदिबंध प्रभाव

प्रत्येक व्यक्ती एकाच वेळी तो स्वतंत्र असतो व त्याच वेळी तो समाजगटाशी बांधलेला असतो. व्यक्तीला स्वत:चे विचारविश्व असते त्यातून त्याची जीवनदृष्टी विकसित होते. ही जीवनदृष्टी विकसित होत असताना त्याला काही सभ्यता व संस्कार पाळावे लागतात. एकप्रकारे मनुष्य हा त्या त्या समाजाच्या संस्कृतीचा वाहक असतो. ही वहनप्रक्रिया प्रत्यक्षात जशी होते तशी मानसिकही होत असते. क्रोबर आणि क्लुक ओहन यांनी लोकमनाची संकल्पना स्पष्ट करताना 'Personality in Culture' ही संज्ञा वापरली आहे. यातील 'Persona' आणि 'Culture' या दोन्ही गोष्टी माणसाचे आचारविचार नियंत्रित करत

असतात तशा साहित्याचेही सांस्कृतिक अनुबंध तयार करतात. हे अनुबंध तयार होत असताना साहित्याचीही संस्कृती एकप्रकारे तयार होते. दुर्गा भागवत यांच्या मते संस्कृती म्हणजे सकळ इंद्रियांना लावलेले वळण असते. मग साहित्याची इंद्रिये कोणती? साहित्यातून व्यक्त होणारी वाङ्मयातील मूल्ये, जीवनमूल्ये, सांस्कृतिक घटिते ही त्या त्या संस्कृतीचा परिपाक असतो. हे सर्व घडत असताना मानवी मनातील आदिबंध हे त्या त्या साहित्यकृतीला कसे नियंत्रित करतात हे आदिबंधाच्या प्रभावाभ्यासातून आपणास पाहता येते.

आदिबंध म्हणजे एखाद्या वस्तूचे मूलरूप किंवा मूल आकृतीबंध होय. 'Archetype' हा शब्द 'Arche + typos' या दोन ग्रीक शब्दांनी मिळून उत्पत्तिस्थान/आदिकारण असा अर्थ होतो, तर typos म्हणजे आकृतिबंध, नमुना रूप, बंध, प्रकार असे अर्थ होतात. (गंगाधर पाटील, समीक्षामीमांसा, पान नं. १६१) साहित्यातून प्रकट होणारी किंवा प्रत्यक्ष जीवनात अनुभवास येणारी स्वप्ने, मिथके, विधिनाटये यातून मानवी जीवनधर्म, वृत्तिप्रवृत्ती व कृतींचे अनेकविध आदिबंध प्रकट होतात, असे गंगाधर पाटील म्हणतात. मानवी जीवनातील जन्म, मृत्यू व वाढ या तीन आदिम अवस्था उत्पत्ती-विकास-लय या एकसमान आकृतिबंधातून दिसून येतात. लोकसाहित्यातून येणारे सूर्य, चंद्र, तारे यांच्या कथांमधून, मिथकांमधून असे आकृतिबंध आदिबंधाच्या स्वरूपात प्रकट होताना दिसतात. ब्रम्हा हा सृष्टीचा कर्ता, विष्णू हा पालनहार तर शंकर हा संहारक म्हणून अनेक कथागीतातून आलेले दिसतात. उत्पत्ती-विकास-लय हे आदिबंध या त्रिमूर्तीच्या प्रतीकातून आपणास दिसतात. सत्य-शिव-सुंदर हाही आदिबंध अनेक साहित्यकृतींचा मूलाधार आहे. अशा प्रकारचे मूलाधार विविध साहित्यप्रकारातून कसे येतात हा तुलनाकाराचा अभ्यासविषय आहे. तौलनिक साहित्याभ्यास करत असताना विविध वाङ्मयप्रकारामध्ये विविध भाषेतून हे आदिबंध कसे प्रकट होत गेले हे तपासता येते.

''आदिमत्व, साधारणत्व व सर्वस्पार्शित हे गुणविशेष धारण करणाऱ्या आणि सातत्याने पुनरावर्तित होणाऱ्या पात्र-प्रतिमा, घटना-प्रसंग, रस-भाव, वृत्ती-प्रवृत्ती, कथाबंध इत्यादींच्या मूल आकृतिबंधाना साहित्यगत आदिबंध म्हणता येईल.'' असे गंगाधर पाटील यांचे मत आहे. साहित्यामध्ये नायक, खलनायक, प्रियकर, प्रेयसी, पतिव्रता, आई अशी विविध पात्रे आदिबंधाच्या रूपात प्रकट होतात. लोकसाहित्याचा अभ्यास करत असताना बृहत्कथा, पंचतंत्र, वेताळपंचविशी, सिंहासनबत्तीशी, शुकसप्तती, जातककथा, नीतिकथा यातून अनेक सुष्ट दुष्ट व्यक्ती वाचकांसमोर येतात. या कथांमधून वरील आदिबंध प्रभावक म्हणून पुढील साहित्यकृतींतून प्रसवतात अशा प्रभावमूलक आदिबंधाचा तौलनिक साहित्याभ्यासामध्ये साहित्याच्या आकलन व आस्वादनासाठी अधिक चांगल्या प्रकारे वापर करता येतो.

कार्ल युंग याने आदिबंधाची ही संकल्पना मानवी मनाशी निगडित आहे असे मानले आहे. मानवी मनाचे तीन स्तर त्याने मानले असून मनोव्यापार हा (१) जाणिवेचा किंवा संज्ञेचा स्तर, (२) व्यक्तिगत

नेणिवेचा स्तर 'स्वीय असंज्ञा', (३) सामूहिक नेणिवेचा स्तर या तीन स्तरावर चालतो. यातील मानवी मनोव्यापारातून मनाचे समग्र रूप तयार होते. सामूहिक नेणिवेचा स्तरामध्ये मानवजातीच्या असंख्य पिढयांचे अनुभवविश्व साठवलेले असतात असे युंगला वाटते. या सामूहिक नेणिवेतील असंख्य जीवनजाणिवा व प्रवृत्ती या वेगवेगळया प्रतिमातून साकारत असतात या आदिम संघटकाला आदिबंध असे म्हटले जाते. या आदिबंधाचे एक टोक मानवाच्या सहजप्रवृत्तीत तर दुसरे प्रतिमांनी साकार झालेल्या आदिबंधात सापडते. युंगच्या मते 'अनिमा' हा पुरूषांच्या मनात असणारी स्त्री प्रतिमा, 'अनिमस' हा स्त्रीच्या मनातील पुरुषप्रतिमा असते. हे अनिमा, अनिमस, ज्ञानवृद्ध, आदिमाता, पिता, छाया, व 'स्व' हे प्रमुख आदिबंध मानले जातात. (गंगाधर पाटील, 'समीक्षामीमांसा', पान नं. १६३) तर मॉड बॉडकिन या समिक्षकेच्या मते १) एखाद्या समाजाच्या सांस्कृतिक भावसृष्टीत व काव्यसृष्टीत सातत्याने पुनरावर्तित होणाऱ्या अनेकविध आदिप्रतिमांचा शोध घेऊन त्यांच्या विविध रूपांचा व आकृतिबंधाचा तुलनात्मक अभ्यास करता येईल व २) तसेच अशा प्रकारच्या काव्यगत आदिप्रतिमांना प्रतिसाद देणाऱ्या रसिकाच्या मनातील आंतरिक अनुभवांचा अभ्यास करता येईल. (गंगाधर पाटील, समीक्षामीमांसा, पान नं. १६४) या दोन्ही गृहितकांचा विचार केला असता आपणास असे दिसून येते की विविध आदिबंध आपणास साहित्यकृतीच्या अंगाने व रसिकांच्या अंगाने तपासता येतात. तौलनिक साहित्याभ्यास करत असताना विविध भाषिक साहित्यकृतींतून असे साहित्यगत आदिबंध व रसिक वाचकातील आदिबंध आधिक चांगल्या प्रकारे अभ्यासता येतात.

मानवी जीवनातील जन्म-तारुण्य, प्रौढत्व, वृद्धत्व-मरण या चार जीवनावस्था अनुक्रमे वसंत, उन्हाळा, पानगळ, हिवाळा, अशा चार ऋतूमधून प्रतिबिंबित होतात साहित्यातून व्यक्त होणारे लय, विकास, ऱ्हास हे चार ऋतूंच्या आदिबंधातून प्रकट होतात. पिढयांनपिढया मानवी मनातून साठत आलेले असे अनेक आदिम आदिबंध साहित्यातून प्रसवतात. कथा, कविता, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, नाटक, प्रवासवर्णने, ललितगद्य अशा विविध साहित्यप्रकारातून येणारे आदिबंध व त्यांचा साहित्यावर नेमकेपणाने पडलेला प्रभाव तौलनिक साहित्याभ्यासात महत्त्वाचा अभ्यासविषय ठरतो.

## २.२.५ परंपरा आणि नूतनीकरण

मानवाच्या जीवनामध्ये परंपरांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. मानवाचे संपूर्ण जीवन नियंत्रित करण्यामध्ये परंपरांचा महत्त्वाचा वाटा आहे. या परंपरा पिढयानपिढया चालत आलेल्या असतात. त्या आदिबंधात्मक असतात. मूर्त व अमूर्त असे अनेक आदिबंध या परंपरांमधून आपणास पहावयास मिळतात. प्राचीन संस्कृतीचे अवशेष परंपरातून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असतात. अनेक प्रकारचे कल्पनाबंध संस्कृतीतून जपले जातात. संस्कृती ही परिर्वतनशील असते. काळानुरूप त्यात विविध बदल होत असतात. जुन्या कल्पनांचे नूतनीकरण होत असते. अशा बदलत गेलेल्या संस्कृतीच्या

पाऊलखुणा त्यांचे झालेले नूतनीकरण साहित्यातून आपणास जागोजागी पहावयास मिळते. मुळात हे सर्व झालेले बदल जसेच्या तसे पुढच्या पिढीकडून स्वीकारले जातील असेही नाही त्यात काळानुरूप बदल केले जातात. मनुष्य आपल्या सोयीनुसार परंपरेमध्ये बदल करत असतो. उदाहरणादाखल पाहायचे झाले तर पूर्वी लग्नसमारंभ आठ-पंधरा दिवस चालत असायचा 'आज यादी पे शादी' हा नवा लग्नप्रकार आपल्याकडे रूळलेला दिसतो. अगदी एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर चौदा ते पंधरा दिवसाचे सुतक पाळले जायचे आज तिसऱ्या ते पाचव्या दिवशीच सगळे सोपस्कार पूर्ण केले जातात. एकूण काय तर जुन्या परंपरा पूर्णपणे मोडीत न काढता काही नव्याची भर घालून त्याचे नूतनीकरण करून त्या प्रथा व परंपरा पाळण्याकडे सामाजाचा कल असलेला दिसतो.

साहित्याच्या क्षेत्रामध्येही विविध संप्रदाय व परंपरा असल्याचे दिसते. या सर्व परंपरा विविध कलाप्रकारातून कशा विकसित होत गेल्या याचा अभ्यास तौलनिक साहित्याभ्यासाचा विषय आहे. जन्मापूर्वीपासून ते मृत्यूनंतर जवळजवळ सोळा संस्कार केले जातात या संस्काराच्या परंपरा कमी-अधिक प्रमाणात सर्व ठिकाणी जपल्या जातात. देवतापूजा, विधिनाटये, खेळ, लोकनृत्ये, यातुक्रिया या परंपरा आजही जपल्या जात आहेत. जागरण, गोंधळ, वाघ्या-मुरळी यातून नवीन वाद्ये, चाली, संगीत यातून त्याचे नूतनीकरण केले जात आहे. रसिकांची अभिरुची बदलत जाईल त्याप्रमाणे त्यात बदल केले जात आहेत. इतकेच काय तर नारदीय कीर्तन परंपरा, नामदेव-तुकारामांची कीर्तन परंपरा यांना आलेले नाटकी स्वरूप इंदोरीकर स्टाइल ही बदलत्या परंपरेची द्योतक आहेत. यातून कीर्तन परंपरेचा विकास झाला की मोडतोड होऊन फक्त मनोरंजन घडले हा संशोधनाचा विषय आहे. एकनाथांनी सुचविलेला व दाखवलेला कीर्तनाचा बाज आज आहे का? हा प्रश्न साहित्याचे अभ्यासक म्हणून आपल्याला पडला पाहिजे. आज अनेक अंधश्रद्धा कमी झालेल्या आहेत परंतु सुशिक्षित लोकांची वाढती अंधश्रद्धा हाही साहित्याच्या संशोधनाचा विषय आहे. हे सर्व जरी खरे असले तरी विविध वाङ्मयीन परंपरा, लोकजीवनातील परंपरा, लोकभ्रम, लोकसमजुती याचा प्रभाव साहित्यावर पडलेला दिसतो.

स्त्रीला देवी मानण्याची आपली संस्कृती व परंपरा आहे असे आपण मानतो. परंतु प्रत्यक्षात तसे घडताना दिसत नाही. साहित्यातून चित्रित होणारी स्त्री 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' तशीच आजही उन्हात बसलेली दिसते. मंत्र-तंत्र, सिद्धी, विविध आजारावरील मंत्राचे उपाय, पाऊस मागणे, नग्नतेचा व पावसाचा संबंध, बेडकाचे लग्न लावण्याचा व पावसाचा संबंध अशा प्राचीन परंपरा हळूहळू नष्ट होत आहेत अशा विविध परंपरा ज्या काळानुरूप बदलत गेल्या किंवा त्यांचा ऱ्हास झाला याचा अभ्यास तुलनाकाराने करावयास हवा. प्रभावाभ्यासाच्या दृष्टीने बोलावयाचे झाल्यास या परंपरांचा प्रभाव मराठी साहित्यावर व भारतीय साहित्यावर नेमकेपणाने कसा पडला आहे हे पाहणे अगत्याचे ठरते. आपणकडे त्रिपुरारी पौर्णिमेला पाण्यात दिवे सोडण्याची परंपरा आहे तशीच परंपरा जपानमध्ये असल्याचे दिसते असे निरीक्षण 'माती, पंख आणि आकाश' या आत्मकथनात ज्ञानेश्वर मुळे यांनी नोंदविले आहे. सूर्य, चंद्र

हे देवता मानून त्यांची पूजा केली जाते. पंचमहाभूतांची संकल्पना व त्यांची पूजा करणे अशा विविध परंपरा या भारतीय संस्कृतीत पहावयास मिळतात. विविध जाती-जमाती त्यांचे रीतिरिवाज, परंपरा यांचा अभ्यास केल्यानंतर एकात्म भारतीयत्वाचा अभ्यास आपणास करता येतो. परंतु या सर्वांच्या तौलनिक अभ्यासाने 'मानवाचे अंती गोत्र एक' या उक्तीच्या प्रत्ययही आपणास येतो. मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र या विविध विद्याशाखांचा अभ्यास करून या परंपरांचा आपणास शोध घेता येतो. मग भारतीय मातृसत्ताक कुटुंबपद्धती आणि ट्रोम्बीयाड या आदिवासी जमातीमध्ये आढळणारी मातृसत्ताक कुटुंबपद्धती तेथील परंपरा, संकेत व भारतीय परंपरा, संकेत याचा तौलनिक अभ्यास आपणास करता येतो. मानववंशशास्त्र आपणास मानवाच्या मुळापर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न करते. आदिम अवस्थेपासून ते आजच्या इंटरनेट, जंबोजेटच्या युगात मानव कसा उत्क्रांत होत गेला; कोणत्या परंपरा व आदिम आदिबंध तो जपत आला; याचे विवेचनही आपणास साहित्याच्या परिशीलनाने शक्य होणार आहे.

एकूणच प्राचीन परंपरा त्यांचे झालेले नूतनीकरण किंवा ऱ्हास या सर्वांचा साहित्यावर पडलेला प्रभाव पाहणे हा प्रभावाभ्यासाचा महत्त्वाचा विषय आहे. तौलनिक साहित्याभ्यास करत असताना तुलनाकाराला या प्राचीन परंपरेचे भान असल्याशिवाय साहित्याचा अभ्यास नीटपणे करता येणार नाही. विविध भाषिक साहित्यातून या परंपरा कशा आल्या त्याचा विचार तौलनिक अभ्यासामध्ये करणे महत्त्वाचे ठरते.

## २.२.६ अनुकरण

मानव हा अनुकरणशील प्राणी आहे. तो जन्मापासून ते मृत्युपर्यंत अनेकविध गोष्टींचे अनुकरण करत असतो. विविध परंपरांचे, संस्कृतीचे अनुकरण करणे त्यांचे पालन करणे व जतन करणे यातून तो स्वत:चे जीवनमान सुखकारक करण्याचा प्रयत्न करत असतो. आपल्याला आवडलेली गोष्ट तो पुन्हा पुन्हा मिळवण्यासाठी प्रयत्न करत असतो. जगण्यासाठी त्याची चाललेली धडपड ही तो स्वत:ला आनंद मिळवण्यासाठी करत असतो. काव्यशास्त्रामध्ये काव्यप्रयोजनांचा अभ्यास करत असताना अनुकरण करण्यातूनही साहित्याची निर्मिती होत असते हे आपण पाहिलेले आहे.

तौलनिक साहित्याभ्यासामध्ये अनुकरणाचा विचार करता आपले स्वत:चे घर किंवा गाव माणसाला केव्हा समजते तर त्याने दुसऱ्याचे घर किंवा गाव पाहिल्यावरच याचा अर्थ तो स्वत:ला तो दुसऱ्याशी ताडून पाहतो. साहित्याची निर्मिती करत असतानासुद्धा एक साहित्यकृती दुसऱ्या साहित्यकृतींशी ताडून पाहिल्याशिवाय त्या संबंधित साहित्यकृतीचे मोल आपणास समजत नाही इथे कलेसाठी कला का जीवनासाठी कला हा वादाचा मुद्दा थोडावेळ बाजूला ठेवला तर साहित्यिकांने निर्माण केलेली साहित्यकृती ही स्वायत्त असल्याचे आपण मानतो परंतु त्या साहित्यकृतीवर कोणाचे ऋण आहेत म्हणजेच

त्या साहित्यकृतीवरील प्रभावांचा विचार करताना आपणास एकप्रकारे त्या साहित्यिकांने कोणाचे ऋण स्वीकारले आहे हे तपासावे लागते. प्रत्येक लेखकाची शैली वेगळी असते असे आपण मानतो तेव्हा त्या शैलीवर दुसऱ्या कुणाची छाप पडलेली आहे हेही आपणास दिसते. व्यंकटेश माडगूळकर यांच्यावर जॉन स्टाइनबेक यांच्या शैलीचा व लेखनाचा प्रभाव पडलेला आहे. मराठीतील कित्येक साहित्यप्रकार इंग्रजी भाषेतील साहित्याचे सृजन व सर्जन म्हणजे अनुकरणाचा उत्कृष्ट नमुनाच होय. मनुष्य हा जगत असताना गोष्टींची नक्कल करतो तसे त्याला आवडणाऱ्या विविध व्यक्ती, त्यांचे पोशाख, हाव-भाव, बोलणे, राहणे, वागणे या गोष्टींचेही तो अनुकरण करतो. एखाद्या साहित्यिकाचे साहित्य वाचत असताना त्याच्यावर प्रभाव पडलेल्या विचारधारांचे अनुकरण त्यांने आपल्या साहित्यातून केल्याचे जाणवते. विविध भाषिक किंवा भिन्नभाषिक साहित्याचा तौलनिक अभ्यास करत असताना या अनुकरणाचा प्रभाव त्या साहित्यकृतीवर कसा पडलेला आहे याचा अभ्यास केला जातो. प्रभाव, अनुकरण व पारस्पारिक आदान प्रदान या प्रक्रियेत तुलना ही अपरिहार्यपणे होतच असते.

इंग्रजांच्या आगमनानंतर व इंग्रजी वाघीणीचे दूध प्यायल्यानंतर इथला भारतीय तरूण आपल्या रूढी-परंपरा, जीवनमान यांच्याशी पाश्च्यात्त्य रूढी-परंपरा ताडून पाहू लागला. त्यातूनच आपणापेक्षा तंत्रज्ञानात सरस असलेल्या इंग्रजांच्या अनेक गोष्टींचे अनुकरण भारतीयांनी केले. इंग्रजांनी हा देश कंगाल केला ही गोष्ट जरी खरी असली तरी इथल्या माणसांना गुलामगिरीची माणूसपणाची जाणीवही त्यांच्याच शिक्षणाने झाली हेही आपणास नाकारता येणार नाही. वर्षानुवर्षे गुलामगिरीत पिचत पडलेल्या, अज्ञान व अन्यायाच्या वरवंट्याखाली भरडलेल्या दलित समाजाला इथल्या वैदिक मनुवादी संस्कृतीने शिक्षणाचे दार कायमचे बंद केले होते. इंग्रजी अनुकरणानंतर का होईना विविध जाती धर्मातील लोक शिकू लागले. डॉ. आंबेडकरांचा शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा मूलमंत्र त्यासाठी कारणीभूत ठरला. भारतीय साहित्यातून विविध साहित्यकृतींचा जन्म झाला. उदाहरणदाखल पाहावयाचे असेल तर मराठीतील 'हायकू' हा काव्यप्रकार जपानमधील 'हायकू' या काव्य परंपरेतून भारतात आला. जितांचा जेत्यावर जसा प्रभाव पडतो तसा काही अंशी जेत्यांचा जितांवर प्रभाव पडतो. वासाहतिक व उत्तरवासाहतिक साहित्याचा परामर्ष घेतल्यानंतर आपणास अनुकरणातून आलेल्या साहित्याचा तौलनिक अभ्यास करता येतो. भिन्नभाषिक साहित्यावर असे अनुकरणात्मक प्रभाव कसे पडले आहेत विविध कालखंडात ते कसे बदलत गेले त्याचाही अभ्यास आपणास तौलनिक साहित्याभ्यासाने अभ्यासता येतो.

## २.३ सारांश

आतापर्यंत आपण वाङ्मयीन प्रभावाचा विचार केला. प्राक्कथा, लोकविद्या, मानसशास्त्रीय आदिबंध, अनुकरण, परंपरा व नूतनीकरण या गोष्टींचा विचार केल्यावर असे लक्षात येते की, वाङ्मयीन

प्रभाव हा प्राक्कथा, लोकविद्या, आदिबंध याद्वारा प्रकट होत राहतो. लोकसाहित्यातील कथांचा आधुनिक वाङ्मयाच्या निर्मितीवर प्रभाव पडतो. लोकविद्या या संज्ञेखाली येणाऱ्या चालीरीती, रूढी, विधिनिषेध, लोकश्रद्धा, आधुनिक वाङ्मयात येत असतात. आदिबंधांचाही वाङ्मयनिर्मितीवर परिणाम होत असतो. सारांश वाङ्मयनिर्मितीवर लोकसाहित्याचा प्रभाव हा कमीअधिक प्रमाणात सतत होत असतो.

## २.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. **प्राक्कथा :** प्राचीन, आर्ष कथा.

२. **विधिनाट्य :** लोकविधींच्यावेळी सादर केलेले नाटक.

३. **विदित :** ज्ञात, माहीत होणे, प्रख्यात असणे.

४. **बृहद् :** मोठा, व्यापक.

५. **चिरहरण :** वस्त्रहरण.

६. **यातुक्रिया :** जादूटोणा, मंत्रतंत्र.

७. **वासाहतिक काळ :** पाश्चात्त्यांच्या जगभर वसाहती स्थापन करण्याचा काळ.

८. **उत्तरवासाहतिक काळ :** स्वातंत्र्यानंतरचा काळ.

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

### ❑ योग्य पर्याय निवडा.

१. इतिहास हा तौलनिक साहित्याभ्यासाचा केंद्रबिंदू आहे, असे कोणी म्हटले आहे?

*(अ) नॉथ्रॉप फ्राय* *(ब) विल्यम शेक्सपिअर*

*(क) लॉर्ड मेकॉले* *(ड) रेने वेलेक.*

२. आपणच आपल्याशी तुलना केली तर आपण स्वत:लाही नीट ओळखू शकत नाही, असे कोणी म्हटले आहे?

*(अ) कांट व क्रोचे* *(ब) फर्डिनेंड ब्रुनेतिअर*

*(क) ॲरिस्टॉटल* *(ड) फ्रॉइड.*

३. देशविदेशातील वाङ्मय तपासून यातील भौगोलिक, कालिक, सांस्कृतिक विशेष बाजूला काढून आणि उरलेला जो शाश्वत आणि सार्वत्रिक असा मन:प्रवृत्तीचा भाग होता त्याचे विश्लेषण केले, तो भाग म्हणजे आदिबंध होय.ही आदिबंधाची संकल्पना कोणी मांडली?

*(अ) नॉथ्रॉप फ्राय* *(ब) विल्यम शेक्सपिअर*

*(क) कांट व क्रोचे* *(ड) डॉ. सी. जी. युंग.*

४. कोणत्या कथेतून शारीरिक, मानसिक व सामाजिक व्यंगावर उपरोधिक भाष्य केलेले दिसते?

*(अ) प्राणी कथा* *(ब) अद्‌भुत कथा* *(क) चातुर्यकथा* *(ड) हास्यकथा.*

५. 'लोकविद्या' या संकल्पनेचा निर्देश प्रथम कोणी केला?

*(अ) विल्यम थॉमस* *(ब) ॲम्ब्रोस मर्टन*

*(क) डॉ. सी. जी. युंग* *(ड) अ व ब.*

६. 'अमेरीकन फोकलोअर सोसायटी' नावाची लोकविद्याविषयक संस्था अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात कोणत्या साली स्थापन झाली?

*(अ) १८८८* *(ब) १८५८* *(क) १८८७* *(ड) १८५१.*

७. १८९० मध्ये 'द गोल्डन बाऊ' नावाचा द्विखंडात्मक ग्रंथ लिहून त्यात धर्म आणि विज्ञान यातून उत्क्रांत होत गेलेल्या मानवी विचारांचा आढावा कोणी घेतला?

*(अ) फ्रंटस बोऑस* *(ब) जेम्स जॉर्ज फ्रेझर*

*(क) विल्यम थॉमस* *(ड) ॲम्ब्रोस मर्टन.*

८. कोणत्या मानवशास्त्रज्ञाने 'मॅजिक सायन्स ॲड रिलिजन ॲड अदर इमेज' नावाचा ग्रंथ प्रसिद्ध केला ?

*(अ) फ्रंटस बोऑस* *(ब) जेम्स जॉर्ज फ्रेझर*

*(क) बंकिमचंद्र चटर्जी* *(ड) बॉनीस्ला कास्पेर मॉलिनोस्की.*

९. 'लोकसाहित्यातून समूहमनाचा अविष्कार झालेला असतो' असे कोणी म्हटले आहे?

*(अ) शरद व्यवहारे* *(ब) प्रभाकर मांडे*

*(क) विश्वनाथ शिंदे* *(ड) तारा भवाळकर.*

१०. साहित्याची उत्पत्ती ही स्वप्नातून झाली असे कोणी मानले आहे?

*(अ) फ्रॉईड* *(ब) सी.जे.युंग*

*(क) फ्रंटस बोऑस* *(ड) बॉनीस्ला कास्पेर मॉलिनोस्की.*

- **उत्तरे :-**

१. *(ड) रेने वेलेक.*

२. *(ब) फर्डिनेंड ब्रुनेतिअर.*

३. *(ड) डॉ. सी. जी. युंग.*

४. *(अ) प्राणिकथा.*

५. *(ड) अ व ब.*

६. *(अ) १८८८.*

७. *(ब) जेम्स जॉर्ज फ्रेझर*

८. *(ड) बॉनीस्ला कास्पेर मॉलिनोस्की.*

९. *(ब) प्रभाकर मांडे.*

१०. *(अ) फ्रॉईड.*

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

- **लघुत्तरी प्रश्न.**

१. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये प्राक्कथेचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो, या विधानाची थोडक्यात चर्चा करा.

२. तौलनिक साहित्याभ्यासातील अनुकरणाचा प्रभाव कसा पडतो त्याचा थोडक्यात आढावा घ्या.

३. परंपरा व नूतनीकरण यांचा तौलनिक साहित्याभ्यासामध्ये कसा अभ्यास करता येईल ते थोडक्यात लिहा.

४. आदिबंधाच्या प्रभावाचा अभ्यास तौलनिक साहित्याभ्यासामध्ये कसा करता येईल ते थोडक्यात लिहा.

५. प्रभाव अभ्यास व तौलनिक साहित्याभ्यास यांचा अनुबंध थोडक्यात स्पष्ट करा.

- **दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. तौलनिक साहित्याभ्यासातील वाङ्मयीन प्रभाव संकल्पना स्पष्ट करा.

२. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये लोकविद्या प्रभाव अभ्यास महत्त्वाचा ठरतो ,या विधानाची सविस्तर चर्चा करा.

३. तौलनिक साहित्याभ्यासामध्ये प्राक्कथेच्या प्रभावाचा अभ्यास कसा करता येईल, ते सविस्तर लिहा.

४. साहित्यावरील मानसशास्त्रीय प्रभाव या संकल्पनेचा परामर्श घ्या.

५. भिन्नभाषिक वाङ्मयावरील आदिबंधाच्या प्रभावाचा तौलनिक साहित्याभ्यास कसा करता येईल ते सविस्तर लिहा.

## २.७ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ

१. **वसंत बापट :** *'तौलनिक साहित्याभ्यास'*, मौज प्रकाशन, पुणे.

२. **चंद्रशेखर जहागिरदार :** *'तौलनिक साहित्याभ्यास : तत्त्वे व दिशा'*, सौरभ प्रकाशन, कोल्हापूर, १९९२.

३. **कल्याण काळे, अंजली सोमण (संपा.) :** *'भाषांतर मीमांसा'*.

❑❑❑

सत्र–४ : घटक–३

# वाङ्मयीन प्रभाव

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ 'प्रभाव' : संकल्पना, व्याख्या

  ३.२.२ 'प्रभाव' : उद्दीप्त करणारे घटक

  ३.२.३ 'प्रभाव' आणि वाङ्मयीन संबंध

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.५ स्वयं–अध्ययन प्रश्न व उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर वाङ्मयीन प्रभाव संकपना समजेल आणि मराठीतील तौलनिक अभ्यासाला गती मिळेल.

१. 'प्रभाव' म्हणजे काय? हे स्पष्ट करता येईल.

२. 'प्रभावाचे' वाङ्मयीन महत्त्व जाणून घेता येईल.

३. 'प्रभावाचे' प्रकार अभ्यासता येतील.

४. 'प्रभाव' आणि 'संबंध' यांच्यातील नाते उलगडता येईल.

५. 'प्रभाव' आणि 'संप्रेषण' (आदान प्रदान) स्पष्ट करता येईल.

६. 'प्रभाव' आणि 'स्वागत' यांचा संबंध स्पष्ट करता येईल.

## ३.१ प्रस्तावना

साहित्याच्या क्षेत्रात देवाणघेवाण ही क्रिया घडत असते. या क्रियेला साहित्यात महत्त्वाचे स्थान असते. ही प्रक्रिया स्वाभाविक आणि अपरिहार्य असते. ती निरंतरपणे चालत राहते. या प्रक्रियेत साहित्याचे वाचक, श्रोते, प्रसारमाध्यमे यांच्यात परस्पर संपर्क जसजसा वाढत जातो तसतशी साहित्याची देवाणघेवाणही वाढत जात असते. साहित्याची देवाणघेवाण संथपणे होत असली तरी ती प्रक्रिया निश्चितपणे होत असते. निरनिराळ्या भाषेतील साहित्यात कधीकधी आश्चर्यकारक असे साम्य आढळते. साहित्यविश्वात आदानप्रदानामध्ये विशिष्ट साहित्याची, साहित्यप्रकाराची किंवा साहित्यिकाची 'प्रभावशीलता' एक महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. विशिष्ट भाषिक समाज अन्य एखाद्या भाषेतील साहित्याचे किंवा साहित्यिकाचे स्वागत करतो. पारभाषिक साहित्याला किंवा साहित्यिकाला मान दिला जातो आणि त्याच्या प्रभावाचा जाणिवपूर्वक स्विकार करतो. हे दृश्य साहित्यविश्वात नेहमी आपणास पाहण्यास मिळते.

एका किंवा एकापेक्षा अधिक अन्य भाषांमधील साहित्यकृतींची (सर्व प्रकारातील साहित्य) वैधर्म्य, साधर्म्य, प्रभव किंवा प्रभाव यांचा संशोधन केलेल्या अभ्यासातून त्याविषयी मांडलेले विचार, समीक्षा म्हणजे तौलनिक साहित्याभ्यास होय. अशी तौलनिक साहित्याभ्यासाची व्याख्या करता येते. तौलनिक साहित्य अभ्यास पद्धतीत 'प्रभाव' हा मुख्य घटक असतो. त्या प्रभाव संज्ञेचा विचार करणे जरुरीचे आहे. त्या दृष्टीने 'प्रभाव' संज्ञा विस्ताराने मांडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ 'प्रभाव' : संकल्पना, व्याख्या

'प्रभाव' अभ्यास हा तौलनिक साहित्याभ्यासाचा मुख्य केंद्रबिंदू आहे. प्रत्यक्ष वस्तुस्थितिवादाच्या परिभाषेत तौलनिक साहित्याभ्यासाची संकल्पना मांडली असल्याचे दिसून येते. 'प्रभाव' या संज्ञेच्या काही व्याख्या केल्याचे आढळून येते.

❑ **'प्रभाव'च्या व्याख्या :-**

१. **जोशेफ टी. शॉ.** : 'लिटररी इनडेटेनेस ऑफ कंम्प्यारिटिव्ह लिटरेचर स्टडीज, कंम्प्यारिटिव्ह लिटर्र मेथडॉलॉजी' या शोधनिबंधात जोशेफ टी. शॉ. म्हणतो की, ''लेखकाचा व्यक्तिगत विकास त्याची देशी वाङ्मयीन परंपरा त्याच्या ललित साहित्यकृतीवर अथवा त्याच्यावर झालेला परिणाम स्पष्ट करू शकत नाही. हे बाहेरून आलेले जे काही असते, ते जेव्हा प्रात्यक्षिकाने दाखवता येते, तेव्हा त्या लेखकावर विदेशी साहित्याचा प्रभाव पडला असे समजले जाते.''

२. **हास्केल ब्लॉक :** 'द कन्सेप्ट ऑफ इन्फ्लुअन्स इन कंम्प्यारिटिव्ह लिटरेचर' या शोधनिबंधात 'प्रभाव' या संकल्पनेविषयी मते मांडली आहेत, त्यात ते म्हणतात.. ''...... बऱ्याचवेळा वाङ्मयीन प्रभाव नियित्तमात्र आणि प्रासंगिक असतात. पण हेही, खरे की नंतरच्या कलात्मक सर्जनक्रियेला दिशा आणि आकार देण्यात ते प्रभावीपणे कार्यरत असतात.''

ब्लॉकची 'प्रभाव' संकल्पना पूर्व यूरोप व फ्रेंच तुलनाकारांना महत्त्वाच्या वाटणाऱ्या वाङ्मयबाह्य घटकांचा मर्यादित विचार करायला परवानगी देते. शिवाय 'प्रभाव' लेखकाच्या निर्मितीप्रक्रियेत शोधावा असे स्पष्ट करते.

३. **म्युलियन :** याने 'लिटरेचर अॅज सिस्टिम' या सौंदर्यशास्त्रावरील शोधनिबंधात आपले मत नोंदविले आहे. ''निर्मिती चालू असलेल्या साहित्यकृतीचा अविभाज्य घटक म्हणून प्रभावाकडे पाहावे. तो लेखकावर आधी पडतो. त्याच्या अस्तित्वालाच व्यापतो. हे त्याचे ग्रंथलेखन सुरू व्हायच्या आधी देखील घडणे शक्य आहे.''

म्युलियनने याबाबतीत काही महत्त्वाची विधाने केलेली आहेत.

(अ) प्रभावाची प्रत्येक चिकित्सा ही प्रारंभी साहित्यकृतीच्या जन्माची चिकित्सा असते. त्या जननाच्या घटकांचे ज्ञान आणि अर्थ निरुपणाच्या आधारे त्यांचे (प्रभावांचे) भाकित वर्तविता येते.

(आ) प्रभाव निश्चिती म्हणजे मूल्यमापन होय. वस्तुस्थिती मोजणे नव्हे.

(इ) प्रभाव परीक्षणात दोन भिन्न अवस्था असतात. पहिली बाब म्हणजे जननात्मक आविष्काराचे अर्थनिरूपण करणे. ती खुद्द प्रभाव किंवा ठसा हाताळते. दुसरी पायरी म्हणजे संहितात्मक व तौलनिक विवेचनाची असते. पण ती आपले अस्तित्व आणि मूल्याकरिता पूर्णत: पहिलीवर अवलंबून असते.

(ई) प्रभावमूल्य सौंदर्यात्मक नसून, मानसशास्त्रीय असते.

(उ) संकेत व तंत्राची (रीतिप्रकार, वाङ्मयप्रकार, प्राक्कथा, आशयसूत्रे, शैली, क्लृप्त्या आणि संरचना) चिकित्सा ही प्रभाव व समांतराभ्यास यांच्याकडे जेव्हा परस्परसंबंधित म्हणून पाहिले जाते, तेव्हा भिन्न असतात.

४. **टी. एस. इलियट :** याने 'ट्रॅडिशन अॅण्ड इन्डिव्हिज्युएल टॅलन्ट' या प्रसिद्ध लेखात परंपरेशी नाते स्पष्ट करताना म्हटले आहे. ''प्रभाव एकच नसून वाङ्मयीन व अवाङ्मयीन प्रभावांचे जाळे कसे तयार होते. याचा उलगडा महत्त्वाचा मानला जाऊ लागला. हे प्रभाव संकेत व

परंपरातूनही उगम पावतात. व्यक्ती त्या परंपरेशी जुळवून घेते. त्या प्रक्रियेला प्रभाव समजले जाते.''

५. **व्ही. सच्चिदानंद :** यांनी 'व्हिटमन आणि भारतीचा' तौलनिक अभ्यास करताना प्रभाव संकपनेची व्याख्या देतात ती अशी– ''एखाद्या लेखकाचा स्वत:चा कलात्मक विकास किंवा त्याची वाङ्‌मयीन परंपरा जे स्पष्ट करू शकत नाही, ते जे काही देशी लेखकाच्या साहित्यकृतीत सापडते. त्याला प्रभाव म्हणावे.''

अशा मोजक्याच व्यक्तींनी प्रभाव संकल्पना मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात आंतरबाह्य गोष्टींचा विचार झाल्याचे आढळून येते. 'प्रभाव' ही संकल्पना स्पष्ट होण्यासाठी वरील व्याख्या उपयुक्त ठरतात.

साहित्याचा तौलनिक दृष्टीने अभ्यास करीत असताना 'प्रभाव' हा घटक आपल्याला प्रकर्षाने जाणवत राहतो. त्याचे तौलनिक साहित्याभ्यासात असलेले अनन्यसाधारण स्थान मान्य करावे लागते. एका भाषेतील साहित्याची किंवा साहित्यिकाची दुसऱ्या भाषेतील साहित्याशी किंवा साहित्यकाराशी तुलना करीत असताना यापैकी कोणाचा कोणावर प्रभाव पडला आहे. हे तपासावे लागते. येथे साहित्याची किंवा साहित्यिकाची तुलना अभिप्रेत असली तरी केवळ तुलना करून त्यातील श्रेष्ठ साहित्यकृती किंवा साहित्यिक ठरवणे हे साहित्याचे काम असत नाही. त्यातील आशयसूत्राचा अभिव्यक्तीदृष्टा अभ्यास करून त्यातील साम्य शोधणे, त्यातील परस्पर विरोधी गोष्टींचा शोध घेणे, कोणाचा प्रभाव कोणावर पडला आहे, याचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. म्हणूना 'प्रभाव' संकपना समजावून घेणे महत्त्वाचे ठरते.

सर्वसाधारणपणे 'प्रभाव' म्हणो एखाद्या साहित्याचा किंवा साहित्यिकाला दुसऱ्या साहित्यावर किंवा साहित्यिकावर विशिष्ट स्वरूपात ठसा जाणवतो. याचाच अर्थ एकाचा दुसऱ्यावर परिणाम जाणवतो. तो ठसा, परिणाम प्रभावरूपात असतो. 'प्रभाव' ही संकापना इंग्रजी साहित्यातील समीक्षक कोलरीज यांनी मांडली. कोलरीज यांनी मांडलेल्या 'प्रभाव' संकपनेसाठी अमेय देव यांनी फ्रेंच परंपरेला अनुसरून आंतरराष्ट्रीय वाङ्‌मयीन संबंधाचा शोध घेण्यात यावा असे मत मांडले आहे. साहित्यातील आंतरराष्ट्रीय वाङ्‌मयीन संबंध स्पष्ट करण्यासाठी अमेय देव यांनी सहा संज्ञा वापरल्या आहेत.

तौलनिक साहित्याभ्यासात तुलनेसाठी निवडलेल्या दोन साहित्यिकांपैकी किंवा साहित्यकृतींपैकी एकाचा प्रभाव दुसऱ्यावर पडलेला व दुसऱ्याने तो प्रभाव कळत नकळत स्वीकारलेला असला पाहिजे. तर त्या दोन्हींची तुलना होऊ शकते. काही समीक्षकांच्या मते प्रभावांचा अभ्यास म्हणजेच तौलनिक अभ्यास होय. साहित्याचा आविष्कार वेगवेगळ्या भाषांत होतो ही तौलनिक साहित्याची मूलधारणा असली तरी त्यातून शेवटी मानवी मनातील अभिव्यक्ती होत असते. तौलनिक साहित्याची दृष्टी तटस्थ

व वस्तुनिष्ठ असते. तौलनिक साहित्याचे प्रयोजन वेगवेगळ्या परंपरेचे भान राखणे, साहित्याच्या विविध कृतींमधील साम्य व वेगवेगळेपणा यांचा शोध घेणे, या साम्यस्थळांची आणि प्राक्कथांची मीमांसा करणे, त्यांच्यातील कारक घटकांची चिकित्सा करणे, दोन किंवा अधिक भिन्न भाषिक समाजातील परस्पर साहित्यसंबंधावर प्रकाश टाकणे आणि शेवटी साहित्यातील तुलनांच्या आधारे त्यांच्या संस्कृतीतील साम्यविरोधांचा व पृथगात्मतांचा शोध घेणे अशा प्रकारची सांगितली जातात. तरीही त्यातील प्रभावांचा शोध घेणे हे ही तौलनिक साहित्याचे मूलभूत प्रयोजन मानावे लागते.

साहित्यात आदानप्रदान हे घडत असते. त्यामध्ये साहित्याची किंवा साहित्यकाराची 'प्रभावशीलता' महत्त्वाची असते. विशिष्ट भाषिक समाज अन्यभाषिक साहित्याचे अथवा साहित्यिकाचे स्वागत करत असतो, त्याला मान्यता देत असतो. त्याचप्रमाणे त्याच्या प्रभावाचा जाणीवपूर्वक स्वीकार करीत असतो. हे चित्र आपणास नेहमी दिसत असते. अन्यभाषिक साहित्याचे स्वागत करणे, त्याच्या प्रभावाचा स्वीकार करणे हे काही कमीपणाचे लक्षण नाही. कोणताही भाषिक समाज आपल्या भाषेतील साहित्यापेक्षा दर्जेदार किंवा प्रभावी साहित्याचा स्वीकार हा करणारा यात शंका असण्याचे कारण नाही. साहित्याच्या क्षेत्रात संकुचित अभिमानाला लागत नाही. तिथे मान असतो तो प्रतिभेला, गुणवत्तेला, अभिनव सौदर्याच्या सर्जनाला. तिथे भाषिक भिंती कोसळून पडतात आणि दुसऱ्या भाषेतील प्रतिभावंताला मान मिळू लागतो. त्याबरोबर प्रभाव पाडणाऱ्या साहित्यातील उसनवारी, नक्कल केली जाते. याची अनेक उदाहरणे सापडतात.

आधुनिक भारतीय साहित्याचा विचार केला तर पाश्चात्त्यांच्या साहित्याचा प्रभाव ठळकपणे जाणवतो. परंतु असे झाले नसते तर साहित्याचे विविध प्रकार निर्माण झाले नसते. प्रभाव हा साहित्याचाच पडतो असे नाही तर साहित्यिकाचाही प्रभाव पडतो. प्रभावाच्या बाबतीत एका गोष्टीचे यात्र सतत भान ठेवावे लागते. दोन साहित्यात साधर्म्य आढळले की तेथे प्रभाव शोधलाच पाहिजे असे नाही. प्रभावाची कारणे भिन्न असू शकतात. प्रभावाचे प्रमाण कमी अधिक असू शकते. प्रभाव नेहमी एकाच प्रकाराचा असत नाही तसा तो साहित्याच्या सर्व बाबीत जाणवतो असेही नाही. कधी तो रचनेपुरता मर्यादित जाणवतो तर कधी तो आशय, भावावस्था, जीवनविषयक दृष्टिकोन असाही आढळतो. या वरील चर्चेवरून प्रभाव ही संकपना आपल्या लक्षात येते.

## ❑ प्रभाव उद्दीप्त करणारे घटक :-

प्रभाव ही एक साहित्यव्यवहारातील सहजस्वाभाविक प्रक्रिया आहे. एका साहित्यिकाचा दुसऱ्या साहित्यिकावर, एका साहित्यकृतीला दुसऱ्या साहित्यकृतीवर प्रभाव पडतो. त्याचप्रमाणे एका भाषेतील साहित्यप्रवाहांचा, वाङ्मयीन चळवळींचा, वाङ्मयीन विचारधारावर आणि दृष्टिकोनावर प्रभाव पडत

असतो. यासाठी दोन भाषांचा भाषिक संपर्क होणे आवश्यक असते. हा संपर्क होण्यासाठी कारण ठरणाऱ्या घटकांचा विचार करणे आवश्यक ठरते.

## १. प्रत्यक्ष संपर्क :-

प्रत्यक्ष संपर्काचे तीन मार्ग सांगता येतात.

### अ) जीवनचरित्र संबंध :-

एखाद्या लेखकाने अन्य भाषांतील साहित्याचा अभ्यास केलेला असतो; किंवा अन्य भाषिक साहित्यिकाच्या सहवासात काही काळ व्यतीत केलेला असतो; अथवा अन्य भाषिक प्रांतात भटकंती केलेली असते. त्या भाषेतील साहित्याचे संस्कार त्याच्या मनावर होत असतात, आणि त्यातून त्याने निर्माण केलेल्या साहित्यावर प्रभाव पडत असतो. मुघल सम्राट शहाजहाँ याच्या दरबारात असलेले राजकवी जगन्नाथ पंडित यांनी 'रसगंगाधर' हा समीक्षा ग्रंथ लिहिला. त्यामध्ये अलंकारादींची उदाहरणे देण्यासाठी म्हणून अनेक स्वरचित काव्ये घातली आहेत. त्यापैकी बऱ्याच काव्यरचनावर अरबी-फारसी काव्याचा स्पष्ट प्रभाव जाणवतो. त्याचे कारण संपर्क हेच आहे. संत नामदेवांनी तीन वेळा गुजरात, राजस्थान, उत्तरप्रदेश, पंजाब येथे यात्रा केल्या होत्या. परिणामत:, गुजरात, राजस्थान, पंजाब येथील भक्तिकाव्याच्या रचनेवर (नरसी मेहता, मीराबाई, गुरुनानक वगैरे नामदेवांचा प्रभाव शोधता येतो. मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्रविषयक लिखाणावर त्यांच्या इंग्लंडमधील वास्तव्यात तेथील समीक्षेच्या वातावरणाचे जे संस्कार त्यांनी ग्रहण केले, त्याला प्रभाव आहे, असे अभ्यासकांचे मत आहे.

### ब) भौगोलिक :-

दोन भाषिक भूप्रदेशात अनुभवांचे व साहित्याचे आदानप्रदान होत राहते. परिणामत: तेथील साहित्य रचनेवर परस्पर प्रभाव पडतो. मराठी आणि कन्नड, मराठी आणि गुजराती, मराठी आणि तेलगू, या भाषांतील साहित्यात असे परस्पर प्रभाव दाखवता येतात. मराठीतील बखरवाङ्मय आणि मराठी संगीत नाटक यांचे प्रभाव पडयाचे दिसून येते. बंगालमधील बाऊल भक्तिकाव्याचा संस्कार असमियाने मिरवलेला दिसून येतो. आधुनिक मराठी नाटक, काव्य यांचे प्रभाव गुजरातीने मानले आहेत.

### क) राजकीय समीकरणे :-

राज्यकर्त्यांची भाषा प्रजेच्या भाषेपेक्षा भिन्न असेल तर प्रजेच्या मनी राजकीय वातावरणामुळे निर्माण होणाऱ्या न्यूनगंडामुळे रायकर्त्यांची भाषा आणि वाङ्मय आपल्या भाषेपेक्षा आणि वाङ्मयापेक्षा श्रेष्ठच असल्याची भावना तयार होऊन त्यातून प्रभाव स्वीकारण्याचा प्रवृत्तिप्रवाह सुरू होतो. तंजावरचे राज्यकर्ते मराठे असल्यामुळे तेथील वाङ्मयावर मराठीचा, विशेषत: नाट्यवाङ्मयावर लक्षणीय प्रभाव

पडला असल्याचे दिसते. ओडिशावर मराठ्यांनी राज्य केल्यामुळे उडिया साहित्यावर मराठीचा प्रभाव पडला. हाच प्रकार गुजरातमधील बडोदरा, मध्यप्रदेशातील झाशी, ग्वालेर व इंदौर येथे मराठ्यांनी स्थापन केलेल्या राज्यामुळे प्रभाव पडल्याचे आढळून येते. संपूर्ण भारतावर जेव्हा ब्रिटिशांचा एकछत्री अंमल सुरू झाला तेव्हापासून इंग्लिशमधूनच सर्व भारतीय भाषांमधील साहित्यात प्रभावाचा ओघच वाहू लागल्याचे दिसते.

अशा प्रकारे साहित्यकाराचे जीवनचरित्र, भौगोलिक निकटत्व आणि राजकीय समीकरणे अशा तीन मार्गांनी भिन्नभिन्न भाषीय साहित्याशी प्रत्यक्ष संपर्क होऊ शकतो; आणि त्यातून प्रभावाची प्रक्रिया सहज आणि गतिमान होते.

## २. भाषांतर :-

कधी कधी भिन्न भाषेतील साहित्याशी प्रत्यक्ष संपर्क नसला, तरी भाषांतराच्याद्वारे त्याच्याशी संपर्क निर्माण होऊ शकतो. त्यातून प्रभावाची निर्मिती होऊ शकते. रवींद्रनाथ ठाकूराच्या वडीलबंधूंनी तुकारामांच्या बऱ्याच अभंगांचे बंगालीमध्ये भाषांतर केले होते. त्यातून रवींद्रनाथांना तुकारामांचा परिचय झाला आणि त्याने रवींद्रनाथांचे काव्य प्रभावित झाले. तुकारामांच्या आध्यात्मिक अनुभूतीची छाया रवींद्रनाथांच्या कवितेवर पसरली; शिवाय 'कन्या सासुऱ्याशी जाये । मागे परतोनी पाहे । तैसे झाले माझ्या जीवा' यांसारख्या तुकारामांच्या उत्कट प्रतिमाही रवींद्रनाथांच्या कवितांत अवतिर्ण झाल्या. वि. स. खांडेकरांच्या कादंबऱ्या जसजशा प्रसिद्ध होत गेल्या, तसतशी त्यांची भाषांतरे गुजराती व तमिळ भाषांमध्ये प्रसिद्ध होत राहिली. परिणामी, कादंबरी वाङ्मय प्रकाराच्या गुजराती आणि तमिळ भाषांतील विकासाच्या एका टप्प्यावर खांडेकरांचा प्रचंड प्रभाव पडलेला आहे. जवळजवळ अशीच परिस्थिती शरच्चंद्र चट्टोपाध्याय यांच्याबाबतीत मराठीत झालेली आहे. अर्थात भाषांतरित साहित्यकृती मूळ साहित्यकृतीचे जे आकलन भाषांतरकाराला झालेले असेल त्याप्रमाणे बनलेली असल्यामुळे मूळ लेखकाचा प्रभाव त्यातून शंभर टक्के शोधता येईल का, हा विवाद्य प्रश्न आहे. तथापि भाषांतरकार हा प्रभावाच्या उद्दीपनाला एक घटक आहे, हे मान्य करण्यास काहीच प्रत्यवाय नाही.

## ३. आदर्श सर्जनशीाता :-

एखादा साहित्यप्रकार अथवा साहित्यप्रवाह राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय पातळीवर इतका सुप्रतिष्ठित होतो की, त्याची सर्जनशीलता अन्य भाषांतील साहित्यकार आदर्श म्हणून सतत स्वत:पुढे ठेवतात. साहजिकच त्या साहित्यकाराचा प्रभाव त्यांच्या साहित्यात प्रकट झाल्यावाशून राहत नाही. विजय तेंडुलकर हे मराठी नाटककार भारतातील सर्व भाषांमधील नाटककारांनी सर्जनशीलतेचा आदर्श म्हणून अशा तऱ्हेने स्वीकारलेले असल्यामुळे सर्व भारतीय भाषांमधील नाट्यसृष्टीवर तेंडुलकरांचा काही ना काही प्रभाव

दाखविता येतो. अशीच स्थिती जागतिक स्तरावर शेक्सपियर या इंग्लिश नाटककाराची आणि चेकॉव्ह या रशियन कथाकाराची झालेली पाहावयास मिळते. कादंबरीकार डोस्टोव्हस्की, नाटककार ब्रेख्त, कवी टी. एस. इलियट, कथाकार मोपासाँ यांची सर्जनशीलताही काहींशी याा पातळीवरची म्हणावी लागेल. त्याचप्रमाणे विद्रोही साहित्याच्या क्षेत्रात सर्व भारतीय भाषांमधील विद्रोही साहित्यावर मराठी दलित साहित्याचा प्रभाव ठळकपणे आढळतो. सर्जनशीलतेच्या मान्य आदर्शाचा हा प्रभाव आपातत: पडलेला असू शकतो किंवा जाणीवपूर्वक आणि प्रयत्नपूर्वक बिंबवलेला असू शकतो.

## ४. नावीन्याचे आकर्षण –

अन्यभाषीय साहित्यात असलेल्या एखाद्या साहित्यिक प्रवाहाचा नव्याने परिचय झाला, म्हणजे तदनुषंगाने कारक घटक भोवतालच्या अनुभूतीमध्ये नसतानाही केवळ नावीन्याच्या आकर्षणामुळे त्या प्रवाहाचा प्रभाव साहित्यावर पडू शकतो. इंग्रजी साहित्यातून अस्तित्ववादाची नव्याने ओळख झाल्यावर, भाऊ पाध्ये, भालचंद्र नेमाडे यांच्यासारखे अस्तित्ववादाला भारतीय वास्तवानुभूतीच्या मुशीतून पुनर्घटित करणारे अपवाद वगळता भारतीय साहित्यातील अस्तित्ववादाचे अवतार हे अशा नावीन्याच्या आकर्षणातून घडले आहेत.

## ५. धर्मांतर :–

धर्म मताच्या प्रचारासाठी जेव्हा साहित्य लिहिले जाते, किंवा धर्मविचार रुजवण्यासाठी साहित्याचा वापर होत असतो तेव्हा धर्म प्रसार हे साहित्याचे प्रयोजन ठरते. त्यावेळी प्रचलित असलेल्या आशयद्रव्याचा, वाङ्मयीन आकृतिबंधाचा प्रभाव स्वीकारुन त्याला वाङ्मय निर्मिती करावी लागते. ख्रिस्ती धर्म प्रचाराचा हेतू मनात ठेवून ख्रिस्ती मिशनरी भारतात आले. ते भारताच्या वेगवेगळ्या प्रदेशात राहिले. तेथील भाषा आत्मसात केल्या. भारतातल्या वेगवेगळ्या भाषांतील आकृतिबंध वापरून ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणारे साहित्य निर्माण केले. फादर स्टीफन्स यांनी संपूर्ण: भारतीय पुराणातील आकृतिबंध वापरून ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणसाठी 'ख्रिस्तपुराण' लिहिले. कवी ना. वा. टिळक यांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार स्वेच्छेने केला होता. ख्रिस्ताच्या संदेशाने ते भारावले होते. आपल्या मनातील भक्तिभावाचे प्रकटन त्यांनी अभंगाद्वारे केले आणि या अभंगावर संत तुकारामाच्या अभंगांचा प्रभाव दिसतो. हा प्रभाव धर्म प्रसाराच्या वाटेने आलेला होता असे म्हणता येते.

## ६. विश्वव्यापी चळवळ :–

जगात काही घटना या अशा घडतात की, त्याचा परिणाम जगातील सर्व भाषांच्या साहित्यावर होत असतो. भारतात बौद्ध धर्माचा झालेला उदय ही पहिली विश्वव्यापी घटना होती, असे म्हणता येते. बौद्धधर्माच्या प्रसारासाठी भिक्खू चीन, जपान, श्रीलंका येथे गेले असल्यामुळे तेथील साहित्यावर बौद्ध


धर्माच्या आचारविचाराचा प्रभाव पडणे ही सहजपणे घडणारी गोष्ट होती. रशियन, फ्रेंच राज्यक्रांती, साम्यवादी क्रांती, दोन महायुद्धे, औद्योगिकीकरण, जागतिकीकरण, अणुबाँबचा झालेला वापर या सर्व गोष्टींचे काही तरी पडसाद जगभर पडल्याचे दिसून येते. त्याचा परिणाम जगभरातल्या साहित्यावर प्रभाव पडल्याचे दिसते. तो प्रभाव विश्वव्यापी असतो.

## ❑ प्रभावाचे प्रकार :-

एकंदरीत 'प्रभाव' हा घटक साहित्याचा तौलनिक अभ्यास करताना प्रकर्षाने जाणवतो. किंबहुना तौलनिक साहित्याभ्यासात त्याचे असलेले अनन्यसाधारणत्व आपणास मान्य करावे लागते. एका विशिष्ट भाषेतील साहित्याची किंवा साहित्यिकाची दुसऱ्या भाषेतील साहित्याशी किंवा साहित्यिकाराशी तुलना करीत असताना यापैकी कोणाचा कोणावर प्रभाव पडला आहे हे तपासावे लागते. येथे त्यांच्यातील तुलना अभिप्रेत असली तरी श्रेष्ठ कोण? आणि कनिष्ठ कोण? हे ठरविणे तौलनिक साहित्याभ्यासाचे काम नाही. साहित्याचे आशयसूत्र, अभिव्यक्तीदृशष्ट्या अभ्यासून त्यातील साम्य शोधणे, कोणाचा कोणावर कसा प्रभाव पडला हे सांगणे महत्त्वाचे ठरते. या प्रभावाचे काही प्रकार संभवतात ते पुढीलप्रमाणे सांगता येतात.

### अ) प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष प्रभाव :-

साहित्याचा किंवा साहित्यिकाचा प्रभाव प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असू शकतो. जसे 'अ' चा 'ब' वर प्रभाव पडला तर तो प्रत्यक्ष; पण 'अ' चा 'ब' वर प्रभाव आणि 'ब' चा 'क' वर प्रभाव पडला, तर 'अ' चा 'क' वर अप्रत्यक्ष प्रभाव पडला असे आढळते.




प्रत्यक्ष प्रभाव आणि अप्रत्यक्ष प्रभाव यांचे उदाहरण द्यायचे झाले तर असे देता येईल की, केशवसुत, हरी नारायण आपटे आणि कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर यांच्यावर अनुक्रमे इंग्लिश रोमँटिक कवी सर वॉटर स्कॉट आणि शेक्सपियर यांचे प्रत्यक्ष प्रभाव होते; पण बालकवी, नाथमाधव आणि रामगणेश गडकरी यांच्यावर अप्रत्यक्ष प्रभाव होते. वात्स्यायनांची कामसूत्रे आणि भागवतपुराणातील दशम स्कंद यांच्या वामन पंडित, रघुनाथ पंडित, एल्हण इत्यादी कवींवर प्रत्यक्ष प्रभाव होता; तर राम जोशी, होनाजी बाळा, परशराम इत्यादी कवींवर अप्रत्यक्ष प्रभाव होता. फार्सी प्रेमकाव्याचा प्रत्यक्ष प्रभाव माधव

ज्युलियन यांच्या प्रेमकवितेवर दिसून येतो; तर यशवंत आणि गिरीश यांच्या प्रेमकवितेवर अप्रत्यक्ष प्रभाव आढळून येतो. अप्रत्यक्ष प्रभावातील गडदपणा कमी कमी होत गेलेलाही प्रत्ययास येतो.

### आ) संकुल प्रभाव :-

जेव्हा एखाद्या विशिष्ट वाङ्मयीन परंपरेचा साकल्याने प्रभाव पडलेला आहे, असे लक्षात येते, तेव्हा त्या प्रभावाला 'संकुल प्रभाव' असे म्हणता येईल. उदाहरणार्थ मराठीतील पंडिती काव्यावर संस्कृतातील विदग्ध महाकाव्यपरंपरेचा प्रभाव पडलेला आहे. हा प्रभाव केवळ कालिदासाचा वा श्रीहर्षाचा वा माघाचा वा भारवीचा आहे असे म्हणता येत नाही. या चारही कवींनी रचलेल्या पाच महाकाव्याची रचनापद्धती, त्यातील वर्णनांची धाटणी, त्यातील अलंकार योजना, त्यातील रसपरिपोष या साऱ्याचा 'संकुल प्रभाव' मराठीतील पंडित कवींवर पडलेला दिसतो. 'संकुल प्रभाव' साहित्य निर्मितीकडे पाहण्याची वाङ्मयसृजकाची दृष्टी आणि त्याची आविष्कार शैली यातून प्रकट होतो आणि साहित्य निर्मितीमधील रचनाबंधांचे विश्लेषण करून त्याचा अभ्यास करता येतो.

### इ) प्रतिद्वंद्वी अथवा नकारात्मक प्रभाव :-

प्रभाव जसा सकारात्मक असतो, तसाच तो नकारात्मक अथवा प्रतिद्वंद्वी स्वरूपाचाही असतो. म्हणजे एखाद्या लेखकाने एखाद्या वाङ्मयकृतीत व्यक्त केलेला जीवनविषयक दृष्टिकोणाचा इतका प्रभाव पडतो की, त्याला प्रतिवाद करण्याकरिता त्याविरुद्ध जीवनविषयक दृष्टिकोण व्यक्त करणारी वाङ्मयकृती निर्माण करण्याची निकड भासू लागते. मराठीमध्ये केशवकुमारांनी लोकप्रिय केलेली विडंबन कविता ही एक प्रकारे प्रतिद्वंद्वीव्यक्त करणारी झालेली होती. रोमँटिक प्रेमाचा जो अतिरेकी उदोउदो रविकिरण मंडळाच्या कवींनी चालविलेला होता त्याला प्रतिद्वंद्व 'प्रेमाचे अद्वैत' या कवितेमध्ये, तर माधव जुलियनांनी अतिरेकीपणाने चालविलेल्या भाषाशुद्धी मोहिमेचा प्रतिद्वंद्व 'कषायपेयपात्रपतितमक्षिकेप्रत' या कवितेत अत्यंत सुंदर रीतीने केशवकुमारांनी केलेला आहे. मुळात ही दोन्ही आशयद्रव्ये अनुक्रमे इंग्लिश रोमँटिक कवींच्या सकारात्मक प्रभावातून आणि फार्सी कवितेच्या नकारात्मक प्रभावातून आलेली होती, हे लक्षात घेतले म्हणजे या प्रभावाच्या अभ्यासाला आणखी रोचक परिमाणे प्राप्त होतात. बांगला कथाकादंबऱ्यांच्या नकारात्मक प्रभावातून 'माणूस' हा मराठी चित्रपट निर्माण झाला, असे एक उदाहरण वसंत बापट यांनी दिले तेही चिंतनीय आहे. एस. एस. प्रावर नकारात्मक प्रभावाचा एक उपप्रकार सांगतात. एखाद्या साहित्यकाराला एखादी कल्पना सुचते, ती तो अर्धवट विकसित करतो आणि तेवढ्यावरच थांबतो; कारण त्याच्या लक्षात येते की, अमूक अमूक साहित्यकाराने अमूक ठिकाणी ती कल्पना अधिक चांगल्या तऱ्हेने विकसित केलेली आहे. अशा तऱ्हेने अर्धविकसित कल्पना रोखून धरणे (suppression) हा देखील नकारात्मक प्रभाव होय.

## ई) वैचारिक प्रभाव :-

तौलनिक साहित्य प्रामुख्याने एका साहित्याचा प्रभाव दुसऱ्या साहित्यावर कसा आणि किती पडलेला आहे, याची चिकित्सा करीत असले, तरी त्याने वैचारिक प्रभावाकडेही दुर्लक्ष करता कामा नये, असा इशारा एस. एस. प्रावर यांनी दिला आहे. उदाहाणादाखल त्यांनी दाखला दिला आहे की, एकोणिसाव्या शतकातील इंग्लिश साहित्यिकावर जर्मन काव्य, नाटक आणि कथात्मक साहित्य यांचा प्रत्यक्ष प्रभाव तेवढासा पडलेला नाही; पण जर्मन तत्त्वज्ञानातील आणि सौंदर्यशात्रातील संकल्पनांचा मात्र खूपच प्रभाव पडलेला आहे. कोलरिज आणि कार्लाईल यांच्या साहित्यातून झिरपत या संकल्पना इंग्लंडमध्ये पोहोचल्या होत्या. अशीच स्थिती आपल्याकडे वेदान्त तत्त्वज्ञान, बौद्ध तत्त्वज्ञान, गांधीवाद, मार्क्सवाद, स्त्रीवाद इत्यादीबाबत आढळून येते.

## ❑ प्रभाव आणि वाङ्मयीन संबंध :-

एकोणिसाव्या शतकात 'तौलनिक' हा शब्द जर्मन साहित्य समीक्षेत रुढ झाला. मॅक्समूलरसारखे जर्मन पंडित भारतीय प्राच्चविद्याशास्त्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत होते. असे काही सांस्कृतिक-साहित्यिक संबंध प्रस्थापित करणे हा तौलनिक साहित्यातील मौलिक विषय आहे. नव्या संकल्पनात 'आंतरराष्ट्रीय साहित्य', 'सर्वसाधारण साहित्य' आणि 'विश्व साहित्य' (वर्ल्ड लिटरेचर) या तौलनिक साहित्याच्या स्पर्धक संकल्पना आहेत. 'विश्वसाहित्य' (युनिव्हर्सल लिटरेचर) ही जोडसंज्ञा एकोणिसाव्या शतकात जर्मनीत आली. आपल्या एका नाटकाच्या फ्रेंच भाषांतरावर भाष्य करताना ग्योएथेने १८२७ मध्ये प्रथम 'वर्ल्ड लिटरेचर' अशी संज्ञा वापरली. नंतर ती निरनिराळ्या अर्थांनी अनेक ठिकाणी वापरली.

रवींद्रनाथ टागोरांनी १९०७ मध्ये 'वसुधैव कुटुम्बकम' या भारतीय आध्यात्मवादी परंपरेला अनुसरून तीच संकल्पना वापरली. मनुष्य व विश्वातील नातेसंबंध स्पष्ट करण्यावर भर दिला. एकशे वीस वर्षांपूर्वी विश्वसाहित्याची संकल्पना टागोरांनी उचलून धरली. यावर भाष्य करताना सिसिर कुमार दास खेदाने म्हणतात, ''ऐंशी वर्षांपूर्वी टागोर तौलनिक साहित्यावर बोलले. ती विद्याशाखा अद्याप स्वत्वाच्या शोधात आहे, तिला पाश्चात्त्य शैक्षणिक जगतात अद्याप मान्यता मिळायची आहे; आणि भारतात ती अस्पष्टपणेच ज्ञात आहे.''

या दोन महाकवींच्या 'विश्वसाहित्य' संकल्पनेचे संदर्भ सर्वस्वी भिन्न आहेत. ग्योएथे साम्राज्यवादी स्वतंत्र जर्मनीचा नागरिक होता. टागोर नोबेल पुरस्कार विजेते झाले, तरी गुलाम राष्ट्राचे 'नेटिव्ह' होते. दोघेही विश्व साहित्याचे गोंडस स्वप्न अशांत व अस्वस्थ युगात पाहात होते. ग्योएथच्या संकल्पनेच्या परिणामावर औपरोधिक भाष्य करताना एडवर्ड सईद यांनी म्हटले आहे की, ''विसाव्या शतकारंभीच्या तौलनिक साहित्याच्या धंदेवाईक विद्वानांकरिता ग्योएथेची विश्वसाहित्याची (weltiliteratur) कल्पना फार महत्त्वाची होती. थोर ग्रंथाची कल्पना व जगातील सर्व साहित्याचे धूसर एकजीवीकरण यांच्याबाबत

बाष्कळ बडबडीला उत्तेजन देणारी ही संकल्पना होती. पण मी आधीच सुचविल्याप्रमाणे तिचा व्यवहारातील अर्थ व कार्यकारी मतप्रणाली अशी होती की, साहित्य आणि संस्कृतीचा संबंध असेल, तर तेथे नेतृत्व हे युरोपकडेच असेल; आणि त्यांचा आवडीचा मुख्य हाच विषय होता.'' आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक व राजकीय संबंधातील हा गुंता लक्षात घेऊनच भारतीय साहित्याची थोरवी ठरविता येईल.

आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्थान किंवा प्रकार ठरविणे अवघड आहे. प्रभाव तुकड्या तुकड्यांनी किंवा तपशीलाने होत असतो. हा प्रभाव स्वीकारणाऱ्या साहित्यकृतीच्या धारणेवर परिणाम करतो. अनेक लेखकाच्या कमी अधिक प्रभावाचे जाळे स्वीकारक साहित्यकृतीत कसे विणले जाते, याची चर्चा वर केली आहे. संबंधच्या पातळीवर नव्या दिशा शोधताना वरवरचे साम्य खरे नसते. आकृतिबंध व शैलीतंत्रातील साधर्म्य महत्त्वाचे मानले जाते. कारण त्यामुळे संकल्पना वास्तवात उतरायला मदत होते. प्र.के.अत्रे यांनी मराठीपणाची जाहिरात 'मराठा' तून केली, तरी त्यांच्या नाटकांचे इंग्रजाळलेपण लपत नाही. कधी-कधी अनुकृत साहित्यकृती मूलाधारापेक्षा उजवी व मूलभूत ठरते. आंग्ल नाटककार डब्ल्यू. एस. गिल्बर्ट व ए. एस. सलिव्हान इंग्रजीतील तिय्यम दर्जाचे नाटककार मानले जातात. त्यांच्या थेस्पीस च्या मुबईतील वळणाने आण्णासाहेब किर्लोस्करांनी सं. सौभद्र रचले आणि ते मराठीत प्रथम दर्जाचे ठरले. यावरून असे ध्यानात यावे लागते की, ज्या देशातील वाङ्मयाचे अनुकरण भरभरून केले जाते, त्याच देशातील जनमानसातील प्रतिमा काही काळ भ्रष्ट-दुष्ट अशी नकारात्मक बनत जाते.

'आंतरराष्ट्रीय संबंध' या संज्ञेत सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय संबंध एकाचवेळी गृहीत धरले जातात. हे मानवी संबंध गुंतागुंतीचे व जिवंत असतात. एखाद्या राष्ट्रात किंवा कालखंडात कधी कधी ते त्रासदायकही ठरतात. काही कारणाने एक राष्ट्र मुख्य प्रवाहापासून बाजूला फेकले जाते. यामुळे त्याच्या संस्कृतीत फरक होत जातो. बहुविध संस्कृतीत विविधतेला महत्त्व प्राप्त झालेली दिसून येते. शुद्ध वाङ्मयाभ्यासही संस्कृती-अभ्यासाकडे झुकत असतो. जागतिकीकरणात राष्ट्राचे संबंध वाढत जातील, त्याप्रमाणात जास्तीत जास्त तौलनिक अभ्यास वाढत जाईल. आंतरराष्ट्रीय संबंधाला सांस्कृतिक व राजकीय बाजू राहणारच. पण त्यात सातत्याने अज्ञान, गैरसमज, प्रादेशिक पूर्वग्रह, मानसिक जडत्व आणि अर्थातच सैनिकी सत्तेशी सामना आधीच गृहीत धरावा लागतो.

औद्योगिक क्रांतीनंतर आंतरराष्ट्रीय संबंधाचे स्वरूप झपाट्याने बदलत गेले. या संबंधाच्या काही अवस्था कल्पाव्या लागतात. त्यांची रूपरेषा व विविध बाजू लक्षात घ्याव्या लागतात. या अवस्था कालानुक्रमे असतीलच असे नाही. परस्पर प्रभावाचे बलाबल, प्रभाव स्वीकारणाऱ्याचे प्रभुत्व आणि कालसापेक्षता यावर ते टप्पे अवलंबून असतात. आंतरराष्ट्रीय संबंध संस्कृतीसापेक्ष राहणार. विरोधातच विकासाची बीजे असतात. फरकांना संस्कृतिसापेक्षता कवेत घेते. संपर्काच्या पहिल्या टप्यात नावीन्याची ओढ जास्त असते. 'भारतीय संबंधाभ्यास' हे वस्तुः स्वीकार, स्वागत कक्षातील उगमाशी निगडित

असतात. हे आपण पूर्वग्रह बाजूला सारून मान्य करायला हवे. त्यांना मीमांसेच्या 'केंद्रस्थानी' ठेवणे योग्य आहे, हा निर्वाळा मुजूमदारांनी दिला आहे.

तौलनिक साहित्याचा गाभा म्हणजे संबंध असे मानले जाते. या संबंधातूनच मूलाधार, अनुकरण, प्रभाव, स्वगत वगैरे प्रकारचे अभ्यास पुढे आले. जुन्या व नव्या तौलनिक साहित्यातील प्रमेयात व प्रवाहात फार बदल होत आहेत. ते एका दृष्टिक्षेपात पाहता येण्यासाठी काही मुद्दे खाली दिले आहेत.

**अ) ॲन बल्कियानने 'इन्फ्लुअन्स ॲण्ड लिटररी फॉर्च्युन : द इक्विहोकल जंक्शन ऑफ टू मेथडस्'मध्ये प्रभावाभ्यासाचे चार उद्देश सांगितले आहेत.**

१) वाङ्मयीन दैव तपासणे.

२) प्रभावाचे मूल्यमापन.

३) 'खोट्या प्रभावा'चा शोध.

४) मूलगामित्वाचा/कुलसाम्याचा उलगडा.

या विदुषीने 'थियॉरायझिंग कम्पॅरिझन : द पिरॅमिड ऑफ सिमिलीट्यूड ॲण्ड डिफरन्स' या लेखात पिरॅमिडचे रूपक वापरून वाङ्मयीन संबंधाचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट केले आहे. साहित्याचा भर साम्य शोधण्यावर होता. तो आता फरकावर आढळतो. एकात्मतेचे स्वप्न फुटीतून निर्माण होणाऱ्या अनेकतेत पाहिले जाते. संतुलन साधण्यासाठी तिने पिरॅमिडच्या वैश्विकतेचा पाया घातला आहे. त्यात विविधता अखेर एकात्मतेच्या कळसाला पोहोचते आणि तुलनांना मोठा वाव मिळतो. त्याच्या पायात सर्व प्रकारच्या साहित्याची आदिम आशयसूत्रे आढळतात. लोककथा व मिथकांत हे साधर्म्य आढळते. साहित्यसंहिता या वैश्विक साधर्म्याच्या आधारावर परस्परांना जोडता येतात. जगातील नाटवाङ्मय तीन सूत्रात बांधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यात एकजिनसीपणा आढळतो. भेदामध्येही काही समान संरचना आढळतात. बहुसांस्कृतिक दृष्टिकोण स्वागत/प्रभावाभ्यासात कसा महत्त्वाचा आहे हे सांगताना ती म्हणते –


'जसजसे सांस्कृतिक वर्गाचे थर साचत जातात, तसे त्यांच्यातील भेद/फरक चिकाटीने शोधणे ही तुलनाकाराची ध्येये आहेत. मात्र त्यांनी प्रत्येकाचे आणि परस्परांचे चांगले आणि विशालतम आकलन होण्यासाठी परस्परांना जीवनसत्त्व पुरवायलाच हवे. या प्रक्रियेला पूरकत्वाचा (complementarity) शोध असे नाव देता येईल. अतिशय दुरुपयोग झालेल्या 'प्रभाव' संकल्पनेकडे अनुकरण म्हणून पाहू नये. पण तिच्याकडे बदलाची प्रक्रिया म्हणून बघावे. भाषिक भेद हा भाषा समजून घेण्याचा मार्ग आहे.

आंतरराष्ट्रीय संबंधाकडे आज खूप व्यापक आणि वेगवेगळ्या दृष्टिकोणातून पाहिले जात आहे. बल्किन पिरॅमिडमध्ये देशी घटकांना योग्य स्थान देते. वांशिक भेदाच्या भिंती ओलांडून साहित्यात

परस्परांना जोडणारे दुवे, सुसंगती आणि सुसंवाद कसा निर्माण होतो, हे पटवून देण्याचा तिचा प्रयत्न आहे. ही विश्ववादी भूमिका सर्वच तुलनाकारांना पटेल, असे नाही. ही बाब पूर्वीच निदर्शनास आणली आहे. प्रभाव एकटे नसतात. ते जाळे लक्षात घेऊन त्यांचे समानधर्म शोधता येतात.

**ब) दोन बंगाली तुलनाकारांची मते तुलनेसाठी पाहू.**

सर्वसाधारण 'प्रभाव' म्हणजे एखाद्या साहित्याचा किंवा साहित्यिकाचा दुसऱ्या साहित्यावर किंवा साहित्यिकावर विशिष्ट प्रकाराचा ठसा जाणवतो. तो ठसा कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्षपणे जाणवतो. याचाच अर्थ एका साहित्याचा किंवा साहित्यिकाचा दुसऱ्या साहित्यावर किंवा साहित्यिकावर परिणाम जाणवतो. तो 'प्रभाव' रूपात असतो. 'प्रभाव' ही संकल्पना इंग्रजी समीक्षक कोलरीज यांनी प्रथम मांडली. 'प्रभाव' संकल्पनेसाठी अमेय देव यांनी फ्रेंच परंपरेला अनुसरुन आंतरराष्ट्रीय पातळीवर साहित्याचे किंवा साहित्यिकाचे संबंध स्पष्ट करण्यासाठी सहा संज्ञा वापरल्या असल्याचे दिसते. 'प्रभव', 'अनुकरण', 'ठसा' (impact), परिणाम (effect), 'स्वागत' (reception), आदिशेष (survival) अशा संज्ञा वापरल्या आहेत. या सगळ्या संज्ञा संबंध या वर्गात मोडतात. या साहित्याचा किंवा साहित्यिकाचा प्रभाव जाणवतो ती मूळ साहित्यकृती किंवा साहित्यिक, जो संहिता स्वीकारून लेखन लिहिले गेलेले किंवा साहित्यिक हा स्वीकारणारा असतो. या प्रभाव प्रक्षेपक आणि स्वीकार करणारा या दोघांना जोडणारा एक मध्यस्थ, त्याची संकल्पना स्पष्ट झाली पाहिजे, यामुळे स्वागताचे वेगळे 'परिमाण' स्पष्ट होते. याची मांडणी अमेय देव यांनी खालीलप्रमाणे केली आहे.



हा आराखडा परिपूर्ण नाही, अशी कबुली देव यांनी दिली आहे. त्यांच्या आधारद्रव्यात (matrix) भाषांतराचा समावेश नाही. हे एक उदाहरण पाहिल्यास त्रुटींचा उलगडा होईल. प्रभाव प्रसारात भाषांतरे महत्त्वाची अवस्था असते. स्वपन मुजमदारांनी प्रभावाच्या सौदर्यशास्त्राची मांडणी केली आहे. मूलाधार शोध - शिकार अथवा लेखकाच्या कर्जबाजारीपणा - उचलेगिरी - उधारी वगैरे बाबतची वाचकांची उत्सुकता पुरी करणे हा प्रभावाभ्यासाचा उद्देश नाही. लेखकाच्या निर्मितिप्रक्रियेतील विविध आकृतिबंध आणि मातृका (Matrice) दाब आणि ओढाताण समजून घेणे हा त्याचा प्रमुख हेतू असतो. लेखकाची मूलभूतता अजमावण्याचे उद्दिष्टही परवापर्यंत बाळगले जाई. मानसशास्त्रीय अंगाने वाङ्मयीन प्रभावाच्या अभ्यासाचे समर्थन करीत मजुमदारांनी प्रभाव व अनुकरण या संकल्पनातील भेद स्पष्ट केला आहे.

## ❑ प्रभाव आणि सहासाम्य (Analogy)

सहज साधर्म्य सहसा 'सहज' नसते. प्रभाव, समांतर, साम्यभेद यांचा रचनासंबंध 'आंतरराष्ट्रीय' संबंधाशी फार निकटचा असतो. त्यासाठी 'प्रभाव' आणि 'सहजसाम्य' या दोहोतील फरक समजावून घेणे महत्त्वाचे आहे. ए. ऑविन ॲल्डरिज यांनी सहजसाम्य (anology) ची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ''ज्यामध्ये दुसरा कोणताही संबंध/संपर्क नसतो. अशा दोन साहित्यकृतीमधील शैली, रचनाशिल्प, मन:स्थिती अथवा कल्पना यामध्ये असणारी साम्ये.''

याचे उदाहरण म्हणून त्यांनी जेम्स जे. वाय. लिऊ यांच्या तौलनिक साहित्याभ्यासाचा निर्देश केला आहे. लिऊ यांनी पूर्वेकडील नाटकांचा एलिझाबेथ काळात इंग्लंडला माहिती नव्हती. तरीही लिऊ यांनी इंग्लंडमधील नाटके आणि चिनी नाटके यातील साम्ये दाखवून दिली आहेत. या दोन्ही देशातील नाटकांच्यात थेट प्रभाव संपर्क नव्हता, त्यामुळे हा तौलनिक अभ्यास जास्त रोचक आणि नाट्यनिर्मितीचे काही सिद्धान्त बनविण्यास उपयुक्त झाला आहे.

व्ही. एम. झिर्मून्स्की यांनी फ्रेंच साहित्यकृतीमधील नायकाची संकल्पना आणि रशियन लोकगीतामधील कथाकाव्यातील नायकाची संकल्पना यामधील अनेक वाङ्मयीन सहजसाम्यांचा अभ्यास केला आहे. या सहजसाम्यांचा मागोवा घेत ते त्या त्या प्रदेशातील समाजगटांच्या तुलनात्मक अभ्यासापर्यंत पोचले आहेत. ते म्हणतात- ''वाङ्मयातील विकास क्रमाच्या या समान प्रवृत्तींचा तौलनिक अभ्यास आपल्याला वाङ्मयीन विकास क्रमाच्या काही सर्वसाधारण नियमांचे आणि सामाजिक पूर्वस्थितीचे नीट आकलन करवून देतो आणि त्याचवेळी प्रत्येक साहित्याच्या ऐतिहासिक आणि राष्ट्रीय विशिष्टतेची समज घडवितो.''

सहजसाम्याविषयी एस. एस. प्रावर यांनीही लिहिले आहे. हा अभ्यास म्हणजे आर्थर हट्टो यांनी संपादित केलेला 'ईओएस; ॲन इन्क्वायरी इंटू दि थिम ऑन लव्हर्स मीटिंग ॲण्ड पार्टिज ॲट डॉन इन

पोएट्री' हा ग्रंथ होय. पहाटेच्यावेळी झालेली प्रेमिकांची मीलने आणि त्यांचे वियोग या आशयसूत्राचे चित्रण आणि विकसन काव्यातून कसे झालेले आहे. हा या अभ्यासाचा विषय आहे. या अभ्यासामध्ये आदिमकाळापासून सुसंस्कृत काळापर्यंत पेरुपासून चीनपर्यंतच्या कवींच्या कवितांचा समावेश केला आहे. प्रावर म्हणतात, ''सामाजिक, वाङ्मयीन व मानसशास्त्रीय अशा तीन घटकांचा परस्पर संबंध त्यात कार्यरत झालेला आहे.''

यावरून लक्षात येते की तौलनिक अभ्यासात सहजसाम्याच्या अभ्यासालाही स्थान आहे; सहजसाम्याचा अभ्यासही उपयुक्त निष्कर्षांना कारणीभूत ठरू शकतो; मात्र सहजसाम्याचा अभ्यास म्हणजे प्रभावाचा अभ्यास नव्हे, याचे भान राखणे आवश्यक आहे. याविषयी वसंत बापट म्हणतात– ''दोन साहित्यात साधर्म्य आढळले की, प्रत्येक वेळी तेथे 'प्रभाव' शोधणे बरोबर ठरणार नाही. सदृश्य संस्कृती, समाजव्यवस्था, आर्थिक व्यवस्था, राजकीय वातावरण, साहित्यिक गरजा यापैकी कोणत्याही कारणांमुळे दोन साहित्यात साधर्म्य उत्पन्न होईलही; पण तेथे 'देते' साहित्य आणि 'घेते' साहित्य असे नाते संभवत नाही.''

## ❑ प्रभाव आणि परंपरा :–

प्रभावाच्या सिद्धान्ताचा स्वतंत्र अभ्यास करावयाचा झाल्यास स्वतंत्र ग्रंथ लिहावा लागेल. अमेरिकन नवसमीक्षेचा जोर केवळ संहितेच्या शास्त्रीय विवेचनावर होता. त्याला फाटा देऊन हॅरॉल्ड ब्लूमने विसाव्या शतकाच्या मध्यावर नव–फ्राईडवादी भूमिकेला गूढवादाची जोड दिली. साहित्यकृतीचे वाचन स्वेच्छेनेच चुकीचे होत जाते. इडिपस गंडामुळे नवखा लेखक जुन्या पितामहाला मारून स्वत:साठी जागा करतो व अँग्झायटी ऑम इन्प्लुअन्स (१९७३), ए मॅप ऑफ मिसरीडिंग (१९७५), कब्बाला ॲण्ड क्रिटीसिझम (१९७५), पोएट्री ॲण्ड रिप्रेशन (१९७६) वगैरे ग्रंथात ब्लूमने वाङ्मयीन प्रभावाच्या चिंतेचे नवे सौंदर्यशास्त्र मांडले आहे. केवळ एका कवितेच्या स्वतंत्र व स्वयंभू साहित्यकृती म्हणून विचार करता येत नाही. ती परंपरेत गुंतलेली असते. एकाच परंपरेतील कवींचे प्रेम/द्वेष– स्पर्धेचे नाते असते. त्यांचा 'कौटुंबिक रोमान्स' त्यांच्या काव्यावर परिणाम करतो. त्यांच्यातील स्पर्धा, संघर्ष आणि युद्ध म्हणजेच युरोपातील आधुनिक काव्याची परंपरा होय. प्रभाव संकल्पना केंद्रस्थानी ठेवून ब्लूमने काव्यपरंपरेचा पुनर्विचार केला, हे मोठे धाडस होते. पॉल द मानने नीत्शेचा अभ्यास केला होता. ते उदाहरण मदतीला घेऊन ब्लूमने 'साहसी आणि महत्त्वाच्या कल्पना मांडल्या' असे फ्रँक लेंट्रिका म्हणतो.

ब्लूमच्या प्रभाव सिद्धान्तात बदल झाले. 'प्रभाव' हा परंपरेत निरोगी असावा लागतो. तो प्लूसारखाही असू शकतो. त्याने अनुकरणपरंपरा स्वीकारून मूलभूतता, उत्स्फूर्तता आणि नवता या संकल्पनावर गैरविश्वास व्यक्त केला. त्या नाकारल्या मात्र नाहीत. प्रभाव याचा अर्थ संहिता नसतातच मुळी, पण संहितांमधील संबंध असतात, असा आहे. मानवतावाद, धर्म आणि गूढवादाच्या आधारे

ब्लूमने फ्रेंच उत्तरसंरचनावाद्यांच्या सिद्धान्तांना प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला. काव्यप्रभावाला बौद्धिक उजळणीचा भाग ठरवले. ब्लूमच्या सिद्धान्तावर अनेक आक्षेप घेण्यात आले. स्टीफन बर्गने प्रभावासंबंधीच्या अनुभवकथनावरील अमेरिकन लेखकांच्या लेखांचा संग्रह 'इन प्रेज ऑफ व्हॉट पर्सिस्टस्' (१९८३) नावाने प्रसिद्ध केला आहे. त्याच्या प्रस्तावनेत त्याने ब्लूमच्या सिद्धान्तात सर्जनशील लेखकाला साहित्यिकाच्या विश्वातच कोंडले जाते, आणि संसर्गापासून बचावासाठी जेरबंद केलेल्या रोग्यासारखे जखडून ठेवले जाते असा आक्षेप घेतला आहे.

सहजसाम्याची पुढची पायरी म्हणजे परंपरा असे मानले जाते. एखादा साहित्यकार जाणूनबुजून एखाद्या परंपरेचा स्वीकार करतो. तेव्हा त्या परंपरेची बरीचशी रचनावैशिष्ट्ये त्याच्या साहित्यकृतीत आपोआप अवतरतात. या रचनावैशिष्ट्यांनाही प्रभाव मानता येणार नाही. उदाहरणार्थ, ग. दि. माडगूळकर अथवा शांता शेळके जेव्हा एखादी 'लावणी' लिहितात, तेव्हा लावणी वाङ्मयाच्या परंपरेत त्यांनी स्वत:ला गुंफून घेतलेले असते. साहजिकच शृंगाराचे रंग, शब्दांचे नर्तन आणि नृत्यपूरक तालबद्धता ही लावणी वाङ्मयाची वैशिष्ट्ये त्यांच्या रचनांमध्ये अवतरणे क्रमप्राप्त ठरते. त्याकरिता जयदेवांच्या 'गीतगोविंद' चा प्रभाव त्यांच्यावर आहे की काय, हे तपासून पाहण्यात औचित्य नसते. परंतु बा. भ. बोरकर अथवा ज्ञानेश वाकुडकर जेव्हा लावणी परंपरेत नसणाऱ्या त्यांच्या प्रेमकवितेत स्त्रीच्या देहाचे उन्मादक चित्रण करतात, तेव्हा त्यांच्यावरील संस्कृत आणि उर्दू काव्याचा प्रभाव शोधणे फलदायी ठरते. नारायण वामन टिळक यांचे अभंग वाङ्मय परंपरेतील असल्याने भारतीय भक्तिपरंपरेचा प्रभाव त्यांच्यावर शोधण्यात हाशील नसते. परंतु मर्ढेकर अथवा विं.दा.करंदीकर अथवा अरुण कोल्हटकर यांनी लिहिलेल्या अभंगात भारतीय भक्तिसाहित्याचा सकारात्मक अथवा नकारात्मक प्रभाव शोधणे महत्त्वाचे असते; कारण अभंग या छंदाचा स्वीकार त्यांनी परंपरांतगत वृत्तीने नव्हे, तर काही अन्य प्रयोजनाने केलेला असतो.

प्रभावाचा अभ्यास करताना त्या साहित्यकृतीमध्ये मुद्दाम 'वेगळ्या प्रकारे वाचन' (मिसरीडिंग) करून परंपरेचे संदर्भ, सकारात्मक प्रभाव आणि नकारात्मक प्रभाव याविषयी प्रश्न उभे करता येतात. मागे दिलेली उदाहरणेच पुढे चालवायची झाली तर ग. दि. माडगूळकर यांच्या लावण्यामध्ये विलक्षण माध्यमाच्या गरजा यांचे प्रभाव किती याची चर्चा करता येते. वसंत बापटांची 'लावणी इवलीची' किंवा नारायण सुर्वे यांची 'मुंबईची लावणी' यांसारख्या कवितांमध्ये परंपरेपासून 'कलात्मक विगमन' (artistic deviation) करताना त्यांच्यावर कोणकोणते प्रभाव कार्यरत झाले, याचा शोध घेतला जाऊ शकतो. अरुण कोल्हटकर यांच्या 'चिरीमिरी' या काव्यसंग्रहाच्या बाबत हेच करावे लागते. विठोबा या दैवताचे मिथक आणि एकूणच 'अभंग' या काव्य-छंद प्रकाराची आत्मरंग वैशिष्ट्ये यांच्यामध्ये त्यांनी कसे आणि का विगमन केले आहे, याचा शोध घेताना नानाविध प्रभावांची चिकित्सा करावी लागते.

## ❑ संप्रेषण :-

साहित्याच्या क्षेत्रात संप्रेषण ही एक अगदी स्वाभाविक, अपरिहार्य व निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. साहित्याच्या क्षेत्रात आदानप्रदान म्हणजेच संप्रेषण फार प्राचीन काळापासूनच होत आले आहे. साहित्य हे जसे लिखित असते तसे ते मौखिकही असते. अशा मौखिक साहित्याची परंपरा शतकानुशतके टिकून आहे. लोकसाहित्यातून आजही याचा प्रत्यय येतो. वेगवेगळ्या आदिवासी समाजांतील कथा-कहाण्या पुष्कळदा सारख्या असतात. याचे कारण म्हणजे त्यांच्यात झालेली देवाण-घेवाण, ही देवाणघेवाण प्रत्यक्षच होते असे नाही. त्यांच्यामध्ये दुवा जोडणारे भटके आणि फिरस्ते या कामी हातभार लावत असतात. जगातील भटक्या जमातींनी इकडच्या कहाण्या तिकडे पोहोचविण्याचे काम मोठ्या प्रमाणावर केले आहे. आंध्रप्रदेशापासून राजस्थान-बलुचिस्थान या मार्गाने मध्य आशियात, तेथून पश्चिम आशियात, इतकेच काय पुढे उत्तर आफ्रिका व दक्षिण युरोपमध्ये भ्रमंती करीत साहित्य इकडचे तिकडे नेण्याचे काम भटके, फिरस्ते यांनी केले आहे. त्यांच्याबरोबर लौकिक समजुती, सामाजिक आचारविचार, लोकगीते, कहाण्या, भाषिक विशेष यांचे संप्रेषण घडून आले आहे.

प्राचीन काळातही दळणवळणाचे मार्ग होते. 'इंका' संस्कृतीच्या शोधानंतर यावर अधिक चांगला प्रकाश पडल्याचे दिसून येते. प्राचीन काळी भारतीय धर्म आणि तत्त्वज्ञान याबरोबरच गणित आणि विज्ञान जगात पोहोचल्याचे पुरावे आहेत. पूर्वेकडे आणि दक्षिणेकडे भारताचे सांस्कृतिक साम्राज्य पसरले होते. भारत आणि अरबस्तान, भारत आणि ग्रीस, अरबस्तान आणि दक्षिण युरोप यांच्यामध्ये जसे व्यापारी संबंध होते तसेच त्यांच्यात साहित्याची देवाणघेवाणही होत होती. ग्रीक महाकाव्ये आणि रामायण यांच्या संबंधाबद्दल विद्वानांच्यात वादविवाद चालत असत. बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी सम्राट अशोकाने आपले शेकडो धर्मप्रसारक अनेक देशात पाठविले होते. तिबेट, चीन, सिलोन अशा देशात अद्यापही याबाबतची असंख्य हस्तलिखिते आहेत. येशू ख्रिस्त लडाखमधील 'हेमिस' गुंफेत आठ वर्षे राहिला आणि तेथेच त्याने आपला धर्मविचार निश्चित केला असावा असा समज आहे. भारतीय किनाऱ्यावर शरणार्थी म्हणून आश्रय घेणारे पारसी आणि ज्यू यांनी आपले विचार भारतीय भूमीत पेरले असतील, भारतीय विचार वाऱ्यावर सोडलेही असतील, आणि भारतीय हवामानात बदलूनही घेतले असतील हे उघडच आहे. बौद्ध धर्म भारताबाहेर गेल्यानंतर त्या त्या वातावरणानुसार त्यात बदल झाले आहेत. त्याचप्रमाणे भारतात आलेल्या धर्माबाबतीत झाले असावे.

एकंदरीत हे दळणवळण किंवा संप्रेषण धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक अभिसरणात तुटपुंजे असले तरी त्याचे सर्वत्र मिश्रण झालेले पाहायला मिळते. त्यात कोणतीच संस्कृती आज आपणास वांशिकदृष्ट्या विशुद्ध राहिलेली दिसत नाही. सर्वांच्या स्वरुपात विलक्षण संमिश्रता आहे. याचाच अर्थ वैचारिक प्रक्रियेतही वाङ्मयीन पातळीवर आदानप्रदान होत होते असे गृहित धरले पाहिजे. केवळ जिज्ञासेपोटी

मेगॅस्थेनिस व मध्ययुगात मार्को पोलो यांसारख्या प्रवाशांनी कितीतरी भूमी आपल्या पायाखालून घालवली होती. आपल्या धर्मभूमीला भेट द्यायला आलेले इतसिंग, फाहियेन, ह्यू-एन-त्संग अशा कैक प्रवाशांनी फार डोळसपणे जग पाहिजे आणि धर्मसाहित्याची तरी देवाणघेवाण केली हे निश्चित आहे.

## ❑ स्वागत-स्वीकार (Reception)

'स्वागत' किंवा 'स्वीकार' हे शब्द साहित्यापेक्षा हॉटेल व्यवस्थापन, सभासंमेलने यामध्ये अधिक शोभून दिसतील. सार्वजनिक ठिकाणी वापरला जाणारा हा शब्द साहित्यातील समीक्षेचे अंग बनेल असे कोणालाही वाटले नसावे. प्रभाव व स्वागत (Reception) या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. स्वागताभ्यासात (reception) व (response or effect) यांच्यातील फरक स्पष्ट केला जातो. हे भिन्न दृष्टिकोण आहेत, त्यांचे साध्य मात्र एकच आहे. स्वागत सिद्धान्त जर्मन साहित्य अभ्यासक हॅन्स रॉबर्ट जाऊस (jauss) याने नोंदवला आहे.

''एखाद्या साहित्यिकाने दुसऱ्या भाषेतील साहित्याशी परिचित होणे, त्या साहित्याशी त्याचे भावबंध जुळून येणे आणि त्या साहित्याचा स्वत:च्या सर्जनक्षमतेवर सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम होऊ देणे, या सामग्री प्रकियेला 'स्वीकार' असे म्हणतात.'' अशी स्वागत किंवा स्वीकार सिद्धान्ताची व्याख्या दिली जाते. एका बाजूने पाहिल्या जी 'प्रभाव' प्रक्रिया वाटते, तीच दुसऱ्या बाजूने पाहिल्यास 'स्वीकार' प्रक्रिया वाटते. ज्यांच्यावर प्रभाव पडतो त्या साहित्यक्षेत्राची क्षमता, प्रवृत्ती आणि गरज यांच्यावर स्वीकाराचे प्रमाण अवलंबून असते. यासाठी पाण्याचे उदाहरण देता येईल. नदीवर पाणी आणण्यास गेलेल्या अनेकांच्याजवळ वेगवेगळी क्षमतेप्रमाणे भांडी असतील जसे कोणाकडे घागर असेल, कोणाकडे कळशी असेल तर कोणाकडे तांब्या, पेला असेल. कोणाला ओंजळीने पाणी प्यायचे असेल. प्रत्येकाची प्रवृत्ती आणि गरज वेगवेगळी असते. स्वीकाराच्या बाबतीत तसेच असते. वि. स. खांडेकरांचा प्रभाव मराठी कादंबरीकारांनी स्वीकारला नाही, इतका गुजराती आणि तमिळ कादंबरीकारांनी स्वीकारला होता. इंग्रजीमध्ये ज्याला दुसऱ्या दर्जाचे कादंबरीकार मानले गेले होते, त्या रेनॉल्ड्सच्या प्रभावाखाली कांदंबऱ्या लिहिणारे नारायण हरी आपटे पहिल्या दर्जाचे कादंबरीकार ठरले गेले. याचे गणित स्वीकार प्रक्रियेत आहे.

स्वागत किंवा स्वीकार प्रक्रियेत आंतरिक घटक म्हणून जसे क्षमता आणि गरज यांना महत्त्व असलेले दिसते, त्याचप्रमाणे काही बाह्य घटकही सांगता येतात. विशिष्ट राजकीय परिस्थिती, घट्ट मुळे रुजलेले सांस्कृतिक संस्कार हे बाह्य घटकही स्वागत सिद्धान्तात महत्त्वाचे मानले जातात. राजकीय परिस्थितीत जेव्हा जित आणि जेते असा संबंध असतो तेव्हा जेत्यांच्या संस्कतीमधील तत्त्वे (त्यांचे साहित्य) जीत लोकांना स्वीकारार्ह वाटू लागतात. त्याप्रमाणे त्यांच्या साहित्यात, संस्कृतीत बदल होताना दिसतात. महाराष्ट्रातील संत नामदेव पंजाबमध्ये घुमान येथे जाऊन वीस वर्षे राहिले होते. त्यावेळी त्यांनी

तिथल्या स्थळांना वेळोवेळी भेटी दिल्या होत्या, जिथे हिंदू आणि मुस्लिम एकत्र राहत होते. संत नामदेव तिथल्या वास्तव्यात तिथल्या लोकजीवनाशी एकरूप होऊन गेले होते. तिथली भाषा त्यांनी आत्मसात केली होती. त्या भाषेत आपल्या आध्यात्मिक अनुभूतीचा आविष्कार करणारी पदे त्यांनी रचली आहेत. या त्यांच्या रचनांवर तिथल्या लोकजीवनाला प्रभाव पडल्याचे स्पष्ट आहे. महाराष्ट्रात सगुण भक्ती परंपरेत रमलेले नामदेव पंजाबमध्ये मात्र निर्गुणाकडे झुकले. मुस्लिम धर्मात जातीभेद नव्हता. सर्व समतेच्या पातळीवर वावरत होते. नामदेवांच्या घुमान येथील अभंग निर्मितीवर याचा प्रभाव दिसून येतो. त्यांनी जातीभेद वर्ज्य मानला व मानवतेच्या एकतेची द्वाही पुकारली. भक्तिमार्ग सर्वांसाठी खुला केला. हे सारे मुस्लिमांचे अनुकरण नव्हते; तर ज्येत्यांच्या विचारप्रणालीतील जी तत्त्वे जितांना आकर्षक वाटण्याची शक्यता होती, ती आपल्याही विचारप्रणालीत त्यांच्यापेक्षा अनुगम्यतेने कशी अनुस्यूत आहेत, त्याचे अधोरेखन होते.

भारतावर अनेक वेळा वेगवेगळ्या प्रदेशांतील लोकांनी आक्रमणे केली. त्यामध्ये आर्य, शक, यवन, मुघल यांनी आक्रमणे केली, इथे राज्ये केली, इथल्या संस्कृतीशी एकरूप झाले होते. मात्र एकोणिसाव्या शतकात इंग्रजांनी आपला एकछत्री अंमल निर्माण केला असला तरी ते इतर आक्रमकांच्याप्रमाणे इथल्या संस्कृतीत मिसळले नाहीत. धर्म आणि संस्कृती याबाबतीत त्यांच्यात अहंकार होता. त्यांनी वसाहतीचे राज्य भारतावर केले. वासाहतिक राज्यात लोकांच्या जीवनात, संस्कृतीत, साहित्यात घडून येणारे बदल हे सक्तीने घडून येतात. अशा संदर्भातील साहित्य बदलांच्या पुनरावृत्तींचा वेग नोंदवते आणि त्याचवेळी आपल्या विकासाचा आणि वाटचालीचा मार्ग सूचित करते. वसाहतीच्या राज्यातील साहित्याचे वसाहतकारशी असलेले नाते द्विविध स्वरूपाचे असते. एक ते गुलामी प्रवृत्तीने वसाहतकारांचा त्यांच्या स्तुतीचा अतिरेकी उदोउदो करते; तर कधी वसाहतकारांना विरोध करीत परंपरेला कवटाळण्याचा प्रयत्न करीत असते. म्हणजेच वसाहतकाळात स्वीकाराची प्रक्रिया दोन पातळ्यावर एकाचवेळी घडत राहते. एकीमुळे गुलामी प्रवृत्तीने स्तुती करण्याकरिता पुनर्मूल्यांकन वसाहतकारांनी लादलेल्या मूल्यांच्या अनुरोधाने होत राहते, तर दुसरीमुळे परदेशी साहित्यकृतींचा स्वीकार समीक्षेच्या तरतमभावानुसार करताना त्यांना एका वेगळ्याच पातळीवर नेऊन ठेवले जाते, जिथे त्या केवळ आस्वाद्य साहित्यकृती नसतात तर आदर्शाचे ठोस नमुने मानले जातात. परिणामत: साहित्यकृती म्हणजे लेखकाच्या कल्पना आणि विचार प्रगट करण्याचे एक साधन, एवढेच तिचे अस्तित्व उरते.

भारतीयांच्याविषयी तुच्छतेचा दृष्टिकोन ब्रिटिशांनी कायम ठेवला होता. वसाहतवादात निवडीची सक्ती अंतर्भूत असते. त्यामुळे जेव्हा इंग्लंडमधील लोक उदार कल्पनेच्या वातावरणाचा आनंद लुटत होते त्याचवेळी वसाहतीमध्ये मुक्त विचारांचे वारे वाहू देणे त्यांना परवडणारे नव्हते. ब्रिटिशांनी केलेल्या सुधारणांची आरती ओवाळणाऱ्या लेखकांनाच नोकरी किंवा त्याच्या पुस्तकाला पुरस्कार दिला जात होता. यामागे ब्रिटिशांची असलेली मानसिकता त्यांच्या उदारीकरणाचा संकुचित भाव अधोरेखित करते. फ्रेंच

राज्यक्रांतीनंतर इंग्लिश साहित्यिक नव्या विचारांनी बनत होती. मात्र त्याचवेळी भारताच्या किनाऱ्यावर उतरली जाणारी पुस्तके यापासून दूरच होती. वसाहतकार जी पुस्तके देतील तीच भारतीयांना निवडणे गरजेचे होते, तशी सक्तीच होती. याचा वासाहतिक स्वीकार प्रक्रियेवर परिणाम झालेला आढळून येतो. प्रभावप्रक्रियेत अंतर पडल्याचे दिसून येते. शेक्सपियर किंवा मिल्टन यांच्या नाटकांची अनुकरणे झालेली असली तरी त्यातील किती स्वेच्छेने झाली होती आणि किती निरुपाय म्हणून झालेली होती हा एक संशोधनाचा विषय ठरू शकतो. त्यावेळच्या ब्रिटिश विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात ग्रीक आणि रोमन साहित्यकृतींचा समावेश होता तर भारतातल्या विद्यापीठातला अभ्यासक्रम शेक्सपियरपासून रोमँटिक इंग्लिश कवीपर्यंत व्यापलेला होता. तसेच ब्रिटिश विद्यापीठातल्या अभ्यासक्रमात प्रत्यक्ष साहित्यकृतींचा समावेश होता तर भारतातील विद्यापीठात समीक्षेला महत्त्व होते. अशा परिस्थितीत स्वीकार प्रक्रियेच्या तीव्रतेचे मापन करण्याची साधणेच बोथट होऊन जातात.

असाच प्रकार गोव्यामध्येही घडला आहे. पोर्तुगीज राजवटीत कोकणीमधील स्वीकार वासाहतिक स्वरूपाचाच होता. त्यात सक्ती होती. अभिव्यक्ती किंवा स्वेच्छा त्यात नव्हती. तसेच कॅनेडियन वाङ्मयात फ्रेंच साहित्याचा स्वीकारही वासाहतिक प्रभावातूनच झाला होता. याचे भान त्यांचा अभ्यास करताना आपणास ठेवावे लागते.

स्वीकार आणि प्रभाव यांचा एकत्रित अभ्यास केला तरच प्रभावाभ्यास परिपूर्ण होतो. त्यासाठी संपर्क माध्यमांची चिकित्सा उपयुक्त ठरते. वाल्मिकींचा 'मर्यादापुरूषोत्तम' राम एकनाथांच्या 'भावार्थरामायणा'त 'कोदंडधारी राम' म्हणून प्रतिष्ठित झाला; आणि नंतर श्रीधरांच्या 'रामविजय' मध्ये अवताराची लीला प्रस्तुत करता झाला, या साखळीचे तौलनिक अध्ययन वाल्मिकी आणि तुलसीदास यांच्या रामायणांचे प्रभावसामर्थ्य, एकनाथकालीन राजकीय-सामाजिक परिस्थितीने घडविलेले स्वीकार प्रस्फुरित वातावरण आणि भ्रमण करणारे जोगी, कथेकरी, पुराणिक या संपर्क माध्यमांच्याद्वारे सर्व दूरवर पोहोलवली गेलेली विविध रामायणे या सर्वांच्या एकत्रित चर्चेतून करता येते.

या दृष्टीने श्रीधर रंगनाथ कुलकर्णी यांच्या 'साहित्यसेतू' या ग्रंथाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. नामदेवांच्या पूर्वी पाच शतके आणि त्यांच्यानंतरची पाच शतके अशा सुमारे हजार वर्षांच्या कालावधीतील साहित्य आणि समाजजीवन यांचा मागोवा घेऊन आणि महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, पंजाब आणि उत्तर प्रदेश एवढा विस्तीर्ण प्रदेश समोर ठेऊन सिद्धपरंपरा, संतकवी, सगुण भक्ती, भक्तिसाहित्य यांचे पारस्परिक प्रभाव, स्वीकार व प्रसारमाध्यमे यांची तपशीलवार चिकित्सा लेखकाने या ग्रंथात केली आहे आणि त्या ग्रंथातून 'महाराष्ट्रातल्या संत परंपरेने उत्तर भारतातील सांस्कृतिक जीवनाचे व साहित्याचे पुनरुज्जीवन करण्याची अत्यंत मोलाची कामगिरी बजावली आहे. असा घसघसीत निष्कर्ष काढला आहे. महाराष्ट्रातून पंजाबमध्ये जाऊन राहिलेले संत नामदेव हे सिद्धपरंपरा, नाथपरंपरा आणि सगुण भक्तीची

परंपरा यांना बांधणारा 'सेतू' कसे होते, याचा आलेख प्रभाव-स्वीकार-अध्यनाच्या सर्वांगीण उपयोजनातून या ग्रंथात मांडलेला पाहावयास मिळतो.

## ❑ मध्यस्थ :-

आदानप्रदान याची चर्चा केल्यानंतर आपणाला अन्य भाषिक समाजाशी संप्रेषण-आदानप्रदान करण्यासाठी कोणाची मध्यस्थी असते हे पाहणे महत्त्वाचे ठरते. वसंत बापट यांविषयी म्हणतात, ''एकोणिसाव्या शतकापासून आजतागायत या प्रक्रियेला हातभार लावणारे भिन्न भिन्न व्यवसायी आपण पाहू शकतो. त्यातील काहींचा साहित्य-संस्कृतींशी साक्षात संबंधही नसतो असे दिसेल. उदाहरणार्थ, राजकीय मुत्सद्दी आणि राज्यकारभासाठी दुसऱ्या देशात गेलेले अधिकारी; जित राष्ट्रातील साहित्याची उठाठेव त्यांनी केली ती कुतूहलामुळे, जिज्ञासेमुळे किंवा एक चांगला छंद म्हणून. हे काम त्यांनी केले नसते तर त्यांना कोणी जाब विचारला नसता.'' या बापट यांच्या विचारावरुन हे स्पष्ट होते की, राजकीय मुत्सद्यांनी किंवा राजकारण्यांनी साहित्याची उठाठेव करण्यामागे साहित्याविषयी आपुलकी म्हणून नव्हे. तर राजकारणाची सोय म्हणूनही साहित्याचा वापर करण्यासाठी त्यांनी साहित्याची उठाठेव केली असावी. परंतु मध्ययुगीन काळात भारतात राजकारण्यांबरोबर आलेल्या मुल्ला, मौलवींनी, अरबी, फारसी भाषा जाणकारांनी इथल्या साहित्याचा विचार केल्याचे दिसून येते. त्यांत त्यांचा विशिष्ट हेतू समाविष्ट असलेला दिसून येतो.

## अ) राज्यप्रसार व धर्मप्रसार :-

भिक्षू, भटके, प्रवासी, फिरस्ते, व्यापारी या मंडळींच्याकडून अशा तऱ्हेचे जे काम झाले ते त्यांनी जाणीवपूर्वक केले असे म्हणता येत नाही. तसेच साहित्याच्या विशेषांची त्यांना समज होती असेही म्हणता येणार नाही. तसेच आदानप्रदानातून सांस्कृतिक श्रीमंती साधता येते याचीही त्यांना जाणीव असेल असेही नाही. मध्ययुगात युरोपीय देशांना विचाराचे पंख फुटल्यावर त्यांनी आपला आदान-प्रदानाचा वेग वाढवलेला दिसून येतो. त्यात काम जाणिवेने आणि समजदारीने झाल्याचे दिसते. याचे कारण म्हणजे राज्यप्रसार व धर्मप्रसार या दोन उद्दिष्टांनी सांस्कृतिक देवाणघेवाण होऊ लागली. अतिप्राचीन काळी भारतामध्ये याच जाणिवेतून आर्य-अनार्यांचा संस्कृतिसंगम झाला होता. मूर्तिपूजा, लिंगपूजा, प्राणिपूजा, वृक्षपूजा, शेती, नगरे या अनार्य संस्कृतीच्या गोष्टी स्वीकारून आर्यांनी आपली पितृसत्ताक समाजरचना व यज्ञसंस्कृती भारताच्या भूमीत रुजवली होती. त्याच धर्तीवर मुस्लिम राजसत्ता व धर्मसत्ता भारतात चिरस्थायी करण्याकरिता सूफी संतांनी मुस्लिम धर्मतत्त्वे आणि भारतीय परेपरंतील प्रेमाद्वैत यांचे मीलन घडवून भारतातील कला व साहित्य यांच्यावर दूरगामी प्रभाव निर्माण केला.

युरोपातून आलेल्या इंग्रज, डच, फ्रेंच राज्यकर्त्यांनी राजकारण करत असतानाच इथली संस्कृती, भाषा, साहित्य याविषयी आस्था ठेऊन काम केलेले दिसते. ख्रिश्चन धर्मप्रसाराबरोबरच इथल्या लोकजीवनाच्या अनेक अंगांचा अभ्यास त्यांनी केला. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी येथील लोकजीवनाशी मिसळून जाऊन अपले धर्मप्रसाराचे काम केले. त्याकरिता ते येथील भाषा शिकले, त्या भाषांचे कोश निर्माण केले, व्याकरणे लिहिली तसेच येथील भाषांत साहित्यनिर्मितीही केली. फादर स्टीफन्स यांचे 'ख्रिस्तपुराण' (इ. स. १६१४) हे याचे उदाहरण सांगता येते. ज्ञानेश्वर-एकनाथ यांच्या धर्तीवर त्यांनी मराठी भाषेचा गौरव केला आहे.

*''जैसा हरळामाजी रत्नकिळा। की रत्नामाजी हिरा निळा।*
*तैसी भासामाजी चोखळा। भासा मराठी।।*
*जैसी पुष्पामाजी पुष्प मोगरी। की परिमळामाजी कस्तुरी।*
*तैसी भासामाजी साजिरी। मराठीया।।*
*पखियांमध्ये मयोरु। की रुखियामध्ये कल्पतरु।*
*तैसा भासामाजी मानु थोरु। मराठीयेसी।।''*

असे उद्गार ही अमराठीची रचना आहे. फादर क्रुआ यांनीही सेंटपिटरच्या जीवनावर 'महापुराण' (इ.स.१६०२) रचले. यात हिंदू देवदेवतांच्यावर प्रखर टीका केली आहे. सतराव्या शतकात ख्रिस्ती धर्मप्रसाराच्या हेतूने मराठी भाषेत निर्मिती केल्याची ही दोन उदाहरणे आहेत.

### ब) लोककला :-

रामायण-महाभारताच्या काळात कुश-लव, भाट, सूत, चारण, तर पुढे इतिहास काळात शाहीर, भाट, गोंधळी, चित्रकथी, डौरी, भराडी, गोंधळी, पुराणिक, कीर्तनकार, बहुरूपी, खेळीये, सोंगाडे, नट इत्यादी लोकप्रयोजक दूरदूरच्या प्रदेशात फिरून लोककलांच्या माध्यमांतून साहित्य सादरीकरण करीत होते. वाङ्मयीन आदानप्रदानाला यातून पोषक वातावरण तयार झाले असणार. महाराष्ट्र आणि आंध्र यांच्या देवाणघेवाणीतून लावणी, पोवाडे आणि बखर या साहित्यप्रकारामध्ये देवाणघेवाण झाली आहे. मराठी नाटकाची निर्मिती देवाणघेवाणीतून झाली असल्याचे स्पष्ट आहे. कर्नाटकातून आलेल्या यक्षगान कार्यक्रम पाहून सांगलीच्या पटवर्धन या संस्थानिकांना मराठीतही असे काहीतरी व्हावे असे वाटले, यातूनच पदरी असलेल्या विष्णुदास भावे यांनी १८४३ मध्ये 'सीतास्वयंवर' नाटक लिहिले व सादर केले. हा मराठी नाटकाचा प्रयोग देवाण-घेवाणीतून जन्माला आल्याचे उदाहरण सांगता येते.

### क) चित्र, संगीत, शिल्प :-

आधुनिक काळात चित्रपट आणि दूरचित्रवाणीवरील याचिका यांच्या साहाय्याने साहित्याची

देवाणघेवाण होते आहे. भीष्म सहानी यांची 'तमस' ही कादंबरी दूरचित्रवाणीद्वारे भारतातील विविध भाषिकांच्या घराघरात पोहोचली आहे. चित्र, संगीत, शिल्प या कलांच्या द्वारेही देवाण-घेवाणीला चालना मिळाली. राजा रवी वर्मा याच्या चित्रांनी लोकांच्या मनात देवदेवतांविषयी समूर्त स्थान निर्माण केले. खजुराहो आणि कोनार्क येथील शिल्पाकृतीतील प्रणयविभ्रमांनी विविध भाषांतील प्रणयगीतांचे आदान-प्रदान सुकर झाले. चित्रपट, आकाशवाणी आणि दूरचित्रवाणी यांनी साहित्याचे आदान-प्रदान मोठ्या प्रमाणावर होण्यास हातभार लावला.

## ड) वाढती महानगरे :-

बदलत्या काळाचा परिणाम म्हणून आज महानगरे (ाशींौींश्रिळींरप) वाढत गेल्याचे दिसून येते. व्यवसायाच्या निमित्ताने वेगवेगळ्या प्रदेशातील प्रजा एकत्र नांदत असल्याचे दिसते. त्यामुळे ही महानगरे बहुसांस्कृतिक (multicultured) बनतात. त्यातून अपरिहार्यपणे साहित्य आणि अन्य कला यांची सातत्याने आदान-प्रदान प्रक्रिया चालू राहते. वडोदऱ्यासारख्या शहरात मराठी आणि गुजराती साहित्यामध्ये होत असलेले आदान-प्रदान आपल्या समोरचे वास्तव उदाहरण आहे. त्याचप्रमाणे बेळगावात कन्नड आणि मराठी साहित्यातही देवाणघेवाण होते आहे. मराठी आणि अन्य भारतीय भाषा तसेच जगातल्या अनेक भाषांत आजही देवाणघेवाण होत आहे.

## इ) भाषाविषयक कार्य करणाऱ्या संस्था :-

आजच्या युगात भाषाविषयक कार्य करणाऱ्या अनेक संस्था कार्यरत आहेत. त्यांच्यावतीने होणारी साहित्याची देवाणघेवाण अधिक डोळसपणे व प्रयोजनपूर्वक होत असते. भारतामध्ये साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्ट, आंतरभारती, विश्वभारती, भारतीय विद्याभवन, इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन लँग्वेज, सदर्न लँग्वेजेस बुक ट्रस्ट या संस्था भारतीय भाषांमधील साहित्याचे आदान-प्रदानाचे कार्य योजनाबद्धपणे करतात. साहित्य अकादमी प्रत्येक वर्षी बावीस भारतीय भाषांमधील प्रत्येकी एका पुस्तकाला पुरस्कार प्रदान करते. पुरस्कारप्राप्त पुस्तकाचे अनुवाद सर्व भारतीय भाषांमध्ये करण्याचा उपक्रम साहित्य अकादमी करते. 'समकालीन भारतीय साहित्य' हे हिंदी त्रैमासिक आणि 'इंडियन लिटरेचर' हे भारतीय भाषांतील साहित्याचे अनुवाद आणि समीक्षालेख प्रसिद्ध करते. साहित्याचे आदान-प्रदान हे नॅशनल बुक ट्रस्टच्या कार्याचे ध्येय आहे. भारतीय ज्ञानपीठ आणि के. के. बिर्ला फाऊंडेशन या संस्थाही ज्ञानपीठ पुरस्कार, मूर्तिदेवता पुरस्कार, सरस्वती सन्मान, व्यास सन्मान यांसारखे पुरस्कार भारतीय साहित्यकारांना देणे, चर्चासत्रे आयोजित करणे, अनुवाद प्रकाशित करणे यांसारखी कामे करते. 'जयपूर लिटररी फेस्टिव्हल' चर्चासत्राचे आयोजन करून त्यासाठी जगभरातील नामवंत साहित्यिकांना आमंत्रित करते.

PEN सारख्या अनेक संस्था आंतरराष्ट्रीय स्तरावर वाङ्मयीन आदान-प्रदानाचे कार्य अनेक वर्षे

करीत आहेत. 'युनोस्को' ही आंतरराष्ट्रीय संस्था दुसऱ्या महायुद्धानंतर अस्तित्वात आली. तुकाराम आणि कबीर हे भारतीय कवी युनेस्कोमुळेच जगभर पोहोचले.

आदान-प्रदानाचे आणखी एक महत्त्वाचे माध्यम म्हणजे अनुवाद हे होय. तथापि अनुवाद हे तौलनिक साहित्याचे महत्त्वाचे अंग असल्याने त्याचा विचार स्वतंत्र प्रकरणात होणे आवश्यक आहे.

## ३.३ सारांश

साहित्याच्या क्षेत्रात देवाण-घेवाण या प्रक्रियेला साहित्यात महत्त्वाचे स्थान असते. साहित्याचे वाचक, श्रोते, प्रसारमाध्यमे यांच्यात परस्परसंबंध जसजसा वाढत जात असतो, तसतशी साहित्याची देवाण-घेवाण वाढत जात असते. निरनिराळ्या भाषेतील साहित्यात आश्चर्यकारक असे साम्य आढळते. साहित्यविश्वात आदानप्रदानामध्ये विशिष्ट साहित्यप्रकाराची किंवा साहित्यिकांची प्रभावशीलता ही महत्त्वपूर्ण गोष्ट असते. अशा अन्य भाषांतील साहित्याच्या सर्व क्षेत्रातील वैधर्म्य, साधर्म्य, प्रभव किंवा प्रभाव शोधून केलेल्या अभ्यासातून मांडलेले विचार, समीक्षा म्हणजे तौलनिक अभ्यास होय. प्रभाव हा तौलनिक अभ्यासाचा मुख्य केंद्रबिंदू असतो. प्रभावाच्या काही व्याख्या केल्यागेल्या आहेत. सर्वसाधारणपणे एखाद्या भाषेतील साहित्याचा किंवा साहित्यिकांचा दुसऱ्या भाषेतील साहित्यावर किंवा साहित्यिकावर पडलेला प्रभाव येथे महत्त्वपूर्ण ठरतो.

साहित्याचा तौलनिक अभ्यास करीत असताना प्रभाव हा घटक आपणाला प्रकर्षाने जाणवत राहतो. त्याचे तौलनिक साहित्य अभ्यासातील असलेले अनन्यसाधारणत्व आपणाला मान्य करावे लागतेू प्रभाव म्हणजे ठसा, परिणाम असे सर्वसाधारणपणे मानले जाते. दोन किंवा अधिक समाजातील साहित्यसंबंधाचा अभ्यास करून तुलनांच्या आधारे त्यातील साम्यस्थळावर प्रकाश टाकणे, त्यातील साम्यविरोधांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. केवळ तुलना करणे हे प्रभाव अभ्यासाचे वैशिष्ट्य ठरत नाही. त्याबरोबरच इतर गोष्टींचा शोध घेणे प्रभाव अभ्यासाचे प्रयोजन असते. साहित्य आदान-प्रदानात प्रभावशीलता प्रभावी ठरते. विशिष्ट भाषिक समाज अन्य भाषिक समाजातील साहित्याचे स्वागत करीत असतो, असे चित्र आपणास नेहमी दिसत असते. तिथे संकुचित अभिमानाला जागा असत नाही. तिथे मान असतो तो गुणवत्तेला, अभिनव सौंदर्याला, तिथे भाषिक भिंती आपोआपच गळून पडतात. आधुनिक मराठी साहित्याचा विचार केला तर पाश्चात्त्य साहित्याचा पडलेला प्रभाव ठळकपणे जाणवतो. प्रभाव हा नेहमी एकाच प्रकारचा पडतो असे नाही. कधी तो रचनेपुरता मर्यादित जाणवतो तर कधी तो आशय, भावावस्था, जीवनविषयक असाही आढळतो.

प्रभाव उद्दीपित करणारे घटक म्हणून प्रत्यक्ष संपर्क, जीवनचरित्र, भौगोलिक, राजकीय, भाषांतर, आदर्श सर्जनशीलता, नावीन्याचे आकर्षण, धर्मांतर, विश्वव्यापी चळवळ यांचा विचार करता येतो.

प्रभावाचे काही प्रकार संभवतात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष प्रभाव, संकुल प्रभाव, प्रतिद्वंद्वी अथवा नकारात्मक प्रभाव, वैचारिक प्रभाव असे ते सांगता येतात. प्रभाव आणि वाङ्मयीन संबंध हे विश्वसाहित्य संकल्पना प्रकट करतात. प्रभाव आणि सहजसाम्य हे सहजपणे होत नसते. त्यात आंतरराष्ट्रीय संबंध असतो. यामध्ये सामाजिक, वाङ्मयीन व मानसशास्त्रीय अशा तीन घटकांचा परस्परसंबंध त्यात कार्यरत झालेला असतो. याविषयी वसंत बापट म्हणतात की, ''दोन साहित्यात साधर्म्य आढळले की, तेथे प्रभाव शोधणे बरोबर ठरणार नाही. सदृश्य संस्कृती, समाजव्यवस्था, आर्थिक व्यवस्था, राजकीय वातावरण, साहित्यिकांच्या गरजा यापैकी कोणत्याही प्रकारांमुळे साहित्यात साधर्म्य उत्पन्न होईल; पण तेथे देते साहित्य आणि घेते साहित्य असा संबंध संभवत नाही.''

प्रभाव आणि परंपरा यांचा अभ्यास करत असताना संप्रेषण, स्वागत, स्वीकार, मध्यस्थ यांचा विचार करावा लागतो. संप्रेषण ही साहित्याच्या क्षेत्रात निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. ती फार प्राचीन काळापासून चालत आली आहे. अन्य भाषेतील साहित्याशी संबंध आल्यावर त्या भाषेतील साहित्य प्रकार अथवा साहित्यिक यांचे स्वागत किंवा स्वीकार केला जातो. मध्यस्थ याचे काही मार्ग सांगता येतात. राज्यप्रसार व धर्मप्रसार, लोककला, चित्र, संगीत, शिल्प कला, वाढती महानगरे, भाषाविषयक कार्य करणाऱ्या संस्था यांच्यामार्फत मध्यस्थी होत असलेली दिसून येते.

## ३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. **प्रभाव :** ठसा, परिणाम.

२. **संकुल प्रभाव :** विशिष्ट वाङ्मयीन परंपरेचा उमटलेला ठसा.

३. **जनन :** जन्म.

४. **भिक्खू :** बौद्ध भिक्षूक.

५. **विगमन :** विशिष्ट सामान्य नियम ठरविणे.

६. **अनुस्यूत :** अंतर्भूत असणारा.

७. **प्रणयविभ्रम :** प्रीतीमधला गोंधळ, चूक, स्त्रियांचा सौंदर्यविलास.

## ३.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

### अ) खाली दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडा.

१. तौलनिक साहित्याभ्यासाचा ..................... हा केंद्रबिंदू आहे.

*(अ) प्रभाव (ब) अनुकरण (क) संबंध (ड) संस्कृती.*

२. जगन्नाथ पंडित यांनी लिहिलेल्या 'रसगंगाधर' या ग्रंथावर ........... काव्याचा प्रभाव पडला आहे.

*(अ) इंग्रजी* *(ब) अरब-फारसी* *(क) पाली* *(ड) संस्कृत.*

३. 'वसुधैवकुटुम्बकम' ही संकल्पना ............. यांनी मांडली आहे.

*(अ) सिसिरकुमार दास* *(क) रवींद्रनाथ टागोर*

*(ब) शरच्चंद्र चट्टोपाध्याय* *(ड) संत ज्ञानेश्वर.*

४. ........... व .......... या प्रभावाभ्यासात एकाच नाण्याच्या दोन बाजू मानल्या जातात.

*(अ) प्रभाव व परंपरा* *(क) प्रभाव व संस्कृती*

*(ब) प्रभाव व संबंध* *(ड) प्रभाव व स्वीकार.*

५. मराठी भाषेचा गौरव ............. या पाश्चात्त्य कवीने आपल्या काव्यातून गायला आहे.

*(अ) फादर स्टीफन्स* *(क) मिल्टन*

*(ब) फादर क्रुआ* *(ड) रॉबर्ट हाऊस.*

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. आंतरराष्ट्रीय वाङ्मयीन संबंध स्पष्ट करताना अमेय देव यांनी किती संज्ञा वापरल्या आहेत.

२. कोणत्या मराठी संताचा प्रभाव गुजरात, राजस्थान व पंजाब साहित्यातील भक्ती साहित्यावर पडला आहे.

३. संत तुकारामांच्या अभंगाचे बंगाली भाषांतर कोणी केले.

४. केशवसुत, हरि नारायण आपटे व वि. स. खांडेकर यांच्यावर कोणाचा प्रत्यक्ष प्रभाव पडला आहे.

५. 'वर्ड लिटरेचर' ही संज्ञा कोणी प्रथम वापरली आहे.

## ३.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**अ)** *१. (अ) प्रभाव.*

*२. (ब) अरब-फारसी.*

३. *(क) रवींद्रनाथ टागोर.*

४. *(ड) प्रभाव व स्वीकार.*

५. *(अ) फादर स्टीफन्स.*

**ब)** १. आंतरराष्ट्रीय संबंध स्पष्ट करताना अमेय देव यांनी सहा संज्ञा वापरल्या आहेत.

२. संत नामदेवांच्या अभंग रचनेचा प्रभाव गुजरात, राजस्थान व पंजाब येथील भक्तिसाहित्यावर पडला आहे.

३. संत तुकारामांच्या अभंगांचे रवींद्रनाथ टागोर यांचे वडीलबंधूंनी बंगालीत भाषांतर केले आहे.

४. केशवसुत, हरि नारायण आपटे व वि. स. खांडेकर यांच्यावर सर वॉटर स्कॉट आणि शेक्सपियर यांचा प्रत्यक्ष प्रभाव पडला आहे.

५. 'वर्ड लिटरेचर' ही संज्ञा प्रथम ग्योएथे यांनी वापरली आहे.

## ३.७ सरावासाठी स्वाध्याय

### ❑ लघुत्तरी प्रश्न सोडवा.

१. प्रभाव उद्दीप्त करणाऱ्या घटकांची चर्चा करा.

२. प्रभाव आणि सहजसाम्य यांचा रचनासंबंध आंतरराष्ट्रीय संबंधाशी फार जवळचा संबंध कसा असतो ते स्पष्ट करा.

३. सहजसाम्याची पुढली पायरी म्हणून प्रभावाभ्यासात परंपरेचे महत्त्व सांगा.

४. आदान-प्रदान प्रक्रियेत मध्यस्थ महत्त्वाचे कार्य करते याचे विवेचन करा.

### ❑ दीर्घोत्तरी प्रश्न सोडवा.

१. प्रभाव संकल्पना स्पष्ट करून तौलनिक साहित्याभ्यासातील तिचे महत्त्व विशद करा.

२. प्रभाव म्हणजे काय? ते सांगून प्रभावाचे विविध प्रकार सांगा.

३. प्रभाव अभ्यासात स्वागत/स्वीकार व मध्यस्थ यांचे महत्त्व काय आहे? याची चर्चा करा.

४. प्रभावाच्या वाङ्मयीन संबंधाची चर्चा करा.

❑ **टीपा लिहा.**

१. प्रभाव आणि परंपरा.

२. प्रभाव आणि सहजसाम्य.

३. प्रभाव आणि संप्रेषण.

४. प्रत्यक्ष प्रभाव आणि अप्रत्यक्ष प्रभाव.

५. प्रभाव आणि मध्यस्थ.

६. आदर्श सर्जनशीलता.

## ३.८ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ


१. **पाटील आनंद :** *''तौलनिक साहित्य : नवे सिद्धान्त आणि उपयोजन'',* साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती १९९८.

२. **बापट वसंत :** *''तौलनिक साहित्याभ्यास'',* मौज प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९८१.

३. **मिरजकर डॉ. निशिकांत :** *''तौलनिक साहित्य'',* प्रतिमा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती १५ ऑगस्ट, २०१६.

४. **मंचरकर रत्नाकर बापूराव :** *''तौलनिक साहित्य आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय'',* प्रतिमा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, ऑगस्ट २००३.


❑❑❑

सत्र–४ : घटक–४

# तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्त्व


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ जागतिकीकरण : संज्ञा आणि संकल्पना

४.२.१.१ जागतिकीकरण आणि तौलनिक साहित्याभ्यास

४.२.२ देशीवाद : संज्ञा आणि संकल्पना

४.२.२.१ मराठी साहित्यातील देशीवाद

४.२.२.२ देशीयतावाद आणि तौलनिक साहित्याभ्यास

४.२.३ संस्कृतिअभ्यास : संज्ञा आणि संकल्पना

४.२.३.१ संस्कृतिअभ्यास

४.२.३.२ संस्कृतिअभ्यास आणि तौलनिक साहित्याभ्यास

४.३ सारांश/समारोप

४.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.५ स्वयं–अध्ययन प्रश्न व उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचन

४.८ उपक्रम

४.९ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ


## ४.० उद्दिष्टे

या विभागाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

१. 'जागतिकीकरण', 'देशीवाद' या संकल्पनांचा परिचय होईल.

२. तौलनिक दृष्टिकोणातून जागतिकीकरण आणि देशीवाद या संकल्पनांचा विचार कसा करावयाचा ते समजेल.

३. संस्कृतिअभ्यास आणि तौलनिक साहित्याभ्यास यांच्यातील अनुबंध तपासता येईल.

४. साहित्याभ्यासासंदर्भात तौलनिक साहित्याभ्यास या शाखेचे महत्त्व कळेल.

## ४.१ प्रास्ताविक

विद्यार्थी मित्रांनो, तौलनिक साहित्याभ्यास ही साहित्याभ्यासाची महत्त्वाची अभ्यासपद्धती आहे. आपल्याला समकालीन असलेल्या जागतिकीकरण, देशीवाद तसेच संस्कृतिअभ्यास या नव्या संकल्पना तौलनिक साहित्याभ्यासाच्या परिप्रेक्षात समजून घ्यावयाच्या आहेत. या संकल्पना नव्या म्हणत असलो तरी साहित्यव्यवहारात त्या गेली पंचवीस वर्षे चर्चेत आहेत आणि या संकल्पना स्थिरस्थावरही झाल्या आहेत. पण आपणास त्यांची सांगड तौलनिक साहित्याभ्यासाशी घालावयाची आहे. यांपैकी संस्कृतिअभ्यास ही संकल्पना अमेरिकेतील तौलनिक साहित्याभ्यासांतर्गत नवी अभ्यासपद्धती म्हणून गेल्या वीस वर्षांपासून रूढ झाली आहे. पण भारतात तिचा अभ्यास होत असला तरी तौलनिक साहित्याभ्यासांतर्गत तिच्या अभ्यासाचे एखादे प्रभावी उदाहरण अजूनही समोर आलेले नाही.

म्हणूनच वरील तिन्ही संकल्पनांचा तौलनिक साहित्याभ्यासासंदर्भात विचार करणे ही काळाची गरज बनली आहे. या तिन्ही संकल्पना सन १९९० नंतर खऱ्या अर्थाने मराठी साहित्यात हळूहळू रुजल्या आहेत. त्यामुळे सन १९९० नंतरच्या सामाजिक व वाङ्मयीन घटनांचा संदर्भाने उपभोग करत. या संकल्पना समजावून घ्याव्या लागतील. सुरूवातीस या संकल्पनांची ओळख करून घेऊ.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ जागतिकीकरण : संज्ञा आणि संकल्पना

'जागतिकीकरण' ही संज्ञा १९९४ नंतर भारतासह जगभरात पोहोचली. प्रामुख्याने भांडवली अर्थव्यवस्थेशी संबंधित असणारी ही संज्ञा बाजारक्षेत्राच्या जगाला कवेत घेणाऱ्या अनिर्बंध विस्तारवादी प्रवृत्तीची आहे. सन १९९१ नंतर भारतीय अर्थव्यवस्थेने कात टाकली. नवे आर्थिक धोरण स्वीकारल्याने भारताचे चित्र बदलले. भारतात जागोजागी मॉल, न्युऑन-साईनच्या जाहिराती, उत्तुंग इमारती, फाईव्ह स्टार, सेव्हेनस्टार हॉटेल्स, मल्टीप्लेक्स थिएटर्स, चैनीच्या वस्तूंची मोठी बाजारपेठ, टी.व्ही. चॅनल्समध्ये भरमसाठ वाढ, माहिती तंत्रज्ञानाची क्रांती, मोबाईलचे आगमन, बदलते व्हर्च्युअल विश्व इत्यादी नवनवीन बदल समाजात होऊ लागले. मोबाईल, इंटरनेटने गेल्या वीस वर्षात भारतीय समाज व्यापून टाकल्याचे आज सहज दिसून येते. 'दीड जीबी आणि आख्खा गाव बिझी' असे नवे वाक्प्रचार आजच्या समाजाचे प्रातिनिधिक दर्शन घडवित आहेत. 'एक आयडिया जो बदल दे आपकी दुनिया', 'कर लो

दुनिया मुठ्ठी में' या मोबाईलच्या जाहिरातीतून जगाला आलेले व्हर्च्युअल वैश्विक खेडयाचे रूप प्रत्ययाला येत आहे.

२०व्या शतकातील दोन महायुद्धांमुळे संपूर्ण जगाचे दोन वर्गात रूपांतर झाले. 'एक शत्रू राष्ट्रे व दुसरा वर्ग मित्र राष्ट्रे' या दोन्ही गटांनी आपापल्या सोईने आंतरराष्ट्रीय व्यापार आणि अर्थव्यवस्थेचे नियम तयार करून ते एकमेकांवर लादण्याचे प्रयत्न केले. नंतर या नियमांचा अडसर आंतरराष्ट्रीय व्यापारात मोठ्या प्रमाणावर होऊ लागला याची जाणीव अमेरिकेसारख्या राष्ट्राला झाली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार, गुंतवणूक आणि विज्ञान, तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण सोईची व्हावी यासाठी अमेरिका प्रयत्न करू लागली. सन १९४५ मध्ये रूझवेल्ट अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असताना त्यांनी पुढाकार घेऊन 'जागतिक बँक' आणि 'आंतरराष्ट्रीय नाणेनिधी' या संस्थांची स्थापना केली. अर्थव्यवहार आणि व्यापार सुरळीत व्हावा यासाठी जगातील नव्याण्णव देशांना सोबत घेऊन सन १९४७ साली 'गॅट' करार (जनरल ॲग्रीमेंट ऑफ ट्रेड ॲण्ड टेरिफ) केला. सन १९९४ मध्ये आपल्या भारत देशाने या गॅट कराराअंतर्गत जागतिकीकरण, आर्थिक उदारीकरण, खासगीकरण हे एल. पी. जी.चे नवे धोरण स्वीकारले. याच काळात 'जागतिक व्यापार संघटना' (World Trade Organisation) ची स्थापना झाली. त्यामुळे पुढील काळात जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारताची बाजारपेठ खुली झाली. आयात-निर्यातीवरील बंधने कमी करण्यात आली. आय.टी.पार्कस्, कॉल सेंटर्स, आऊट सोर्सिंग इंडस्ट्री. या मोठ्या महानगरांमध्ये विकसित होऊ लागले. स्थानिकांनी निर्माण केलेल्या वस्तूंना किंमत मिळेनाशी झाली. स्थानिकांचे व्यवसाय, छोटे उद्योजक, छोटे शेतकरी देशोधडीला लागले. ब्रँडेड वस्तूंना भाव आला. परिणामी लाखो लोक बेरोजगार झाले. संगणकीय क्रांतीमुळेही बेकारांच्या झुंडी वाढू लागल्या.

'जागतिकीकरण' या व्यामिश्र संकल्पनेचे वर्णन करताना उत्तम कांबळे लिहितात, ''जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने आता पृथ्वी नावाच्या ग्लोबवरील सर्व मानवी जीवनाला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रितीने व्यापून टाकले आहे. आर्थिक सुधारणा, वैश्विक खेडे, माहितीचे युग, तंत्रज्ञानाचे स्फोट, ज्ञानाच्या बँका आणि बाजारपेठा, एक कायदा-एक कोर्ट, एक भूगोल-एक न्याय, संपत्तीचे विकेंद्रीकरण, कायद्याचा संकोच, वस्तूंचा सर्वत्र सुलभ प्रवास, हव्या त्या गोष्टी, हव्या त्या ठिकाणी, हव्या त्या वेळेला मिळणाऱ्या वस्तू, भांडवलाचा सहज विकास, मुबलक वस्तू, चलनाचा मुक्त संचार, मुबलक व्यक्तिस्वातंत्र्य, खासगीकरण, औद्योगिकीकरण, उदारीकरण, अशी वेगवेगळी नावे धारण करत ही प्रक्रिया सुरू झाली. मानवी वाटचालीच्या इतिहासात अशा प्रकारची प्रक्रिया माणूस प्रथमच पाहत होत्या. त्याला या प्रक्रियेचे नीट आकलन होत नाही आणि मायावी वाटावी अशी प्रक्रिया आपली नीट व्याख्याही होऊ देत नाही. शंभर पायांच्या गोमेप्रमाणे ती आहे. तिच्या पायाचा हिशेब लवकर लागत नाही. तिचा चेहरा नीट टिपता येत

नाही. तिचा एक पैलू पकडला की दुसरा दुर्लक्षित तरी होतो किंवा लपवला तरी जातो. तिच्या आर्थिक चेहऱ्यावर बोलायचे तर भांडवलशाही दुर्लक्षित होते. कथित विकासावर बोलायचे तर दारिद्र्य दुर्लक्षित होते. व्यक्तिस्वातंत्र्यावर बोलायचे तर वेश्या बाजार दुर्लक्षित होतो. वैश्विक खेड्यावर बोलावे तर पोटासाठी स्थलांतर करणारे कोट्यावधी दुर्लक्षित होतात. समान कायद्यावर बोलायचे तर अमेरिकेची फौजदारी दुर्लक्षित होते. वस्तूंच्या भरल्या बाजारपेठांवर बोलायचे तर (शेतकरी) आत्महत्या दुर्लक्षित होतात. पाच-सहा-सात आकडी पगारावर बोलायचे तर पदव्युत्तर शिक्षणासाठीची फी उपलब्ध व्हावी म्हणून स्वत:च्या कौमार्यभंगासाठी लिलाव लावणारी लंडनच्या सॅनडायगोची नॅटाली डालन ही युवती दुर्लक्षित होते. कथित शांततेचा आणि सहजीवनाचा विचार करावा तर पावला पावलावर उफाळून येत असलेला मूलतत्त्ववाद आणि तो गिळत असलेली प्रेते दुर्लक्षित होतात. जागतिकीकरणाची व्याख्या म्हणूनच कठिण होऊन बसते.''[१]

इंग्रजी 'Globalazation' या संज्ञेसाठी मराठीत 'जागतिकीकरण' अथवा 'वैश्विकीकरण' असा शब्द प्रयोग वापरला जातो. हिंदी भाषेत त्यास 'भूमंडलीकरण' असे म्हटले जाते. 'जागतिकीकरण' ही अर्थातच विश्वव्यापी आर्थिक प्रक्रिया असल्याने तिची व्याख्या नेमक्या शब्दात करणे केवळ अशक्यप्राय आहे. वेगवेगळ्या शब्दकोशांमध्ये 'जागतिकीकरणा'च्या विविध व्याख्या केल्या गेल्या आहेत. 'विकीपिडिया' कोशात दिलेली व्याख्या अशी : ''एक अशी प्रक्रिया आहे की, जगभरातील लोक एकत्र येतात. एकच काम करतात, राहतात वगैरे. सर्व प्रकारच्या प्रवाहांचे एकत्रीकरण म्हणजे जागतिकीकरण होय. जागतिकीकरण ही संज्ञा प्रामुख्याने जागतिक आर्थिकीकरणाला जोडून वापरली जाते. ज्यात पैसा, व्यापार, थेट गुंतवणूक, पतपुरवठा, परकीय देशात थेट गुंतवणूक, तंत्रज्ञान, आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था वगैरेंचा संबंध येतो.''[२]

या आणि अशा विविध व्याख्यांमधून जागतिकीकरणाचे विभिन्न पैलू दर्शविल्याचे दिसून येते.

### ४.२.१.१ जागतिकीकरण आणि तौलनिक साहित्याभ्यास

तौलनिक साहित्याभ्यासाची अभ्यासपद्धती लवचिक असल्याने राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळ्यांवर साहित्य आणि इतर कलांमध्ये होणारी परिवर्तने, घडणाऱ्या घटना, नव्या युगातील नव्या संकल्पनांचा अभ्यास ही शाखा आंतरविद्यावर्ती दृष्टिकोण वापरून करते. अर्थात 'जागतिकीकरणा'ने आज संपूर्ण विश्वातील साहित्यादी इतर कलांवर परिणाम केल्याने तिचा साहित्याभ्यासासंदर्भात विचार करणे हे तौलनिक साहित्याभ्यासाचे नवे शोधक्षेत्र ठरू शकते. आज या दिशेने कोणतेही ठोस काम झालेले नसले तरी तुलनाकार निश्चितपणे जागतिकीकरणाचा विभिन्न देश, भाषा, संस्कृतीवरील प्रभावशोध घेतील.

तुलनाकार हा कोणत्याही संकल्पनेकडे पूर्वग्रहदूषित दृष्टिकोणातून न पाहता तटस्थपणे अभ्यास करतो; त्यामुळेच तौलनिक अभ्यासातून मिळालेले निष्कर्ष पारंपारिक अभ्यासापेक्षा अधिक शास्त्रीय असतात. 'जागतिकीकरण' या प्रक्रियेकडे तटस्थपणे पाहताना तुलनाकार या संकल्पनेतील सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही बाबी लक्षात घेऊन दोन भिन्न देश भाषा सांस्कृतिक कलाकृतींची तुलना करतो. अशा अभ्यासात कोणत्याही संकुचित मनोवृत्तीला थारा नसतो. भारतातील तौलनिक साहित्याभ्यासापुढे जी अनेक आव्हाने आहेत. त्यापैकी एक 'जागतिकीकरणा'च्या दृष्टिकोणातून केला जााणारा तौलनिक साहित्याभ्यास हे आहे. मराठी तुलनाकारांमध्ये डॉ. आनंद पाटील यांनी या दिशेने काही प्रयत्न केले आहेत. परंतु मराठी साहित्य आणि भारतीय साहित्यविश्वात 'जागतिकीकरण' हे शोधक्षेत्र अजून पुरेसे विकसित व्हावयाचे आहे. ते सध्यातरी प्राथमिक अवस्थेतच आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

भारत हे बहुभाषक-बहुसांस्कृतिक राष्ट्र असल्याने विभिन्न साहित्यामधील जागतिकीकरणाचे उमटलेले प्रतिबिंब कसे आहे याचा शोध घेता येतो. या क्षेत्रात संशोधनास खूप वाव आहे. मराठी तुलनाकार डॉ. निशिकांत मिरजकर लिहितात, त्यापमाणे, ''जागतिकीकरणामुळे तौलनिक साहित्याची अनिवार्यता वाढलेली आहे. जागतिकीकरणाच्या फलस्वरूप आंतरवाङ्मयीन आणि आंतरसांस्कृतिक असे जे सार्वत्रिक वातावरण निर्माण झालेले आहे, त्यामुळे ग्रंथसंहितांचा आणि लेखकांचा विचार अलगपणे करणे कठीण होत चालले आहे. जागतिकीकरणामुळे स्थिर चिन्हमीमांसा असलेल्या वाङ्मयीन संस्कृतीत क्रांती घडत आहे. काही निवडक लेखकांचे आंतरराष्ट्रीयीकरण होते. हे लेखक समाजाच्या उच्च स्तरातील, संस्कृतिरक्षक वर्गातील असतात. त्यांना सत्ताधारी वर्गाचा आश्रय प्राप्त होत असतो. याउलट, समाजाच्या निम्नस्तरामधील काही लेखक समाजव्यवस्थेने पुरविलेल्या सोयी-सुविधांपासून वंचित राहिलेले असतात. पूर्वी या लेखकांचा आवाज पद्धतशीरपणे दाबून टाकला जात असे. जागतिकीकरणामुळे त्यांनाही आता खुले वातावरण मिळू लागले आहे.''[४]

अशाप्रकारे जागितीकरणाच्या परिप्रेक्षात निर्माण झालेल्या भिन्नभाषी साहित्याचा तौलनिक अभ्यास होणे ही आता काळाची गरज बनली आहे. केवळ साहित्यच नव्हे तर विभिन्न कला, संस्कृतीचाही तौलनिक अभ्यास जागतिकीकरणाच्या दृष्टिकोणातून होणे गरजेचे आहे. अशा अभ्यासातून पुढे आलेल्या तटस्थांमधून साहित्य, भाषा, संस्कृतीचे योग्य आकलन समीक्षकांना, लेखक-कलावंतांना करता येईल. आता यानंतर 'देशीवाद' ही संज्ञा अभ्यासूया आणि तिचा तौलनिक साहित्याभ्यासाशी कोणता संबंध आहे तेही पाहू या-

## ४.२.२ देशीवाद : संज्ञा आणि संकल्पना

देशीवाद ही प्रामुख्याने मानववंशशास्त्र आणि समाजशास्त्र या शाखांमध्ये वापरली जाणारी संज्ञा

आहे. अमेरिकेतील रेड इंडियन आणि आदिम जमातींना आधुनिक आणि परक्या संस्कृतीच्या रेट्यामुळे आपली आदिम संस्कृती नष्ट होईल की काय? अशी भीती वाटत असे. आक्रमक परक्या संस्कृतीला प्रभावीपणे विरोध करणेही त्यांना शक्य होत नव्हते. या भीतीच्या भावनेतून स्वसंस्कृतीच्या विजयाचे लोकसाहित्य, कला निर्माण होवू लागल्या. या लोकसाहित्यातून आदिम शक्ती संघटित होऊ लागली. त्यातून ज्या चळवळी निर्माण झाल्या, त्या स्थानिक, देशी संस्कृतींच्या उदात्तीकरणाच्या चळवळींनाच मानववंशशास्त्र ज्ञानी 'देशीयवाद' असे म्हणतात. मंत्र, तंत्र, विधी करून पूर्वजांच्या मृतात्म्यांना बोलवण्याच्या अंधश्रद्धाही या चळवळींमध्ये होत्या. सन १९४३ साली राल्फ लिंटन या अमेरिकन मानववंशशास्त्रज्ञाने देशीवादी चळवळीचा सखोल अभ्यास करून देशीयतेवर एक निबंध लिहिला आणि एक अभ्यास विषय म्हणून देशीयतावादाच्या सीमारेषा काटेकोरपणे स्पष्ट केल्या. तत्पूर्वी एल्. एच. मॉर्गन, जेम्स मुनी यांनी देशीयतावादी चळवळींचा खूप अभ्यास केला होता.

देशीयतावादाचे रूपांतर सामाजिक चळवळीमध्ये हळूहळू होत असते. देशीयतावाद ही विशिष्ट सामाजिक चळवळ दोन भिन्न संस्कृतीच्या प्रत्यक्ष, सततच्या आणि जवळच्या संपर्कामुळे निर्माण होते. तिला संस्कृती संपर्कातून होणाऱ्या सांस्कृतिक बदलाची घटना म्हणता येईल. देशीयतावादाच्या या आकलनामुळे देशीयतावादी चळवळी केवळ आदिम जमातीपुरत्या मर्यादित राहत नाहीत. श्रेष्ठ-कनिष्ठ भाव असलेल्या कोणत्याही दोन संस्कृतींच्या संपर्कामधून देशीयतावादी चळवळ निर्माण होवू शकते.

स्वसंस्कृतीला परसंस्कृती नष्ट करून टाकील, अशी भीती प्रथम समाजातील काही व्यक्तींच्या मनात निर्माण होते. परसंस्कृतीचा प्रभाव असलेली प्रस्थापित व्यवस्था अशा व्यक्तींना असमाधानकारक वाटू लागते. व्यवस्थेला मान्य नसलेली कृत्ये करून या व्यक्ती आपला निषेध व्यक्त करतात. ही बंडे वैयक्तिक पातळीवरील असतात. हळूहळू हा वैयक्तिक पातळीवरील निषेध सामूहिक चळवळीचे रूप धारण करतो. राल्फ लिंटन यांनी देशीयतावादी वर्गीकरण चार प्रकारांमध्ये केले.

१. भूतकाळाचे पुनरुज्जीवन करू पाहणारा देशीयतावाद.

२. वर्तमान चिरस्थायी करून पाहणारा देशीयतावाद.

३. मंत्रतंत्रात्मक देशीयतावाद.

४. विवेकाधिष्ठित देशीयतावाद.

वरील चार प्रवृत्ती देशीयतावादी चळवळींमधून कमी-जास्त प्रमाणात आढळून येतात. या चळवळी नेहमीच मंत्रतंत्रात्मक अंधश्रद्धांशी निगडित असतात असे नव्हे. अनेकदा भूतकाळातील अथवा वर्तमान संस्कृतिघटकांचा उपयोग समाजातील सदस्यांचा स्वाभिमान पुन:प्रस्थापित करण्यासाठी होतो. विपरीत सामाजिक परिस्थितीला तोंड देण्याचे सामर्थ्य समाजामध्ये निर्माण करण्याचा हेतू देशीयतावादी चळवळीमागे

असू शकतो. संस्कृतीमधील भूतकालीन किंवा समकालीन पैलूंना चिरस्थायित्व देण्याचा प्रयत्न करून स्वत:ला वेढून असलेल्या परसंस्कृतीमध्ये मिळण्यास ठाम विरोध करणे, हे देशीयतावादी चळवळीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असते.

## ४.२.२.१ मराठी साहित्यातील देशीवाद

सन १९९० पासून मराठी साहित्यात भालचंद्र नेमाडे यांनी देशीवादी भूमिका मांडावयास सुरुवात केली. आतापर्यंत मानववंशशास्त्र, समाजशास्त्रापुरती मर्यादित असलेली देशीवादी किंवा देशीयतावादी संकल्पना आता मराठी साहित्याच्या संदर्भात मांडली जाऊ लागली. इंग्रजांच्या भारतावरील प्रदीर्घ राजवटीचा आणि उत्तर-वासाहतिक अस्मिताशोधाचा संदर्भ या भूमिकेमध्ये होता. विशेषत: मराठी साहित्य सुरुवातीच्या १९व्या शकतात व २० व्या शतकाच्या पूर्वार्धात झालेले मराठी साहित्यावरील परकी संस्कार नाकारणे आणि स्वसंस्कृतीतून बळ घेऊन निर्माण होणारे साहित्य आणि साहित्यविचार विकसित करणे हे भालचंद्र नेमाडे यांच्या देशीवादी भूमिकेचे महत्त्वाचे उद्दिष्ट दिसून येते.

या दृष्टिकोणातूनच मराठी साहित्यातील विविध प्रवृत्तींचा, साहित्येतिहासाचा आणि समीक्षापद्धतींचा पुनर्विचार, देशीयतावादी भूमिका करू पाहते. विशिष्ट भूप्रदेशाची त्याची म्हणून अशी वेगळी संस्कृती असते. या कल्पनेला मराठीतील देशीयतावादी भूमिकेमध्ये स्थान आहे. याबरोबरच भाषिक वेगळेपणा आणि विशिष्ट भाषेच्या साहित्यपरंपरेलाही महत्त्व दिले जाते. पारंपरिक आविष्कार पद्धती, कथनरूपे, पाश्चात्त्यांशी संबंध येण्यापूर्वीच्या काळातील सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण घटना केंद्रस्थानी आणून परंपरेबद्दल पुनर्विचार केला जातो.

मराठीतील देशीयतावादी साहित्यविचार भूमिनिष्ठा आणि खास मराठी परंपरेवर भर देत असला, तरी त्याचे नाते आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक वातावरणाशीही आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अनेक पाश्चात्त्य वसाहती पाश्चात्त्यांच्या वर्चस्वातून मुक्त होण्याचा प्रयत्न करू लागल्या. पाश्चात्त्यांच्या सांस्कृतिक दडपणातून मुक्त होण्याचे प्रयत्न तेथील विचारवंत करू लागले. अमेरिकेतील काळ्या लोकांचेही असेच प्रश्न होते. यामधून फ्रांटस् फॅनन, सी.एल.आर., जेम्स, ए. काब्राल, एमी सेझेंयर यांसारख्या लेखकांचे लेखन निर्माण झाले होते. एडवर्ड सैद यांनी 'ओरिएंटॅलिझम' (सन १९७८) या आपल्या ग्रंथातून वरील लेखकाच्या जाणिवेला देशीयतावादी परिमाण देत विद्वत्तचर्चेच्या केंद्रस्थानी आणले. या ग्रंथाच्या प्रसिद्धीनंतरच मराठीमध्येही भालचंद्र नेमाडे यांनी देशीवादी भूमिका मांडली, ही गोष्ट लक्षणीय आहे.

देशीवादाची आपली भूमिका स्पष्ट करताना डॉ. भालचंद्र नेमाडे लिहितात, ''देशी याचा अर्थ त्या-त्या भूमीशी जोडलेले असणे असा प्राय: होतो. खरे तर प्रत्येक वस्तू देशीच असेल, तर देशीपणाची चर्चा करण्याची गरज काय? परंतु देशी नसलेल्या परक्या बाहेरून येणाऱ्या अनेक मूल्यांचे, भाषांचे,

संस्कृतींचे देशी मूल्यांवर, भाषांवर व संस्कृतींवर जेव्हा आक्रमण होते, तेव्हा स्वत:च्या अस्तित्वासाठी मानवसमूहांना देशीवादी व्हावे लागते. वस्तुत: देशीपणा ही अत्यंत स्वयंभू झाडाझुडपांसारखी सोशीकपणे आपापल्या जागेवर उगवणारी व टिकून राहणारी संकल्पना आहे. परंतु तिलाही आक्रमक व्हावे लागते असे सांस्कृतिक कसोटीचे क्षण येतात. त्यावेळी अत्यंत नम्रतेने बोलणाऱ्या ज्ञानेश्वरालासुद्धा ''दाऊ वेल्हाळ देशी नवी'' असे आक्रमक व्हावे लागते किंवा भटोबासारख्या गाढ्या पंडितालाही ''तुमचा अस्मात कस्मात मी नेणे गा', मजश्री चक्रधरे, निरूपिली मऱ्हाटी; तियाचि पुसा:'' असे 'संकुचित' किंवा 'दुराग्रही' व्हावे लागते. देशीपणाच्या संकल्पनेत स्थितीशीलत्व अबाधित राखणारी स्वाभाविक अवस्था, हा अर्थ अभिप्रेत असतो. देशीवाद ह्या संकल्पनेत त्याच गुणांची लढाऊ वृत्ती, आपल्या अस्तित्वाचा हक्क प्रस्थापित करण्याची आग्रही वृत्ती प्रकट होते. देशीवाद ही अर्थातच देशीपणाची एकतात्कालिक अवस्था असते. देशीयता हा शब्द आपण ह्या दोन्ही अवस्थांना सामावणारा म्हणून वापरू.''५

विद्यार्थी मित्रहो, आतापर्यंतच्या चर्चेवरून देशीवाद किंवा देशीयतावाद ही संकल्पना आपल्या लक्षात आली असेल. आता देशीयतावाद आणि तौलनिक साहित्याभ्यास परस्पर संबंधाचा विचार करूया.

## ४.२.२.२ देशीयतावाद आणि तौलनिक साहित्याभ्यास

तौलनिक साहित्याभ्यास ही एक सर्वसमावेशक व व्यापक अशी साहित्याचा अभ्यास करणारी बृहत ज्ञानशाखा आहे. त्यामुळे साहित्यविचाराशी संबंधित अशा कोणत्याही नव्या संकल्पना तौलनिक साहित्याच्या अभ्यासाचा विषय बनतात. ही प्रक्रिया अव्याहतपणे चालू असते. अर्थात देशीवादी दृष्टिकोणातून विभिन्न साहित्यांचा तौलनिक अभ्यास करणे, हे तौलनिक साहित्याभ्यासाचे नवे अभ्यासक्षेत्र आहे. देशीवादाची मांडणी भालचंद्र नेमाडे यांनी सन १९८० च्या दशकात 'साहित्यातील देशीयता' हा निबंध लिहून केला असला तरी सन १९९० मध्ये प्रकाशित झालेल्या नेमाड्यांच्या 'टीकास्वयंवर' या ग्रंथातून वरील लेख पुस्तकरूपाने प्रकाशित केला आणि मग मराठी साहित्य आणि देशीवाद या अनुषंगाने चर्चा सुरू झाली.

स्थानिकतेवर भर देणारा देशीवाद आणि आंतरराष्ट्रीय संबंधाभ्यास करणारी तौलनिक साहित्याभ्यास या दोन्ही अभ्यासशाखा परस्पर भिन्न वाटत असल्या तरी त्या परस्परभिन्न अजिबात नाहीत. देशीवादाची गृहीतक तौलनिक साहित्याभ्यासाला मान्य आहेत. कारण श्रेष्ठ साहित्य मातीचा सुगंध घेऊन दरवळत असतं हे तौलनिक साहित्याभ्यासांतर्गत येणाऱ्या 'विश्वसाहित्या'चं महत्त्वाचं तत्त्व आहे. याबाबत भालचंद्र नेमाडे लिहितात, ''तौलनिक साहित्यविचारातही असे सिद्ध केले जाते की, कलाकृती ह्या अनन्यसाधारण कधीच नसतात. कारण कोणत्यातरी समान तत्त्वाच्या आधारे त्यांचे वर्गीकरण हे करता येतेच. संविधानके, रूपचिन्हे, संरचना, प्रतीके, पात्रे, आशयसूत्रे, कथनतंत्रे, तत्त्वे, शैलीप्रकार, मूल्ये इ. घटक जगभरच्या सांहित्यकृतींमध्ये सार्वत्रिकपणे आढळतात. अर्थात ही समानता त्या त्या देशी वैशिष्ट्यांशिवाय अस्तित्वात

आलेली नसते आणि ही देशी वैशिष्ट्ये गृहीत धरल्याशिवाय दोन भिन्न संस्कृतींच्या किंवा भिन्न भाषांच्या साहित्यकृतींची तुलना करता येत नाही.''६

याचा अर्थ देशी कलाकृतीस परक्या संस्कृतीचे पूर्णपणे वावडे असते असे नाही अस्सल कलावंत परक्या साहित्य किंवा संस्कृतीतील काही तत्त्वे, मूल्ये आत्मसात करून आपल्या कलाकृतीत ही तत्त्वे, मूल्ये वापरतो, पण त्याचे प्रमाण ठरलेले असते. स्वत:चे सत्त्व गमावून ही घेण्याची क्रिया कधीच घडत नाही. नेमाड्यांनी हा मुद्दा पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे. ''संस्कृती म्हणजे परस्पर सहकार्य करणाऱ्या अनेक व्यवस्थांमध्ये जाळे असते. बाहेरून पडणारे सर्व प्रभाव ह्या व्यवस्थांमध्ये रूपांतरित करून त्यांना आत्मसात करण्याची अंगभूत शक्ती प्रत्येक जिवंत 'जोमदार संस्कृतीमध्ये असते. बाहेरील प्रभाव आत्मसात करण्याच्या ह्या प्रक्रियेलाच देशीकरण म्हणता येईल. ही देशीकरणाची प्रक्रिया जितकी सक्षम असेल, तितकी ती देशी संस्कृतीला पोषक ठरते. बाहेरून आढळणाऱ्या विविध मूर्त आणि अमर्तू गोष्टींचे देशीकरण करून कोणत्याही जोमदार संस्कृतीचे पोत भक्कम होत जाते. ह्या प्रक्रियेमुळेच मानवबाह्य विश्वातील घटना, सचेतन व अचेतन वस्तू, प्राणी आणि वनस्पती इत्यादींना संस्कृती आपल्या पोटात घेत असते. त्याच प्रक्रियेमुळे मानवी अस्तित्वाचे त्या प्रदेशाशी, तिथले डोंगर, नद्या, प्राणिजात, इतिहास व भूगोल ह्यांच्याशी जन्मजात नाते प्रस्थापित होते. साहित्याच्या परंपरेत ही देशीकरणाची प्रक्रिया अव्याहत चालू आहे. प्रत्येक नव्या साहित्यिकाला आपली मुळे ह्या परिसराभिमुख परंपरेत खोलवर रोवलेली असल्याचे आपोआप जाणवते. परसंस्कृतीशी संपर्क झालेल्या लोकांच्या जाणिवेत वा नेणिवेत परसंस्कृतीतील नवी मूल्ये, तत्त्वे, एवढेच नव्हे तर मोठमोठ्या सांस्कृतिक व्यवस्थासुद्धा आत्मसात केल्या जातात. हिंदुस्थानात आर्य, हूण, शक, मोगल इत्यादींचे असेच देशीकरण झाले. उसनवारी करतानासुद्धा परक्या समाजाचा कितीही तीव्र सांस्कृतिक व राजकीय दबाव असो, कोणते परके मूल्य किंवा तत्त्व घ्यावे निवड सांस्कृतिक व्यवस्था अत्यंत काळजीपूर्वक करत असतात आणि ज्या गोष्टी समाजाची मूळ संरचना वाढविण्यासाठी आवश्यक असतात, अशाच परक्या गोष्टींना देशी व्यवस्थेत शेवटी स्थान मिळते. येथे संस्कृतिसंपर्काच्या गदारोळात पहिल्या पिढीची चूक झाली तर पुढच्या पिढ्या त्यात दुरुस्ती करून समतोल साधताना दिसतात.''७

अशाप्रकारे देशीयता ही विश्वातील श्रेष्ठ वाङ्मयात सर्वत्र आढळून येणारी खास बाब ठरते आणि देशीयतावाद ही साहित्यक्षेत्रातील चळवळ भारतात उगम पावलेली चळवळ मानता येते. कारण राल्फ लिंटन यांचा देशीवाद हा मानववंशशास्त्र आणि समाजशास्त्रापुरता मर्यादित होता. भालचंद्र नेमाडे यांनी सन १९८३ मध्ये 'साहित्यातील देशीयता' हा शोधनिबंध लिहून साहित्यातील देशीवादाची शास्त्रशुद्ध मांडणी केली. सन १९९० साली त्यांनी लिहिलेल्या 'टीकास्वयंवर' या ग्रंथात सदर शोधनिबंध समाविष्ट केला. त्यानंतर साहित्यक्षेत्रातील अनेक विद्वानांनी देशीवादाची दखल घेत चर्चा घडवून आणली. आज भारतीय तौलनिक साहित्याभ्यासाच्या संप्रदायास 'देशीवाद' महत्त्वाचा वाटत आहे. या संप्रदायाच्या नव्या

तत्त्वप्रणालीत देशीवादी दृष्टिकोण निश्चितपणे भर घालेल असे वाटते. कारण बहुभाषक आणि बहुसांस्कृतिक अशा भारत देशात प्रत्येक प्रदेशातील वाङ्मय तेथील मातीचा सुगंध घेऊन उभे असल्याचे दिसून येते. अशावेळी प्रत्येक भाषा-प्रदेश-संस्कृतीतील पृथकत्व आणि खास भारतीय सांस्कृतिक साम्ये या निकषांवर देशीवादी तुलना शक्य आहेत, त्या भविष्यात मोठ्या प्रमाणावर होतील असा विश्वास वाटतो. खासकरून १९९० नंतरच्या जागतिकीकरणाच्या रेट्यास देशीवादी दृष्टिकोण वापरून केला जाणारा तौलनिक अभ्यास हेच एकमेव उत्तर असू शकते, असे वाटते. अर्थात नव्या साहित्याच्या अभ्यासकांनी तौलनिक साहित्याभ्यासाकडे वळणे ही काळाची गरज बनली आहे. आता संस्कृति-अभ्यासाचा विचार करूया-

## ४.२.३ संस्कृतिअभ्यास : संज्ञा आणि संकल्पना

'संस्कृती' हा शब्द सम अधिक कृत या धातूपासून बनला असून त्याचा अर्थ 'कला, साहित्य धर्माधी समग्र जीवनाच्या सर्वस्पर्शी उन्नत अवस्थेची गतिमान प्रक्रिया' असा सर्वसाधारणपणे होतो. वास्तविक पाहता संस्कृती ही जटिल प्रक्रिया असल्याने तिचे शब्दात अचूक वर्णन करणे केवळ अशक्य आहे. 'संस्कृती'चा विरुद्धार्थी शब्द 'विकृती' तेव्हा 'विकृती' सोडून जे काही असते ते ते सर्व 'संस्कृती' या संज्ञेत मोडते, असे ढोबळ मानाने म्हणता येईल. मानवाची समग्र जीवनपद्धतीच संस्कृती असल्याने ज्या जीवनद्रव्यावर लेखक साहित्य रचतो; त्या साहित्यकृतीत संस्कृतीचे प्रतिबिंब उमटणे अगदी स्वाभाविक होय. संस्कृती मग ती एका व्यक्तीची, व्यक्तिसमूहाची, विशिष्ट प्रदेशाची, भाषेची, राज्याची, राष्ट्राची, खंडाची, उपखंडाची, लेखकाची, कवीची, कोणत्याही कलावंताची (चित्रकार, नाटककार, संगीतकार, पटकथाकार, दिग्दर्शक, अभिनेते इत्यादी) अशा कोणत्याही घटकाची असो प्रत्येक घटकांनुसार तिची व्याख्या बदलते. तेव्हा संस्कृती ही एक व्यामिश्र, जटिल संकल्पना आहे.

### ४.२.३.१ संस्कृतिअभ्यास

संस्कृतिअभ्यास ही अलीकडच्या काळातील महत्त्वाची ज्ञानशाखा बनत चालली आहे. संस्कृती ही मानवी जीवन व्यापून टाकत असल्याने तिचा स्वतंत्र अभ्यास होणे स्वाभाविक आहे. आपण करत असलेले मराठी साहित्याभ्यास, इंग्रजी साहित्याभ्यास ही संस्कृतिअभ्यासाची केवळ एक-एक अंगे आहेत. संस्कृतिअभ्यास हे एक खूप मोठे वर्तुळ आहे की, ज्यामध्ये सर्व कला, भाषा, साहित्य, कामगार, खेडूत, आदिवासी, महानगरीय, मध्यमवर्गीय, निम्नवर्गीय, उच्चभ्रूंची संस्कृती असे छोटे घटक असलेली असंख्य छोटी-छोटी वर्तुळे सामावली जातात. मग अशा संस्कृती नावाच्या व्यामिश्र प्रक्रियेचा अभ्यास स्वतंत्रपणे का केला जाऊ नये? असे जगभरातील काही विद्वानांना वाटते. अमेरिका, इंग्लंड सारख्या राष्ट्रांनी संस्कृतिअभ्यासाच्या दिशेने वाटचाल सुरू केले त्यालाही आता दोन दशके उलटून गेली आहेत.

डॉ. अनिल पाटील लिहितात त्याप्रमाणे, ''पाश्चात्त्य देशातील ही नवी टूम समजून संस्कृतिअभ्यासाकडे कानाडोळा करून चालणार नाही. अठरापगड जातींना आपल्या अस्मितेचे भान शिक्षणामुळे येत आहे. राजकारणात ते आज आपला हक्काचा सत्तेतला वाटा मागत आहेत. सांस्कृतिक श्रेणीबद्धतेला ते आव्हान देणार, यात नवल नाही. संस्कृतिअभ्यास ब्रिटनमध्ये सुरू होण्यास कनिष्ठ वर्गाचा उठाव हेच कारण होते. अमेरिकेत अनेक सांस्कृतिक उपगटांना संतुष्ट ठेवण्यासाठी आफ्रीकन-अमेरिकन, गे, स्ट्रेट वगैरे अभ्यासकांना इंग्रजी वाङ्मयाभ्यासाच्या बरोबरीने स्थान देण्यात आले आहे.''८

त्यामुळे गेल्या दोन-अडीच दशकांपासून अमेरिकेत जो संस्कृतिअभ्यास गतीने वाटचाल करीत आहे, तो उद्या आपल्या भारतात येऊच शकत नाही असे मानणे हा शुद्ध वेडेपणा ठरेल. आज मराठी, हिंदी, इंग्रजी इत्यादी भाषासाहित्यांमधील विद्वानांना भीती वाटते की, संस्कृतिअभ्यास त्यांच्या मुळावरच उठला आहे. अगदी डॉ. आनंद पाटील ही भीती व्यक्त करताना असे लिहितात की, ''समीक्षा, साहित्य-सिद्धान्त, इतकेच नव्हे, तर 'साहित्य' यांच्या वर्चस्वाला विरोध सुरू झाला आहे. या सांस्कृतिक उद्योगातील खोटेपणा आणि मर्यादा उघड होत आहे. स्पेशलायजेशन च्या मर्यादाही स्पष्ट झाल्या आहेत. स्पेशॅलिस्टांची जागा कम्पॅरिटिस्ट घेऊ लागले आहेत. त्या दोघांना बाजूला सारून कल्चरॅलिस्टिक पुढे सरसावले आहेत. साहित्याभ्यास संदर्भहीन ठरल्याने अमेरिकेसारख्या प्रगत देशात समकालीन संस्कृतीच्या अभ्यासाच्या लाटा येत आहेत. उच्चभ्रू साहित्य आणि संस्कृतीचे स्तोम फार माजले. लोकप्रिय किंवा कमी दर्जाची संस्कृती उपेक्षित राहिली. लिंग, वंश, वर्ण, वर्ग वगैरे भेदांना सामावून घेणारा संस्कृतिअभ्यास बहुसंस्कृतिवादात महत्त्वाचा ठरला.''९ परंतु ही भीती अनाठायी वाटते. कारण संस्कृतिअभ्यास सगळ्र जीवनप्रवाहांना आपल्या कवेत घेणार असल्याने ती एक स्वतंत्र ज्ञानशाखा होऊ शकेल. भाषा-साहित्य-तौलनिक साहित्याभ्यास संस्कृतीचा गरजेपुरता आणि संदर्भाने अभ्यास करतील. शिवाय संस्कृतिअभ्यासाची स्वतंत्र अभ्यासपद्धती अजूनही शास्त्रशुद्धतेचे निकष पाळून तयार झालेली नाही. ती तशी तयार करणेही खूप अवघड काम असणार आहे. कारण अभ्यासाला निवडलेल्या विषयानुसार तिची अभ्यास पद्धती बदलावी लागणार, त्यामुळे भाषा-साहित्यादी तौलनिक शास्त्रे विसर्जित करून फक्त संस्कृतिअभ्यास करणे हे केवळ अशक्य आहे. एक भाषिक साहित्यिकांनी आपले ज्ञान वाढवावे, बहुभाषिक व्हावे, किमान दोन भाषांवर चांगले प्रभुत्व मिळवावे हे ठीकच आहे. पण म्हणून एक भाषा साहित्यिक अभ्यास कालबाह्य ठरविणे योग्य ठरत नाही. आता डॉ. आनंद पाटील यांनी संस्कृतिअभ्याससंदर्भात नोंदविलेली निरीक्षणे पाहू-

''१. 'संस्कृती' या संज्ञेत सर्व प्रकारच्या संस्कृतीच्या रूपबंधांचा समावेश होतो. उदा. दूरदर्शन, लोकप्रिय संगीत, रहस्यकथा इ. प्रकार नीच दर्जाच्या संस्कृतीतले मानले जात नाहीत.

२. मार्क्सवादी समीक्षेची परंपरा संस्कृतिअभ्यासात महत्त्वाची मानली जाते.

३. भारतीय संस्कृतिविचार वेदपुराणांवर केंद्रित झालेला आहे. भारत हा देश कृषिप्रधान देश आहे. त्याच्या गावगाड्याच्या संस्कृतीला वेदसंस्कृतीइतकेच महत्त्व मिळायला हवे. हे मौलिक कार्य त्रिंबक नारायण आत्रे यांनी 'गावगाडा' (१९१५) रचून स्वातंत्र्यपूर्व काळात केले होते.

४. भारतातील बहुभाषिकता व बहुसंस्कृतिवादाचे स्वरूप युरोपातील कोणत्याही देशापेक्षा फार वेगळे आहे. सोळा हजार जाती-पोट जाती-जमातींत विभागलेला हा खंडप्राय देश पर्यावरणीय सौंदर्यमीमांसेला (eco-aesthetics) नवे परिमाण प्राप्त करून देतो. इथला 'संस्कृती' या संकल्पनेचा इतिहास जाती-वर्ण व्यवस्थेला जखडलेला आहे.

५. 'संस्कृती' या संकल्पनेत प्रबोधन काळातील धारणेनुसार मानवाच्या आदर्श स्वभावाची कल्पना केली जाते. रोमँटिक आदिमता वादात माणसाच्या निसर्गदत्त अवस्थेकडे वळण्याचा आग्रह धरला गेला. आधुनिक समाजशास्त्र कोशात बुद्धिमत्तांची व्याख्या 'मूलभूत कल्पनांच्या विकासाला समर्पित झालेले आणि सर्जनात्मक बौद्धिक उपक्रमांत गुंतलेले समाजातील लोक' अशी केली आहे. हे संस्कृतिरक्षक निवडक लोक नेहमीच सत्तेच्या जवळ असतात. वाङ्मयीन अभिरुची हे लोकच नियंत्रित करतात.

६. एका राष्ट्रात साहित्यिकांनी विकसित केलेल्या संस्कृतीच्या संकल्पनांचे अनुकरण इतर देशांत घडणे सांस्कृतिक संबंधांच्या प्रकारांवर व पातळ्यांवर अवलंबून असते.

७. भारतीय साहित्यिक बुद्धिमंतांनी स्वत:चा दर्जा व महत्त्व जाणीवपूर्वक टेकू देऊन उंचावण्याचा प्रयत्न करण्याची परंपरा सदैव टिकवल्याचे दिसेल. समाजातील सांस्कृतिक नेतृत्व टिकवण्याचे काम अप्रत्यक्षपणे त्यांच्या कल्पना करीत असतात.

८. साहित्याची अति उदात्तीकरण झालेली संकल्पना आणि समकालीन वास्तव जीवनातील दाहक अनुभव यांत आजच्याइतकी मोठी दरी पूर्वी कधी निर्माण झाली नव्हती.

९. भारतीय बहुसंस्कृतिवादातून उद्‌भवणाऱ्या संघर्षावर संस्कृतिअभ्यास हा एक चांगला उपाय वाटतो. महात्मा फुले, गो.ग.आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वगैरे समाजसुधारक संस्कृतीचे टीकाकार होते. आता समकालीन संस्कृतीचे अभ्यासक तयार होणे गरजेचे आहे.

१०. संस्कृतिअभ्यास ही कुठलाही रामबाण उपाय सुचविणारी विद्याशाखा नाही. ती सुटसुटीत व्याख्या केलेली पद्‌धतिमीमांसा नाही; किंवा सीमाबद्ध संशोधनाचे क्षेत्रही नाही, असे असूनही तौलनिक साहित्यात तिला आता केंद्रस्थान देण्यात येत आहे.

११. होमी के. भाभा यांनी 'द लोकेशन ऑफ कल्चर' (सन १९९४) या ग्रंथात उत्तरवासाहतिक दृष्टिकोणातून पाश्चात्त्य आधुनिकतेच्या संस्कृतीची पुनर्मांडणी करण्याची गरज प्रतिपादित केली आहे. संस्कृतिसंकराचे आणि स्वत: व परका, पूर्व व पश्चिम अशा द्वैतापलीकडे जाणारे साामजिक फरक 'रूपांतरित' करणारे सिद्धान्त त्यांनी मांडले आहेत. सांस्कृतिक संघर्षाचे पुरावे सादर करण्यासाठी श्रीलंकेतील तमिळ-सिंहली संघर्ष, आफ्रिकेतील व लॅटिन अमेरिकेतील हिंसाचार, भारत-पाकिस्तान तणाव वगैरे उदाहरणे भाभांनी दिली आहेत. संकरित आंतरराष्ट्रीय संस्कृतीचा त्यांनी पुरस्कार केला आहे. त्याला ते 'तिसरा अवकाश' (Third Space) म्हणतात. संस्कृतिसंकराची कल्पना विरचनावादी दृष्टिकोणातून विकसित करून भाभांनी संस्कृतिअभ्यासाला मोलाची सैद्धान्तिक बैठक तयार करून दिली आहे.

१२. भारतीय तुलनाकारांनी ही भूमिका व चैतन्य सदैव लक्षात ठेवायला हवे. कारण उपसंस्कृतीची भारतातील संख्या जगातील कुठल्याही देशापेक्षा जास्त आहे. त्यांच्या तौलनिक संस्कृति-अभ्यासाचे समर्थन करता आले पाहिजे.

१३. वाङ्मयीन वाचन अवाङ्मयीन संहितांकडे वळवण्याला आधुनिकतावाद्यांचा विरोध असतो. आधुनिकतावादी आकृतिबंध, आशय, शैली यांच्या एकात्मतेला महत्त्व देतात. संस्कृतिअभ्यासात ही एकाग्रता अग्रभागी टिकत नाही.

१४. ब्रिटनमधील संस्कृतिअभ्यासाचा प्रारंभ सन १९५० च्या दशकात एफ.आर.लेव्हिसच्या 'थोर परंपरावादातून झाला. पुढे रिचर्ड होगार्त व रेमंड विल्यम्स या मार्क्सवादी मंडळींच्या प्रयत्नांमुळे त्याला गती मिळाली. होगार्तचा 'द युजेस ऑफ लिटरसी' कामगार वर्गाच्या संस्कृतिअभ्यासाचा पाया घालणारा ग्रंथ ठरला.

१५. स्वत्व सिद्ध करण्याचे राजकीय माध्यम म्हणून संस्कृतिअभ्यासाकडे पाहिले जाते. त्यामुळे ते लोकप्रिय ठरतात. मूल्यधारणा अभ्यासताना स्थानिक परिस्थिती विचारात घेतली पाहिजे.''[१०]

## ❑ संस्कृतिअभ्यासाचे प्रमुख प्रकार :-

संस्कृतिअभ्यासाची सैद्धान्तिक बैठक पक्की नसल्यामुळे तिच्यामध्ये अनेक बदलाच्या शक्यता. दिसून येतात. ती नित्य नव्या वाटा धुंडाळणारी ज्ञानशाखा आहे. तिच्या अभ्यासाचे काही प्रकार पुढील प्रमाणे :-

### अ) श्रमजीवी वर्गाच्या संस्कृतीचा अभ्यास :-

प्रामुख्याने दुसऱ्या महायुद्धानंतर जगभरात निर्माण झालेल्या बदलांचा अभ्यास या शाखेत केला जातो. उदा. शिक्षण पद्धती, सिनेमा संगीत, दूरदर्शन इत्यादी प्रकारच्या सांस्कृतिक उद्योगांचा अभ्यास.करणे.

### ब) सांस्कृतिक नेतृत्व-चिकित्सा :-

संस्कृतीला स्वत:चे राजकीय कार्य असते. यामध्ये अदृश्य नेतृत्वाचा समाजमनावरील प्रभाव शोधला जातो. अदृश्यपणे दुरून नियंत्रण करणाऱ्या शक्तीचे नेतृत्व असा होतो. भारतीय राजकारणात विशिष्ट उच्चवर्णीय लोक सत्तेत नसूनही अदृश्यपणे नेतृत्व करून सांस्कृतिक सूत्रे हलवून जास्त सत्ता गाजवतात. अशा अदृश्य नेतृत्वाचा अभ्यास ह्या शाखेत केला जातो.

### क) संरचनावादी संस्कृती-अभ्यास :-

सन १९७० च्या दशकात 'लुई अल्तुस्सर व झाक लंका' या फ्रेंच तज्ज्ञांने मनोविश्लेषण सिद्धान्त मांडला त्यातून हा अभ्यास प्रकार पुढे आला. या सिद्धान्तानुसार प्रत्येक व्यक्तीची मतप्रणाली ही एक संरचना असते. राजकीय मनोविश्लेषणात्मक संरचनावादाचा उपयोग चित्रपटाच्या सांस्कृतिक अभ्यासात केला जातो. चिन्हमीमांसेतून 'बहुअर्थी' ही संकल्पना लोकप्रिय झाली. एका चिन्हकाचे एकापेक्षा अनेक अर्थ असतात. हे या सिद्धान्ताचे गृहीतक होय.

अशा प्रकारे संस्कृतिअभ्यासाचा विचार केल्यानंतर आता तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्त्व आपण जाणून घेणार आहोत.

## ४.२.३.२ संस्कृतिअभ्यास आणि तौलनिक साहित्याभ्यास

आता आपणास संस्कृतिअभ्यासाच्या संदर्भात तौलनिक साहित्याभ्यासाचे महत्त्व लक्षात घ्यावयाचे आहे. तौलनिक साहित्याभ्यासाला संस्कृतिअभ्यासाची जोड दिल्यास तौलनिक संस्कृतिअभ्यास अशी एक नवीनच ज्ञानशाखा निर्माण होऊ शकते. अशा अभ्यासात साहित्याखेरीज इतर कला, चित्रपट, नाटक, समाजातील विविध वर्ग, जातीसमूह, स्थलांतरित, भटके-विमुक्त, आदिवासी, स्त्रिया अशा सर्व घटकांचा अभ्यास करता येऊ शकेल. मात्र त्यासाठी संस्कृतिअभ्यासानेही आपल्यामध्ये बदल करत साहित्यिक संहितांआधारे हा अभ्यास करावा आणि तौलनिक साहित्याभ्यासाने थोडा व्यापक दृष्टिकोण स्वीकारत साहित्याच्या कक्षा संदर्भानुसार ओलांडून इतर क्षेत्रांचा गरजेनुसार अभ्यास करण्याची तयारी ठेवावी तरच तौलनिक संस्कृतिअभ्यास भविष्यात विकसित होऊ शकेल अन्यथा फारसे काही आपल्या हाती लागणार नाही.

वास्तविक संस्कृतिअभ्यास ही ब्रह्द ज्ञानशाखा असल्याने तिचा अभ्यासाचा व्यापक पसारा पाहता तिने स्वतंत्रपणे वाटचाल करणे योग्य ठरेल. तौलनिक साहित्याभ्यासासाठी अभ्यास संदर्भ म्हणून संस्कृतिअभ्यासाचा तौलनिक साहित्याभ्यास नक्कीच वापर करू शकेल.

## ४.३ सारांश/समारोप

विद्यार्थी मित्रांनो, आतापर्यंत आपण ह्या प्रकरणात 'जागतिकीकरण', 'देशीवाद' आणि 'संस्कृतिअभ्यास' संकल्पना समजावून घेतल्या आणि त्यांचे तौलनिक साहित्याभ्यासासंदर्भात महत्त्व काय आहे? हे तपासण्याचा प्रयत्नही केला.

'जागतिकीकरण' ही प्रामुख्याने भांडवली अर्थव्यवस्थेशी संबंधित असणारी विश्वव्यापी विस्तारवादी प्रक्रिया आहे. तिने बाजाराबरोबरच स्थानिक भाषा, संस्कृती, परंपरा या सर्वांचे झपाट्याने आंतरराष्ट्रीयीकरण करण्याचा घाट घातला आहे. अशावेळी दोन भिन्न साहित्यातील कलाकृतींमध्ये जागतिकीकरणानंतरच्या समाजाचे कोणते प्रतिबिंब कसे उमटले आहे हे पाहणे व त्याचा साधकबाधक विचार करून तौलनिक साहित्याभ्यासाच्या कसोट्या वापरून चिकित्सा करणे गरजेचे आहे.

'देशीवाद' ही प्रामुख्याने मानववंशशास्त्र आणि समाजशास्त्राशी संबंधित संज्ञा असली तरी तिचा साहित्याच्या संदर्भात सर्वप्रथम विचार केला तो भालचंद्र नेमाडे ह्यांनी. जागतिकीकरणाच्या विषम वातावरणात स्थानिक भाषा, संस्कृती यांना घट्टपणे चिकटून साहण्याची जाणीव देशीवाद आपणास करून देतो. तेच जागतिकीकरणासारख्या हजार पायांच्या गोमेला दिलेले उत्तर ठरते. तौलनिक साहित्याभ्यास हा आंतरराष्ट्रीय संबंधाभ्यास असल्यामुळे ही शाखा आणि देशीवाद परस्पर विरुद्ध टोके आहेत, असे प्रथमदर्शनी वाटते. पण वस्तुत: तसे नसून तौलनिक साहित्याभ्यासात देशीवादाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. थोर साहित्य हे देशी मातीचा गंध घेऊन येतं हे तौलनिक साहित्याभ्यासकांना मान्य आहे. त्यामुळे देशीवाद ह्या शाखेस उपकारक ठरतो.

'संस्कृतिअभ्यास' ही ब्रहद् ज्ञानशाखा असून साहित्य, भाषा हे त्याचे केवळ एक घटक ठरतात. तेव्हा साहित्य, भाषा आणि संस्कृती ह्या परस्पराश्रयी प्रक्रिया असल्याने तौलनिक संस्कृतिअभ्यासांतर्गत त्यांचा अभ्यास व्हावा. परंतु साहित्यबाह्य गोष्टींच्या अभ्यासासाठी संस्कृतिअभ्यासाने स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून वाटचाल केली पाहिजे असे वाटते. या सर्वच संकल्पनांच्या संदर्भात तौलनिक साहित्याभ्यासही ज्ञानशाखा महत्त्वाची ठरते.

## ४.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. **निम्नस्तरीय :** खालच्या दर्जाचे.

२. **विद्वत्चर्चा :** विद्वानांतील चर्चा.

३. **परिसराभिमुख :** परिसराला जवळचे, परिसराला महत्त्व देणारे.

४. **पृथकत्व :** निराळेपण.

५. **व्यामिश्र :** गुंतागुंतीचे.

६. **खंडप्राय :** पृथ्वीवरील एखाद्या खंडाएवढे (भारताविषयी खंडप्राय' हे विशेषण वापरले जाते.)

७. **विस्तारवादी :** वर्चस्व गाजवणारे, आपल्या भूमीचा अवैध रीतीने विस्तार करू इच्छिणारे.

## ४.५ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

### ❑ योग्य पर्याय निवडा.

१. 'जागतिकीकरण' ही संज्ञा कोणत्या गोष्टींशी संबंधित आहे?

*(अ) साहित्य (ब) अर्थव्यवस्था (क) कला (ड) यापैकी नाही.*

२. १९९४ साली भारत सरकारने कोणता करार स्वीकारला?

*(अ) गॅट (ब) सिमला (क) ताश्कंद (ड) यापैकी नाही.*

३. जागतिकीकरणास खालीलपैकी कोणती पर्यायी संज्ञा वापरली जाते?

*(अ) आंतरराष्ट्रीयीकरण (ब) वैश्विकीकरण*

*(क) नागरीकीकरण (ड) यापैकी नाही.*

४. देशीवाद ही मूळ कोणत्या ज्ञानशाखेतील संज्ञा आहे?

*(अ) अर्थशास्त्र (ब) राज्यशास्त्र (क) मानववंशशास्त्र (ड) यापैकी नाही.*

५. देशीवाद ही संकल्पना सर्वप्रथम कोणी मांडली?

*(अ) राल्फ लिंटन (ब) ज्युलिया क्रिस्तेवा*

*(क) होमी के. भाभा (ड) यापैकी नाही.*

६. मराठी साहित्याच्या संदर्भात देशीवादाची मांडणी कोणी केली?

*(अ) आनंद पाटील (ब) भालचंद्र नेमाडे*

*(क) निशिकांत मिरजकर (ड) यापैकी नाही.*

७. 'टीकास्वयंवर' हा ग्रंथ केव्हा प्रकाशित झाला?

*(अ) १९८९ (ब) १९९० (क) १९९१ (ड) यापैकी नाही.*

८. संस्कृतिअभ्यास कोणत्या देशात प्रतिष्ठा पावला आहे?

*(अ) अमेरिका (ब) स्कॉटलंड (क) जर्मनी (ड) यापैकी नाही.*

९. संस्कृतिअभ्यास ही पाश्चात्त्य संकल्पना मराठीत आणणारे अभ्यासक कोण?

*(अ) निशिकांत मिरजकर (ब) आनंद पाटील*

*(क) उत्तम कांबळे (ड) यापैकी नाही.*

१०. संस्कृतिअभ्यासात भारतातील कोणती गोष्ट पोषक आहे?

*(अ) राष्ट्रीयता (ब) बहुसांस्कृतिकता (क) विविधतेतील एकता (ड) यापैकी नाही.*

- **उत्तरे :-**

१. *(ब) अर्थव्यवस्था.*

२. *(अ) गॅट.*

३. *(ब) वैश्विकीकरण.*

४. *(क) मानववंशशास्त्र.*

५. *(अ) राल्फ लिंटन.*

६. *(ब) भालचंद्र नेमाडे.*

७. *(ब) १९९०.*

८. *(अ) अमेरिका.*

९. *(ब) आनंद पाटील.*

१०. *(ब) बहुसांस्कृतिकता.*

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न.

१. जागतिकीकरणाची संकल्पना सांगून तौलनिक साहित्याभ्यासातील तिचे महत्त्व विशद करा.

२. देशीवाद म्हणजे काय ते सांगून तौलनिक साहित्याभ्यासात त्याचा कसा उपयोग होऊ शकतो ते लिहा.

३. संस्कृतिअभ्यास ही संज्ञा व संकल्पना सविस्तर स्पष्ट करा.

४. संस्कृतिअभ्यास आणि तौलनिक साहित्याभ्यास परस्परसंबंध स्पष्ट करा.

**ब) लघुत्तरी प्रश्न.**

१. जागतिकीकरण म्हणजे काय ते थोडक्यात स्पष्ट करा.

२. देशीवाद ही संज्ञा स्पष्ट करा.

३. संस्कृतिअभ्यास ही संकल्पना सांगा.

४. तौलनिक संस्कृतिअभ्यास याविषयी माहिती सांगा.

## ४.७ अधिक वाचन

१. **पाटील, आनंद** (१९९८) : *''तौलनिक साहित्य : नवे सिद्धांत आणि उपयोजन''*, साकेत प्रकाशन प्रा. लि., औरंगाबाद.

२. **नेमाडे, भालचंद्र** (१९९०) : *''टीकास्वयंवर''*, साकेत प्रकाशन प्रा. लि., औरंगाबाद.

३. **मिरजकर, निशिकांत** (२०१६) : *''तौलनिक साहित्य''*, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

८. **कांबळे, उत्तम** (२००९) : *''जागतिकीकरणात मराठी कविता''*, परचुरे प्रकाशन, मुंबई.

## ४.८ उपक्रम

१. तुमच्या आवडत्या लेखकाच्या कलाकृतीतील देशीयता शोधा आणि तुमच्या शब्दात सविस्तर लिहा.

## ४.८ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ

१. **कांबळे, उत्तम (संपादक) :** *''जागतिकीकरणात मराठी कविता''*, परचुरे प्रकाशन, पृ.७, २००९.

२. **मिरजकर, निशिकांत :** *''तौलनिक साहित्य''*, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृष्ठ २८३.

३. **नेमाडे, भालचंद्र :** *''टीका स्वयंवर : औरंगाबाद''*, तिसरी आवृत्ती, २०१५, साकेत प्रकाशन प्रा.लि., पृष्ठ १०४, १०५.

४. **बापट, वसंत :** *''तौलनिक साहित्याभ्यास'',* मौज प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९८१.

५. **तत्रैव :** पृष्ठ १०८.

६. **तत्रैव :** पृष्ठ ११०.

७. **पाटील, आनंद :** *''तौलनिक साहित्य : नवे सिद्धांत आणि उपयोजन'',* औरंगाबाद : पृष्ठ ३३७, १९९८.

८. **तत्रैव :** पृष्ठ ३३१.

९. **मिरजकर, उ. नि. :** पृष्ठ २७६, २७७, २७८, २७९.

❑❑❑